शनिवार
१४
फेब्रुवारी २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३४०
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत



आयसीसीने नबीच्या खिशाला लावली कात्री
(पान ७ वर)

## थोडक्यात

### अरावली पर्वताला स्पर्श करु दिला जाणार नाही!

**नवी दिल्ली :** अरावली पर्वताची मान्यता केंद्र शासनाने रद्द केल्यानंतर विरोधात सुप्रिम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. गुरुवारी एका प्रकरणाची सुनावणी झाली. आज सुप्रीम कोर्टाने हरियाणा सरकारला अरावली पर्वत रांगेवर प्रस्तावित जंगल सफारी प्रकल्पाची विस्तृत योजना सादर करण्याची परवानगी नाकारली. यावेळी कोर्टाने स्पष्ट म्हटले की, अरावली रांगेची स्पष्ट वैज्ञानिक परिभाषा अस्तित्वात येईपर्यंत कोणत्याही प्रकल्पास परवानगी देणार नाही तसेच तोपर्यंत अरावली पर्वताला तोपर्यंत कोणालाही स्पर्श करत येणार नाही असे स्पष्ट शब्दांत हरियाणा सरकाला सुनावले.

### विद्यार्थिनीवर थारमध्ये सामूहिक लैंगिक अत्याचार

**भोपाळ :** मध्य प्रदेशची राजधानी भोपाळमध्ये एका ११ वीच्या वर्गात शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर चार वेगवेगळ्या कारमध्ये सामूहिक बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. नराधमांनी केवळ अत्याचारच केला नाही, तर त्याचे चित्रीकरण करून पीडितेकडे खंडणीची मागणी करत तिला वारंवार ब्लॅकमेल केले. याप्रकरणी पोलिसांनी थारसह चार वाहने जप्त केली असून मुख्य आरोपीसह त्याच्या साथीदाराला बेड्या ठोकल्या आहेत.

### शेतकऱ्यांना पीएम किसानचा हप्ता मिळणार नाही

**नवी दिल्ली :** मंत्रालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, देशभरातील ३,०१८,३६१ शेतकऱ्यांची बँक खाती ६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत त्यांच्या आधारशी लिंक केलेली नाहीत. या शेतकऱ्यांच्या खात्यात पंतप्रधान किसान योजनेचा २२ वा हप्ता जमा होणार नाही. तुमचे बँक खाते आधारशी लिंक करणे अनिवार्य आहे, अन्यथा तुम्हाला पीएम किसान योजनेचा २२ वा हप्ता मिळणार नाही. मंत्रालयाने शेतकऱ्यांची राज्यवार यादी जारी केली आहे. यादीनुसार, सर्वाधिक उत्तर प्रदेशातील सुमारे १० लाख शेतकऱ्यांची बँक खाती आधारशी लिंक केलेली नाहीत. तर महाराष्ट्रातील १,७२,३४८ शेतकऱ्यांनी आधार लिंक केलेले नाही.

### पंतप्रधानांच्या हस्ते सेवा तीर्थचे उद्घाटन

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (१३ फेब्रुवारी) अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या सेवा तीर्थ संकुलाचे उद्घाटन केले. या संकुलामध्ये पंतप्रधान कार्यालयासह (पीएमओ) राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबिनेट सचिवालय देखील आहे. नवीन संकुलात सेवा तीर्थच्या फलकाचे मोदींनी आज अनावरण केले. या संकुलाच्या भिंतीवर देवनागरी लिपीत नावे लिहिली असून त्याखाली नागरिक देवो भव (नागरिक देवासारखे आहे) हे ब्रीदवाक्य कोरलेले आहे. पंतप्रधान कार्यालय रायसीना हिलवरील साउथ ब्लॉकमधून सेवा तीर्थ येथे हलवले जाईल, ज्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणी असलेली कॅबिनेट सचिवालय आणि राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयाची कार्यालये एकत्र येतील. या इमारतींची रचना ४-स्टार मानकांनुसार केली आहे आणि त्यात अक्षय ऊर्जा प्रणाली, जलसंवर्धन उपाय आणि डिजिटली एकात्मिक कार्यालये समाविष्ट आहेत. मोदींनी नवीन इमारतीचे उद्घाटन केले तेव्हा गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल, पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री जितेंद्र सिंह आणि पंतप्रधान कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते. २०१४ पासून, मोदी सरकारने भारताच्या वसाहतवादी भूतकाळातील प्रतीकांपासून दूर जाण्यासाठी आणि मानसिकतेत बदल घडवून आणण्यासाठी सातत्याने पावले उचलली आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यांनी निदर्शनास आणून दिले की पंतप्रधान कार्यालयाला आता सेवा तीर्थ असे नाव देण्यात येईल, केंद्रीय सचिवालयाच्या इमारतींना कर्तव्य भवन असे नाव देण्यात आले आहे आणि राजपथाचे कर्तव्य पथ असे नाव देण्यात आले आहे. त्याच भावनेने, पंतप्रधानांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या रेसकोर्स रोडचे नाव बदलून लोक कल्याण मार्ग आणि राजभवन आणि राज निवास यांचे नाव अनुक्रमे लोकभवन आणि लोकनिवास असे करण्यात आले आहे.

# एपस्टीन फाइल्सवरून संसदेत गदारोळ!

## केंद्रीय मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी - दोन्ही सभागृहे ९ मार्चपर्यंत स्थगित

नवी दिल्ली, दि. १३ वृत्तसंस्था

**जेफरी एपस्टीन प्रकरणाशी संबंधित कथित 'एपस्टीन फाइल्स'वरून शुक्रवारी संसदेच्या दोन्ही सभागृहात जोरदार गदारोळ पाहायला मिळाला. विरोधी पक्षांनी या मुद्द्यावरून केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली. या गदारोळामुळे लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांचे कामकाज ९ मार्चपर्यंत स्थगित करण्यात आले असून, यासोबतच अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. आता होळीनंतर १० मार्चपासून संसदेचे कामकाज पुन्हा सुरू होईल.**



शुक्रवारी सकाळी ११ वाजता लोकसभेचे कामकाज सुरू होताच विरोधी पक्षाच्या सदस्यांनी 'एपस्टीन फाइल्स'चा मुद्दा उपस्थित करत घोषणाबाजी सुरू केली. केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी आणि जेफरी एपस्टीन यांच्यात कथित संभाषण झाल्याचा दावा करत काँग्रेससह इतर विरोधी पक्षांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. सभागृहाचे कामकाज सुरू होण्यापूर्वी विरोधकांनी संसद परिसराबाहेरही निदर्शने केली होती.

### १० मार्चला पुन्हा रणकंदन?

गदारोळ थांबत नसल्याचे पाहून पीठासीन अधिकारी संध्या राय यांनी लोकसभेचे कामकाज ९ मार्चपर्यंत स्थगित केले. तत्पूर्वी, काही मंत्र्यांनी आपल्या मंत्रालयाशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे सभागृहासमोर ठेवली. राज्यसभेचे कामकाजही शुक्रवारी ९ मार्चपर्यंत स्थगित करण्यात आले. आता १० मार्चला जेव्हा दोन्ही सभागृहे पुन्हा भरतील, तेव्हा एपस्टीन प्रकरणावरून विरोधक पुन्हा सरकारला घेरण्याची शक्यता आहे.

दरम्यान, हरदीप सिंह पुरी यांनी विरोधकांचे हे सर्व दावे पूर्णपणे फेटाळून लावले आहेत.

गदारोळादरम्यान काँग्रेस खासदार उज्ज्वल रमन सिंह यांनी 'कोडीन सिरप'च्या सेवनामुळे झालेल्या कथित मृत्यूंचा मुद्दा उपस्थित केला. उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशातील मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत द्यावी आणि या प्रकरणाची सीबीआय चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली. या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा म्हणाले की, कोडीन सिरपमुळे कोणताही मृत्यू झालेला नाही, त्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

## चांदीच्या किमतीत मोठी घसरण, ४.२० लाख रुपयांवरून २.५० लाख रुपये प्रति किलो!

मुंबई, दि. १३ वृत्तसंस्था



विक्रमी उच्चांक गाठल्यानंतर चांदीच्या किमतीत आता लक्षणीय घसरण होत आहे, ज्यामुळे गुंतवणूकदारांची चिंता वाढत आहे. मल्टी कमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया वर चांदी सुमारे ₹२.५ लाख प्रति किलोवर घसरली आहे.

यापूर्वी, ती ₹४.२० लाख प्रति किलोच्या ऐतिहासिक उच्चांकावर पोहोचली होती. त्या विक्रमी उच्चांकापासून, नफा-वसुली आणि जागतिक दबावामुळे किमती घसरत आहेत. सध्या, ती ₹२.३० लाख ते ₹२.७० लाख प्रति किलोच्या श्रेणीत व्यवहार करत आहे. गुंतवणूकदारांच्या मनात सर्वात मोठा प्रश्न आहे की, चांदीच्या किमती आणखी कमी होतील की त्या पुन्हा वाढू शकतील. अलिकडच्या घसरणीमागे अनेक प्रमुख कारणे आहेत. अमेरिकेतील मजबूत आर्थिक आकडेवारीमुळे लवकरच व्याजदर कपातीची शक्यता कमी झाली आहे. जेव्हा दर कपातीची अपेक्षा कमी होते तेव्हा डॉलर मजबूत होतो. डॉलर मजबूत झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात चांदी महाग होते, कारण त्याची किंमत डॉलरमध्ये दर्शविली जाते. याचा जागतिक मागणीवर परिणाम होतो आणि किमतींवर दबाव येतो. विक्रमी उच्चांक गाठल्यानंतर, मोठे गुंतवणूकदार आणि व्यापाऱ्यांनी नफा बुक करण्यास सुरुवात केली. जेव्हा मोठ्या प्रमाणात विक्री होते तेव्हा किमतींमध्ये मोठी घसरण होते. (पान २ वर)

# राष्ट्रवादी विलीनीकरणाचा मुद्दा ऐरणीवर!

* प्रस्ताव आल्यास भाजपला विश्वासात घेणे अनिवार्य - सुनील तटकरे
* पटेल, तटकरे यांना खलनायक का ठरवले जात आहे? - हसन मुश्रीफ



मुंबई, दि. १३ वृत्तसंस्था

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेमुळे राज्यातील राजकारण तापले असताना, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी भूमिका स्पष्ट करत, कोणताही विलीनीकरणाचा प्रस्ताव समोर आल्यास भाजपला विश्वासात घेणे अनिवार्य असल्याचे सांगितले. तसेच, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केलेल्या दाव्याचाही त्यांनी तीव्र शब्दांत समाचार घेतला.

विलीनीकरणाच्या शक्यतेवर पत्रकारांशी बोलताना तटकरे म्हणाले की, विलीनीकरणाबाबत कोणताही प्रस्ताव किंवा विचार समोर आला, तर त्यावर पक्षपातळीवर चर्चा होईल. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पक्षाचे वरिष्ठ नेते त्यावर विचार करतील. मात्र, आम्ही एनडीएचा घटक पक्ष आहोत आणि एनडीएचा मुख्य पक्ष भाजप आहे. त्यामुळे कोणताही मोठा निर्णय घेताना भाजपला विश्वासात घेणे आवश्यक आहे. २०२३ मध्ये एनडीएमध्ये सहभागी होताना भाजपची अनुमती घेतल्याची आठवण करून देत, भविष्यातही आघाडीतील मुख्य पक्षाशी चर्चा करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदेंनी केलेले विधान अत्यंत गैर आहे. अजितदादांच्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर अशा प्रकारचे लिखाण करणे अनाठायी आहे. दादांनी घेतलेले निर्णय स्वच्छ मनाने आणि पक्षाच्या हितासाठीच होते. आता असे लिहून ते नेमके काय साध्य करू इच्छितात, त्यांचा हेतू काय आहे, हे समजत नाही. अजित पवार यांची भाजपबाबतची भूमिका पूर्वीपासूनच स्पष्ट होती, असा पुनरुच्चार करत तटकरे यांनी सांगितले की, २०१४, २०१६ आणि २०१७ मध्येही भाजपसोबत चर्चेचे प्रयत्न अंतिम टप्प्यात आले होते. २०१९ मध्येही भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार राज्याला स्थिरता देऊ शकते, असे मत अजित पवारांनी स्पष्टपणे मांडले होते. त्यांनी ही भूमिका कधीही लपवून ठेवली नव्हती, असेही तटकरे यांनी नमूद केले.

### शशिकांत शिंदे यांचा दावा



शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी पक्षाच्या मुखपत्रात लिहिलेल्या लेखात, अदृश्य शक्तींच्या कारवाया, धमक्या आणि खोट्या षडयंत्रांमुळे अजित पवारांना राष्ट्रवादीतून बाहेर पडून वेगळा गट स्थापन करावा लागल्याचा दावा केला होता. तसेच, झालेली चूक दुरुस्त करण्याच्या उद्देशाने ते मागील काही महिन्यांपासून प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले होते.

### आमच्या पक्षामध्ये कोणीही लुडबूड करू नये - मुश्रीफ



**कोल्हापूर :** बारामती विमान अपघाताबाबत अनेक नेत्यांनी संशय घेतला आहे. या संदर्भात आमदार रोहित पवार यांनी दोन वेळा पत्रकार परिषद घेत कारवाईची मागणी केली आहे. याबाबत आता राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी देखील या अपघाताची पूर्ण सखोल चौकशी केली जाईल असे कोल्हापूरमधील अजित पवारांच्या समर्थकांना आश्वस्त केले आहे. हसन मुश्रीफ म्हणाले की, आमदार रोहित पवार यांनी अजितदादा यांच्या विमान अपघाताबाबत काही प्रश्न उपस्थित केले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच सांगितले होते की लोकांच्या मनातील शंका दूर झाल्या पाहिजेत. जे आक्षेप घेतले गेले आहेत, त्यांची सखोल चौकशी राज्य शासन करेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. अजितदादांच्या अपघातामुळे जसे रोहित पवारांना दुःख झाले आहे, त्यापेक्षा जास्त दुःख आम्हाला झाले आहे, असे हसन मुश्रीफ म्हणाले आहेत. मुश्रीफ म्हणाले की, प्रफुल्ल पटेल हे पवार साहेबांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष आहेत आणि आजही ते कार्याध्यक्ष आहेत. सुनेत्रा वहिनी यांची राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्यानंतरही प्रफुल्ल पटेल कार्याध्यक्ष म्हणून राहणार आहेत. सुनील तटकरे हे राज्याचे प्रदेशाध्यक्ष आहेत.

## लीलावती रुग्णालय प्रकरणाची सखोल चौकशी करा : अनिल देशमुख यांची मागणी

मुंबई, दि. १३ वृत्तसंस्था

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्या कथित भ्रष्ट कारनाम्यांवरून महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आज मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत परमबीर सिंग यांच्यावर जोरदार टीका केली.

अनिल देशमुख म्हणाले की, मी गृहमंत्री असताना परमबीर सिंग यांनी माझ्यावर खोटे आरोप करून मला बदनाम करण्याचा कट रचला होता. मात्र आता त्यांचे भ्रष्टाचाराचे प्रकार एकामागून एक उघड होत आहेत. मुंबईतील प्रसिद्ध लीलावती रुग्णालय प्रशासनाने त्यांना अपमानास्पद पद्धतीने पदावरून काढून टाकल्याने त्यांचे खरे स्वरूप जनतेसमोर आले आहे. रुग्णालयातील ट्रस्टी आणि डॉक्टरांनी परमबीर सिंग (पान २ वर)

## बांगलादेशची सत्ता तारिक रहमान यांच्या हाती!

### बीएनपीला दोन तृतीयांश बहुमत, जमात-ए-इस्लामीचा सुपडा साफ

ढाका, दि. १३ वृत्तसंस्था

बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) १३ व्या सार्वत्रिक निवडणुकीत बहुमताचा आकडा ओलांडला आहे. या विजयानंतर २० वर्षांच्या सत्तेच्या प्रतीक्षेचा अंत करत पुढील सरकार स्थापन करण्यास सज्ज झाली आहे. अशांत देशाच्या राजकीय दिशेने मोठा बदल घडवून आणणारा हा एक महत्त्वाचा जनादेश आहे.



तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने २००१ मध्ये शेवटची निवडणूक जिंकली होती. मतमोजणीच्या ट्रेंडमध्ये प्रचंड विजय दिसून येत असल्याने पक्षाने आज विजयाची घोषणा केली आणि दोन दशकांनंतर पुन्हा सत्तेत येण्याची खात्री पटली. दरम्यान, जमात-ए-इस्लामीला मोठा धक्का बसला, निकालांची संथ गती असूनही ते दुहेरी अंकी जागांपर्यंत मर्यादित राहिले. स्थानिक माध्यमांनी वृत्त दिले की सकाळी झालेल्या मतदानात बीएनपी आघाडीने २०९ जागा जिंकल्या. बीएनपीच्या कामगिरीमुळे साध्या बहुमतासाठी आवश्यक असलेल्या १५१ जागांच्या मर्यादेच्या पुढे गेला, ज्यामुळे पक्ष पुढील सरकार स्थापन करण्यासाठी मजबूत स्थितीत आला. अनेक मतदारसंघांमध्ये मतमोजणी सुरूच राहिली, परंतु एकूण ट्रेंडमध्ये अंतिम संख्येत मोठा बदल होण्याची शक्यता कमी असल्याचे दिसून आले. सकाळी ४ वाजेपर्यंत, जमात-ए-इस्लामीने ५६ जागा जिंकल्या होत्या. बांगलादेशच्या जनमत चाचणीच्या अनधिकृत निकालांमध्ये जुलै चार्टरला जनतेचा मोठा पाठिंबा असल्याचे दिसून आले, जो २०२४ च्या उठावामुळे निर्माण झालेला एक सुधारणा दस्तऐवज आहे जो मोठ्या घटनात्मक बदलांचा प्रस्ताव देतो. स्थानिक माध्यमांनुसार, निवडणुकीदरम्यान (पान २ वर)




पाचवीचा कार्यक्रम

आपणास कळविण्यात अत्यंत दुःख वाटत आहे की, शारी गावातील प्रतिष्ठित नागरिक व कृषी उत्पन्न बाजार समीतीचे (पं.स) माजी सभापती मा.श्री.जीवनभाऊ जाधव यांच्या अर्धांगिनी स्व. सावित्रीबाई जीवन जाधव यांचे सोमवार दि. ०९/०२/२०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना..!

पाचवीचा कार्यक्रम आज दि. शनिवार १४/०२/२०२६ रोजी करण्याचे ठरविले आहे.

--- : शोकाकुल :---

* केशव जीवन जाधव * मधुकर जीवन जाधव * राजेश शेषराव जाधव
* बंटी ऊर्फ नितेश शेषराव जाधव * निलेश हेमसिंग जाधव
* इंकेश शेषराव जाधव व समस्त जाधव परिवार शारी, (वाईगौळ)

स्थळ : आमचे राहते घरी शारी ता.आर्णी जि.यवतमाळ



# पान 1 वरून...

## चांदीच्या किमतीत मोठी घसरण...

आंतरराष्ट्रीय बाजारात कॉमेक्स चांदीच्या किमती १२१ डॉलरच्या विक्रमी उच्चांकावर पोहोचल्यानंतर झपाट्याने घसरल्या. याचा थेट परिणाम भारतीय बाजारातील भावनेवर झाला. बाजारातील तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की मजबूत डॉलर आणि जागतिक अनिश्चिततेमुळे चांदी अल्पावधीत दबावाखाली राहू शकते. दीर्घकाळात, चांदीची औद्योगिक मागणी (विशेषतः सौर आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात) मजबूत राहण्याची अपेक्षा आहे, जी किमतींना आधार देऊ शकते. मात्र, अलिकडच्या काळात झालेली घसरण सरासरीपेक्षा जास्त आहे, जी दर्शवते की बाजार सध्या अस्थिर काळ अनुभवत आहे. गुंतवणूकदारांनी सावध राहण्याची आणि दीर्घकालीन रणनीती आखण्याची ही वेळ असू शकते.

## लीलावती रुग्णालय प्रकरणाची ...

यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, डॉक्टरांना बढती देण्यासाठी प्रत्येकी २५ लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. या आर्थिक गैरव्यवहारांमुळेच रुग्णालय प्रशासनाने त्यांची हकालपट्टी केल्याचे सांगितले जात आहे.

**अँटिलिया प्रकरणातही दिशाभूल :** अनिल देशमुख यांनी अँटिलिया प्रकरणाचाही उल्लेख केला. मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाबाहेर स्फोटक सापडल्याप्रकरणी तपासात दिशाभूल होत असल्याने तपास परमबीर सिंग यांच्याकडून काढून एटीएस कडे देण्यात आला होता. एटीएसच्या तपासात त्यांच्यावर संशयाची सुई फिरली होती, असेही देशमुख म्हणाले. शेवटी बडतर्फी टाळण्यासाठी परमबीर सिंग यांनी माझ्यावर १०० कोटींचे खोटे आरोप केल्याचा दावा करत, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी अनिल देशमुख यांनी केली.

## बांगलादेशची सत्ता तारिक ...

बांगलादेशच्या अनेक भागात हिंसाचाराच्या घटना घडल्या. मतदानाशी संबंधित संघर्षात ७० हून अधिक लोक जखमी झाल्याची नोंद आहे. बांगलादेशी वृत्तपत्र द डेली स्टारने वृत्त दिले. १४ वेगवेगळ्या घटनांमध्ये सुमारे ७२ लोक जखमी झाले आहेत, त्यापैकी अनेक घटना मतदान केंद्रांजवळ किंवा आत घडल्या आहेत. अशांततेसंदर्भात पोलिसांनी किमान नऊ जणांना ताब्यात घेतले आहे. नोआखाली जिल्ह्यातील हटिया येथे सर्वात वाईट हिंसाचार घडला, जिथे बीएनपी आणि नॅशनल सिटीझन पार्टीच्या समर्थकांमध्ये झालेल्या संघर्षात ३१ जण जखमी झाले. मतदान सकाळी ७:३० वाजता सुरू झाले आणि नऊ तास अखंडपणे सुरू राहिले. मतदारांनी दोन स्वतंत्र मतपत्रिका वापरल्या एक संसदीय निवडणुकीसाठी आणि दुसरी जनमत चाचणीसाठी जी देशभरातील ४२,६५९ मतदान केंद्रांवर पारदर्शक मतपेट्यांमध्ये ठेवण्यात आली होती. देशातील ३०० मतदारसंघांपैकी २९९ मतदारसंघांमध्ये निवडणुका घेण्यात आल्या. संसदीय उमेदवाराच्या मृत्यूमुळे शेरपूर-३ मध्ये मतदान पुढे ढकलण्यात आले. बांगलादेश निवडणूक आयोगाच्या मते, देशभरात ६०.६९ टक्के मतदान झाले, पोस्टल मतपत्रिकेचा वापर ८०.११ टक्के होता आणि एकूण वैध मतदानाचा दर ७०.२५ टक्के होता. २००८ च्या संसदीय निवडणुकीनंतर ही पहिलीच शांततापूर्ण आणि आनंदी निवडणूक असल्याचे अनेक मतदारांनी सांगितले. मतमोजणी सुरू असताना, जमात-ए-इस्लामी बांगलादेशचे प्रमुख शफीकुर रहमान यांनी सांगितले की त्यांचा पक्ष स्वतःच्या फायद्यासाठी ''विरोधी राजकारणात'' सहभागी होणार नाही, मतमोजणी सुरू असताना निवडणूक निकाल स्वीकारण्याचा त्यांचा हेतू दर्शवितो. त्यांनी पत्रकारांना सांगितले, ''आम्ही सकारात्मक राजकारण करू. देशभरात सुरक्षा कडेकोट करण्यात आली होती, अनेक मतदान केंद्रांवर लष्कराचे जवान तैनात होते आणि प्रमुख शहरांमध्ये पोलिसांची गस्त दिसून येत होती. मतदान केंद्रांजवळील मतदान केंद्रांसह बहुतेक मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले होते. तथापि, काही ठिकाणी, कम्पार्टमेंटमध्ये कॅमेरे नव्हते. निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले की वाढलेली सुरक्षा आणि देखरेख यामुळे मतदारांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. निवडणुकीशी संबंधित हिंसाचारात कोणत्याही मृत्यूची नोंद अधिकाऱ्यांनी केली नाही. सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सशस्त्र दल, सीमा रक्षक बांगलादेश आणि पोलिसांचे सुमारे १० लाख कर्मचारी तैनात करण्यात आले होते. २०२४ च्या राजकीय गोंधळानंतर आणि तीन दशकांत पहिल्यांदाच अवामी लीग मतपत्रिकेतून अनुपस्थित राहिल्यानंतर बांगलादेशमधील ही निवडणूक पहिली राष्ट्रीय निवडणूक होती.

# पोहरादेवी येथे आज संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव

## समाज बांधवांना उपस्थित राहण्याचे ना. राठोड यांचे आवाहन

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १३ :** बंजारा काशी तीर्थक्षेत्र पोहरादेवी (जि. वाशीम) संत नगरीत श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव उद्या, शनिवारी, दि. १४ फेब्रुवारी २०२६रोजी शनिवारी पर्यटन विभाग, महाराष्ट्र राज्य, बंजारा विरासत संघाच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार हे उपस्थित राहणार आहेत. संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील गोर बंजारा समाजबांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निमंत्रक महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री लोकनेते ना. संजय राठोड यांनी केले आहे.

'जय सेवालाल बोलो, पोहरागड चालो,' असा नारा ना. संजय राठोड यांनी दिला आहे. यावेळी



बंजारा काशी तीर्थक्षेत्र पोहरादेवीत श्री संत सेवालाल महाराज जयंती महोत्सव उद्घाटन व सेवा रत्न पुरस्कार सोहळा मान्यवरांच्या हस्ते लाखो सेवा भक्तांच्या साक्षीने पार पडणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार, मृदू व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई, कृषिमंत्री तथा वाशीम



जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रेय भरणे, पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक हे उपस्थित राहणार आहेत. शुभाशीर्वाद देण्यासाठी धर्मगुरू महंत तथा आमदार श्री. बाबूसिंग महाराज, धर्मगुरू महंत श्री. कबीरदास महाराज यांची उपस्थिती राहील. त्याच बरोबर यवतमाळ-वाशीम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख, विधान परिषद सदस्य श्रीमती भावना गवळी, विधान परिषद सदस्य राजेश राठोड, विधानसभा सदस्य तुषार राठोड, विधानसभा सदस्य श्रीमती सई प्रकाश डहाके, पदवीधर मतदारसंघाचे विधान परिषद सदस्य धीरज लिंगाडे, शिक्षक मतदारसंघाचे विधान परिषद सदस्य किरण सरनाईक, माजी खासदार हरिभाऊ राठोड, माजी आमदार नीलय नाईक , वाशीमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, वाशीम जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे, वाशीमचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विशेष उपस्थितीमध्ये महंत जितेंद्र महाराज, महंत सुनील महाराज, महंत यशवंत महाराज, महंत शेखर महाराज, महंत गोपाल महाराज आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दुपारी १ वाजता पोहरादेवीच्या संतनगरीत आगमन होणार असून आदिमाया शक्ती देवी जगदंबा, जगत्गुरू संत सेवालाल महाराज आणि महान तपस्वी संत डॉ. रामराव बापू यांच्या समाधिस्थळी दर्शन घेऊन श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव साजरा करण्यासाठी मान्यवरांसह हजेरी लावणार आहेत. उद्या, शनिवारी दि. १४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते १ वाजतापर्यंत संत सेवालाल महाराज प्रांगणात सेवा प्रसाद वाटप, दुपारी ४.३० ते ६ अल्पोपहार, रात्री ९ वाजता सेवा प्रसाद वाटप तसेच भजन कीर्तन कार्यक्रम, यावेळी सकाळच्या सुमारास 'जातेन हातेम लेन चालो सेवालाल तू ' या बंजारा गीतासह विविध गीते गायन करून घराघरांत पोहचलेल्या गायिका मंगली यांचा गाण्यांचा बहारदार कार्यक्रम पार पडणार आहे. सायंकाळी ६ ते रात्री ८ वाजता 'टकटक देखरो सावरिया'बंजारा गीतासह गुलाबी साडी गाणी गाणारा तरुण गायक संजू राठोड यांच्या गाण्याचा बहारदार कार्यक्रमासह लेझर शो, ड्रॉइंग शो आणि फायर शो साजरा होणार आहे. या सोहळ्याला राज्यभरातील गोर बंजारा समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक पर्यटन विभाग, महाराष्ट्र राज्य, बंजारा विरासत संघ व निमंत्रक राज्याचे मृदू व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी केले आहे.

## पंजाबराव कृषी विद्यापीठ महाशिवरात्रि निमित्ताने शिवपूजन

**अकोला:** येणाऱ्या १५ फेब्रुवारी रोजी रविवार महाशिवरात्रीच्या निमित्ताने शिवपूजनाचा फार मोठा समारंभ आयोजित केला असून त्यासाठी पंजाबराव कृषी विद्यापीठाचे प्रांगण या ठिकाणी भव्य मंडपाची उभारणी केली आहे. संपूर्ण विदर्भातील ११ जिल्ह्यातील सहयोगातील साधक शिवपूजनाचा लाभ घेण्यासाठी अकोला येथील श्री राज राजेश्वर नगरीमध्ये मोठ्या संख्येने येत आहेत. या कार्यक्रस्ममीमासाठी अकोला जिल्ह्याचे खासदार सन्माननीय श्री अनुपजी धोत्रे आमदार श्री रणधीर सावरकर व डॉक्टर पंजाबराव कृषी विद्यापीठाचे कुलगुरू माननीय श्री शरद जी गडाख साहेब उपस्थित राहणार आहेत. परमपूज्य माताजी श्री निर्मला देवी यांनी सहज योगाची निर्मिती १९७० सालापासून केली असून महाराष्ट्र मध्ये जवळपास ११०० ध्यान केंद्रे निशुल्क कार्यरत आहेत.

## नक्षी येथे रविवारी विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा

**नागपूर, दि. १३ :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार उच्च न्यायालय विधी सेवा उप-समिती, नागपूर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपूर, जिल्हा प्रशासन नागपूर व तालुका विधी सेवा समिती भिवापूर यांच्या संयुक्त विद्यमाने नक्षी (ता. भिवापूर) येथे रविवारी (ता.१५) सकाळी ११ वाजता विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. या महाशिबिराचे उद्घाटन न्यायमूर्ती अनिल सत्यविजय किलोर, प्रशासकीय न्यायमूर्ती, उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ तथा पालक न्यायमूर्ती, जिल्हा नागपूर यांच्या हस्ते होणार आहे.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला**
मुर्तिजापूर रोड, अकोला ४४४००१
वेब पत्ता : mjp.maharashtra.gov.in
ई-मेल : eemjpda@rediffmail.com

जा.क्र./निविदा/४०६/२०२६
**निविदा सुचना** दिनांक : १२/०२/२०२६

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला या कार्यालयाकडून खालील निविदा सुचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | निविदा सुचना क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजीत किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | क्रमांक ७३ सन २०२५-२६ | लंघापूर व ५७ खेडी प्रादे. पा.पु. योजना देखभाल व दुरुस्ती अंतर्गत म.जी.प्रा. उपविभाग, मुर्तिजापूर कार्यालयातील दैनंदिन कामासाठी डेटा एंट्री ऑपरेटर व कुशल मनुष्यबळ पुरविणे. | रु. २,८६,७२८/- |
| २ | क्रमांक ७४ सन २०२५-२६ | ईमारत देखभाल व दुरुस्ती अंतर्गत म.जी.प्रा. उपविभाग, मुर्तिजापूर कार्यालयाच्या आवाज भिंतीला कलरींग व किरकोळ दुरुस्ती करणे | रु. ८,४४,४४५/- |

या उपरोक्त सर्व कामांची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडून दि. १३/०२/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर निविदेचा विक्री कालावधी दि. १३/०२/२६ ते २०/०२/२६ असा असून निविदा भरून सादर करण्याचा दि. २३/०२/२६ दु. ३.०० वाजेपर्यंतचा आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. १३.०२.२०२६ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला येथील निविदा शाखेत पाहण्यास नि:शुल्क उपलब्ध आहेत.

**कार्यकारी अभियंता**
म.जी.प्रा. विभाग, अकोला.

**जाहीर नोटीस**
**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**
एम.जे.सी.क्र.४९/२०२६ प्रोसेस क्र. ६२३/२०२६
चौ. ता.२३/०३/२०२६ दिनांक १०/०२/२०२६

अर्जदार : १. पुर्णाजी गोपाळराव दहीहांडेकर, वय ७७ वर्षे, धंदा. मजुरी रा. पिंप्री डिक्कर, पोस्ट. देवरी, ता. अकोट जि. अकोला
२. सौ. पुष्पा गजानन बोपुलकर, वय ४८ वर्षे, धंदा. घरकाम रा. तुरखेड, ता. अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती
...विरुद्ध....
गैरअर्जदार : कोणीही नाही.

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील पत्यावरील कायम रहिवासी असून अर्जदार कं. १ व २ चे वडील नामे गोपाळराव हरीचंद्र दहीहांडेकर हे दि. ११/११/२०१४ रोजी पिंप्री डिक्कर, पोस्ट. देवरी ता. अकोट जि. अकोला येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदारांची आई व मयत गोपाळराव हरीचंद्र दहीहांडेकर यांची पत्नी नामे वच्छलाबाई गोपाळराव दहीहांडेकर ह्या दि. १३/१०/२००८ रोजी पिंप्री डिक्कर, पोस्ट. देवरी ता. अकोट जि. अकोला येथे मयत झाल्या आहे व अर्जदाराचे आईवडीलांचा अंत्यसंस्कार सुद्धा मौजे पिंप्री डिक्कर, पोस्ट. देवरी ता. अकोट जि. अकोला येथे झाला आहे. तसेच मयत गोपाळराव हरीचंद्र दहीहांडेकर यांची आई नामे जनाबाई हरीचंद्र दहीहांडेकर ह्या बरेच वर्षापुर्वी मयत झाल्या आहेत. मयत गोपाळराव हरीचंद्र दहीहांडेकर व मयत वच्छलाबाई गोपाळराव दहीहांडेकर यांना अर्जदार कं. १ व २ यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाही.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायालयात स्वतः अथवा वकिलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानुसार निकाली काढण्यात येईल.करीता आज दिनांक १०/०२/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार,
सहायक अधिक्षक (न्यायीक) दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट,
जि. अकोला.

**जाहीर नोटीस**
**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**
एम.जे.सी.क्र.३४/२०२६ प्रोसेस क्र. ६२५/२०२६
चौ. ता.१६/०३/२०२६ दिनांक १०/०२/२०२६

अर्जदार : भिमराव विठ्ठल आठवले, वय ८० वर्षे, धंदा. शेती रा. रौंदळा, ता. अकोट जि. अकोला ..विरूध्द..
गैरअर्जदार :कोणीही नाही.

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे. अर्जदार कं. १ चे वडील नामे विठ्ठल बापुना आठवले हे कायमचे रौंदळा येथील रहिवासी होते. ते दि. २९/०९/१९९० रोजी रौंदळा येथे मयत झाले. तसेच अर्जदाराची आई नामे सोनाबाई विठ्ठल आठवले ही सुध्दा रौंदळा येथील रहिवासी असुन तो दि.०५/१०/२०१९ रोजी रौंदळा येथे मयत झाली. त्यांना अर्जदार हा एकटाच मुलगा आहे. मुलगी नव्हती, मयत विठ्ठल बापुना आठवले यांची आई ही अर्जदाराचे वडीलांचे आधी मयत झाली आहे. अश्या प्रकारे मयत विठ्ठल व सोनाबाई आठवले यांना अर्जदार हा एकमेव वारस आहे. त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानुसार निकाली काढण्यात येईल करीता आज दिनांक १०/०२/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले

आदेशानुसार,
सहायक अधिक्षक (न्यायीक) दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट,
जि. अकोला.

**जाहीर नोटीस**
**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**
एम.जे.सी.क्र.४७/२०२६ प्रोसेस क्र. ६२४/२०२६
चौ. ता.२३/०३/२०२६ दिनांक १०/०२/२०२६

अर्जदार : ज्ञानेश्वर रामरतन भगत, वय ४५ वर्षे, धंदा. शेती रा. ठोकबर्डी (जौलखेड बु.). ता. अकोट जि. अकोला .... विरूध्द ...
गैरअर्जदार :कोणीही नाही.

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे. अर्जदार हे वरील पत्यावर राहत असुन अर्जदार हा मयत रुख्माबाई श्रावण भगत यांचा पुतण्या असुन मयत रूख्माबाई श्रावण भगत हा दि. ०१/०८/२०१७ रोजी त्यांच्या राहत्या घरी ठोकबर्डी, (जौलखेड बु), ता. अकोट जि. अकोला येथे मयत पावल्या. मयत रुख्माबाई श्रावण भगत यांना कोणतेही मुलबाळ नव्हते. त्यांचे पती श्रावण लक्ष्मण भगत हे तिच्या मृत्यु अगोदर मरण पावले होते. तसेच मयताची आइ अगोदरच वारली असुन मयत रूखमाबाई श्रावण भगत यांचे पती व दोन भाउ होते. त्यापैकी श्रावण यांचे पती रामरतन गणपत भगत यांना अर्जदारांशिवाय इतर कोणतेही मुलबाळ नाही. अर्जदार याच्याशिवाय मयत रूख्माबाई श्रावण भगत यांना इतर कोणीही वारस नाहीत. त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आत, त्यांनी उपरोक्त न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानुसार निकाली काढण्यात येईल करीता आज दिनांक १०/०२/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार,
सहायक अधिक्षक (न्यायीक) दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट,
जि. अकोला.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय, मानोरा ता. मानोरा जि. वाशिम**
दुरध्वनी कंमाक -०७२५३-२६३२४६
Email Address tahsildarmanora@gmail.com
क्रं. जन्म-मृत्यु नोंदणी /म.स./कावि- ७१/२०२६
दिनांक २७/०१/२०२६

**जाहिरनामा**

अर्जदार :- गुणवंतराव लक्ष्मणराव कोल्हे रा. सोयजना ता. मानोरा जि. वाशिम ...विरूध्द..
गैरअर्जदार ग्राम पंचायत कार्यालय, सोजयना ता. मानोरा जि. वाशिम
बनाम :- सर्व नागरिक

याव्दारे सार्वत्रिक लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार गुणवंत लक्ष्मणराव कोल्हे रा. सोयजना ता. मानोरा जि. वाशिम येथील कायमचा रहिवासी असून यांनी स्वतःच मुलीचे नावाने जन्म नोंदीचा आदेश ग्राम पंचायत कार्यालय, सोयजना ता. मानोरा जि. वाशिम येथे आदेश मिळणेकामी विनंती अर्ज केलेला आहे. तसेच जन्म नोंदणी निबंधक, ग्राम पंचायत कार्यालय, सोयजना यांचेकडून प्रस्ताव प्राप्त आहे. अर्जदाराचे स्वतःचे मुलीचे नामे नेहा गुणवंतराव कोल्हे हिचा जन्म दिनांक २३.०५.१९९४ (विद्यार्थी प्रवेश निर्गम उतारा प्रमाणे) रोजी अर्जदाराचे राहते घरी मौजा सोयजना ता. मानोरा जि. वाशिम येथेच झालेला आहे. परंतु ग्राम पंचायत कार्यालय, सोयजना ता. मानोरा येथे गेले असता अर्जदाराचे स्वतःचे मुलीचे नावाने जन्म नोंदीचा अभिलेख आढळला नाही. असे अर्जदाराचे अर्जात नमुद आहे. अर्जदाराकडून जन्म नोंद अनावधानाने करण्यात आलेले नाही. त्यासाठी ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय, सोयजना यांचे कडून अभिप्रायासह जन्म नोंद नसल्याचा अनुउपलब्धता प्रमाणपत्र सोबत जोडले आहे. प्रकरणात अर्जदारानी सचिव, ग्राम पंचायत, सोयजना यांचा जन्म नोंद अनुउपलब्धता प्रमाणपत्र, आधार कार्ड, प्रतिज्ञालेख, पो. पाटिल यांचा रहिवासी दाखला व प्रतिज्ञालेख, शिधापत्रिका, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, कर फी बाबत पावती, घराचा आठ अ, आधार कार्ड, ई. कागदपत्रे या सोबत जोडलेले आहे. तरी विद्यार्थी प्रवेश निर्गम उतारा वरिल यावरिल तारिख नमुद करून ग्राम पंचायत कार्यालय, सोयजना येथे जन्म-मृत्यु नोंदणी कायदा सन १९६९ चे कलम १३ (३) २०२३ अन्वये जन्म नोंद होण्याकरिता विनंती अर्ज केलेला आहे. करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्वतःचे मुलीचे जन्म मौजा सोयजना ता. मानोरा येथे झालेले आहे. परंतु सदरचा दस्त/ अभिलेख उपलब्ध नसल्याने जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय, सोयजना ता. मानोरा यांचे अभिलेखावर घेवून जन्माचे प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाचेही हितसंबध असल्यास, कोणाचेही उजर असल्यास अथवा कोणास आक्षेप घ्यावयाचे असेल तर हा जाहिरनामा वृत्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत किंवा नेमलेल्या नेमलेल्या तारखेच्या दिवशी न्यायालयात हजर होवून आपली हरकती लेखी स्वरूपात कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीचे आत कोणीही योग्य हरकत न दाखविल्यास सदरहु न्यायालय उपरोक्त अर्जदारास त्यांच्या स्वतःचे मुलीचे जन्म नोंदणी करण्याबाबत लागलीच पुरावा घेवुन अर्ज निकाली काढण्यात येईल मंजुर करण्यात येईल. आज दिनांक २७/०१/२०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

(राजेंद्र पाटील)
तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मानोरा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय, मानोरा ता. मानोरा जि. वाशिम**
दुरध्वनी कंमाक -०७२५३-२६३२४६
Email Address tahsildarmanora@gmail.com
क्रं. जन्म-मृत्यु नोंदणी /म.स./कावि- ७१/२०२६
दिनांक १२/०२/२०२६

**जाहिरनामा**

अर्जदार: प्रकाश परशराम शेरे रा. शेंदोना ता. मानोरा जि. वाशिम ...विरुद्ध...
गैरअर्जदार: ग्राम पंचायत कार्यालय, शेंदोना ता. मानोरा जि. वाशिम बनाम: सर्व नागरिक

याव्दारे सार्वत्रिक लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार प्रकाश परशराम शेरे रा. शेंदोना ता. मानोरा जि. वाशिम येथील कायमचा रहिवासी असून यांनी स्वतःचे मुलांचे नावाने जन्म नोंदीचा आदेश ग्राम पंचायत कार्यालय, शेंदोना ता. मानोरा जि. वाशिम येथे आदेश मिळणेकामी विनंती अर्ज केलेला आहे. तसेच जन्म नोंदणी निबंधक, ग्राम पंचायत कार्यालय, शेंदोना यांचेकडून प्रस्ताव प्राप्त आहे. अर्जदाराच्या स्वतःचे मुलांचे नामे पवन प्रकाश शेरे यांचा जन्म दिनांक १३.०१.२०१२ रोजी अर्जदाराचे राहते घरी मौजा शेंदोना ता. मानोरा जि. वाशिम येथेच झालेला आहे. परंतु ग्राम पंचायत कार्यालय, शेंदोना ता. मानोरा येथे गेले असता अर्जदाराचे मुलांचे नावाने जन्म नोंदीचा अभिलेख आढळला नाही. असे अर्जदाराचे अर्जात नमुद आहे. अर्जदाराकडून जन्म नोंद अनावधानाने करण्यात आलेले नाही. त्यासाठी ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय, शेंदोना यांचे कडून अभिप्रायासह जन्म नोंद नसल्याचा अनुउपलब्धता प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

प्रकरणात अर्जदारानी सचिव, ग्राम पंचायत, शेंदोना यांचा जन्म नोंद अनुउपलब्धता प्रमाणपत्र, प्रतिज्ञालेख, पो. पाटिल यांचा रहिवासी दाखला व प्रतिज्ञालेख, शाळाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, अंगणवाडी सेविका प्रमाणपत्र, शिधापत्रिका, आधार कार्ड, घराचा आठ-अ, घर टॅक्स पावती ई. कागदपत्रे या सोबत जोडलेले आहे. तरी शाळेचा बोनाफाईड प्रमाणपत्रावरिल तारिख नमुद करून ग्राम पंचायत कार्यालय, शेंदोना येथे जन्म-मृत्यु नोंदणी कायदा सन १९६९ चे कलम १३ (३) २०२३ अन्वये जन्म नोंद होण्याकरिता विनंती अर्ज केलेला आहे.

करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्वतःचे मुलांचे जन्म मौजा शेंदोना ता. मानोरा येथे झालेले आहे. परंतु सदरचा दस्त/ अभिलेख उपलब्ध नसल्याने जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय, शेंदोना ता. मानोरा यांचे अभिलेखावर घेवून जन्माचे प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाचेही हितसंबध असल्यास, कोणाचेही उजर असल्यास अथवा कोणास आक्षेप घ्यावयाचे असेल तर हा जाहिरनामा वृत्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत किंवा नेमलेल्या नेमलेल्या तारखेच्या दिवशी न्यायालयात हजर होवून आपली हरकती लेखी स्वरूपात कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीचे आत कोणीही योग्य हरकत न दाखविल्यास सदरहु न्यायालय उपरोक्त अर्जदारास त्यांच्या स्वतः चे मुलांचे जन्म नोदणी करण्याबाबत लागलीच पुरावा घेवून अर्ज निकाली काढण्यात येईल मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १२/०२/२०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

(राजेंद्र पाटील)
तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मानोरा

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**e-TENDER NOTICE – 124 / 2025–26**

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website https://eprocurement.mahagenco.in.

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost Rs. (In Lakhs) |
|---|---|---|---|
| TN0876 AHP1 | 3000065474 | PROCUREMENT OF SEAL PLATE AND SEAL TROUGH PLATES FOR UNIT 2 AOH OF BAH. | 10.01 |
| TN0877 TM1 | 3000065480 | PROCUREMENT OF MOP SPARES AND GENERATOR SEAL RING FOR TG SET (COH # 3). | 10.01 |
| TN0878 EM1 Refloated | 3000065482 | WORK OF CLEANING OF GTR OIL COOLERS OF U#1 TO 4 AT 210 MW TPS KHAPERKHEDA ON AS AND WHEN REQUIRED BASIS | 6.30 |
| TN0879 EM1 | 3000065484 | OVERHAULING OF HT / LT BOARD AND OTHER ALLIED WORKS DURING UNIT #1 AOH AT 210 MW KHAPERKHEDA TPS. | 27.99 |
| TN0880 CHP1 | 3000065494 | SUPPLY OF LUGS, WIRES, ICTP, MCB AND MPCB FOR DAY TO DAY ELECTRICAL MAINTENANCE IN CHP-I (4 X 210 MW), TPS KHAPERKHEDA. | 10.49 |
| TN0881 TM1 | 3000065495 | PROCUREMENT OF DISCHARGE LINE SPARES OF CIRCULATING WATER PUMPS INSTALLED AT KHAPERKHEDA TPS-210MW | 9.66 |
| TN0882 CHP1 | 3000065496 | WORK OF PROVIDING, FIXING AND TESTING OF AUTOMATIC BUNKER CHOKE UP REMOVAL SYSTEM FOR COAL BUNKERS OF CHP-I (4 X 210 MW), TPS KHAPERKHEDA. | 54.71 |
| TN0883 TM1 | 3000065498 | PROCUREMENT OF SEALING STRIPS AND SQUARE WIRE FOR HP AND IP TURBINE KHAPERKHEDA TPS UNIT 2. | 19.85 |
| TN0884 BM1 | 3000065510 | PROCUREMENT OF SPRING ASSEMBLY FOR XRP 803 ½ HP COAL MILLS IN UNIT NO. 1 AND 2. | 30.71 |
| TN0885 WTP2 | 3000065511 | SUPPLY OF DESKTOP SODIUM ANALYSER AT WTP-500 MW KHAPERKHEDA TPS. | 3.40 |
| TN0886 CHP2 | 3000065513 | BIENNIAL WORK CONTRACT FOR MAINTENANCE, STAMPING & VERIFICATION OF WEIGH BRIDGES AND BELT WEIGHERS IN CHP 500MW, TPS KHAPERKHEDA. | 16.64 |
| TN0887 CHP1 | 3000065515 | BIENNIAL COMPREHENSIVE OPERATION & MAINTENANCE CONTRACT FOR STONE GRAPPLE UNIT AT WAGON TIPPLER NO. I & II. | 84.24 |
| TN0888 TIC1 | 3000065516 | ANNUAL MAINTENANCE CONTRACT FOR WORK OF REPAIRS OF ELECTRONIC MODULES OF VARIOUS SYSTEMS OF 210 MW KHAPERKEDA TPS. | 4.15 |

Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.

Sd /-
Chief Engineer (O&M)
MSPGCL, TPS Khaperkheda

**महाराष्ट्र शासन**
**उपवनसंरक्षक (प्रादेशिक) अकोला वनविभाग अकोला यांचे कार्यालय**
**वसुंधरा हॉल, अशोक वाटीका जवळ, मंगरुळपीर रोड, अकोला**
दुरध्वनी क्रमांक ०७२४-२४१५६०० ई- मेल dycfakola@mahaforest.gov.in
सत्यमेव जयते
**ई-निविदा सुचना क्रमांक :- १३ सन -२०२५-२६**

उपवनसंरक्षक (प्रादेशिक) अकोला वनविभाग अकोला यांचे वतीने सार्वजनीक बांधकाम विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गात पंजीबध्द कंत्राटदार यांच्याकडुन खालील कामासाठी बी-१ नमुण्यात ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रीत कामाची किंमत (रुपये) | १% इसारा (EMD) रक्कम (रु.) | निविदा शुल्क | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Excavation Continuous Contour Trench (CCT) for protection in Compt. No. C-65 at. Yelwan Part-I in Borgaon Manju beat in Akola round of Akola range in Akola Forest Division. | 761961.00 | 7620.00 | 590 | खुला | ३० दिवस |
| 2 | Excavation Continuous Contour Trench (CCT) for protection in Compt. No. C-65 at. Yelwan Part-II in Borgaon Manju beat in Akola round of Akola range in Akola Forest Division. | 761961.00 | 7620.00 | 590 | खुला | ३० दिवस |
| 3 | Excavation Continuous Contour Trench (CCT) for protection in Compt. No. 708 at. Mazod Part-I in Loni beat in Akola round of Akola range in Akola Forest Division. | 761961.00 | 7620.00 | 590 | खुला | ३० दिवस |
| 4 | Excavation Continuous Contour Trench (CCT) for protection in Compt. No. 709 at. Mazod Part-II in Loni beat in Akola round of Akola range in Akola Forest Division. | 761961.00 | 7620.00 | 590 | खुला | ३० दिवस |
| 5 | Excavation Continuous Contour Trench (CCT) for protection in Compt. No. C-87 at. Devoli in Kanshivani beat in Akola round of Akola range in Akola Forest Division. | 761961.00 | 7620.00 | 590 | खुला | ३० दिवस |

ई-निविदा तपशिलवार माहिती व अटी व शर्ती www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. ईच्छुक कंत्राटदारांनी वरील संकेतस्थळावर भेट देऊन निविदा भरावयाची कार्यवाही करावी.

**ई-निविदा प्रसिध्दीचा तपशिल**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | दि. ०९.०२.२०२६ सकाळी ११.०० वा. |
| ई-निविदा दाखल करण्यास सुरवात दिनांक | दि. ०९.०२.२०२६ सकाळी ११.०० वा. पासुन |
| ई-निविदा दाखल करण्याचा अंतीम दिनांक | दि. १६.०२.२०२६ दुपारी ४.०० वा. पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा दिनांक | दि. १७.०२.२०२६ सकाळी १२.०० वाजता (शक्य झाल्यास) |

सुमंत एस. सोळंके (भा.व.से.)
उपवनसंरक्षक (प्रादेशिक)
अकोला वन विभाग अकोला.

## संपादकीय

# भारतीय संस्कृती आणि व्हॅलेंटाईन डे!

दरवर्षी १४ फेब्रुवारीला जगभरात 'व्हॅलेंटाईन डे' मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. जागतिकीकरणाच्या प्रवाहात हा पाश्चात्य सण आता भारतीय घराघरांत, विशेषतः तरुण पिढीमध्ये खोलवर रुजला आहे. मात्र, जेव्हा आपण भारतीय संस्कृतीच्या चष्म्यातून या दिवसाकडे पाहतो, तेव्हा एक मोठा वैचारिक संघर्ष पाहायला मिळतो. एका बाजूला हा दिवस 'प्रेमाचा उत्सव' मानला जातो, तर दुसऱ्या बाजूला तो 'पाश्चात्य संस्कृतीचे आक्रमण' म्हणून नाकारला जातो. या विषयाचा सखोल आढावा घेणे काळाची गरज आहे. भारतीय संस्कृतीवर असा आरोप केला जातो की ती प्रेमाच्या विरोधात आहे, परंतु हा विचार पूर्णतः चुकीचा आहे. भारताचा इतिहास आणि आध्यात्मिक वारसा प्रेमाच्या विविध रूपांनी नटलेला आहे. त्यामध्ये दैवी प्रेमाचे उदाहरण घेतले तर राधा-कृष्णाचे प्रेम हे भारतीय संस्कृतीतील सर्वोच्च प्रतीक आहे. हे प्रेम केवळ शारीरिक नसून ते आत्म्याचे परमात्म्याशी असलेले मिलन मानले जाते. दुसरे उदाहरण कामदेव आणि रतीचे. पाश्चात्य संस्कृतीत जसा 'क्युपिड'आहे, तसा भारतीय संस्कृतीत 'कामदेव' आहे. वसंत ऋतूच्या आगमनावेळी कामदेवाची पूजा करण्याची परंपरा आपल्याकडे प्राचीन काळापासून आहे. याला सांस्कृतिक उत्सवाचीही जोड देता येईल. 'मदनोत्सव' किंवा 'वसंतोत्सव' हे सण प्राचीन भारतात अत्यंत उत्साहाने साजरे केले जात असत. कालिदासाच्या साहित्यात प्रेमाच्या शृंगारिक आणि उदात्त छटांचे वर्णन आढळते. त्यामुळे, प्रेम करणे ही संकल्पना भारतासाठी नवीन नाही; फक्त ते व्यक्त करण्याची पद्धत आज बदलली आहे. भारतीय संस्कृतीने व्हॅलेंटाईन डेला विरोध करण्यामागचे एक मुख्य कारण म्हणजे त्याचे झालेले 'व्यापारीकरण'. आज हा दिवस भावनांपेक्षा व्यवसायाशी अधिक जोडला गेला आहे. यावर भेटवस्तूंचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडल्याचे आढळून येते. कोट्यवधी रुपयांची उलाढाल या एका दिवसात होते. चॉकलेट, फुले, महागड्या भेटवस्तू खरेदी करण्यासाठी तरुणाईवर एक प्रकारचे मानसिक दडपण आपोआपच येते. आजकालचे चित्रपटही या दिवसावर विशेष प्रभाव पाडतात. ६० आणि ७० च्या दशकातील चित्रपटांमध्ये अभिनेत्रीचे कपडे भारतीय संस्कृतीला पोषक असे असायचे आता मात्र हॉट सीन टाकल्याखेरीज हिंदी चित्रपट पूर्णच होत नाही. त्यातूनच तरुणाईमध्ये स्त्री शरीराबाबत आकर्षण निर्माण होते. त्यातून मग एकतफीa प्रेमाच्या घटना घडतात ज्या समाजस्वास्थ्यासाठी घातक ठरतात. या उत्सवात दिखाऊपणा भरलेला आहे हे नाकारुन चालणार नाही. भारतीय संस्कृती 'संयम' आणि 'गुप्तता' याला महत्त्व देते. प्रेम ही अत्यंत खाजगी आणि पवित्र गोष्ट मानली जाते. मात्र, व्हॅलेंटाईन डेच्या नावाखाली होणारे सार्वजनिक प्रदर्शन भारतीय सामाजिक मूल्यांशी सुसंगत वाटत नाही. भारतीय समाजात व्हॅलेंटाईन डेवरून दोन गट पडलेले दिसतात. त्यामध्ये प्रथम पारंपारिक गटाच्या मते, हा पाश्चात्य सण भारतीय तरुणांना स्वैराचाराकडे नेणारा आहे. यामुळे कुटुंबसंस्था आणि नैतिक मूल्ये धोक्यात येऊ शकतात, अशी भीती त्यांना वाटते. तर आधुनिक गटाच्या मते, नवीन पिढीसाठी हा दिवस केवळ आपल्या प्रिय व्यक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचे एक माध्यम आहे. त्यांच्या मते, जर आपण पाश्चात्य तंत्रज्ञान, कपडे आणि शिक्षण स्वीकारू शकतो, तर त्यांच्यातील उत्सवाचा भाग स्वीकारण्यात काय हरकत आहे? अलिकडच्या काळात व्हॅलेंटाईन डेला भारतीय पर्याय देण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. काही संस्था १४ फेब्रुवारी हा दिवस 'मातृ-पितृ पूजन दिवस' म्हणून साजरा करण्याचे आवाहन करतात. यामागे प्रेमाची व्याप्ती केवळ प्रियकर-प्रेयसीपुरती मर्यादित न ठेवता ती पालकांपर्यंत नेण्याचा उद्देश आहे. तसेच, माघ महिन्यातील 'वसंत पंचमी' हा दिवस खऱ्या अर्थाने भारतीय 'प्रेम दिवस' म्हणून साजरा केला जावा, असा एक प्रवाह आहे, कारण निसर्गातील नवचैतन्य आणि प्रेमाचा हा नैसर्गिक काळ आहे. संस्कृती ही प्रवाही असते, ती काळानुसार बदलत जाते. जोपर्यंत आपण आपल्या मर्यादा पाळतो तोवर व्हॅलेंटाईन डे साजरा करणे म्हणजे भारतीय संस्कृतीचा अपमान करणे असे होत नाही. आता प्रेमाचा व्यापक अर्थ विचारात घेतला असता प्रेम म्हणजे केवळ आकर्षण नव्हे, तर एकमेकांबद्दलचा आदर, विश्वास आणि त्याग होय. ही मूल्ये भारतीय संस्कृतीच्या मूळ गाभ्यात आहेत. तसेच वर्षातील केवळ एकच दिवस प्रेम व्यक्त करण्यासाठी राखीव ठेवण्यापेक्षा, वर्षाचे ३६५ दिवस आपल्या नात्यातील ओलावा टिकविणे ही खरी भारतीय पद्धत आहे. भारतीय संस्कृती ही अत्यंत लवचिक आणि विशाल आहे. आपण जगातील चांगल्या गोष्टींचे नेहमीच स्वागत केले आहे आणि आजही करीत आहोत. व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने जर समाजात प्रेम, जवळीक आणि आनंद पसरत असेल, तर तो वाईट नाही. मात्र, तो साजरा करताना आपल्या संस्कृतीतील मर्यादा, शालीनता आणि कौटुंबिक मूल्ये यांना तडा जाणार नाही याची काळजी तरुणाईने घेणे आवश्यक आहे. शेवटी, प्रेम ही कोणत्याही देशाची किंवा धर्माची मक्तेदारी नाही. भारतीय संस्कृतीच्या दृष्टिकोनातून, 'वसुधैव कुटुंबकम' (संपूर्ण पृथ्वी हेच एक कुटुंब आहे) या भावनेतून जर आपण सर्वांवर प्रेम केले, तर प्रत्येक दिवस हा व्हॅलेंटाईन डेच ठरेल.

## ।।अभंगवाणी।।

प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

दान द्यावे तर
तू कर्ण बनावे
दानामध्ये द्यावे
मरण ही

भुलायचे तर
खारुताई व्हावे
रूप नवे घ्यावे
निसर्गाला

जर अडकला
साखळी बनावे
जोडून ठेवावे
माणसांना

उगायचे तर
सूर्य तू बनावे
सृष्टीला करावे
प्रकाशित



चेतन खुबा पवार
रा. आलूर ता. उमरगा जि. धाराशीव
(मो.९५९५३३३३०६/९५९५७८७१४३)



# थोर समाजसुधारक संत श्री सेवालाल महाराज

**संत सेवालाल महाराज यांचे विचार मानवतावाद व विज्ञानवादाची शिकवण देणारे आहेत. समाजातील भोळ्या समजुती, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, पशुबळीप्रथा, अनीतीचे व्यवहार याविरोधात जागृती तर भूतदया, निसर्गप्रेम, स्व:कर्तृत्वावर विश्वास, सत्य, अहिंसा व प्रेम इत्यादींची शिकवण देणारे आहेत. त्यांचे महनीय विचार बोलवचने, दोहे, कवणे व भजने या रूपात प्रकट झालेले आहेत. बंजारा समाजाचे दैवत थोर समाजसुधारक संत सेवालाल महाराज बंजारा समाजाचे आराध्य दैवत असले तरी त्यांची शिकवण सर्वच जाती धर्मासाठी पोरीया तारा म्हणजे दीपस्तंभी मार्गदर्शकच आहे.**

संत सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी झाला. हे भारतीय समाजसुधारक होते. शूरवीर लढवय्या 'गोरराजवंशी बंजारा'समाजातील प्रख्यात सतगुरू होते. क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील गुत्ती बल्लारी तालुक्यातील गोलाल डोडी गावात झाला. आता ते गाव सेवागड या नावाने ओळखले जाते.

निसर्गपूजक, कृषी संस्कृती रक्षक, पशुपालक, काटक अशा आदिम बंजारा समाजाचे आराध्य दैवत म्हणजे संत सेवालाल महाराज होय. क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांचा जन्म १५फेब्रुवारी १७३९ रोजी आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील गुत्ती बल्लारी तालुक्यातील गोलाल डोडी गावात झाला. वडील भीमानायक राठोड रामावत व माता धर्मणी या गोरराजवंशीय जोडप्याचे ते ज्येष्ठ अपत्य. घरात कृषी सुबत्ता खूप होती. सेवाभाया व त्यांचे तीनही बंधू हापानायक, बदूनायक, पुरानायक हे अतिशय शूर होते.

१५ फेब्रुवारी १७३९ रोजी रामजी नायक तांडा, बावन बराड, गुत्तीबल्लारी क्षेत्र सध्या ज्या नावाने ओळखले जाते सेवागड, गुत्ती मंडळ, अनंतपूर जिल्हा आंध्रप्रदेश येथे झाला. बंजारा समाज हा तांडा करून राहतो. बदलत्या काळासोबत बंजारा समाजातही परिवर्तन झालं आहे. पण तरीही लोकजीवन, संस्कृती, बोलीभाषा, वेशभूषा, केशभूषा, पेहराव, पारंपरिक नृत्य, लोकगीते या बाबतीत हा समाज स्वतंत्र ओळख कायम ठेवून आहे. आज तांड्यावरील लोकजीवन स्थिर भासत असले तरी पोटासाठी हंगामी स्थलांतर चुकलेले नाही. पशुपालन व व्यापार हा बंजारा समाजाचा पारंपरिक व्यवसाय होता. त्यासाठी सतत भ्रमंती करावी लागत असे. मोगली आक्रमण व पुढे इंग्रजांच्या काळात पारंपरिक व्यवसाय बुडीत निघाले. त्यामुळे सामाजिक जनजीवनही विस्कळित झाले. बंजारा समाजाला या बदलत्या परिस्थितीचा खूप मोठा फटका बसला. गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पंजाब अशा प्रांतात हा समाज मोठ्या संख्येने विखुरला गेला. बडद बंजारा व लमाण बंजारा अशा दोन मुख्य उपशाखा असलेला समाज देशभरात काही उपजातींनीही ओळखला जातो. बडद म्हणजे बैल बैल या पशुधनाशी संबंधित शाखा म्हणजे बडद बंजारा.

मिठाचा व्यापार करणारी शाखा म्हणजे लमाण बंजारा. लवण या मिठाच्या समानार्थी शब्दावरून लम्बाना, लम्बानी व पुढे फक्त लमाणी असा शब्द रूढ झाला. संत सेवालाल महाराजांच्या जन्मावेळी हा समाज भारतभर विखुरलेला होता. शिक्षणाचा अभाव तर होताच शिवाय पोटापाण्यासाठी व्यवसायाचीही समस्या उभी राहिलेली होती. सेवालाल महाराजांनी जनजागृती केली. स्वतः तांड्या तांड्यावर फिरले. समाज व्यसनाधीनता गुन्हेगारी यांनी वेढला गेला होता. संत सेवालाल महाराजांनी बंजारा समाजाला ऐतिहासिक संस्कृतीची जाणीव करून दिली. लडी भजन सत्संग, भजन यामधून लोकांना साध्या सरळ सोप्या भाषेत शिकवण दिली. थाळी नादावर आधारित भजन हा प्रकार आजही रूढ आहे. सेवालाल महाराजांची शिकवण आजही बंजारा समूहाला तोंडपाठ आहे. सेवालाल महाराज हे एक भारतीय सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील एक सुधारक होते. संत हाथीराम बाबा, बाबा लखीशाह बंजारा, संत रूपसिंह महाराज, क्रांतिकारी संत गोविंद गुरू बंजारा यासह हा शूरवीर 'गोरराजवंशी बंजारा' समुदाय संत सेवालाल महाराजांना आपले आध्यात्मिक गुरू म्हणून मानतात. ते आई जगदंबेचे परम शिष्य होते. आयुष्यभर ब्रह्मचारी राहिले. रामावत क्षेत्रीय कुळातील भीमासिंह नाईक यांचे ते चिरंजीव होते.

### धर्मणी याडी (मातोश्री)

संत सेवालाल महाराज यांच्या आईचे नाव धरमणी होते. ती जयराम वडतीया (सुवर्णा कप्पा, कर्नाटक) यांची राजकन्या होती. भीमा नायक यांच्या लग्नानंतर त्यांना जवळजवळ १२ वर्षे मूलबाळ नव्हते, पुढे आई जगदंबा मातेची पूजा व कृपेमुळे धर्मनी व भीमा नाईक यांना संत सेवालाल महाराज यांचा जन्म झाला अशी बंजारा समाजात एक श्रद्धा आहे.

संत सेवालाल महाराज यांचे श्रीक्षेत्र रुईगड येथे निधन झाले. आणि महाराष्ट्र राज्यातील वाशीम जिल्ह्यातील पोहरागड येथे त्यांची समाधी आजही आई जगदंबेच्या मंदिराशेजारी आहे. आध्यात्मिक आणि समाजप्रबोधनातून समाजाला दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले. संत सेवालाल महाराज यांची भविष्यवाणी आजही काळाच्या कसोटीवर तंतोतंत खरी ठरली आहे. बंजारा समाजातील महायोद्धा राजा लखीशाह बंजारा, गोर राजाभोज, क्रांतिकारी संत गोविंद गुरू बंजारा, बाबा मख्खनशाह बंजारा, शूरवीर बल्लुराय बंजारा, वीरांगना मल्लिका बंजारन, गोराबादल, आला उदल, नायक मनिसिंह पवार, राजागोपीचंद गोर, वीरांगना दुर्गावती बंजारन, वीर दुर्गादास राठोड, जयमल फत्तेसिंह या शूर पराक्रमीच्या इतिहासाच्या शौर्यगाथा आजही बंजारा साहित्य बरोबरच शीख इतिहासात सुद्धा दिसून येते. माता जगदंबा बंजारा देवी, व्यंकटेश्वर बालाजी, संत हाथीराम बाबा महाराज, संत रूपसिंह महाराज यासह संत सेवालाल महाराज आणि संत सामकी माता यांना समाजात विशेष आस्थेचे स्थान आहे.

### सेवालाल महाराज यांचे वचन

**संत श्री सेवालाल महाराज यांनी आपल्या गोर बंजारा भाषेत दिलेला उपदेश**

१) रपीया कटोरो पाणी वक जाय - भावार्थ : एका रुपयाला एक वाटी पाणी विकेल. २) कसाईन गावढी मत वेचो - भावार्थ : खाटकाला गाय विकू नका पशू प्राण्यावर प्रेम करा. ३) जिवते धंणीरो बीर घरेम मत लावजो - भावार्थ : जिवंत नवरा असणाऱ्या स्त्रीला आपली बायको म्हणून घरात आणू नका. ४) चोरी लबाडीरो धन घरेम मत लावजो - भावार्थ : चोरी करून खोट बोलून पैसा कमाऊ नका किंवा तशा पैसा घरात आणू नका. ५) केरी निंदा बदी चाडी जूगली मत करजो - भावार्थ : कोनाची निंदा चाडी चुगली लावा लावी करू नका. ६) जाणंजो छाणंजो पछच माणजो - भावार्थ : जाणून घ्या विचार, मंथन करा आणि नंतरच ती गोष्ट स्वीकारा. ७) ये जो वातेर पत रकाडीय वोन पाने आड पान तारलीयुंव - भावार्थ : ह्या गोष्टीचा जो कोणी आदर करेल, आचरणात आणेल स्वीकार करेल मी त्याचा रक्षण करेल. पाना आड पान मी त्याला तारेल. संत सेवालाल महाराज हे थोर मानवतावादी संत होते. मानवी कल्याणासाठी त्यांनी सर्वदूर मानवता, पर्यावरण रक्षण, गोरक्षाचा संदेश दिला. महाराष्ट्र व तेलंगणा राज्यात संत सेवालाल महाराज यांची जयंती शासन स्तरावर साजरी केली जाते. धर्माच्या रक्षणासाठी त्यांनी निजामाविरूद्ध लढा सुद्धा उभारला होता. समाजातील अनिष्ट रूढी व शोषणाविरुद्ध त्यांनी आपल्या वाणीतून प्रहार चढवून सामाजिक सुधारणांसाठी आग्रही भूमिका घेतली. संत सेवालाल महाराज यांचा जन्म गोरबंजारा समाजात माघ कृष्ण पक्ष शके १६६१मध्ये अर्थात १५फेब्रुवारी १७३९ रोजी रामजी नायक तांडा, बावन बराड, गुत्तीबल्लारी क्षेत्र सध्या ज्या नावाने ओळखले जाते सेवागड, गुत्ती मंडळ, अनंतपूर जिल्हा आंध्रप्रदेश येथे झाला. आता ते गाव 'सेवागड'या नावाने ओळखले जाते. काही जाणकारांच्या मते संत सेवालाल महाराज यांचा जन्म आंध्रप्रदेश राज्यातील जिल्हा अनंतपूर गुत्तीबल्लारी येथे झाला असावा. महाराजांच्या वडिलांचे नाव भीमा नाईक तर आईचे नाव धर्मणी होते. भीमा नाईक हे तांड्याचे नाईक होते. सेवादास, सेवाभाया, मोतीवाळो, तोडावाळो अशीही संत सेवालाल महाराज यांची विविध नावे गोरबंजारा समाजात प्रचलित आहेत. महाराष्ट्रातील वाशीम जिल्ह्यात 'पोहरागड' येथे त्यांची समाधी आहे. आपल्या महाराष्ट्राला संतांची पुरातन अशी परंपरा आहे. महाराष्ट्राच्या मातीला जसा पराक्रमाचा वारसा आहे तसा संतांच्या विचारांचा गंधही आहे. महाराष्ट्रभूमीत अनेक जाती- धर्मातील साधुसंत, प्रबोधनकार, कीर्तनकारांनी जन्म घेतला. महाराष्ट्राची जडणघडणच मुळी संतांच्या विचारातून झालेली आहे. त्यांच्या शिकवणुकीमुळेच आज संपूर्ण समाज गुण्यागोविंदाने नांदतो आहे. संत आयुष्यभर सर्वांना परमार्थाचा मार्ग दाखवितात. संतसाहित्याचा खरा आत्मा भक्तीबरोबरच समाजप्रबोधन, समाजकल्याण हा आहे. संतांचा प्रत्येक श्वास सृष्टीतल्या प्रत्येक जीवांसाठी समर्पित असतो. समाजाला सद्ममार्गाकडे घेऊन जाण्याचे द्रष्टेपणाचे कार्य संतमंडळी करीत असतात. असेच एक थोर संत म्हणजे संत सेवालाल महाराज फिरस्त्या व्यापाराच्या निमित्ताने भारतभर भ्रमंती करीत असताना संत सेवालाल महाराजांना भारतातील अनेक संतांच्या कार्याविषयी माहिती मिळाली. संतांच्या या प्रेरणेतून सत्याचा शोध घेऊन आपल्या समाजाला संत सेवालाल महाराज यांनी जीवन जगण्याचा खरा मार्ग दाखविला.

# परिवर्तनवादी- संत सेवालाल महाराज



सौ. ज्योती चव्हाण (राठोड)
यवतमाळ.
(मो.नं : ७५८८५९०९९८)

**भारत ही केवळ भौगोलिक सीमा असलेली भूमी नाही. हजारो वर्षांच्या सांस्कृतिक परंपरेने नटलेली, विविध समाजघटकांना आपल्यात सामावून घेणारी महान सभ्यता आहे. या प्राचीन संस्कृतीच्या प्रवाहात, वेगवेगळ्या काळात अनेक समाज, जमाती आणि पंथ उदयाला आले. त्यांपैकी एक महत्त्वाचा समाज म्हणजे बंजारा समाज. दऱ्याखोऱ्यांतून, जंगलवाटांनी आणि व्यापारी मार्गांवरून भटकंती करणारा हा समाज आपली लोकसंस्कृती, वेशभूषा आणि बोलीभाषा यांमुळे वेगळी ओळख निर्माण करणारा ठरला. काळाच्या ओघात हा समाज तांड्यांमध्ये स्थिरावला. मात्र, या संक्रमनाच्या काळात समाजाला संघटित दिशा देणारा, परिवर्तनवादी विचार देणारा युगपुरुष म्हणजे संत सेवालाल महाराज हे आहेत.**

अठराव्या शतकातील राजकीय अस्थिरता, विविध सत्तांतील संघर्ष आणि सामाजिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर बंजारा समाजाचा पारंपरिक व्यवसाय बैल, उंट, घोड्यांच्या पाठीवर धान्य व जीवनावश्यक वस्तू वाहून नेण्याचा 'लेदणी'व्यवसाय सुरू होता. युद्धकाळात रसद पुरविण्याची महत्त्वाची जबाबदारी या समाजाने पार पाडली. मात्र, या व्यवसायाच्या निमित्ताने समाजात अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, अन्यायकारक रूढी यांचा शिरकाव होत असल्याचे संत सेवालाल महाराजांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी केवळ उपजीविकेचे नव्हे, तर जीवनमूल्यांचे प्रबोधन सुरू केले. समाजाला आत्मनिर्भरतेचा आणि विवेकाचा मार्ग दाखवताना ते आपल्या बोलीत म्हणतात -

*'तम सोता तमार जीवनेम दिवो लगा सको छो..*
*कोई केन भजो मत, केनी पूजो मत, कोई केती कमी छेनी..*
*भजनेम वेळ घाले पेक्षा करणी करेन शिको..*
*जाणजो, छाणजो, पच मानजो'*

या वचनातून ते सांगतात की, आपल्या जीवनाचा प्रकाश स्वतः पेटवा. कोणाची अंधभक्ती करू नका, कुणालाही देवत्व बहाल करू नका. कोणी श्रेष्ठ नाही, कोणी कनिष्ठ नाही. पूजा-पाठात वेळ घालविण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती, श्रम आणि कर्तृत्वाला महत्त्व द्या. प्रत्येक गोष्ट तपासून, विचारपूर्वक स्वीकारा. हा संदेश आजच्या वैज्ञानिक युगातही तितकाच समर्पक वाटतो.

बंजारा समाजासह सर्वसामान्य गरीब घटकांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध ते निर्भीडपणे उभे राहिले. -

शोषणाविरुद्ध आपली निर्भीड भूमिका त्यांनी पुढील वचनात स्पष्ट केली आहे.

'गोर गरीबेनं दांडण खाये, ओरि सात पिढी नरकेम जाय.'

गरिबांचे हक्क हिरावून घेऊन जगणाऱ्यांचे आयुष्य कधीच मंगलमय होत नाही. अन्यायाची फळे पिढ्यान्पिढ्या भोगावी लागतात, असा हा मानवतावादी संदेश आहे. सामाजिक न्यायाची जाणीव निर्माण करणारा हा विचार आजच्या काळातही तितकाच महत्त्वाचा आहे.

निजामांच्या अन्यायकारक सत्तेविरुद्ध लोकांना संघटित करताना त्यांनी संघर्षाची भूमिका स्पष्ट केली. येथे सेवादास महाराजांमधील क्रांतिकारक समाजसुधारकाचे दर्शन आपल्याला होते.

*'जे छाती करिय वोन साथ दियुं*
*जे हाय नाकीय वोर ढेर पाडीयूं'*

धैर्याने छाती पुढे करून उभा राहणारा माणूसच संकटावर मात करतो; भीतीपोटी पळ काढणारा निश्चितच पराभूत होतो. हा संदेश संघर्षापुरता मर्यादित नसून, जीवनातील प्रत्येक अन्यायाविरुद्ध, गुलामगिरीविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारा आहे. निसर्गाशी अतूट नाते असलेल्या संत सेवालाल महाराजांनी पर्यावरणात निर्माण होणाऱ्या संकटाविषयी तेव्हाच आपल्या वाणीने लोकांना जागृत केले.

*'सो कोसेप दिवा रिय,*
*रपया कटोरो पाणी वक जाय'*

निसर्गाचा विनाश केला, तर एक दिवस पाणीही पैशाने विकत घ्यावे लागेल, ही त्यांची दूरदृष्टी आजच्या जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर अक्षरशः खरी ठरताना दिसते. निसर्गसंवर्धन हा केवळ पर्यावरणवाद नाही, तर मानवजातीच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे, हे त्यांच्या विचारांतून स्पष्ट होते.

अहिंसा आणि करुणेचा संदेश देताना ते सर्व जीवसृष्टीप्रति करुणा बाळगण्याचा आग्रह धरतात -

*'जीव जळगाणीन साई वेस*
*दी पगेन साई वेस*
*चार पगेना साई वेस*
*किडी मुंगीन साई वेस'*

दोन पायांचे, चार पायांचे, उडणारे प्राणी-पक्षी तसेच किड्या-मुंग्यांपर्यंत सर्वांचे रक्षण करा. अहिंसा हा केवळ उपदेश नसून प्रत्यक्ष आचरणाचा विषय आहे, असे ते ठामपणे मांडतात.

व्यसनाधीनता, चोरी आणि अधर्म याविरुद्ध ते म्हणतात -

*'चोरी मत करजो कोई,*
*लाज रखाडो धर्मेरी*
*दारू मत पियो, कोई*
*धर्मेरी वाणी रखाडो भाई'*

नैतिकता जपा, व्यसनांपासून दूर राहा. धर्म म्हणजे कर्मकांड नव्हे, तर चारित्र्याची शुद्धता आहे, असा त्यांचा ठाम संदेश होता.

*अखेर ते जीवनाचे सार सांगतात*
*'सत, दया, लीनता ये गणेती रेणो*
*भवसागर तर जाणो'*

सत्य, करुणा आणि विनम्रता या तीन मूल्यांच्या आधारावरच जीवनरूपी भवसागर पार करता येतो.

आज उपभोगवाद, स्पर्धा आणि व्यक्तिकेंद्री विचारांनी समाजात दरी वाढत असताना संत सेवालाल महाराजांचे वैज्ञानिक, विवेकवादी, मानवतावादी आणि निसर्गपूरक विचार अधिकच आवश्यक वाटतात. स्त्रीसन्मान, श्रमप्रतिष्ठा, पर्यावरणभान आणि सामाजिक न्याय या मूल्यांची आज समाजाला नितांत गरज आहे.

संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण म्हणजे केवळ श्रद्धांजली नाही, तर स्वतःच्या जीवनाकडे पाहण्याची, मूल्यांची पुर्नतपासणी करण्याची संधी आहे. त्यांच्या शिकवणीतून प्रेरणा घेऊन आपण शोषणमुक्त, समतावादी आणि मानवतावादी समाज उभारण्याचा संकल्प केला, तरच त्यांच्या कार्याला खरी मानवंदना मिळेल.

# क्रांतिकारी युगपुरुष संत श्री सेवालाल महाराज



गोर अनिल राठोड
ॲग्रीशिया, इंडस्ट्रीज, नाशिक.
मोबाईल: ९५२७३०२७९४



१५ फेब्रुवारी २०२६ रोजी बंजारा समाजाचे आराध्य दैवत, महान समाजसुधारक आणि क्रांतिकारी विचारवंत संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती अत्यंत श्रद्धा, अभिमान आणि उत्साहात साजरी होत आहे. १५ फैब्रुवारी १७३९ रोजी त्यांचा जन्म झाला आणि त्यांनी संपूर्ण आयुष्य समाजजागृती व मानवकल्याणासाठी अर्पण केले.

अठराव्या शतकातील अस्थिर काळात बंजारा समाज आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या कठीण परिस्थितीतून जात होता. पारंपरिक व्यापारावर आलेले संकट, शिक्षणाचा अभाव, वाढती अंधश्रद्धा आणि व्यसनाधीनता यामुळे समाजाची घडी विस्कळीत झाली होती. अशा वेळी संत सेवालाल महाराजांनी केवळ आध्यात्मिक उपदेश न करता थेट समाजप्रबोधनाचा मार्ग स्वीकारला. त्यांनी तांड्यांमध्ये जाऊन लोकांना संघटित केले, स्वाभिमान जागवला आणि नैतिकतेवर आधारित जीवनमूल्ये रुजवली. त्यांचे कार्य केवळ धार्मिक विधींपुरते मर्यादित नव्हते; ते प्रत्यक्ष कृतीतून समाजपरिवर्तन घडवणारे होते. सत्य, प्रामाणिकपणा, परिश्रम, पशुप्रेम, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक एकता हे त्यांच्या विचारांचे मुख्य आधार होते. त्यांनी स्पष्ट सांगितले, 'चोरी-लबाडी करू नका, निंदा-चुगली टाळा, विचारपूर्वक निर्णय घ्या आणि स्वाभिमानाने जगा.' समाजाने संघटित राहून अन्यायाविरुद्ध उभे राहावे, शिक्षणाला प्राधान्य द्यावे आणि परिश्रमाच्या जोरावर प्रगती साधावी, हा त्यांचा ठाम संदेश होता. म्हणूनच ते केवळ संत नव्हते, तर सामाजिक क्रांतीचे शिल्पकार ठरले. आज महाराष्ट्रासह देशभरात त्यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. महाराष्ट्र शासनाने देखील जयंती सर्वत्र साजरी करण्याचे आवाहन करून त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. ही बाब संपूर्ण बंजारा समाजासाठी अभिमानाची आहे. महाराष्ट्रातील वाशीम जिल्ह्यातील पवित्र पोहरागड हे त्यांचे समाधीस्थान आज लाखो भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. पोहरागड हे बंजारा समाजाच्या अस्मितेचे, एकतेचे आणि सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक आहे. २८७ व्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी त्यांच्या विचारांचा स्वीकार करून शिक्षण, नैतिकता, संघटन आणि स्वाभिमान यांचा मार्ग आचरणात आणण्याचा संकल्प करूया. हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

संत श्री सेवालाल महाराजांना विनम्र अभिवादन आणि कोटी कोटी प्रणाम!

# आलिया भट्टने घेतला मराठमोळ्या पदार्थाचा आस्वाद



फिटनेसचं महत्त्व आजच्या काळात खूप वाढलं असून बरेच लोक फिटनेसफीक्र झाले आहेत. सेलिब्रिटी तर अनेकदा फिट राहण्यासाठी वेगवेगळे उपाय करत असतात. कोणी व्यायाम करतं, कोणी डाएट. यादरम्यान बऱ्याचदा लोक भारतीय पदार्थ सोडून पाश्चिमात्य पदार्थांचं सेवन करायला लागतात. विविध पद्धतीचे सलाड ते खातात, पण तुम्हाला माहीत आहे का करिना कपूर व आलिया भट्ट त्यांच्या फिटनेससाठी काय करतात आणि त्यांचा आहार कसा असतो?

करिना कपूर तिच्या फिटनेसमुळे अनेकदा चर्चेत असते. दोन मुलांच्या जन्मानंतरही ती खूप फिट आहे. यासाठी ती व्यायाम करते आणि विशिष्ट प्रकारचा आहार घेते. अभिनेत्री यासाठी अहारतज्ज्ञ ऋजुता दिवेकर यांची मदत घेते आणि त्यांच्या सल्ल्यानुसार आहारात पदार्थांचा समावेश करते. अशातच आता तिची नणंद अभिनेत्री आलिया भट्टनेही ऋजुता दिवेकर यांची भेट घेत एक स्टोरी इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे.करिना कपूरच्या आहारात कांदे पोहे, खिचडी असे घरगुती भारतीय पदार्थ असतात असं ऋजुता यांनी 'लल्लन टॉप'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितलेलं. अशातच आता करिनाबरोबर आलिया भट्टनेही अशा साध्या व घरगुती पदार्थांचं सेवन करायला सुरुवात केल्याचं तिने शेअर केलेल्या फोटोंमधून दिसतं. आलिया भट्टने एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये महाराष्ट्रीयन पद्धतीचे पदार्थ असल्याचं पाहायला मिळतं.

आलिया भट्टने शेअर केलेल्या मराठमोळ्या पदार्थांनी भरलेल्या या ताटामध्ये पिठलं, एक पालेभाजी, कोशिंबीर, बटाट्याची भाजी, भाकरी आणि त्यावर लोणी असे चविष्ट, साधे आणि रुचकर पदार्थ आहेत. शिवाय या सर्वांचं प्रमाणही कमी असल्याचं दिसतं.



# रेणुका शहाणे यांनी अनुष्का शर्माच्या प्रदर्शित न झालेल्या 'चकदा एक्स्प्रेस'मधील लूक केला शेअर



रेणुका शहाणे मराठी व हिंदी इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री आहेत. त्यांनी आजवर मराठी व हिंदी चित्रपटांत आणि मालिकेत काम करत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. रेणुका यांनी इंडस्ट्रीतील अनेक लोकप्रिय कलाकारांबरोबर आतापर्यंत काम केलं आहे. अनुष्का शर्मा २०२१ मध्ये मुलीच्या जन्मानंतर अभिनयक्षेत्रात पुनरागमन करण्यास सज्ज होती, त्यावेळी तिने झुलन गोस्वामी यांच्या जीवनावर आधारित चरित्रपटाचं 'चकदा एक्स्प्रेस'चं चित्रीकरण पूर्ण केलं होतं. यामध्ये रेणुका शहाणे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे.

'चकदा एक्स्प्रेस' हा चित्रपट माजी भारतीय महिला क्रिकेटर झुलन गोस्वामी यांच्यावर आधारित आहे. यामध्ये बॉलीवूड अभिनेत्री अनुष्का शर्माने मुख्य भूमिका साकारली आहे. परंतु, अद्याप हा चित्रपट प्रदर्शित झाला नाहीये. 'फ्री प्रेस जरनल'च्या वृत्तानुसार पूर्वी हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार होता. परंतु, काही कारणांनी ती डील रद्द झाली. आता यातील अभिनेत्री रेणुका शहाणे यांनी याबाबत त्यांची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार आता हा चित्रपट प्रदर्शित होणार नसल्याचं म्हटलं जात आहे. चित्रपटाचं संपूर्ण चित्रीकरण पूर्ण झाल्यामुळे ही धक्कादायक गोष्ट आहे. अशातच आता रेणुका यांनीसुद्धा नाराजी व्यक्त केल्याचं दिसतं. यामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारली होती. आता त्यांनी इन्स्टाग्रामवर या चित्रपटातील लूकचा फोटो शेअर केला आहे. रेणुका शहाणे म्हणालेल्या, ''चकदा एक्स्प्रेसमधील माझा लूक मला खूप आवडला होता. मला या चित्रपटात आणि टीमबरोबर काम करूनही खूप मजा आली. चित्रपट प्रदर्शित झाला असता तर बरं झालं असतं.'' पूर्वी 'एनडी टीव्ही'शी संवाद साधताना रेणुका यांनी याबद्दल प्रतिक्रिया दिलेली. त्या म्हणालेल्या, ''मला खूप वाईट वाटलं, कारण या चित्रपटासाठी प्रत्येकाने खूप मेहनत घेतली होती. अनुष्कानेही यासाठी स्वत:वर खूप काम केलं होतं. यामध्ये मी जे सीन केले, ते खूप चांगले होते आणि म्हत्त्वपूर्ण होते. विशेष करून क्रीडा क्षेत्रातील स्त्रियांसाठी हा चित्रपट फार महत्त्वाचा आहे.

# राशी-भविष्य

**मेष:** आज तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून प्रचंड पाठिंबा आणि प्रेम मिळेल आणि तुमच्या कुटुंबाप्रती असलेल्या समर्पणाची प्रशंसा होईल.

**वृषभ:** तुमच्या कुटुंबावरील प्रेमाची सर्वांनाच प्रशंसा होईल. जर तुम्हाला तुमच्या जोडीदारासाठी काही साध्य करायचे असेल तर तुम्ही ते सहजतेने करू शकाल.

**मिथुन:** घराबद्दलच्या तुमच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. कुटुंबातील चिंता कमी होतील. कामे पूर्ण करण्यात तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला पाठिंबा मिळेल.

**कर्क:** तुम्हाला नातेसंबंधांमध्ये सुधारणा जाणवेल. चांगल्या शब्दांचा वापर केल्याने अनेक गोष्टी सुधारतील. कामातील तुमची आवड बदलेल आणि तुम्हाला यश मिळेल.

सिंह: तुमच्यापैकी ज्यांना मुले होऊ इच्छितात त्यांच्यासाठी हा चांगला काळ आहे. तुम्ही आज कौटुंबिक संतुलन राखू शकाल आणि याचा तुम्हाला नक्कीच फायदा होईल.

**कन्या:** आज तुमचे पूर्ण लक्ष तुमच्या कुटुंबावर केंद्रित असेल. कौटुंबिक समस्येवर तोडगा निघेल आणि तुम्हाला आत्मविश्वासाने पुढे जाण्याची संधी मिळेल.

**तूळ:** आज तुमचा राग नियंत्रित करा. आरोग्य मध्यम आहे. प्रेमात वाद किंवा राग येण्याची शक्यता आहे. व्यवसायाची परिस्थिती मध्यम आहे. लाल वस्तू दान करा.

**वृश्चिक:** आज घरातील तापमान वाढेल. लक्ष्मी योग तयार होत आहे, जो खूप फायदेशीर आहे. तुम्ही जमीन, इमारत किंवा वाहन खरेदी करण्याचा विचार करू शकता. आरोग्य आणि व्यवसाय ठीक आहे .

**धनु:** आज तुम्ही शक्तिशाली राहाल. तुम्हाला जे हवे आहे ते तुम्ही साध्य कराल. तुमच्या योजना अंमलात आणा. सर्व काही ठीक राहील. आरोग्य मध्यम आहे.

**मकर:** आज परिस्थिती चांगली आहे. पैशाचा प्रवाह चालू राहील. पण गुंतवणूक करू नका. कठोर भाषा वापरणे टाळा. आरोग्य आणि प्रेम मध्यम असेल आणि व्यवसाय ठीक राहील. लाल वस्तू दान करा.

**कुंभ:** आज सौम्यता वाढेल. आरोग्य आणि प्रेम मध्यम आहे आणि तुम्हाला व्यवसायाच्या दृष्टिकोनातून चांगली बातमी मिळू शकते. बजरंग बाणाचे पठण करा.

**मीन:** आज जास्त खर्च केल्याने तुम्हाला त्रास होऊ शकतो. तुमची मानसिक स्थिती कमकुवत असू शकते. तुमच्यात आत्मविश्वासाची कमतरता असेल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# रितेश देशमुख खूप ओव्हररिॲक्ट झाले; बिग बॉस मराठी फेम सोनाली राऊतने व्यक्त केली उघड नाराजी!

सुपर मॉडेल व अभिनेत्री सोनाली राऊत दोन आठवड्यांपूर्वी 'बिग बॉस मराठी'च्या घरातून एलिमिनेट झाली. शोमधून बाहेर आल्यावर तिने घरातील सदस्यांबद्दल अनेक खुलासे केले होते. आता अभिनेत्रीने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत रितेश देशमुखबद्दल सुद्धा वक्तव्य केलं आहे. रितेश खूप 'ओव्हररिॲक्ट' झाले असं सोनालीचं म्हणणं आहे;सोनालीने 'बिग बॉस'मधून बाहेर आल्यावर 'इंडिया फोरम' या चॅनेलला मुलाखत दिली. सोनालीने 'बिग बॉस'च्या घरात असताना एक टास्क खेळण्यास नकार दिला होता. यानंतर तिला थेट नॉमिनेट करण्यात आलं होतं. टास्क खेळण्यास नकार दिल्याने भाऊच्या धक्क्यावर रितेश देशमुखने सुद्धा सोनालीची चांगलीच शाळा घेतली होती. सोनालीने आधी टास्क खेळणार नाही असं सांगितलं आणि त्यानंतरही भाऊच्या धक्क्यावर सोनाली रितेशला उलट बोलत होती त्यामुळे रितेशने तिची कानउघडणी केली होती. ''हा तुमच्या घरी ठेवायचा. या घरात नाही दाखवायचाइथे सगळे सारखे आहेत. यावेळेला फक्त नॉमिनेट केलंय. पुढच्या वेळेस घराच्या बाहेर काढेन.'' असं रितेश तिला म्हणाला होता. यावर सोनालीने प्रतिक्रिया दिली आहे.

सोनाली राऊत म्हणाली, ''रितेश देशमुख जे या शोचे होस्ट आहेतते खूप 'ओव्हररिॲक्ट' झाले होते असं मला वाटतं. मला साहजिकच त्या गोष्टीचं खूप वाईट वाटलं. कारण, मी त्यांना आधीपासून ओळखतेते शो खूप चांगला होस्ट करत आहेत त्यांचा हा दुसरा सीझन आहे. पण, मला त्या गोष्टीवर खूप ओव्हर रिॲक्शन मिळाली असं मला वाटतं. घराच्या आत काय होतंहे त्यांनाही माहिती नाहीये. त्या सगळ्या गोष्टी मी त्यांना नक्की सांगेन. मला ती गोष्ट मनाला प्रचंड लागली होतीत्याचा परिणाम माझ्या गेमवर सुद्धा झाला. ''होस्ट म्हणून हा त्यांचा दुसरा सीझन आहे त्यामुळे मला वाटतं ते सुद्धा अंडरप्रेशर असतील. कारण, बिग बॉसचे अनेक भाषांमध्ये सीझन सुरू असतात आणि या सगळ्या होस्टमध्ये सुद्धा तुलना केली जाते. महत्त्वाचं म्हणजे, जेव्हा तुम्ही मुंबईत असता तेव्हा तुमची तुलना थेट 'हिंदी बिग बॉस'बरोबर केली जाते. त्यामुळे रितेशला सुद्धा स्वत:ची एक इमेज क्रिएट करायची असेलकी, ते या शोकडे फार गांभीर्याने पाहतात. जेव्हा रितेश पहिल्याच वीकेंडला आले होतेतेव्हा ते प्रचंड रागात होते. त्यावेळी आम्ही सगळेच गोंधळून गेलो होतो की, हे एवढं 'ओव्हररिॲक्ट' का करत आहेत? कारण, पहिल्या आठवड्यात आम्ही असं रागावण्यासारखं काहीच केलं नव्हतं.



# आकाश साप्ताहिकी




दि.१४-२ ते २०-२-२०२६. नववर्षातील पहिले ग्रहण यावर्षी चंद्र आणि सूर्याची प्रत्येकी दोन अशी चार ग्रहणे असुन येत्या १७ फेब्रुवारीला कंकणाकृती सूर्यग्रहण आहे.हा निसर्गातील सावल्यांचा खेळ अंटार्क्टिकातून कंकणाकृती तर दक्षिण पॅसिफिक आणि हिंदी महासागराच्या भागात खंडग्रास स्थितीत पाहता येईल. आपल्या भागात मात्र चार ग्रहणांमधील केवळ एकच खंडग्रास चंद्रग्रहण पुढील महिन्यात अनुभवता येईल. अशी असेल आकाश स्थिती

दि.१४.चंद्र पूर्वाषाढा नक्षत्रात.
दि.१५.चंद्र उत्तराषाढा नक्षत्रात.
दि.१६.चंद्र श्रवण नक्षत्रात मंगळ ग्रहाचे जवळ.
दि.१७.चंद्र आणि सूर्य धनिष्ठा नक्षत्रात.कंकणाकृती सूर्यग्रहण.
दि.१८.चंद्र शततारका नक्षत्रात.वसंत ऋतू प्रारंभ.
दि.१९.चंद्र पूर्वाभाद्रपदा नक्षत्रात, चंद्र आणि बुध व शूक्र ग्रहिचे जवळ.
दि.२०.चंद्र उत्तरा भाद्रपदा नक्षत्रात.चंद्र आणि शनी मीन राशीत जवळ दिसतील.

ग्रह दर्शन
सध्या स्थितीत संध्याकाळी एकाचवेळी चार ग्रह पाहता येतील,पूर्व आकाशात मिथुन राशीत गुरु ग्रह ठळक स्वरूपात दर्शनार्थ सज्ज असुन याचवेळी पश्चिम आकाशात बुध आणि शूक्र या दोन्ही ग्रहांचे दर्शन करता येईल.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 308



रसभंग, रासलीला, वरदान, विप्रलंब, शिरकाण, शीलवान, शेरवानी, सरबत, सोयरीक, गजगामिनी, गोळाबेरीज, जवाबदारी, नरकपाल, परावलंबी, पोटकरपी, बेबंदशाही, रजतवणी, वादविवाद

**पाच अक्षरी**
अवतरण, कपाळमोक्ष

**सहा अक्षरी**
प्रसारविभाग, लालबहादूर शास्त्री

(उत्तर पुढील अंकी)

**संकेत शब्द:–**

**दोन अक्षरी**
अक्ष, कच, कर, काज, खास, गज, जय, झोप, टाच, डग्गा, तर, तपी, ताग, तात, दशा, दाद, निरा, पस, पापी, बक, माज, रम, रवि, रूप, लत, लस, वण, वाल, शेट, सर, हाल

**तीन अक्षरी**
अभंग, चपळ, चळत, चातक, जनित, जमाव, टवाळी, ठिगळ, तणस, तरूण, तासणी, तासणे, ददात, नाताळ, निराळा, निशाण, पिटणे, पीठिका, बखर, मलीदा, रकम, रसना, रहीत, लानत, वावगा, सखल, साबीत

**चार अक्षरी**
कटमिती, कलदार, कवतिक, कारावास, खानसामा, गणगोत, जाहिरात, तक्तपोस, निरक्षर, पटवारी, पाकशाळा, भालदार, भेदरणे, भेदभाव, रक्तपिति, रखडणे, रमजान

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 689



**–: आडवी विधाने :–**
1) पर्यावरण संवर्धनासाठी सर्वदूर झाडे लावणे
4) मृत व्यक्तिला दिलेली आदरांजली
6) केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेली शेतजमीन
10) ज्ञाति, समुदाय, समाज
11) माझे
12) विविध पदार्थांचे मिश्रण
13) अंतर, फेर
14) कष्ट, मेहनत
15) या ठिकाणच्या मातीपासून तयार केलेल्या गणपतीच्या मूर्ती फार प्रसिद्ध आहेत.
16) जगण्यासाठी केलेली धडपड
20) दह्यापासून तयार केलेला एक पातळ रुचकर पदार्थ
21) निष्णात, पटाईत, कुशल
22) पोलिसदलातील एक अधिकारी
25) सरकारने ताब्यात घेतलेले
26) मजला, अस्मादिकाला
27) सूर्याची किरणे, तेज, कीर्ती
28) न्यूनगंड, स्वत:मधील कमीपणाची भावना
30) हळूच, वरचेवर
32) किल्ल्याभोवती बांधलेले दगडाचे कुंपण
35) ज्याच्या आरंभकाळाचा थांगपत्ता नाही असा
37) एक कंद मूळ प्रकार
39) मुलायम
40) एकोपा, एकाच मताची मंडळी
42) काठीभोवती चिंध्या गुंडाळून केलेले दिवटी
44) वायू, शरीरातील त्रिदोषांपैकी एक
46) कुळाचे नाव वाढविणारा
48) न्यून, कमी प्रतीचे
49) खुपच छान, सुंदर
50) आलिगन देणे, मिठी मारणे
53) हार, ओसाड
54) एक दिशा
57) रीतरिवाज, प्रथा
58) अहंकार, ताठा, अभिमान
59) पालन पोषण, संगोपन
61) जोगेश्वरी देवीच्या नावाने मागितलेली भिक्षा
64) गोड बोलणे, एक मराठी दूरचित्रवाहिनी
65) गादी, तख्त, सिंहासन
67) छाती
69) कमळासारखे सुंदर डोळे असलेला
73) पडणे, नाश, पान
75) हस्त, हात
77) शरीर संरक्षणासाठी असलेला सशस्त्र माणूस
79) मंगलाष्टकाचे वेळी वरवधूमध्ये धरलेला कपडा
82) दुसरा ज्याप्रमाणे वागेल त्याचप्रमाणे आपणही वर्तन करावे या अर्थाचा एक शब्द प्रयोग
84) अंधार, काळोख
85) निकड, आवश्यकता
86) ताठा, गुर्मी

**–: उभी विधाने:–**
1) निराधार वृद्धांच्या राहण्यासाठी केलेली सोय
2) प्रत्येक दिवशी
3) लोकांनी आपापसात संयुक्त भांडवलावर काढलेले सावकारी दुकान
4) शरीर कष्ट करुन उपजीविका करणारा
5) सांभाळ, काळजीपूर्वक रक्षण
6) ओरडा, गडबड, कल्ला
7) एक लहान चर्मवाद्य
8) उत्तराधिकारी
9) आंकडा, गळ, अटकविण्याचे साधन
12) नदीचे फोडून आणलेले पाणी, पाट
17) जंगलात लागलेली आग
18) अनर्थ, बिकट प्रसंग
19) उष्ण, गरम
20) भांडणाचे मूळ, वाद
21) सकाळ, पहाट
23) सर्व जग, दशदिशा
24) क्रिकेटच्या खेळात काढलेली धाव
25) सोन्या–मोत्याचे दागिने
26) घाण, विष्ठा
29) भगीरथ प्रयत्नाने भूतलावर अवतरलेली पवित्र नदी
31) सर्व सैन्य, बळ, शक्ति
33) केस गळून पडल्याने उघडा पडलेला मस्तकाचा भाग
34) कृपण
36) वस्तुमात्राचे नाव
38) रत्नचा अपभ्रंश
41) निबर, कडक, कठीण
43) गुप्त राहणे, इतरांच्या दृष्टीस पडणार नाही असे राहणे
45) पैसा दिला सर्व कामे सहज शक्य होतात या अर्थाचा एक वाक्प्रचार
46) जमीन खणण्याचे एक हत्यार
47) मागच्या काळात झालेला
51) वडील माणूस
52) परवानगी, कायदेशीर मोकळीक
55) नम्र, गरीब
56) लाज, लज्जा
58) खिडकी, झरोका
60) पाळलेला, माणसाळलेला प्राणी
62) तृण
63) मुख रस
64) लहान, छोटा
66) संगम, सहवास, संयोग
68) एक जागा सोडून दूसरीकडे जाणे
70) जिव्हा, रसना
71) लोकांच्या सत्तेखाली त्यांच्या संमतीने चालणारी व त्यांच्याच हिताची अशी राज्यपद्धती
72) एक अवैध मादक द्रव्य पदार्थ
73) फुलांचे दळ
74) दया, मेहरबानी
76) हसू, उपहास, फजिती
77) शेवट, समाप्ती
78) द्रव, आवड
79) शरीरावयव 80) धूळ, पुष्प पराग
81) टिंगल, टवाळी
83) बाजूने, पक्ष (उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# विविध आस्थापनांमध्ये बालकामगार कायद्याचे उल्लंघन

## नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यात सर्वाधिक कारवाई; ५१ बालमजुरांची सुटका

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १३ : विदर्भात विविध आस्थापनांमध्ये बालकामगार कायद्याचे उलंघन केले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. अपर कामगार आयुक्तांनी एक वर्षाच्या कालावधीत राबविलेल्या विशेष छापासत्रात तब्बल ४१ आस्थापनांवर धाडी टाकण्यात आल्या आणि त्यातून ६४ बालमजुरांची सुटका करण्यात आली आहे. नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यात २८ ठिकाणी छापे टाकण्यात आले असून, कार्यवाहीत ५१ बालकामगारांची सुटका करण्यात आली.**



### गुन्हे दाखल

**१४ वर्षांच्या आतील मुलांना कामावर ठेवणे हा गुन्हा आहे. अनेक आस्थपानांकडून बालमजुरीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. छापासत्र टाकून कारवाई केली असून, गुन्हे दाखल करण्यात आले आहे. कोणत्याही आस्थापनाने बालमजुरांना कामावर ठेऊ नये, असे आवाहन अपर कामगार आयुक्त किशोर दहिफळकर यांनी केले आहे.**

विविध जिल्ह्यात गॅरेज, वर्कशॉप, हॉटेल, ढाब यासह अन्य व्यावसायिक आस्थापनांमध्ये ही मुले राबवण्यात येत होती. काही ठिकाणी त्यांना दररोज १०० ते १५० रुपयांपेक्षा कमी मजुरी देऊन दिवसभर कामावर ठेवले जात असल्याचे आढळून आले आहे बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) कायद्यानुसार १४ वर्षांखालील मुलांना कामावर ठेवणे दंडनीय गुन्हा आहे. मात्र, संबंधितांनी कायद्याला केरात टाकत शिक्षणाच्या हक्कापासून वंचित ठेवून या मुलांचे बालपण हिरावून घेतल्याचे कारवाईत स्पष्ट झाले. अनेक आस्थापनांमध्ये कामाच्या ठिकाणी सुरक्षेची कोणतीही साधने नव्हती. काही मुलांना तर ओव्हरटाईमच्या नावाखाली रात्री उशिरापर्यंत काम करावे लागत असे अपर कामगार आयुक्त किशोर दहिफळकर यांच्या पथकाने संबंधित आस्थापनांवर गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

**जनजागृती**

अपर कामगार आयुक्त कार्यालयाकडून जनजागृती करण्यात असली तरी आस्थापनांकडून कायद्याचे उलंघनही करण्यात येत आहे. सामाजिक संघटना आणि बालहक्क कार्यकर्त्यांनी या प्रकरणात कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. केवळ दंड नव्हे, तर परवाने रद्द करून आस्थापनांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची गरज व्यक्त होत आहे. बालपण आणि शिक्षणाचा हक्क हिरावून घेणाऱ्यांविरुद्ध प्रशासनाने सातत्याने आणि कठोर कारवाई मागणी होत आहे.

# सेनेच्या विशिष्ट सेवा मेडलने नितीन इंदूरकर पुरस्कृत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



नागपूर, दि. १३ : नागपूर निवासी मेजर जनरल निवृत्त नितीन राम इंदुरकर यांना विशिष्ट सेवा मेडलने विशेष कार्यक्रमात पुरस्कृत करण्यात आले. अहमदाबाद येथे नुकत्याच पार पडलेल्या या विशेष कार्यक्रमात मेजर जनरल नितीन राम इंदुरकर यांचेसह एकूण १४ अधिकाऱ्यांना विविध सेवा मेडल प्रदान करून गौरविण्यात आले.

शांतता काळातील देण्यात येणारे हे पुरस्कार दक्षिण कमानचे प्रमुख जनरल ऑफिसर कमांडिंग लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांच्या शुभहस्ते देण्यात आले. नितीन इंदुरकर यांना यापूर्वीही त्यांच्या वैशिष्ट पूर्ण कामगिरीबद्दल सेना मेडल, विशिष्ट सेवा मेडल द्वारे गौरविण्यात आले असून सेनासेवीतील हे तिसरे मेडलही त्यांच्या नावे नोंदल्या गेले आहे. नितीन इंदुरकर हे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते वनवासी कल्याण आश्रमाचे विदर्भ विभागाचे संरक्षक, माजी मुख्य वनसंरक्षक राम नारायण इंदूरकर (भावसे) यांचे पुत्र असून, भामसंघ प्रणित एलओबीडब्लूचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष बँक कर्मचारी कामगार नेते विनायक इंदुरकर जेष्ठ पत्रकार विश्वास इंदूरकर भाजपा महानगराचे सक्रिय पदाधिकारी कार्यकर्ते विवेक इंदुरकर यांचे चुलत बंधू होत. नितीन इंदुरकर यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल मित्र मंडळ व नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे.

## थोडक्यात

### चॅरिटेबल ट्रस्टद्वारा धम्म परिषद

**नागपूर :** प्रियदर्शी चॅरिटेबल ट्रस्ट कोहळीच्या वतीने चौथ्या धम्म परिषद पार पडली भदंत आनंद समता परिसर बाजार चौक कोहळी कळमेश्वर येथील समता सैनिक दलाच्या उपस्थितीत धम्म रॅली काढण्यात आली. प.पूज्य भदंत महातिस्यम यांच्या शुभहस्ते परिषदेचे उदघाटन झाले. धम्म ध्वजारोहण, बुद्धवंदना, परित्रण पाठ, धम्मदेशना, नाट्य, परिसंवाद, भोजनदान, सत्कार, प्रबोधन आणि बुद्ध भीमगीते तसेच आंबेडकरवादी द्दष्टिकोनातून बुद्ध धम्म,त्यागमूर्ती माता रमाई यांचा जीवन संघर्ष आदी विषयांवर चर्चासत्र घेण्यात आले. भीमेश भारती यांनी बुद्ध भीमगीते सादर केले. परिषदेत उपस्थितीत सुखदेव उके, संघमित्रा ढोके, चावरे, प्रा.प्रवीण कांबळे, स्मिता ताकसंडे यांची उपस्थिती होती. धम्मपरिषदेचे आयोजक रेश्मा शैलेश उके यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### विद्यार्थिनीचा वडिलासह मृत्यू

**नागपूर :** १२वीची परीक्षा देण्यासाठी घराबाहेर पडलेल्या विद्यार्थिनीचा आणि वडिलांचा भीषण अपघातात जागीच मृत्यू झाला ही घटना गुरुवारी सकाळी मोहपा रोडवर घडली. या दुर्घटनेत अन्य एक विद्यार्थिनी जखमी झाली असून, तिच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनुसार, मोहपा गावातील सुभाष केशव भिवणकर (वय ५२) हे गुरुवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास आपल्या दुचाकीने मुलगी (वय १६) आणि तिची मैत्रीण वंशिका ज्ञानेश्वर नरुळे (वय १७) यांना घेऊन उमरेडकडे निघाले होते. दोन्ही विद्यार्थिनींची बारावीची परीक्षा असल्याने त्या परीक्षा केंद्रात वेळेत पोहोचण्यासाठी घरातून लवकर निघाल्या होत्या. मात्र, सुभाष भिवणकर आणि तन्वी यांचा अपघातात मृत्यू झाला.

## निधन

### शशिकुमार भगत



**नागपूर :** नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष आणि तरुण भारतचे माजी कार्यकारी संपादक स्व. शशिकुमार भगत यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी उद्या शनिवार, दि. १४ फेब्रुवारीला शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. पंचशील चौकातील पत्रकार भवनात शनिवारी सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या या शोकसभेच्या अध्यक्षस्थानी तरुण भारतचे माजी संपादक सुधीर पाठक राहतील.

## मला काय त्याचे ...



**नागपूर: नागपूरसह राज्यभरात दररोज रस्ते दुर्घटना घडत आहेत. कुटुंबेच कुटुंब उध्वस्त होत असताना कुणीही आपल्या वाहनाच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यास तयार नाहीत. शहरातील मेडिकल चौक ते मानेवाडा हा अतिशय धोकादायक रस्ता. यात काही ठिकाणी तर दुभाजकच नाही. कोण कुठून येईल आणि ठार मारून जाईल सांगता येत नाही. मेडिकल चौकापासून तुकडोजी पुतळा चौकापर्यंत असे ६ स्ट्रिप डिव्हायडर तयार करण्यात आले आहेत. याठिकाणी निरीक्षण केले असता ई-रिक्षा सोडून कोणत्याही वाहनधारकाने वेग कमी केलेला नव्हता. शेवटी 'मला काय त्याचे' अशी मनोवृत्ती ठासून भरली आहे.**

# सौर क्रांतीत नागपूर जिल्हा राज्यात प्रथम

## खासदार महोत्सवात सन्मान; अमरावती, बुलढाण्याची पहिल्या १० मध्ये झेप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. १३ : केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'पीएम सूर्यघर मोफत वीज योजने'च्या प्रभावी अंमलबजावणीत महाराष्ट्राने देशात द्वितीय क्रमांकावर झेप घेत सौर ऊर्जेच्या क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला आहे. विशेष म्हणजे या मोहिमेत नागपूर जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे या अनुषगांने ऑल इंडिया रिन्युएबल एनर्जी असोसिएशनतर्फे खासदार औद्योगिक महोत्सवात महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह विविध संस्थांचा विशेष पुरस्कारांनी सन्मान करण्यात आला.



सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ, महावितरण आणि जन समर्थ या संस्थांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी महावितरणचे संचालक (संचलन/प्रकल्प) सचिन तालेवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे, मुख्य अभियंता दिलीप दोडके, पंकज तगडपल्लीवार आणि कार्यकारी अभियंता राहुल सोनटक्के यांन गौरविण्यात आले. ज्येष्ठ उद्योगपती गिरधारी मंत्री आणि महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच, एमएनआरईचे संचालक आदित्य प्रताप सिंह आणि आरईसीचे विभाग प्रमुख संजय त्रिपाठी यांनीही आपल्या संस्थांच्या वतीने पुरस्कार स्वीकारले. पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजनेमुळे देशभरात घरांच्या छतांवर सौर प्रकल्प उभारणीला मोठी गती मिळाली आहे. सौर रूफटॉपच्या माध्यमातून नागरिकांना स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जा उपलब्ध होत असून महाराष्ट्र यात अग्रेसर आहे. नागपूर जिल्ह्यासह अमरावती आणि बुलढाणा जिल्ह्यांनीही राज्यातील पहिल्या १० जिल्ह्यांमध्ये स्थान मिळवून आपली चमक दाखवली आहे. संपूर्ण देशात दररोज ६,५०० हून अधिक रूफटॉप सौर प्रकल्पांची स्थापना होत असल्याची माहिती आदित्य प्रताप सिंह यांनी यावेळी दिली. तर, महावितरणचे संचालक सचिन तालेवार यांनी ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल आणि स्वयंचलित (ऑटोमेटेड) केल्यामुळे अनुदानाचे वितरण अत्यंत वेगाने आणि पारदर्शक पद्धतीने होत असल्याचे नमूद केले.

# वसंतराव नाईक कला व समाज विज्ञान संस्था विजेता

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. १३ : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाद्वारे आयोजित 'युवारंग २०२६' या आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्थेने पटकावले असून हिस्लॉप महाविद्यालय उपविजेता ठरले. वसंतराव नाईक संस्थेच्या शैलेश नैताम याने 'सुवर्ण कुमार' तर नयन मेश्राम हिने 'सुवर्ण कन्या' हा मानाचा करंडक पटकावला.




महोत्सवाच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून कला संचालक डॉ. किशोर इंगळे, डॉ. अजय चव्हाण व डॉ. विजय खंडाळ उपस्थित होते. या स्पर्धेत संगीत व नाट्य चषक वसंतराव नाईक संस्थेने जिंकले, तर ललित कला चषक शासकीय चित्रकला व अभिकल्प महाविद्यालय व वसंतराव नाईक संस्थेने संयुक्तपणे मिळवला. साहित्य चषक श्री रामदेवबाबा अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय आणि हिस्लॉप महाविद्यालयाने, तर नृत्य चषक वसंतराव नाईक संस्था व रामदेवबाबा महाविद्यालयाने संयुक्तपणे पटकावला. नृत्य कला प्रकारात, लोकनृत्य स्पर्धेत वसंतराव नाईक संस्था व रामदेवबाबा महाविद्यालय प्रथम, मोहता विज्ञान व विदर्भ कला महाविद्यालय (लाखनी) द्वितीय, तर एल.ए.डी. महिला महाविद्यालय आणि प्रेरणा महाविद्यालय तृतीय स्थानी राहिले. लावणीत कशीश ठावरे (हिस्लॉप) प्रथम, आर्या धनविजय (ग्रंथालय विभाग) द्वितीय व जान्हवी कोठेकर (गुरुनानक तंत्रशिक्षण संस्था) तृतीय ठरली. शास्त्रीय नृत्यात सोनल शेंडे (डॉ. आंबेडकर महाविद्यालय) प्रथम, गौरी भागवत (सिटी प्रीमियर महाविद्यालय) द्वितीय व हुमेशा (एल.ए.डी.) तृतीय आली. नाट्य विभागात, नक्कल कलेत शैलेश नैताम (वसंतराव नाईक) प्रथम, सत्यजित साखरे (हिस्लॉप) द्वितीय व पल्लवी कटरे (गृहविज्ञान विभाग) तृतीय आली. लघुनाटिका प्रकारात वसंतराव नाईक संस्था प्रथम, हिस्लॉप द्वितीय व रामदेवबाबा महाविद्यालय तृतीय राहिले, तर मूकनाट्यात वसंतराव नाईक संस्थेने प्रथम, हिस्लॉपने द्वितीय व एल.ए.डी. महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळवला. अशा प्रकारे विविध श्रेणींत या संस्थांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

# घराघरातून निघणाऱ्या कचरा संकलनाला मिळणार अधिक बळ

## नागपूरच्या कचरा संकलन ताफ्यात ४० नवीन वाहनांचा समावेश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. १३ : नागपूर शहराला स्वच्छ आणि सुंदर करण्याच्या दृष्टीने पाऊल टाकत, महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने कचरा संकलन ताफ्यात ४० नवीन वाहनांचा समावेश केला आहे. महापौर श्रीमती नीता ठाकरे यांनी गुरुवारी मनपा मुख्यालयातून या वाहनांना हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ केले. यामुळे शहरातील 'डोअर-टू-डोअर' कचरा संकलनाला अधिक बळ मिळणार आहे.



या नवीन ताफ्यात २० इलेक्ट्रिक आणि २० डिझेल वाहनांचा समावेश असून, यामुळे बीव्हीजी इंडिया लिमिटेडच्या वाहनांची संख्या २६० झाली आहे. संपूर्ण नागपुरात आता एकूण ४९० वाहनांद्वारे कचरा संकलन केले जाणार आहे. गांधीबाग महाल झोन ते मंगळवारी झोन (झोन ६ ते १०) दरम्यान अनियमित कचरा संकलनाची समस्या या नवीन वाहनांमुळे दूर होईल, असा विश्वास महापौरांनी व्यक्त केला. याप्रसंगी नगरसेवक दिनेश यादव, नगरसेविका सय्यदा बेगम अंसारी, पूजा पाठक, प्रभारी आयुक्त वसुमना पंत, उपायुक्त निर्भय जैन, डॉ. रंजना लाडे, राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, कार्यकारी अभियंता अल्पना पाटणे, डॉ. पियूष अंबुलकर, लोकेश बासनवार, भोला खोब्रागडे व बीव्हीजी इंडियाचे अधिकारी उपस्थित होते. शहरात झोन १ ते ५ ची जबाबदारी 'अँटोनी वेस्ट'कडे, तर झोन ६ ते १० ची जबाबदारी 'बीव्हीजी इंडिया'कडे आहे. या नव्या सुविधेमुळे ओला व सुका कचरा संकलन अधिक सुव्यवस्थित होणार आहे.

## माजी विद्यार्थी मेळावा... पिडिलाइटतर्फे वॉटरप्रूफिंग व बांधकाम रसायनांबाबत माहिती

# उद्योगातील आधुनिक बदलांशी विद्यार्थ्यांना जोडण्याचा स्तुत्य उपक्रम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १३ : संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) नागपूर येथे प्लंबर आणि मेसन (गवंडी) व्यवसायातील विद्यार्थ्यांसाठी एका विशेष माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम पिडिलाइट इंडस्ट्रीज लिमिटेड आणि नागपूर आयटीआय यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.**




कार्यक्रमाला व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय नागपूर येथील पुरुषोत्तम जी देवतळे साहेब यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. श्वेता कुलकर्णी, उपसंचालक, नागपूर आयटीआय, प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. योगेश पाटील, उपव्यवस्थापक, पिडिलाइट, अनोष डोमासिया व त्यांची टीम, व्यवसाय व्यवस्थापक, पिडिलाइट; श्रुती मोरे व त्यांची टीम; तसेच मोहसिन शेख (डॉ.फिक्सिट टीम) यांची प्रमुख उपस्थिती होती. जयंत टालाटुले अविनाश केने, शिवाजी ढुमणे सिद्धार्थ मेहरे, प्रकाश वाढई (सर्व गट निदेशक) तसेच संबंधित व्यवसायाचे शिल्प निदेशक इंद्रभूषण बेलसरे, प्रभाकर मुंडे व पेटकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी उद्योगतज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्लंबिंग व बांधकाम क्षेत्रातील करिअर संधी व कौशल्य विकासाबाबत सविस्तर माहिती दिली.

योगेश पाटील यांनी पिडिलाइटच्या सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमांबाबत व कौशल्यविकास कार्यक्रमांविषयी माहिती देत युवक सक्षमीकरणावर भर दिला. जीवन राजूरकर, प्लंबिंग अभियंता व कंत्राटदार, यांनी प्लंबिंग व बांधकाम क्षेत्रातील रोजगार व उद्योजकतेच्या संधी स्पष्ट केल्या अनोष डोमासिया व विशाल यांनी 'रॉफ' उत्पादनांची माहिती देत बांधकाम उद्योगातील त्यांचे उपयुक्त उपयोग समजावून सांगितले. सौ. श्रुती मोरे व नविद यांनी विविध प्लंबिंग उत्पादनांची माहिती व त्यांचा प्रत्यक्ष वापर विद्यार्थ्यांसमोर मांडला. मोहसिन शेख यांनी डॉ. फिक्सिटच्या वॉटरप्रूफिंग व बांधकाम रसायनांबाबत माहिती देत आधुनिक बांधकामातील त्यांचे महत्त्व विशद केले. संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर येथील प्लंबर व मेसन व्यवसायातील एकूण ३० माजी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यरत माजी विद्यार्थ्यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचा समारोप कुणाल जाधव, कौशल्य पर्यवेक्षक यांनी आभारप्रदर्शनाने केला हा माजी विद्यार्थी मेळावा यशस्वी ठरला असून, विद्यार्थ्यांना उद्योगतज्ज्ञांशी संवाद साधण्याची तसेच प्लंबिंग व बांधकाम क्षेत्रातील करिअर संधी जाणून घेण्याची मोलाची संधी प्राप्त झाली.

# शिवसेनेतर्फे नवनिर्वाचित महापौर नीता ठाकरेंचे स्वागत



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. १३ : नवनिर्वाचित महापौर निता ठाकरे यांचा शिवसेना पक्षातर्फे सह संपर्कप्रमुख ओंकार पारवे यांच्या नेतृत्वातील सत्कार करण्यात आला.

युवा सेना जिल्हाप्रमुख शरद सरोदे, महिला आघाडी जिल्हा प्रमुख मनीषा पापडकर, शहर प्रमुख बंडू तळवेकर, नगरसेवक गणेश चरलेवार, माजी नगरसेवक व उप जिल्हाप्रमुख गणेश डोईफोडे, उपजिल्हा संघटीका गायत्री वैद्य, संपर्कप्रमुख ओमी यादव, शिवसेना शहर प्रमुख सलमान खान, शिवसेना शहरप्रमुख सचिन यादव, विधानसभा संघटक गणेश सोळंकी, उपशहर प्रमुख प्रमुख नरेंद्र मगरे आदी उपस्थित होते. महापौर यांच्याशी नागपूर महानगरपालिकेत पक्ष कार्यालय देण्याबाबत चर्चा झाली. मनोनित नगरसेवक याबाबत सुद्धा चर्चा करण्यात आली.

महत्त्वाचे

## उस्मान तारिकला इशान किशनचा थेट इशारा

**नवी दिल्ली :** टी-२० विश्वचषकातील भारत विरुद्ध पाकिस्तान या महामुकाबल्यापूर्वी भारतीय संघाने आपली रणनीती स्पष्ट केली आहे. पाकिस्तानचा 'पॉज' फिरकीपटू उस्मान तारिक याचे आव्हान परतवून लावण्यासाठी भारतीय फलंदाज सज्ज असल्याचे यष्टीरक्षक फलंदाज इशान किशनने सांगितले आहे. नामिबियाविरुद्ध दिमाखदार विजय मिळवल्यानंतर बोलताना इशानने स्पष्ट केले की, उस्मान तारिकच्या साईडआर्म अ‍ॅक्शनचा सामना करण्यासाठी संघाने आधीच पुरेसा सराव केला आहे.अपेक्षेप्रमाणे, टी-२० विश्वचषकातील भारत-पाकिस्तान या साखळी सामन्याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे. उभय संघांमधील सामना हा नेहमीच क्रिकेट विश्वातील सर्वाधिक पसंतीचा सामना असतो. त्यातच मैदानाबाहेरील अनेक नाट्यमय घडामोडींनंतर हे दोन्ही संघ आमनेसामने येत आहेत.

## इटलीच्या 'मॉस्को' बंधूंचा वानखेडेवर वर्ल्ड रेकॉर्ड!

**नवी दिल्ली :** भारताची क्रिकेट पंढरी मानल्या जाणाऱ्या वानखेडे स्टेडियमवर १२ फेब्रुवारी रोजी एका नव्या इतिहासाची नोंद झाली. टी-२० विश्वचषकात पदार्पण करणाऱ्या इटलीने नेपालवर १० गडी राखून दणदणीत विजय मिळवत विश्वचषकातील आपल्या पहिल्या विजयाची नोंद केली.या विजयाचे खरे शिल्पकार ठरले ते जस्टिन मॉस्को आणि अँथनी मॉस्को हे दोन सख्खे भाऊ. या दोघांनी केवळ सामनाच जिंकून दिला नाही, तर विश्वचषकाच्या इतिहासात सख्ख्या भावांनी केलेली सर्वोच्च भागीदारी करण्याचा जागतिक विक्रमही प्रस्थापित केला.प्रथम फलंदाजी करणाऱ्या नेपाळच्या फलंदाजांना इटलीच्या फिरकीपटूंनी आपल्या जाळ्यात ओढले आणि त्यांना अवघ्या १२३ धावांवर रोखले. १२४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इटलीच्या सलामीवीर जोडी जस्टिन आणि अँथनी यांनी नेपाळच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला.विश्वचषकाच्या इतिहासात दोन सख्ख्या भावांनी शतकी भागीदारी करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

# झिम्बाब्वेने कांगारूंना २३ धावांनी केले पराभूत

## टी-२० विश्वचषक मध्ये मोठा उलटफेर!




**नवी दिल्ली : दि.१३ वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक २०२६ चा १९ वा लीग सामना आज म्हणजेच शुक्रवार, १३ फेब्रुवारी रोजी ऑस्ट्रेलिया आणि झिम्बाब्वे यांच्यात कोलंबो येथे खेळला गेला. या सामन्यामध्ये झिम्बाब्वेच्या संघाने कमालीची कामगिरी केली आणि या विश्वचषकामध्ये मोठा उलटफेर पाहायला मिळाला आहे. या सामन्यामध्ये झिम्बाब्वेच्या संघाने ऑस्ट्रेलियाला २३ धावांनी पराभूत केले. या सामन्यामध्ये झिम्बाब्वेच्या संघाने ऑस्ट्रेलियाला पराभूत करुन सुपर ८ ची पकड मजबूत केली आहे. झिम्बाब्वेच्या गोलंदाजी आक्रमणासमोर कांगारूंचा एकही फलंदाज क्रीजवर टिकू शकला नाही.या पराभवामुळे कांगारूंचा सुपर ८ मध्ये जाण्याचा मार्ग अधिकच कठीण झाला आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा कर्णधार ट्रॅव्हिस हेडने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. झिम्बाब्वेला प्रथम फलंदाजी करताना चांगली सुरुवात मिळाली. संपूर्ण डावात फक्त २ विकेट पडल्या, परंतु संघाला फक्त १६९ धावाच मिळाल्या. ऑस्ट्रेलियासमोर १७० धावांचे लक्ष्य होते. झिम्बाब्वेकडून ब्रायन बेनेटने ६४ धावांची खेळी केली. १७० धावांच्या प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाची सुरुवात खराब झाली. २५ धावांच्या आत ३ विकेट गमावल्या. झिम्बाब्वेच्या १७० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या ऑस्ट्रेलियाची सुरुवात खराब झाली. जोश इंगलिस फक्त आठ धावा करून बाद झाला. त्यानंतर कॅमेरॉन ग्रीन एकही धाव न काढता बाद झाला. चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला येत असलेला टिम डेव्हिडही फलंदाजीत अपयशी ठरला आणि फक्त दोन चेंडूंनंतर बाद झाला. कर्णधार ट्रॅव्हिस हेडने १५ चेंडूत १७ धावा करून ब्रॅड इव्हान्सच्या गोलंदाजीवर बाद झाला.ग्लेन मॅक्सवेलही फॉर्ममध्ये नव्हता, त्याने ३२ चेंडूत ३१ धावा केल्या. मॅट रेनशॉने एका टोकाला धरून ४४ चेंडूत ६५ धावा केल्या. तथापि, त्याची खेळी कांगारू संघाला मदत करू शकली नाही. झिम्बाब्वेची गोलंदाजी विनाशकारी होती, ब्लेसिंग मुझाराबानीने त्याच्या चार षटकांच्या स्पेलमध्ये फक्त १७ धावा देऊन चार बळी घेतले. ब्रॅड इव्हान्सने ३.३ षटकात २३ धावा देऊन तीन बळी घेतले.नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या झिम्बाब्वेने दमदार सुरुवात केली. ब्रायन बेनेट आणि तादिवानाशे मारुमानी यांनी पहिल्या विकेटसाठी ६१ धावा जोडल्या. मारुमानी २१ चेंडूत ३५ धावा काढून बाद झाला. त्यानंतर बेनेटला रायन बर्लच्या रूपात एक चांगला साथीदार मिळाला आणि दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ७० धावांची महत्त्वाची भागीदारी रचली.३० चेंडूत ३५ धावा काढल्यानंतर बर्लला कॅमेरॉन ग्रीनने बाद केले. तथापि, बेनेटने एका टोकाला एकत्र धरले आणि ५६ चेंडूत ६४ धावांची दमदार खेळी खेळली, ज्यामुळे झिम्बाब्वेला २० षटकांत २ बाद १६९ धावांपर्यंत मजल मारता आली.

## पाकिस्तानचा धुव्वा उडवण्यासाठी टीम इंडिया सज्ज

### हाय-व्होल्टेज लढतीसाठी भारतीय संघ रवाना




**नवी दिल्ली : दि.१३ वृत्तसंस्था**

**भारतीय संघ :**
**सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, संजू सॅमसन, शिवम दुबे, इशान किशन, हार्दिक पांड्या, अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रिंकू सिंग.**

टीम इंडियाने उल्लेखनीय कामगिरी करत नामिबियाला ९६ धावांनी हरवून २०२६ च्या टी-२० विश्वचषकात सलग दुसरा विजय मिळवला. आता, टीम इंडियाचे पुढील ध्येय १५ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानला हरवणे असेल. टीम इंडियाने नेहमीच टी-२० विश्वचषकात वरचढ कामगिरी केली आहे. खेळलेल्या आठ सामन्यांपैकी संघाने सात वेळा विजय मिळवला आहे आणि फक्त एकदाच पराभव पत्करला आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हा सामना श्रीलंकेतील कोलंबो येथे खेळला जाईल. नामिबियाविरुद्धच्या सामन्यानंतर, टीम इंडिया आता पाकिस्तानचा सामना करण्यासाठी कोलंबोला रवाना झाली आहे. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे.सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया अत्यंत मजबूत दिसत आहे. टीम इंडिया या विश्वचषकात त्यांचे सर्व सामने भारतात खेळेल, तर दुसरीकडे, पाकिस्तान त्यांचे सर्व सामने श्रीलंकेत खेळेल. परिणामी, प्रत्येक संघाला पाकिस्तानविरुद्धच्या प्रत्येक सामन्यासाठी श्रीलंकेला जावे लागेल. यामुळे, भारतीय संघ या सामन्यासाठी श्रीलंकेला रवाना झाला आहे. टीम इंडियाचे खेळाडू चार्टर्ड विमानाने कोलंबोला रवाना झाले आहेत.आतापर्यंत दोन्ही संघांनी या विश्वचषकात प्रत्येकी दोन सामने खेळले आहेत आणि दोन्ही सामने जिंकले आहेत. चांगल्या नेट रन रेटमुळे भारतीय संघ ग्रुप अ मध्ये अव्वल स्थानावर आहे. १५ फेब्रुवारी रोजी जो संघ सामना जिंकेल तो थेट सुपर ८ मध्ये पात्र ठरेल. टीम इंडिया पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात आपली प्रभावी कामगिरी सुरू ठेवण्याचा प्रयत्न करेल. या सामन्यात टीम इंडियाच्या प्लेइंग इलेव्हनमध्येही बदल होऊ शकतात, अभिषेक शर्मा परतण्याची शक्यता आहे.

## धोनीला मानहानीच्या प्रकरणात १० लाख रुपये भरण्याचे आदेश

**नवी दिल्ली : दि.१३ वृत्तसंस्था**




भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी याला मद्रास उच्च न्यायालयाने एका जुन्या मानहानीच्या प्रकरणात १० लाख रुपये जमा करण्याचे आदेश दिले आहेत. निवृत्त आयपीएस अधिकारी जी. संपत कुमार यांच्याविरोधात धोनीने दाखल केलेल्या दाव्यादरम्यान न्यायालयाने हा अंतरिम आदेश दिला आहे.२०१३ च्या आयपीएल सट्टेबाजी घोटाळ्याशी धोनीचा संबंध जोडल्याचा आरोप करत, धोनीने निवृत्त आयपीएस अधिकारी जी. संपत कुमार यांच्यावर १०० कोटी रुपयांचा मानहानीचा दावा दाखल केला होता. या प्रकरणातील पुराव्यांच्या तांत्रिक प्रक्रियेवरून आता न्यायालयाने धोनीला खर्च उचलण्यास सांगितले आहे.न्यायमूर्ती आर.एन. मंजुळा यांनी ११ फेब्रुवारी रोजी हा आदेश दिला. या प्रकरणातील महत्त्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष वेधले असता खालील बाबी समोर आल्या आहेत. प्रकरणाशी संबंधित सीडीमधील मजकुराचे लिप्यंतरण आणि भाषांतर करण्याचे काम सध्या सुरू आहे. हे काम अत्यंत व्यापक असून ते पूर्ण करण्यासाठी सुमारे ३ ते ४ महिने लागण्याची शक्यता आहे. या कामासाठी न्यायालयाला अधिकृत दुभाष्याची नियुक्ती करावी लागली आहे. या प्रक्रियेसाठी येणारा १० लाख रुपयांचा खर्च वादी म्हणून धोनीने उचलावा, असे न्यायालयाने स्पष्ट केले.न्यायालयाने धोनीला ही रक्कम १२ मार्च २०२६ पर्यंत 'मद्रास उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश मदत निधी'च्या खात्यात जमा करण्यास सांगितले आहे. जर धोनीने हे पैसे वेळेत जमा केले नाहीत, तर प्रक्रियेत विलंब होऊ शकतो.

## रियान पराग राजस्थान रॉयल्सचा नवीन कर्णधार

**नवी दिल्ली : दि.१३ वृत्तसंस्था**



२०२६ मध्ये होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीगच्या १९ व्या हंगामासाठी राजस्थान रॉयल्सने त्यांच्या संघात अनेक मोठे बदल केले आहेत. गेल्या हंगामापर्यंत संघाचे नेतृत्व करणाऱ्या संजू सॅमसनची त्यांनी ट्रेड विंडोद्वारे चेन्नई सुपर किंग्जकडे बदली केली. तेव्हापासून, आयपीएल २०२६ च्या हंगामापूर्वी सर्वांच्या नजरा राजस्थान रॉयल्सच्या नवीन कर्णधारावर लागल्या आहेत, आता सीएसके मधून राजस्थान रॉयल्सचा भाग असलेले रवींद्र जडेजा ही भूमिका स्वीकारेल अशी अपेक्षा होती.

तथापि, राजस्थान रॉयल्स फ्रँचायझीने या सर्व अटकळांना पूर्णविराम देत आयपीएल २०२६ च्या आधी रियान परागला ( ) नवीन कर्णधार म्हणून घोषित केले आहे.आयपीएल २०२६ च्या आधी रियान परागची पूर्णवेळ कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, जो संघाचे नेतृत्व करणारा सातवा खेळाडू बनला आहे. मागील कर्णधारांमध्ये शेन वॉर्न, राहुल द्रविड, स्टीव्ह स्मिथ, अजिंक्य रहाणे आणि संजू सॅमसन यांचा समावेश आहेआयपीएल २०२५ चा हंगाम राजस्थान रॉयल्ससाठी चांगला नव्हता. गेल्या हंगामात संघाचे नेतृत्व करणाऱ्या संजू सॅमसन दुखापतीमुळे आठ सामने गमावले आणि रियान परागने जबाबदारी स्वीकारली.

तथापि, त्याच्या नेतृत्वाखाली राजस्थान रॉयल्सने फक्त दोन सामने जिंकले आणि सहा सामने गमावले. कर्णधार म्हणून रियान परागने फलंदाजीत नक्कीच चांगली कामगिरी केली, या आठ सामन्यांमध्ये त्याने सरासरी ३८.५७ धावा केल्या आणि त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील सर्वोच्च धावसंख्या ९५ धावा आहेत, ज्या त्यांने कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध केल्या होत्या.२०१९ च्या आयपीएल हंगामात, रियान परागला जगातील सर्वात मोठ्या टी-२० लीगमध्ये पदार्पण करण्याची संधी देण्यात आली, जिथे तो गेल्या सात हंगामांपासून राजस्थान रॉयल्सचा भाग आहे. त्याची सर्वोत्तम कामगिरी २०२४ च्या आयपीएल हंगामात होती, जिथे त्याने ५२.०९ च्या सरासरीने ५७३ धावा केल्या. रियान परागने आयपीएलमध्ये एकूण ८४ सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने २६.१ च्या सरासरीने १५६६ धावा केल्या आहेत.

## आरबीआयचा बँकांना दणका!




**नवी दिल्ली :** आरबीआय अर्थात भारतीय रिझर्व्हें बँकने ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि बँकांकडून चुकीच्या विक्रीवर कारवाई करण्यासाठी नवीन मसुदा नियम जारी केले आहेत. हा मसुदा, आरबीआय कमर्शियल बँक्स जबाबदार व्यवसाय आचारसंहिता सुधारणा निर्देश २०२६, १ जुलै २०२६ पासून लागू होईल. या मसुद्यानुसार, जर एखाद्या बँकेने उत्पादन किंवा सेवा चुकीच्या पद्धतीने विकल्याचे आढळले तर बँकेला ग्राहकांना पूर्ण रक्कम परत करावी लागेल आणि झालेल्या कोणत्याही नुकसानाची भरपाई करावी लागेल. मार्केटिंगसाठी आरबीआयची नवी आचारसंहिता लागू केली आहे यात ग्राहकांची स्पष्ट संमती अनिवार्य असेल.मार्केटिंग किंवा विक्री करताना पारदर्शकता आवश्यक आहे. नवीन नियमांनुसार, बँका आणि इतर वित्तीय संस्था कोणत्याही वित्तीय उत्पादनाची किंवा सेवेची जाहिरात, मार्केटिंग किंवा विक्री करताना पारदर्शकता आणि जबाबदारी वापरतील. ग्राहकांशी संपर्क साधण्यापूर्वी स्पष्ट संमती घेणे अनिवार्य असेल आणि संपर्क फक्त कार्यालयीन वेळेतच करता येईल, आरबीआयने असेही म्हटले आहे की, बँकांच्या अंतर्गत धोरणांनी कर्मचाऱ्यांना किंवा थेट विक्री एजेंटना कोणत्याही प्रकारे चुकीच्या विक्रीत सहभागी होण्यास प्रोत्साहित करू नये.

# १० महिन्यांत ५३.९५ लाख वाहनांची विदेशात पाठवणी

**नवी दिल्ली : दि.१३ वृत्तसंस्था**

## वाहन निर्यातीने घेतली मोठी झेप



चालू आर्थिक वर्षातील एप्रिल ते जानेवारी या दहा महिन्यात वाहन निर्यात २४.४ टक्क्यांनी वाढून ५३ लाख ९५ हजारांवर गेली आहे. तीनचाकी वाहनांची निर्यात ५२ टक्क्यांनी वाढली असून, चारचाकी आणि दुचाकी वाहनांच्या निर्यातीत अनुक्रमे १७.६ आणि २३.७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. गतवर्षी याच कालावधीत ४३.३५ लाख वाहनांची निर्यात झाली होती.चालू आर्थिक वर्षात सर्वच श्रेणीतील वाहन निर्यातीत वाढ झाली आहे. वस्तू आणि सेवा करातील (जीएसटी) कपातीनंतर वाढीची गती वाढली आहे. एप्रिल ते जानेवारी या कालावधीत कारची निर्यात ३.३८ वरून ३.७६ लाखांवर गेली असून, यूव्ही कारची निर्यात २.८९ वरून ३.६२ लाखांवर गेली आहे. व्हॅनची निर्यात ७,५०९ वरून ८,७३६वर गेली आहे. सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाइल मॅन्युफॅक्चरर्स (सियाम)ने ही आकडेवारी शुक्रवारी (दि.१३) जाहीर केली.प्रवासी तीनचाकी वाहनांची निर्यात २.४८ वरून ३.७९ लाखांवर झेपावली आहे. तब्बल ५२.४ टक्क्यांनी निर्यात वाढली आहे. तर, मालवाहतूक करणाऱ्या तीनचाकी वाहनांची निर्यात ३,१२९ वरून ४,४४०वर गेली आहे. एकूण तीनचाकी वाहनांची निर्यात २.५१ वरून ३.८३ लाखांवर गेली आहे. दुचाकींची निर्यात ३४.४२ वरून ४२.५९ लाखांवर गेली आहे. दुचाकींच्या निर्यातीत एकूण २३.७ टक्क्यांची वाढ झाली आहे. स्कूटर्सची निर्यात ४.९० वरून ५.५९ लाखांवर गेली असून, मोपेडची निर्यात ५,५७४ वरून १७,८६२वर गेली आहे. तर, मोटरसायकलची निर्यात २९.४६ वरून ३६.८२ लाखांवर गेली आहे. मोटरसायकलची निर्यात २५ टक्क्यांनी वाढली आहे.एप्रिल ते जानेवारी या दहा महिन्यात चारचाकी वाहनांची विक्री ३४.९० वरून ३७.०६ लाखांवर गेली आहे. त्यात युटिलिटी व्हेईकलचा (यूव्ही) वाटा २४.५२ लाख आहे. चीनचाकी वाहनांची विक्री ६.२० वरून ६.८५ लाखांवर गेली आहे. त्यात प्रवासी तीनचाकींचा वाटा ५.६७ लाख आहे. दुचाकींची विक्री १.६५ वरून १.७८ कोटींवर गेली आहे. त्यात मोटरसायकलचटा वाटा १ कोटी ७ लाख आहे. खालोखाल ६६.२६ लाख स्कूटर्सची विक्री झाली आहे.एप्रिल ते जानेवारी या कालावधीत वाहनांचे उत्पादन २.५० वरून २.७४ कोटींवर गेले आहे. चारचाकी वाहनांचे उत्पादन ४०.८२ वरून ४४.२५ लाखांवर गेले आहे. त्यात यूव्ही वाहनांचा वाटा तब्बल २७.९८ लाख आहे. चीनचाकी वाहनांचे उत्पादन ८.७९ वरून १०.७५ लाखांवर गेले आहे.




## आयसीआयसीआय प्रू स्मार्ट कीड ३६० सह आपल्या मुलाचे भविष्य सुरक्षित करा!

**मुंबई: दि.१३ वृत्तसंस्था**

आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाईफ इन्शुरन्सने आयसीआयसीआय प्रू स्मार्टकिड ३६० लाँच केला आहे. ही एक दीर्घकालीन बचत योजना आहे, जी पालकांना त्यांच्या मुलाच्या भविष्यातील खर्चासाठी पैसे जमा करण्यास आणि योजना बनवण्यास मदत करते. या योजनेत गॅरंटीड फायदे देखील मिळतात. आयसीआयसीआय प्रू स्मार्ट कीड ३६०, हा प्लॅन मुलाच्या भविष्याच्या महत्त्वाच्या टप्प्यांसाठी मदत करतो - जसे की शाळा, उच्च शिक्षण, किंवा तरुण वयातील महत्वाचे उद्दिष्टे. यामध्ये मनी बॅक किंवा ठराविक पेमेंट मिळते. खास गोष्ट म्हणजे, पालकांना हवे असल्यास ठराविक रक्कम किंवा वाढती रक्कम म्हणून पेमेंट घेण्याचा पर्याय निवडता येतो. या लाँचबद्दल बोलताना, विकास गुप्ता, चीफ प्रॉडक्ट ऑफिसर, आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्स यांनी सांगितले, आयसीआयसीआय प्रू स्मार्टकिड ३६० हा प्रोडक्ट पालकांना त्यांच्या मुलाचे भविष्य आर्थिकदृष्ट्या सुरक्षित करण्यास मदत करण्यासाठी तयार केला आहे. या पॉलिसीमध्ये मनी बॅक फायदे आहेत आणि पॉलिसी संपल्यानंतर मुलांना ठराविक रक्कमेची गॅरंटीड मॅच्युरिटी बेनेफिट मिळते, जी त्याच्या प्रौढ वयात त्याला आर्थिक आधार देऊ शकते.या योजनेची आणखी खास गोष्ट म्हणजे, प्रीमियममध्ये सवलत आणि फायदे सुरू ठेवण्याची सुविधा. जर पालकाचे अचानक निधन झाले, तर भविष्यातील सर्व प्रीमियम माफ केले जातात, लाइफ कव्हर रक्कम नॉमिनीला दिली जाते आणि पॉलिसीतील इतर फायदे चालू राहतात. यामुळे मुलाचे भविष्य आणि त्याची उद्दिष्टे कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरक्षित राहतात.मुख्य फायद्या व्यतिरिक्त, आयसीआयसीआय प्रू स्मार्टकिड ३६० मध्ये काही ऐच्छिक सुविधा देखील आहेत, त्यापैकी एक म्हणजे फॅमिली इन्कम बेनिफिट, जी पालकाच्या अचानक मृत्यूच्या परिस्थितीत कुटुंबाला नियमित उत्पन्न देऊन आर्थिक आधार देते.

## महागाई आटोक्यातच, सुधारित आधारभूत वर्षाचा पहिला अहवाल सादर

**नवी दिल्ली : दि.१३ वृत्तसंस्था**



सुधारीत आधारभूत वर्षाच्या आधारे काढलेला पहिला ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) गुरुवारी (दि.१२) जाहीर झाला. त्यानुसार जानेवारी महिन्यातील महागाई निर्देशांक २.७५ टक्के आहे. शहरी भागातील महागाई निर्देशांक २.७७ आणि ग्रामीण भागातील २.७३ टक्के आहे.डिसेंबर २०२५ पर्यंत २०१२च्या आधारभूत वर्षावर महागाई निर्देशांक काढला जात होता. डिसेंबरमध्ये निर्देशांक १.३३ टक्क्यांवर होता. महागाई निर्देशांक काढण्यासाठी कालबाह्य आधारभूत वर्षाचा आधार घेत असल्याची टीका होत होती. नामांकित आंतरराष्ट्रीय संघटनांनी देखील यावर भाष्य केले होते. अखेरीस २०२४च्या आधारभूत वर्षानुसार महागाई निर्देशांक काढण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार गुरुवारी पहिला अहवाल सरकारने जाहीर केला. भारतीय रिझर्व्ह बँकेनुसार (आरबीआय) महागाईची सहनशील पातळी चार ते सहा टक्के आहे.आरबीआयच्या न्यूनतम चार टक्के पातळीपेक्षा जानेवारीतील महागाई निर्देशांक खाली राहिला आहे. तर, सलग बारा महिने महागाई निर्देशांक दोन ते सहा टक्के पातळीवर राहिला आहे. शीतपेय वगळता खाद्यान्नाच्या किमतीचा एकूण महागाई निर्देशांकातील वाटा ३४.७७ टक्के आहे. त्यानुसार अन्नधान्याच्या किमती (पेय वगळून) २.१३ टक्क्यांनी वाढल्या आहेत.ग्रामीण आणि शहरी भागांसाठी हा दर अनुक्रमे १.९६ आणि २.४४ टक्के आहे. पेय धरून महागाई निर्देशांकातील खाद्यपदार्थांचा वाटा ३६.७५ टक्के आहे. पूर्वीच्या पद्धतीनुसार सीपीआयमध्ये अन्न आणि पेयांचा एकत्रित वाटा ४५.९ टक्के होता. एकूण निर्देशांकाच्या जवळपास निम्मा वाटा खाद्यान्न आणि पेयांचा होता. नवीन पद्धतीनुसार गृहनिर्माण महागाई दर २.०५ टक्क्यांवर आला आहे. त्यात ग्रामीण आणि शहरी भागांचा दर अनुक्रमे २.३९ आणि १.९२ टक्क्यांनी वाढला आहे. जुन्या पद्धतीनुसार डिसेंबरमध्ये गृहनिर्माण क्षेत्राची महागाई २.८६ टक्क्यांवर होती.महागाई निर्देशांक काढण्यासाठी २०१२चा आधार घेतला जात होता. आता आधारभूत वर्ष २०२४ धरल्याने दरम्यानच्या काळात घरगुती खर्चाच्या पद्धतीमध्ये झालेल्या बदलाचे प्रतिबिंब अधिक अचूक पडणार आहे. अर्थव्यवस्थेतील किमतींचा कल कसा आहे, याचे देखील अचूक मापन नवीन पद्धतीत होईल.

तू सांग प्रिये, कधी गं मला
प्रेमानं हाक तू देशील का?
अंधारात तू समयेची ज्योत गं
संकटात मायबाप होशील का?
- संतोष भाकरे

---

तुझा हा हसरा मुखडा
गझलचा वाटतो मिसरा
निसरडी वाट प्रेमाची
बसा किंवा इथे घसरा
जरा होकार येऊ दे
नको मारू अशा चकरा
-किशोर बुजाडे

---

प्रेमाच्या फुलांचा सुगंध
आसमंत व्यापून उरतो;
पण माणूस एवढा हावरट की
त्या फुलांचं रोपटंच उपटून टाकतो.

- मिलिंद हिवराळे

---

रात्र, तू, मी, चंद्र, तारे,
ज्यात दडलेले दृश्य आहे
ते मनाच्या आत दडलेले
बिलगुनी पत्रास त्या ती
रात्रभर रडली कोण जाणे
काय त्या पत्रात दडलेले

फक्त वरवर पाहिले आहेस तू डोळे
पाहिले नाहीस तू डोळ्यात दडलेले
- अविनाश येलकर

---

मायेचं अख्खं विद्यापीठ
होती आमची आजी,
कष्टकरी खूप मेहनती
होती ती साधी,
मनापासून जीव लावणारी
होती आमची आजी,
पणतूची सुद्धा घ्यायची ती
विशेष काळजी!
-दगा लोटन पाटील,वनावल
ता.शिरपुर जि.धुळे

---



## हॅप्पी व्हॅलेंटाइन डे.. आई–बाबा ..!!

टोचू देत नाहीत ते कधी काटा माझ्या पायाला
जपलय त्यांनी मला प्रत्येक क्षणाला ..
डोक्यावरचं छत आहेत ते माझ्या,
भीती नाही मला कोणत्याच संकटाची
वेळेला पर्वा ही करीत नाहीत
ते माझ्यासाठी स्वत:च्या जीवाची ...
खूप कष्ट केलेत माझ्यासाठी
आणि अजूनही करतात.
मला कोणत्याची गोष्टीची
कमी भासू नये म्हणून अजूनही राबतात
माझे आई-बाबा माझ्यासाठी,
क्षणोक्षणी त्यांना काळजी लागून राहते
मी आयुष्यात कितीही मोठं झालो तरी,
गरज असते ती फक्त त्यांच्या आशीर्वादाची ...
माझ्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या
आई-बाबांना व्हॅलेंटाईनडेच्या खूप-खूप शुभेच्छा..!!
-रियाश प्रियांका शिवाजी चौगुले.
डिवाइन पॅराडाईज हायस्कूल
चिंचपाडा कल्याण (पूर्व),ठाणे



---

तू ज्ञानोबाची ओवी हो
मी तुकोबाचा अभंग होतो
करूया आयुष्याचं कीर्तन
मी नादब्रह्म मृदुंग होतो
-राजेश एस काटोले
नागे लेआउट कौलखेड,अकोला

---

सगळ्यांपेक्षा वेगळी आणि सुंदर
तू नक्कीच आहेस,
पण त्यापेक्षाही सुंदर
तुझं माझ्या आयुष्यात असणं आहे.
हॅप्पी व्हॅलेंटाईन डे बायको
-गौरव दिलीप पोदुटवार
शिवाजी नगर,आर्णी

---

स्वार्थाविना जगले जे,
समाजाचा आधार झाले,
कष्टाच्या घामाने ज्यांनी,
आमचे विश्व उभारले
हिऱ्याची पारख जगाला नसो,
पण माझे ते सर्वस्व आहेत,
या व्हॅलेंटाईन दिनी, माझे
बाबाच माझे दैवत आहेत!
-राहुल आनंदराव घनोकार
भोनगाव ता. शेगाव जिल्हा बुलढाणा

---

एक अबोल प्रेमाचे क्षण
प्रेम प्रीतीने भरावे
तुला पाहता सजनी
मी तुझ्या प्रेमात पडावे.
-सुमित.बा.वाकोडे
मु पो लाखनवाडा बु
ता खामगांव जि. बुलढाणा

---

कधी बघशील जर चाळून हृदयाला
गडे रडशील तू बिलगून हृदयाला



रिकामा पिंजरा झालाय देहाचा
गडे नेलेस तू पळवून हृदयाला

उद्या रुजणार येथे झाड प्रेमाचे
इथे मी टाकले गाडून हृदयाला

- शीलवंत सिरसाट

---

कशाला वाचला चेहरा
पुस्तके वाचणाऱ्याने,
उभा रस्ता बदलला रे
तिच्या एका इशाऱ्याने,
तुया गावावरून गं
जवा जवा जाई मी,
जरी भुललीस तू
तुले चोरून पाहिले मी
-अनंत राऊत



---



तुझ्या श्वासात श्वास गुंतलेला
माझाही श्वास आहे,
प्रत्येक श्वासात तू घे जगून
मीही जगेल असा विश्वास आहे.
- प्रवीण हटकर

---

प्रेम हे एका नात्यापुरतं कधीच
मर्यादित नसतं,
आईच्या मायेपासून मित्रांच्या विश्वासातही तेच वसतं.
जिथे आपुलकी, जिव्हाळा आणि
निखळ आधाराचा झरा वाहतो,
त्या प्रत्येक नात्यात प्रेमाचा सुगंध कायम दरवळत राहतो.
- वैशाली बिपीन ठाकरे, नागपूर

---

चंद्र, तारे, फुले, हिरवळ एकीकडे
तिचे ते मोहक रूप एकीकडे
जडी - बुटी, औषध, उपचार एकीकडे
तिचा तो शाश्वत सहवास एकीकडे
-श्रावणी टेकाडे, अकोला

---

तिची वेदना जगण्यासाठी पोषक होती
जखम गुलाबी या श्वासांची मालक होती

या हृदयावर घाव फुलांचा होता म्हणुनी
जखमेसाठी फुंकर सुद्धा घातक होती
-निलेश कवडे,अकोला

---

सुगंधी सुरांनी तुझ्या सवे मी
सुरचित होते शब्दाविना मी
बेभान झुलते वाऱ्या विना मी
घेऊन जा मज दबकल्या पावलांनी
तू चंद्र नदीचा मी फुल धरणीचे
रोज उगवते वेड तुला पाहण्याचे
सौ प्रतिभा घनश्याम कळंब (चिकटे)
अकोला

---

जंतर-मंतर तंतर हे सारे करून झाले
अर्धे दशक राणी तुझ्यावर मरून झाले

लाख बहाणे न भेटण्याचे वापरून झाले
आता तर हो म्हण यौवन अर्धे सरून झाले
-ईश्वर मते, अकोला.

---

कुणाची याद आली ! काय आहे माजरा सखये
गुलाबी हा उगाचच चेहरा का हासरा सखये.
तुझ्या मॅसेजनेही वाढते धडधड किती माझी
सहन होणार का भेटीतला मज हादरा सखये
-अजीजखान पठाण,
नागपूर

---

अरे मी कुठे देव नाही म्हणालो
न दिसला मला एकदाही म्हणालो
खरे प्रेम वेडे कधीही बहरते
असू दे ऋतू कोणताही
जसा तोल गेला
मला ती बिलगली
असो ही सुगी बारमाही
म्हणालो.
रामकृष्ण रोगे

---

ईश्वराने तुला मला
प्रेम धाग्यात बांधले...
तुझ्या प्रेमानेच माझे
फाटके आयुष्य सांधले..
-अमोल गोंडचवर

---

प्रेमाचा गोडवा
तुझ्या सोबतीने आयुष्य हे,
फुलांसारखे फुलून येते...
व्हॅलेंटाईन डे च्या दिवशी,
मन फक्त तुलाच शोधते!

---

साधी आठवण
शब्दांत मांडता येणार नाही,
असे आपले नाते असावे...
मी काहीही न सांगता,
तुला सर्व काही कळावे!

---

हातामध्ये हात तुझा,
अशीच कायम साथ हवी...
प्रत्येक जन्म फक्त तुझ्याच,
प्रेमाची ती ओढ हवी!
- रामेश्वर राळे, दोनवाडा

---

# प्रेम -जगण्याची ऊर्जा देणारी अखंड प्रेरणा

**मनिषा आनंदराव कांबळे, यवतमाळ**

फेब्रुवारी महिना आला की वातावरणात एक वेगळीच कोमलता दरवळू लागते . वा?यालाही जणू मृदु स्पर्श लाभतो .शब्दांनाही सुगंध येते. जगण्याला नवे अर्थ सापडतात. हा महिना जगामध्ये 'प्रेमाचा महिना' म्हणून ओळखला जातो. पण प्रेम फक्त हा उत्सव किंवा सण नसून सृष्टीचा शाश्वत नियम आहे .'प्रेम आहे म्हणून जग आहे' आणि 'जग आहे म्हणून प्रेम आहे'.प्रेमाशिवाय हे संपूर्ण विश्व अपूर्ण आहे .कारण सृष्टीचा प्रत्येक कण परस्परावरील प्रेम, आकर्षण, ओढ आणि जिव्हाळ्यावर टिकून आहे. प्रेम म्हणजे केवळ दोन हृदयातील भावनांची देवाण-घेवाण नव्हे. तर ती 'माणसाला माणूस बनवण्याची शक्ती आहे'. कारण जेव्हा दोन हृदय एकत्र येतात तसे विचारही एकत्र आले पाहिजे. त्या विचारात माणुसकीची ज्योत असली पाहिजे. कारण समाज बदलायचा असेल तर सुरुवात आधी हृदयापासून होते. कारण क्रांती नेहमी रस्त्यावर नाही तर आधी मनात होते.' मी' पासून तर 'आपण 'पर्यंतचा प्रवासच ख?या मानवतेचा आरंभ आहे. प्रेम माणसाला सांगते ,'तू एकटा नाहीस' ही जाणीव त्यांना संकटाशी उभी राहण्याची ताकद देते. जगणं ही एक सुंदर देणगी आहे .आणि प्रत्येक श्वासात एक शक्यता दडलेली आहे. प्रत्येक हृदयात एक स्पंदन आहे .आणि त्या स्पंदनाला चालना देणारी अदृश्य शक्ती म्हणजे प्रेम .प्रेम हे जीवनातील प्रवासातील ऊर्जा स्त्रोत आहे. ते थकलेल्या पावलांना बळ देते.निराश मनाला आशेची दिशा देते. आणि माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवते .जगण्याच्या अथांग प्रवासात माणूस कधी थकतो,कधी हरवतो तर कधी स्वतःलाच विसरतो .पण या सर्व अवस्थांमध्ये जर कोणती शक्ती त्याला पुन्हा उभे करीत असेल तर ती म्हणजे प्रेम आहे. कारण प्रेम हे फक्त भावना नसून सृष्टीचा श्वास आहे .जगण्याची ऊर्जा देणारी अखंड प्रेरणा आहे. विश्वाच्या इतिहासाकडे पाहिले तर प्रत्येकच युगात महापुरुष हे प्रेमाच्या दीपस्तंभा सारखे उभे राहिलेले दिसतात .त्यांच्या हृदयातील अथांग सागरातील विविध रूपाने त्यांनी जगाला प्रेम दिले. प्रभू येशू ख्रिस्ताने क्षमे मधून मानवतेला करूणेचा मार्ग दाखवला. पैगंबर मोहम्मद यांनी 'रहमतुल्लीन आलमिन'दया आणि बंधू भावाचा संदेश देत समाजाला न्यायाचे प्रेम शिकवले. गुरुनानक देवांनी 'एक ओंकार ' तत्त्वातून समता आणि सेवाभावाचे प्रेम जागवले. भगवान बुद्धांनी करुणा , मैत्री आणि अहिंसेच्या मार्गाने द्वेषावर प्रेमाचा विजय मिळवण्याची शिकवण दिली .संत कबीरांनी जाती-धर्मांच्या भिंतीवर प्रेमाचे प्रहार करून'ढाई आखर प्रेम का, पढे सो पंडित होई' तत्व जगाला सांगितले. संत सेवालाल महाराजांनी समाजात स्वाभिमान आणि नैतिकतेचे प्रेम जागवले. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षणातून शोषितासाठी प्रेमाची क्रांती उभी केली. रयतेचा राजा शिवाजी महाराजांनी प्रेम आणि कर्तव्याला जोडले,आणि न्याय, शिस्त आणि समाजसेवा या तत्त्वावरती प्रेम जगले. संत तुकाराम महाराजांनी भक्ती आणि माणुसकीला जोडून प्रेमाचे सामाजिक रूप दाखवले. राजर्षी शाहू महाराजांनी समतेला राज्यकारभारात स्थान देऊन प्रेमाला सामाजिक न्यायाचे रूप दिले. संत रविदासांनी महाराजांनी 'मन चंगा तो कठोती मे गंगा' या पवित्र विचाराने आणि समतेच्या संदेशाने जगाला प्रेम दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंर्त्य ,समता आणि बंधुता या मूल्यातून प्रेमाला संविधानाच्या पायावर कोरले .थोडक्यात सांगायचे झाल्यास या सर्व महापुरुषाच्या कार्यात प्रेमाची प्रचंड ऊर्जा वाहताना दिसते. यांची मार्ग जरी वेगळे असले तरी सर्वांच्या कार्यात एकसमान सूत्र दिसते .ते म्हणजे मानवतेवरील अपार प्रेम. त्यांचे हे प्रेम केवळ शब्दात नव्हते.

प्रेम मग केवळ दोन व्यक्तींच्या नात्यापुरते मर्यादित राहत नाही. तर ते एक सामाजिक मूल्य बनते. कारण प्रेम जर खर असेल तर व्यक्ति बदलते. व्यक्ति बदलली की कुटुंब बदलते आणि कुटुंब बदलले की समाजही बदलतो. म्हणून व्हॅलेंटाईन डे ला गुलाब देण्याऐवजी विचार द्या. भेट वस्तू देण्याऐवजी समानतेची हमी द्या .आणि शब्द नका देऊ तर कृतीतून माणुसकी दाखवा. कारण प्रेमाचा खरा रंग माणूसपण आहे.आज जग वेगाने पुढे जात आहे. तंत्रज्ञान वाढले सुविधाही वाढल्या पण माणसातील माणूस हरवला जात आहे. मनामनातील अंतरही वाढले आहे. जात ,धर्म, पंत, भाषा यांच्या भिंतीही वाढल्या आहेत .ते फक्त प्रेमच दूर करू शकतं .कारण प्रेम कधी भेदाभेद करत नाही. तर प्रेमाचा सेतू बांधते, समता शिकवते. म्हणूनच फेब्रुवारीचा महिना आपल्याला आठवण करून देते की प्रेमाला एका दिवसापूर्वी मर्यादित ठेवू नका. प्रेम आपल्या विचारात रुजवा,कृतीत जगा, आणि समाजात पेरा. कारण प्रेम असेल तरच शांती असेल, समता असेल, आणि मानवता जिवंत राहील .चला या व्हॅलेंटाईन डे च्या निमित्ताने आपणही एक आपल्या अंतकरणातील प्रेमाचा सूर्य उगवून देऊया. कारण जेव्हा मन प्रेमाने उजळले , तेव्हा जग खऱ्या अर्थाने सुंदर होईल.



# व्हॅलेन्टाईन डे : प्रेमाचा दिवस की माणुसकीची आठवण?

**प्रविण बागडे, नागपूर**

फेब्रुवारीचा महिना आला की हवेत एक वेगळीच ऊब पसरते. गुलाबांची पाकळी, चॉकलेट्सची गोडी, शब्दात न मावणाऱ्या भावना आणि डोळ्यांत साठलेली स्वप्नं. या साऱ्यांचा एकत्रित उत्सव म्हणजे व्हॅलेंटाईन डे. काहींसाठी तो फक्त एक दिवस असतो पण अनेकांसाठी तो संपूर्ण आयुष्याची आठवण करून देणारा क्षण असतो. प्रेम म्हणजे केवळ गुलाब, कार्ड्स आणि सोशल मीडियावरचे स्टेटस नाही, तर तो माणसाच्या अस्तित्वाचा आत्मा आहे, जो श्वासासोबत आत जातो आणि नात्यांमधून बाहेर प्रकट होतो. प्रेम हे कोणत्याही एका दिवसापुरते मर्यादित नसते. तरीही व्हॅलेंटाईन डे चे महत्त्व नाकारता येत नाही.

कारण हा दिवस आपल्याला थांबवतो धावपळीच्या, स्वार्थी, स्पर्धात्मक जगात थोडा वेळ स्वतःकडे आणि आपल्या माणसांकडे पाहायला भाग पाडतो. "आपण प्रेम करतो का?" यापेक्षा "आपण प्रेम व्यक्त करतो का?" हा प्रश्न या दिवशी अधिक ठळक होतो. आजच्या काळात प्रेमालाही बाजारपेठेचा रंग चढला आहे. गिफ्ट्सची किंमत, रेस्टॉरंट्सचे पॅकेजेस, सोशल मीडियावरील 'परफेक्ट कपल' फोटो या सगळ्यात प्रेम हरवत चालले आहे का, असा प्रश्न अनेकांना पडतो. पण प्रेम कधीच वस्तू नव्हते आणि कधीच होणार नाही. प्रेम म्हणजे दोन माणसांमधील न दिसणारा करार एकमेकांना समजून घेण्याचा, स्वीकारण्याचा आणि आयुष्याच्या प्रत्येक वळणावर साथ देण्याचा. भारतीय संस्कृतीत प्रेमाला नेहमीच गहिरे, शांत, संयमी रूप दिले गेले आहे. सावित्रीचे सत्यवानावरील प्रेम, राधा-कृष्णाची अध्यात्मिक जवळीक, मीरा आणि विठ्ठलाचे भक्तिपूर्ण नाते ही प्रेमाचीच विविध रूपे आहेत. आज मात्र प्रेमाला फक्त रोमँटिक चौकटीत अडकवले जाते. प्रत्यक्षात प्रेम हे आईच्या काळजीत असते, वडिलांच्या न बोलणाऱ्या त्यागात असते, मित्राच्या खांद्यावरच्या आधारात असते आणि वृद्धांच्या डोळ्यातल्या शांततेत असते.

व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने प्रेमाचा हा व्यापक अर्थ पुन्हा एकदा समजून घेण्याची गरज आहे. प्रेम म्हणजे केवळ 'तू माझा किंवा माझी' एवढेच नव्हे, तर 'मी तुझ्यासाठी आहे' हे नि:स्वार्थी भावनेतून उमटलेले वाक्य आहे. प्रेमात अधिकार असतो, पण मालकी नसते. प्रेमात अपेक्षा असतात, पण अटी नसतात. प्रेमात राग असतो, पण तोही जपणुकीचा असतो. आजच्या तरुणाईवर अनेकदा प्रेमाबाबत आरोप केले जातात की ते उथळ आहे, क्षणिक आहे, दिखाऊ आहे. पण सत्य असे आहे की आजची पिढी प्रेम व्यक्त करण्याचे नवे मार्ग शोधत आहे. त्यांच्या भाषेत प्रेम आहे, त्यांच्या संगीतामध्ये प्रेम आहे, त्यांच्या कविता आणि मेसेजेस मध्ये प्रेम आहे. दोष प्रेमाचा नाही, तर प्रेम समजून न घेणाऱ्या समाजाचा आहे. प्रेमाला विरोध करणारे अनेक आवाज आजही समाजात आहेत. व्हॅलेंटाईन डे म्हणजे 'पाश्चात्त्य संस्कृती' असा शिक्का मारून प्रेम व्यक्त करणाऱ्यांना दोषी ठरवले जाते. पण प्रेमाला संस्कृती नसते; प्रेम ही माणसाची मूलभूत गरज आहे. संस्कृती जर प्रेमाला नाकारत असेल, तर त्या संस्कृतीला पुन्हा तपासण्याची गरज आहे. प्रेम हे बंडखोर असते ते जाती, धर्म, भाषा, आर्थिक स्थिती या सगळ्या भिंती ओलांडते. म्हणूनच कदाचित प्रेमाला नेहमीच विरोध झाला आहे. कारण प्रेम प्रश्न विचारते, रूढी मोडते आणि माणसाला माणूस म्हणून उभे करते. व्हॅलेंटाईन डे हा त्या बंडखोरीचा शांत, सुंदर उत्सव आहे. व्हॅलेंटाईन डेच्या गुलाबामागे कधी कधी एक न बोललेली हुरहूर असते, चॉकलेटच्या गोडीमागे एखादी न व्यक्त झालेली वेदना असते. तरीही माणूस प्रेमावर विश्वास ठेवतो, कारण विरहही सांगून जातो की, आपण कुणावर तरी मनापासून प्रेम केले होते. प्रेम जवळ असो वा दूर, समोर असो वा आठवणीत ते जर खरं असेल तर ते मनाला अधिक माणूस बनवतं आणि म्हणूनच, प्रेम हरवले तरी त्याची आठवण जपा; कारण काही नाती आयुष्यात साथ देत नाहीत, पण आयुष्यभर अर्थ देऊन जातात. प्रेमाला एक दिवस पुरेसा नसतो, पण एक दिवसही निरर्थक नाही. कारण कधी कधी एक दिवसच आयुष्यभराची दिशा ठरवतो. प्रेम करा, व्यक्त करा आणि जपा, कारण प्रेम हेच खरं शाश्वत सत्य आहे. तुमचं आयुष्य प्रेमाने, आपुलकीने आणि सुंदर नात्यांनी नेहमी फुलत राहो, भावनांना शब्द मिळोत आणि शब्दांना अर्थ. व्हॅलेंटाईन डे च्या मनापासून शुभेच्छा!

# युवा पिढीला व्हॅलेन्टाईनची नव्हे तर लैंगिक शिक्षणाची गरज !

**डॉ.संदिप चव्हाण, अकोला**

**"मज दिसें ना माणूस चोहीकडे**
**वासानेचा पाऊस चोहीकडे"**

व्हॅलेंटाईन सप्ताह नव्हे तर लैंगिक शिक्षण जनजागृती सप्ताह असावा, कारण निमित्त आहे व्हॅलेंटाईन सप्ताहाचे यामध्ये युवकांकडून हा सप्ताह आपल्या देशात देखील मोठ्या उत्साहात साजरा केला जातोय, परंतु लैंगिक अज्ञानामुळे समाजात वाढत्या लैंगिक अत्याचारच्या घटना बघता खरी गरज आहे ती लैंगिक शिक्षण जनजागृतीची रोज डे, प्रपोस डे , चॉकलेट डे , टेडी डे, प्रॉमिस डे ,हग डे , किस डे या व्हॅलेंटाईंच्या सप्ताह ऐवजी जनेंद्रीयांबद्दल माहिती, शरीरातील प्रामुख्याने होणारे बदल, मासिकपाळी आणि स्वप्नदोष बद्दल अवगत करणे, लैंगिक आजार आणि ती होऊ नये करिता वापरण्यात येणारी प्रतिबंधात्मक उपाय योजना, आपल्या पार्टनरची लैंगिक इच्छा शक्तीचा योग्य तो आदर करने, नात्यांना योग्य न्याय देऊन सुदृढ, निरोगी समाज निर्मिती करण्याकरिता आजीवान कटीबद्ध राहण्याचा संकल्प करने असा सप्ताह जर साजरा केला ना तर तोच (व्हॅलेंटाईन सप्ताह) प्रेम सप्ताह निमित्त घेतलेला खरा प्रेमाप्रती जागृती असलेला सप्ताह समाजातील लैंगिक अत्याचाराला आळा घालण्यास उपयोगी ठरेलं ! लैंगिक शिक्षण देणे काळाची गरज आहे, भारतीय समाजाबद्दल विचार केला असता, कामजीवन आणि लैंगिक शिक्षणाबद्दल बरेच समज गैरसमज समाजात प्रचलित असल्याचे दिसून येत आहेत. लैंगिक शिक्षण देणे काळाची गरज आहे कारण, त्यामुळे मुलांना लैंगिकतेबद्दल शास्त्रशुद्ध माहिती मिळते आणि त्यांचा लैंगिकतेकडे पाहाण्याचा दृष्टिकोण चांगला होतो. याशिवाय, लैंगिक शिक्षणामुळे मुलांमध्ये चुकीचे समज निर्माण होत नाहीत आणि ते कोणत्या अफवेवर विश्वास ठेवत नाहीत. लैंगिक शिक्षण देण्याची गरज का आहे? मुलांना प्रजननाचे कार्य आणि त्याशी संबंधित रोग आणि सुरक्षितता याविषयी माहिती मिळावी. मुलांचा लैंगिकतेकडे पाहाण्याचा दृष्टिकोण चांगला व्हावा. मुलांना योग्य वयात लैंगिक गोष्टींबद्दल योग्य माहिती मिळाली तर त्यांच्या मनात चुकीचे समज निर्माण होणार नाहीत. आज एकतर्फी प्रेमातील हल्ल्यात वाढ झाली आहे. वयाच्या या टप्प्यावर येणारे भावनिक चढ उतार कसे हाताळावे याबाबत भारतीय कुटुंबात आजही खुलेपणाने चर्चा होत नाही. लैंगिक शिक्षण हे शालेय वयातच द्यायला हवे. अतिशय सुशिक्षित, उच्चशिक्षित तरुणांनाही असलेले अपुरे लैंगिक ज्ञान, माहिती, गैरसमज यांची पातळी पाहिली तर लक्षात येईल की लैंगिक शिक्षणाचे तीनतेरा वाजलेले आहेत. भारतीय कुटुंबांमध्ये आजही लैंगिक शिक्षणाचा विषय निघाला की भुवया उंचावल्या जातात. पण आताच्या काळात पालकांना हे समजणं अतिशय गरजेचं आहे की मुलांच्या भविष्य आणि वर्तमानास सुरक्षित ठेवण्यासाठी लैंगिक शिक्षण देणं अतिशय आवश्यक आहे. योग्य शिक्षण नसल्याने मुलांकडून अनेक अशा चुका घडू शकतात किंवा मुलं संकटात सापडू शकतात, ज्याचे परिणाम संपूर्ण कुटुंबीयांना भोगावे लागू शकतात.

आपल्या समाजात आजही लैंगिक गोष्टींबाबत उघडपणे बोलले जात नाही. पण सध्या लैंगिक शिक्षण ( ) हे काळाची गरज बनले आहे. मुलांना योग्य वयात जर लैंगिक गोष्टींबद्दल योग्य माहिती मिळाली तर त्यांच्या मनात चुकीचे समज निर्माण होणार नाहीत वा ते कोणत्या अफवेवर विश्वास ठेवणार नाहीत. मध्यंतरी शाळेमध्ये मुलांना लैंगिक शिक्षण देण्याबाबत मोहीम सुरु केली होती पण त्यालाही अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून आपल्या मुलांना योग्य वयात लैंगिक शिक्षण देण्याची जबाबदारी आता प्रत्येक पालकाची आहे. मुलांना जर योग्य लैंगिक शिक्षण मिळाले नाही तर मुल आपल्या पद्धतीने त्यांच्या मनातील लैंगिक उत्सुकतेबद्दल माहिती मिळवतात पण अशा प्रकारे त्यांनी स्वत:हून गोष्टी जाणून घेणे चुकीचे ठरू शकते. इंटरनेट वरून वा मित्रांकडून मिळणारे लैंगिक शिक्षण हे एकंदर मुलाच्या मनावर विपरीत परिणाम करू शकते. लैंगिक गोष्टींकडे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोन बदलू शकतो. विरुद्ध लिंगाच्या व्यक्तीसोबत लैंगिक संबंध प्रस्थापित करताना ते चुकीच्या पद्धतीने प्रस्थापित केले जाऊ शकतात. मात्र जेव्हा मुलांना योग्य लैंगिक शिक्षण मिळते तेव्हा मात्र त्यांच्या मनातील गैरसमज दूर होऊन त्या गोष्टींकडे ते अधिक विचारपूर्वक पाहतात. म्हणूनच मुलांना योग्य लैंगिक शिक्षण मिळणे गरजेचे आहे. नवं दामपत्यांमधील संवाद, विवादाचे प्रमुख कारण म्हणजे लैंगिक संबंधातील आपसी ताळमेळ किंवा दुरावा त्यातूनच पुढे घरेलू हिंसाचाराची विशेषतः लैंगिक हिंसाचाराची प्रकरणे सामोरे येतात, घटस्फोट होण्यामागची कारणे जी आहेत त्यामधील लैंगिक कमजोरी, वंधत्व ही आहेतच परंतु अलीकडच्या काळात लैंगिक अज्ञान हे प्रमुख म्हणून निदर्शनात येत आहे, कारण लग्नाकरिता नुसते लग्न पत्रिकेतील गुण जुळवून काही फायदा नाही तर त्याकरिता मनासोबतच शरीराची सुद्धा खऱ्या अर्थाने सांगड बसने गरजेचे आहे. खरंच ज्या प्रक्रियेतून मनुष्य जन्माला येतो त्याबद्दलच जर तो अज्ञानी असेल तर किती हास्यास्पद बाब आहे. निश्चितच आपण कुठेतरी चुकतोय आणि ती चूक आपण येत्या काळात दुरुस्त केली नाही तर लैंगिक आजरांसोबतच, लैंगिक अत्याचाराची वाढती संख्या हा आपल्या समाजा समोरील येत्या काळातील मोठा प्रश्न असेल !

अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com

## प्रभातच्या ८ बालवैज्ञानिकांची डॉ. होमी भाभा स्पर्धेच्या अंतिम फेरीत निवड

**अकोला :** १३ फेब्रुवारी शालेय जीवनात शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत प्रतिष्ठेच्या 'डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेच्या' दुसऱ्या (प्रात्यक्षिक) फेरीतून प्रभात किड्स स्कूलच्या ८ विद्यार्थ्यांची अंतिम फेरीसाठी गुणवत्तापूर्ण निवड झाली आहे. यामध्ये इयत्ता ६ वीचे पाच विद्यार्थी असून, अर्णव गोलोकार, रेयांश बोबडे, आराध्या राठी, ओजस सोर आणि मोरया सोनवणे यांनी उज्ज्वल यश प्राप्त केले आहे. तसेच इयत्ता नववीच्या आदित्य गुरुदासानी, नील अंभोरे आणि तनिष्क कोरडे यांनीही अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. प्रभातच्या या बालवैज्ञानिकांना स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख व्ही. अनुराधा यांच्या मार्गदर्शनाखाली शुभम डांगे, पूजा ठाकूर, शुभांगी व्यवहारे, वैशाली जोशी व प्रियांका माणिकराव यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल प्रभात किड्स स्कूलचे संचालक डॉ. गजानन नारे, सौ. वंदना नारे, प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, समन्वयक मो. आसिफ यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले असून अंतिम फेरीतील उज्ज्वल यशासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

# परिचारिकांचे आमदारांविरोधात निदर्शन; जाहीर माफीनाम्याची मागणी, कामबंदचा इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १३ : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयातील परिचर्या संवर्गाने आमदार साजिद खान पठाण यांच्या रुग्णालय भेटीदरम्यान झालेल्या कथित वक्तव्याचा निषेध नोंदवत जाहीर माफीनाम्याची मागणी केली आहे. माफीनामा न मिळाल्यास १४ फेब्रुवारी २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.**



परिचर्या संवर्गाच्या निवेदनानुसार, १२ फेब्रुवारी रोजी आमदारांची भेट नियोजित असताना, स्त्री रुग्णकक्षात कर्तव्यावर असलेल्या परिचारिकांशी अशोभनीय भाषेत संवाद झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिचारिकांची बाजू न ऐकता एकतर्फी निर्णय घेणे आणि वारंवार राजकीय दबाव आणण्याचे प्रकार वाढत चालले आहेत. या घटनेमुळे समाजमाध्यमांवर गैरसमज व द्वेष निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद आहे.

रुग्णाच्या प्रकृतीची माहिती दूरध्वनीवर देणे ही डॉक्टरांची जबाबदारी असून, ती परिचारिकांवर टाकणे योग्य नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले. कर्मचारी वर्ग १ ते ४ मधील मनुष्यबळ आधीच अपुरे असल्याने जनरल वॉर्डमध्ये ८० ते ९० रुग्णांमागे एकच परिचारिका कार्यरत असते, असा दावा संघटनेने केला. नियमांनुसार जनरल वॉर्डमध्ये सहा रुग्णांमागे एक, आयसीयूमध्ये एका रुग्णामागे एक, तर कार्डिएक मॉनिटर असलेल्या विभागात तीन रुग्णांमागे एक परिचारिका असणे अपेक्षित असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

प्रत्येक भेटीदरम्यान फक्त परिचर्या संवर्गालाच धारेवर धरणे अन्यायकारक आहे. एकेरी भाषेमुळे मानसिक खच्चीकरण होते आणि व्हायरल व्हिडिओंमुळे मानहानी होते, असा आक्षेप नोंदवत महिला कर्मचाऱ्यांच्या सन्मानाचा विचार व्हावा, अशी मागणी करण्यात आली. रुग्ण व नातेवाईकांइतकेच कर्मचारीही लोकप्रतिनिधींचे मतदार आहेत, त्यामुळे आमच्या अडचणी समजून घ्याव्यात, असेही निवेदनात म्हटले आहे.

घडलेल्या प्रकाराबद्दल आमदारांनी जाहीर माफी मागावी, अन्यथा कामबंद आंदोलनाला प्रशासन व आमदार जबाबदार राहतील, असा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, वैद्यकीय अधीक्षक, महिला आयोग, मानवाधिकार आयोग यांच्यासह संबंधित पक्ष व संघटनांना पाठविण्यात आल्या आहेत.

## कर्मचाऱ्यांच्या रोषानंतर आमदारांची दिलगिरी; तरीही आरोग्य व्यवस्थेला दिला इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. १३ :** जिल्ह्यातील सर्वोपचार रुग्णालय पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. गुरुवारी (१२ फेब्रुवारी) अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांनी रुग्णालयाची अचानक पाहणी केली असता, तेथील अनागोंदी कारभार समोर आला. या पाहणीदरम्यान वॉर्डमधील नर्स, वॉर्डबॉय आणि सुरक्षा रक्षकांकडून रुग्णांना मिळणाऱ्या कथित उद्धट वागणुकीमुळे वातावरण चांगलेच तापले होते.

मागील काही महिन्यांपासून रुग्णालयातील व्यवस्था कोलमडल्याच्या तक्रारी नागरिक करत होते. आ. पठाण यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता रुग्णांना दिल्या जाणाऱ्या जेवणाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे आढळले. तसेच अनेक वॉर्डांमध्ये अस्वच्छता आणि डॉक्टरांची अनुपस्थिती दिसून आली. रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याचा दावाही त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे. पाहणी सुरू असताना एका महिला रुग्णाच्या नातेवाईकांनी तिथल्या नर्स आणि सुरक्षा रक्षकाने उद्धट वर्तन केल्याची तक्रार केली. यावर संतापलेल्या आ. पठाण यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना धारेवर धरत जाब विचारला. मात्र, या प्रकारानंतर रुग्णालय कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली असून, आमदारांनीच चुकीच्या भाषेचा वापर केल्याचा आरोप काही कर्मचाऱ्यांनी केला आहे.

**"रुग्णांची सेवा करा, दादागिरी नको" :** कर्मचाऱ्यांच्या रोषानंतर आपली भूमिका स्पष्ट करताना आ. पठाण म्हणाले, "मी जनतेला योग्य आरोग्य सेवा मिळावी, यासाठी कर्मचाऱ्यांना जाब विचारला. माझ्या बोलण्यामुळे कोणाला वैयक्तिक वाईट वाटले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो; मात्र गरीब रुग्णांशी उद्धटपणे वागणे खपवून घेतले जाणार नाही. उद्या जर सेवा सुधारली नाही, तर कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल."

## महत्त्वाचे

### टपाल विभागातर्फे आंतरराष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धा

**अकोला :** टपाल विभागाच्या आंतरराष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धेत ९ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन प्रवर अधीक्षक रामी रेड्डी यांनी केले आहे. ही स्पर्धा दि. ८ मार्चला होईल. शालेय स्तरावरही या स्पर्धेचे ७ मार्चला आयोजन केले जाणार आहे. इंग्रजी किंवा कोणत्याही भारतीय भाषेत पत्र लिहिता येईल. पत्राची कमाल शब्दमर्यादा ८०० आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी आपले अर्ज २५ फब्रुवारीपर्यंत प्रवर अधीक्षक, विभागीय टपाल कार्यालय, अकोला या कार्यालयास जमा करावेत. सर्कल स्तरावर २५ हजार, १० हजार व ५ हजार रुपये आणि प्रमाणपत्र अशी बक्षिसे आहेत. राष्ट्रीय स्तरावर ५० हजार, २५ हजार व १० हजार रुपये अशी पहिली तीन बक्षिसे आहेत. विद्यार्थ्यांमध्ये पत्रलेखनाची आवड निर्माण होण्यासाठी ही आंतरराष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेचा लाभ घेण्याचे आवाहन टपाल विभागामार्फत करण्यात आले आहे.

### शास्ती अभय योजना जाहीर; १०० टक्क्यांपर्यंत मिळणार व्याजमाफी

**अकोला :** शहरातील नागरिकांची मागणी तसेच आमदार रणधीर सावरकर आणि महापौर शारदा खेडकर यांच्या निर्देशानुसार, अकोला महानगरपालिका क्षेत्रातील थकीत मालमत्ता करधारकांना दिलासा देण्यासाठी मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशान्वये १४ फेब्रुवारी २०२६ पासून विशेष शास्ती अभय योजना (व्याजमाफी योजना) लागू करण्यात आली आहे. थकीत कर भरणे आर्थिकदृष्ट्या सुलभ व्हावे, या उद्देशाने ही योजना एकूण तीन टप्प्यांत राबवली जाणार आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात, जे करधारक १४ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत आपल्या संपूर्ण थकीत कराचा भरणा एकरकमी करतील, त्यांना शास्तीच्या (दंड/व्याज) रकमेत १०० टक्के सवलत देण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यात, ६ मार्च ते २० मार्च २०२६ दरम्यान एकरकमी कर भरणाऱ्यांना शास्तीमध्ये ९० टक्के सूट मिळणार आहे. तर योजनेच्या अंतिम टप्प्यात, २१ मार्च ते ३१ मार्च २०२६ पर्यंत कर भरणाऱ्यांना शास्तीच्या रकमेत ८५ टक्के सूट दिली जाणार आहे. थकीत मालमत्ता करधारकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपला कर भरून शहराच्या विकासात सहकार्य करावे, असे आवाहन महापौर सौ. शारदा रणजीत खेडकर यांनी केले आहे.

## सामूहिक बलात्कार प्रकरणातील फरार आरोपीस २० वर्षांची सक्तमजुरी; ३१ हजारांचा दंड

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १३ :** पोलीस स्टेशन बार्शिटाकळी हद्दीतील शाम शिंदखेड येथील सामूहिक बलात्कार प्रकरणातील फरार आरोपीस अखेर २० वर्षांची सक्तमजुरी व एकूण ३१ हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे. अकोला जिल्हा व सत्र न्यायालय क्र. १ यांनी १३ फेब्रुवारी २०२६ रोजी हा निकाल दिला. या प्रकरणातील फिर्यादी व तिचे पती जगदीश तारापुरे यांच्या शेतात रखवालदार म्हणून वास्तव्यास होते. २८ फेब्रुवारी २०१६ रोजी मध्यरात्री आरोपी शंकर उर्फ शेखर देवराव मुंढे (रा. राजंदा, ता. बार्शिटाकळी) व त्याच्या साथीदाराने शेतात जाऊन फिर्यादीच्या पतीच्या गळ्याला चाकू लावून फिर्यादीवर आळीपाळीने बलात्कार केला. तसेच शेतातील फवारणी पंप, बॅटरी व मोबाईल असा सुमारे ३ हजार रुपयांचा माल चोरून नेला. या घटनेवरून बार्शिटाकळी पोलीस स्टेशनमध्ये अप. क्र. २३/२०१६ अन्वये भादंवि कलम ३७६(ड), ३९२, ४४७, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास पोलीस उपनिरीक्षक संजय कोरवे यांनी करून आरोपी शंकर मुंढे यास अटक केली होती. त्यास दि. २७ एप्रिल २०१८ रोजी न्यायालयाने २० वर्षांची सक्तमजुरी सुनावली असून तो सध्या शिक्षा भोगत आहे.

दरम्यान, दुसरा आरोपी आशिष उर्फ डुब्या श्रीकृष्ण कानपुरे (रा. राजंदा, ता. बार्शिटाकळी) हा घटनेपासून फरार होता. त्याच्याविरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २९९ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. दि. ६ सप्टेंबर २०२२ रोजी न्यायालयाने काढलेल्या स्टँडिंग वॉरंटनुसार त्यास अटक करण्यात आली. त्याचे सीए नमुने तपासणीसाठी अमरावती येथे पाठविण्यात आले होते, तसेच जिल्हा कारागृहात ओळख परेड घेण्यात आली.

## पेन्शन वाढीसाठी संसदेला घेराव घालणार; एक हजार रुपयात कसे जगायचे?

### ईपीएस-९५ पेन्शनधारकांचे पीएफ कार्यालयासमोर धरणे आंदोलन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १३ :** ईपीएस-९५ पेन्शनधारकांना ९ हजार रुपये किमान पेन्शन, महागाई भत्ता आणि मोफत रेशन यांसह अन्य प्रलंबित मागण्यांसाठी ९५ पेन्शनधारक संघर्ष समितीच्या वतीने पीएफ कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. "एक हजार रुपयांच्या पेन्शनमध्ये महिनाभर कसे जगायचे?" असा संतप्त सवाल करत, पेन्शन वाढीसाठी प्रसंगी संसदेला घेराव घालण्याची तयारी ठेवा, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

पेन्शन वाढीसाठी ईपीएस-९५ पेन्शनर दिवसेंदिवस आक्रमक होत आहेत. अनेकवेळा मोर्चे, धरणे आंदोलने आणि निवेदने देऊनही केंद्र सरकारने ठोस निर्णय घेतलेला नाही. दिल्लीत झालेल्या देशव्यापी आंदोलनातही अकोल्याचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

पीएफ आयुक्तांना दिलेल्या निवेदनात आपल्या मागण्यांकडे तातडीने लक्ष देण्याची विनंती करण्यात आली आहे. या आंदोलनात विदर्भ अध्यक्ष कॉ. देवराव पाटील, अंबदास भरणे, नारायणराव अंधारे, व्ही.ए. देशमुख, आर. एम. काटोले, केशव कोठाळे, सुभाष राठोड, कॉ. नयन गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. तसेच कॉ. सी.के. अंबरे, पी.के. देशमुख, धर्मराज सरोदे, डी.एन. पंत, देवीदास घनबहादूर, संजय मालोकार, विजय बोरकर आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### या मागण्यांसाठी आंदोलन

- ज्येष्ठ पेन्शनधारकांना रेल्वे तिकीट सवलत पूर्ववत मिळावी.
- सन २०१४ पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना हायर पेन्शनचा लाभ मिळावा.
- पेन्शन किमान ९ हजार रुपये आणि त्यावर महागाई भत्ता मिळावा.
- वृद्धापकाळात मोफत औषधोपचार मिळावेत.
- रेशन दुकानामार्फत जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा व्हावा.

## स्वच्छतेचा कंत्राटी पॅटर्न महागात; ५१ वॉर्डातील खर्चात दुपटीने वाढ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १३ :** शहरातील स्वच्छतेचा प्रश्न कायम चर्चेत असतानाच, आता महापालिका क्षेत्रातील ५१ वॉर्डांतील सफाईचा खर्च प्रशासनाच्या तिजोरीवर मोठा भार टाकणार आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही याच भागात कंत्राटी पद्धतीने स्वच्छता केली जात होती; मात्र आता हा वार्षिक खर्च थेट ६ कोटींवरून ११ कोटींवर पोहोचला आहे. सोमवारी होणाऱ्या महासभेत या पडीक वॉर्डांतील वाढीव खर्चाच्या मुद्द्यावर वादळी चर्चा होण्याची शक्यता आहे.



महापालिका प्रशासनाने ५१ भागांसाठी ५१ स्वतंत्र कंत्राटदार नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. प्रत्येक भागात १२ मजूर, याप्रमाणे हे काम चालते. यापूर्वी या कामासाठी महिन्याला ५० लाख, म्हणजेच वर्षाकाठी ६ कोटी रुपये खर्च केले जात होते. मात्र, आता मजुरांना किमान वेतन कायद्यानुसार मानधन देणे बंधनकारक असल्याने खर्चाचे गणित पूर्णपणे बदलले आहे. नवीन प्रस्तावानुसार, महिन्याचा खर्च ५० लाखांवरून ९० लाखांवर गेला असून, वर्षाकाठी पालिकेला ११ कोटी रुपये मोजावे लागणार आहेत.

यापूर्वीही स्वच्छतेच्या नियोजनावरून आणि कंत्राटदारांच्या कार्यपद्धतीवरून ओरड झाली होती. पडीक वॉर्डांतील स्वच्छतेचा मुद्दा याआधीही गाजला असून, वाढीव निधी देऊनही जर कचऱ्याची समस्या कायम राहिली, तर या खर्चाच्या उधळपट्टीवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. सोमवारी होणाऱ्या महासभेत या ५१ कंत्राटदारांच्या नियुक्तीवर आणि दुपटीने वाढलेल्या खर्चावर शिक्कामोर्तब होणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. प्रशासनाकडून किमान वेतनाचे कारण दिले जात असले तरी, विरोधी पक्ष यावर काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ५१ भागांतील स्वच्छतेचा हा नवा कंत्राटी पॅटर्न शहराला खरोखर स्वच्छता देणार की केवळ पालिकेचा खर्च वाढवणार, हे येणारा काळच ठरवेल.

## निविदा कुणी भरूच नये यासाठी मोठी साखळी?



### दोन कोटींची निविदा सव्वा कोटींवर, तरीही कंत्राटदार मिळेना!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १३ :** महापालिकेच्या बाजार वसुलीचा तिढा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. सुरुवातीला दोन कोटी रुपये निश्चित केलेली निविदेची रक्कम आता सव्वा कोटी रुपयांवर आणण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. वारंवार निविदा काढूनही कंत्राटदारांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने अखेर प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. मात्र, या प्रस्तावाला स्थायी समिती किंवा महासभेची अधिकृत मंजुरी घ्यावी लागणार असून, त्यानंतरच पुढील प्रक्रिया पार पडेल.

शहरातील रस्त्यालगत आणि महापालिकेच्या निश्चित जागांवर व्यवसाय करणाऱ्या हातगाडी चालकांकडून दररोज शुल्क वसूल केले जाते. ३१ डिसेंबर रोजी स्वाती कंपनीचा ठेका रद्द झाल्यानंतर ही वसुली महापालिका कर्मचाऱ्यांमार्फत केली जात आहे. परंतु, शहराचे १२४ चौरस किलोमीटरचे क्षेत्रफळ पाहता, वसुलीसाठी केवळ ६ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. या अपुऱ्या मनुष्यबळामुळे वसुलीतून मिळणारे उत्पन्न अत्यंत अल्प आहे. प्रशासनाने दैनंदिन शुल्कात वाढ केल्याने सुरुवातीला निविदेची किंमत २ कोटी रुपये निश्चित केली होती. मात्र, कंत्राटदारांनी पाठ फिरवल्याने ही रक्कम १.५ कोटी करण्यात आली. तिसऱ्या प्रयत्नानंतरही कोणी पुढे न आल्याने आता ही रक्कम १.२५ कोटींवर आणली जाणार आहे.

**अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या भूमिकेवर संशय? :** शहरात सध्या नॅशनल अर्बन लाइव्हलीहूड मिशनच्या सर्वेक्षणानुसार ४ हजार ३३ हॉकर्सची नोंद असली, तरी प्रत्यक्षात ही संख्या तीन पटीने जास्त असल्याचा अंदाज आहे. असे असतानाही वसुलीसाठी मुद्दाम कमी कर्मचारी नियुक्त केले जात असल्याचा आरोप होत आहे. महापालिका अधिकारी आणि कर्मचारी स्वतःच्या फायद्यासाठी ही निविदा प्रक्रिया यशस्वी होऊ देत नाहीत का? असा सवाल आता उपस्थित होत आहे. वसुलीचा पैसा कंत्राटदाराच्या खिशात जाण्याऐवजी काही भ्रष्ट मार्गांनी जात असल्याची चर्चा पालिका वर्तुळात रंगली आहे.

**पाण्याचा अपव्यय** — एअरटेल कंपनीच्या एचडीडी मशीनच्या कामादरम्यान घडला प्रकार

# कौलखेडमध्ये मुख्य जलवाहिनी फुटली

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १३ : कौलखेड चौकातील मुख्य रस्त्यावर इंटरनेट केबल टाकण्याच्या कामादरम्यान मुख्य जलवाहिनी फुटल्याची घटना शुक्रवारी सकाळी घडली. एअरटेल कंपनीच्या एचडीडी मशीनद्वारे सुरू असलेल्या भूमिगत कामावेळी पाईपलाईन तुटल्याने पाण्याचा प्रचंड प्रवाह रस्त्यावर वाहू लागला. बराच वेळ पाणी वाहत राहिल्याने हजारो लिटर पाणी वाया गेल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.**



घटनेनंतर संपूर्ण रस्त्यावर पाणी साचून परिसर चिखलमय झाला. मुख्य मार्गावरील काही भाग निसरडा झाल्याने दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका निर्माण झाला होता. सकाळच्या वर्दळीच्या वेळी ही घटना घडल्याने पादचाऱ्यांना चिखलातून मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागली, तर वाहतूकही काही काळ मंदावली होती. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी महानगरपालिका प्रशासनाला पाचारण केले. ही जलवाहिनी तातडीने दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली आहे, जेणेकरून पुढील पाणीपुरवठ्यावर त्याचा परिणाम होणार नाही. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी खाजगी कंपन्यांच्या कामांवर महापालिकेचे नियंत्रण असणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

> "शहरात पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जाते, मात्र प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे किंवा खाजगी कंपन्यांच्या कामामुळे हजारो लिटर पाणी रस्त्यावर वाहते. याला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई व्हायला हवी."
> - स्थानिक नागरिक, कौलखेड.

प्रशासकीय समन्वयाचा अभाव? कौलखेड चौक हा शहरातील गजबजलेला भाग आहे. अशा वर्दळीच्या ठिकाणी भूमिगत काम करताना महानगरपालिकेच्या जलप्रदाय विभाग आणि संबंधित कंपनीमध्ये तांत्रिक समन्वय होता का, असा प्रश्न स्थानिकांनी उपस्थित केला आहे. शहरात आधीच पाणीटंचाई असताना अशा प्रकारे पाण्याची नासाडी होणे ही गंभीर बाब असल्याची प्रतिक्रिया परिसरातून उमटत आहे.

# तूर उत्पादनात मोठी घट

## अस्थिर बाजारभावामुळे हिरपूरचा बळीराजा संकटात!

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी



**हिरपूर , दि. १३ :** यंदाच्या खरीप हंगामात सुरुवातीला दमदार पावसाने साथ दिल्याने तूर पिकाची स्थिती समाधानकारक होती. मात्र, पीक ऐन बहरात असताना निसर्गाचा लहरीपणा आणि वन्य प्राण्यांच्या हैदोसामुळे तूर उत्पादनात मोठी घट झाली आहे.

त्यातच बाजारपेठेतील अस्थिर भावामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून, बळीराजा पुन्हा एकदा चिंतेच्या गर्तेत सापडला आहे.

परिसरात यंदा फुलधारणा आणि शेंगा भरण्याच्या महत्त्वाच्या काळात जमिनीत ओलावा कमी पडला. वाढलेली थंडी आणि धुक्यामुळे शेंगांची वाढ खुंटली, तर काही ठिकाणी फुले व कोवळ्या शेंगांची मोठ्या प्रमाणावर गळ झाली. परिणामी, एकरी उत्पादनात २ ते ५ क्विंटलपर्यंत घट झाल्याचे शेतकरी सांगत आहेत. नैसर्गिक आपत्ती कमी होती की काय, म्हणून रोही (नीलगाय) आणि रानडुकरांनी पिकांची नासधूस करून शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला आहे.

उत्पादन घटले असताना किमान चांगला भाव मिळेल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र, बाजारात तुरीची नवीन आवक सुरू होताच दरात मोठी घसरण सुरू झाली आहे. वाढलेला मजुरी खर्च, महागडी औषधे आणि खतांच्या किमती पाहता, सध्या मिळणारा भाव अत्यंत तुटपुंजा आहे. शासनाने तुरीच्या भावात सुधारणा करून स्थिर व योग्य दर मिळवून द्यावा, अशी आर्त मागणी हिरपूर परिसरातील शेतकरी वर्गातून केली जात आहे.

> निसर्गाच्या लहरीपणामुळे आधीच उत्पादन अर्ध्यावर आले आहे, त्यात आता बाजारभाव पडल्याने जगावे कसे, हा प्रश्न आमच्यासमोर उभा ठाकला आहे.
>
> **शेतकरी, हिरपूर परिसर**

# तलाठ्यांच्या हलगर्जीमुळे शेतकरी हैराण

## सोनगिरी येथील शेतकऱ्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी




**बार्शीटाकळी दि. १३ :** तालुक्यातील महसूल विभागाच्या संथ कारभारामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सोनगिरी येथील एका प्रलंबित प्रकरणामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, त्रस्त शेतकरी गोपाल विश्वंभर ढोरे यांनी थेट जिल्हाधिकारी आणि पालकमंत्र्यांकडे लेखी तक्रार केली आहे.

तक्रारीनुसार, सोनगिरी येथील तलाठी दीर्घकाळ रजेवर असल्याने शेतजमिनीच्या नोंदी आणि वारसा हक्काची कामे रखडली आहेत. तलाठी कार्यालयात उपलब्ध नसल्याने अर्ज धूळ खात पडले असून, शेतकऱ्यांना वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप आहे.

तक्रारदाराने वरिष्ठ कार्यालयांतील समन्वयाबाबतही नाराजी व्यक्त केली आहे. विविध कार्यालयांशी संपर्क साधला असता, अधिकारी अधिकारक्षेत्राचे कारण पुढे करत जबाबदारी टाळत असल्याचा आरोप ढोरे यांनी केला आहे. धक्कादायक म्हणजे, रजेवर असलेल्या कर्मचाऱ्यांना खासगीत भेटण्याच्या सूचना काही स्तरांवरून मिळत असल्याने संभ्रम वाढला आहे. या कामातील विलंबाची सखोल चौकशी करून अहवाल सादर करावा आणि दोषींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

> ### तलाठी म्हणतात, भेटून बोलू!
>
> या संदर्भात संबंधित तलाठी यांच्याशी संपर्क साधला असता, मी सध्या रजेवर होतो, आपण प्रत्यक्ष भेटून बोलू, अशी जुजबी प्रतिक्रिया देऊन त्यांनी अधिक बोलणे टाळले.
>
> सोनगिरी येथील तक्रारीची दखल घेण्यात आली आहे. संबंधित प्रकरणाची आणि कामातील विलंबाची पडताळणी करून नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही केली जाईल.
>
> **-रवींद्र कापशीकर, तहसीलदार, बार्शीटाकळी.**

## महत्त्वाचे

### दिग्रस बुद्रुकमध्ये ५% निधीतून ॲक्वा कॅनचे वाटप



**दिग्रस बुद्रुक :** येथील ग्रामपंचायतीच्या ५ टक्के (दिव्यांग) निधीतून पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना एक्का कॅनचे वाटप करण्यात आले. गावातील गरजू लाभार्थ्यांना उपयुक्त साहित्य उपलब्ध करून देण्याचा स्तुत्य उपक्रम ग्रामपंचायतीतर्फे राबविण्यात आला.याप्रसंगी ग्रामपंचायत सचिव देमापुरे, सरपंच आशाताई कराळे, ग्राम ऑपरेटर सुभाष बराटे, ग्राम कर्मचारी राजू कुकडकर, गजानन ताले आदी प्रामुख्याने उपस्थित होते. ग्रामपंचायत सदस्य मिलिंद आत्माराम गवई यांच्या हस्ते लाभार्थ्यांना एक्का कॅन वितरित करण्यात आले.ग्रामपंचायतीने राबविलेल्या या उपक्रमाबद्दल लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले असून, प्रशासनाच्या या सामाजिक बांधिलकीचे परिसरात कौतुक होत आहे.

### मुर्तिजापूरमध्ये शिवमहापुराण कथा, प्राणप्रतिष्ठा सोहळा



**मुर्तिजापूर (जि. अकोला) :** सरोदे ले-आउट येथील श्री दत्तमंदिर, जुनी वस्ती येथे श्री नर्मदेश्वर महादेव लिंगाची प्राणप्रतिष्ठा व मंदिरनिर्मिती निमित्त शिवमहापुराण कथा व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळा ८ ते १६ फेब्रुवारीदरम्यान होत आहे.८ ते १४ फेब्रुवारी या कालावधीत दररोज दुपारी शिवमहापुराण कथाचे वाचन ह.भ.प. विलास महाराज हतगांवकर यांच्या प्रवचनातून होत आहे. कार्यक्रमांतर्गत पीठ स्थापना, हवन, मूर्ती स्थापना व कलश स्थापना यांसारखे विधी पार पडणार आहेत.सोमवार, १६ फेब्रुवारी रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आळंदा-रुस्तमाबादमध्ये भागवत सप्ताहाचा प्रारंभ

## १७ फेब्रुवारीला ३५ क्विंटल भाकरींचा महाप्रसाद!

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी



**बार्शीटाकळी : दि. १३ :** तालुक्यातील आळंदा-रुस्तमाबाद येथील श्री जागेश्वर संस्थान येथे श्रीमद भागवत ज्ञानकथा सप्ताहाचा भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला आहे. या सप्ताहाची सांगता १७ फेब्रुवारी रोजी भव्य महाप्रसादाने होणार असून, तब्बल ३५ क्विंटल ज्वारीच्या भाकरी आणि ७ क्विंटल मिसळच्या वरणाचे वाटप भाविकांना करण्यात येणार आहे.या सोहळ्यात ह.भ.प. विश्राम महाराज (पांडे) आपल्या अमोघ वाणीतून भागवत कथेचे निरूपण करत आहेत. १८ फ ब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या धार्मिक उत्सवात दररोज सायंकाळी कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ज्ञानेश्वर महाराज लाहुडकर, गजानन महाराज गोंडचवर, नेहाताई ठक, ज्ञानेश्वर महाराज पाटोंड, मोहन महाराज मेटकर, सुष्माताई चांभारे व राधिकाताई डांबडे यांसारख्या नामवंत कीर्तनकारांची प्रबोधनात्मक कीर्तने होणार आहेत.

महाप्रसादासाठी ग्रामस्थांनी जय्यत तयारी केली आहे. विशेष म्हणजे, स्वच्छतेचा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी पिण्याच्या पाण्यासाठी प्लास्टिकऐवजी मातीच्या गाडग्यांचा वापर करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी या ज्ञानकथेचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक समिती व आळंदा-रुस्तमाबाद ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आत्मसंतोष भवनमध्ये त्रिमूर्ती शिवजयंती उत्साहात

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी



**हिवरखेड : दि. १३ :** हिवरखेड येथील आत्मसंतोष भवन (मुख्य ओमशांती शाखा) येथे त्रिमूर्ती शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय द्वारा संचालित शाखेत आयोजित कार्यक्रमात शिवबाबा ध्वजारोहण न.पा. अध्यक्ष सुलभा रमेश दुंतोडे यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळच्या ज्ञानमूर्ती सत्राने झाली. यावेळी लाईट हाऊसच्या संचालिका ब्रह्माकुमारी अर्चना दिदी यांनी मुरलीनंतर मार्गदर्शन करत प्रभूनाम स्मरण, योगसाधना व आत्मज्ञानाचे महत्त्व विषद केले. आत्मसंतोष भवनच्या संचालिका ब्रह्माकुमारी रश्मी दिदी यांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

कार्यक्रमास न.पा. सभापती प्रमिला रविंद्र मानकर, प्रमुख अतिथी हभप अनंत महाराज रेखाते, प्रकाश गावंडे, रमेश दुंतोडे, महादेव बुंदे, रामदास पाटील आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. ध्वजारोहणानंतर ब्रह्माभोजनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष प्रतिभा वीरेंद्र येऊल, सभापती वैभव गावंडे, सभापती वंदना वानखडे, गटनेता वैषाली गणेश वानखडे, शिला बोपटे, रवी घुंगड, संदीप इंगळे, ममता खेडकर, बाली बुंदे, सौ. चिमनकर,साधना बुंदे, शंकुतला पिंजरकर, सत्यभामा बुंदे, डॉ. संजय शर्मा, रवी वाकोडे, वैभव पोटे, मोहन मानसेता, महादेव नेवारे,अनिता नेवारे, गोपाल बुंदे, रमेश येऊल, गजानन येऊल, संतोष शर्मा, देवीदास फोपसे, मंदा फोपसे, देवीदास इखार, मनोहर दुंतोडे, गजानन पिंजरकर यांच्यासह शेकडो नागरिक उपस्थित होते.संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला.

# श्री शिवाजी महाविद्यालयात जल्लोष २०२६ चा उत्साह

## विविध स्पर्धा आणि रॅम्पवॉकने वेधले लक्ष; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी



**आकोट : दि. १३ :** स्थानिक श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. सुनील पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली जल्लोष २०२६ या सांस्कृतिक महोत्सवाचे दिमाखात आयोजन करण्यात आले. भारतीय संस्कृती आणि परंपरांचे जतन करण्याच्या उद्देशाने आयोजित या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेसह विविध कलागुणांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे कार्यकारिणी सदस्य सुरेश खोटरे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनील पांडे होते, तर उपप्राचार्य डॉ. संजय कोल्हे यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, परंपरा आणि वेशभूषेबद्दल अभिमान निर्माण करणे हा या सोहळ्याचा मुख्य उद्देश होता.महोत्सवाची सुरुवात रांगोळी, पोस्टर मेकिंग, रील मेकिंग, फ्लॉवर डेकोरेशन आणि मेहंदी स्पर्धांनी झाली. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकता आणि कौशल्याच्या जोरावर या स्पर्धांमध्ये रंगत भरली. त्यानंतर पार पडलेल्या रॅम्पवॉकने सर्वांच्या नजरा खिळवून ठेवल्या. विद्यार्थिनींनी महाराष्ट्राची नऊवारी साडी, पंजाबचा पटियाला सूट, गुजरातचा घागरा-चोळी आणि दक्षिण भारतीय पेहराव परिधान केला होता, तर विद्यार्थ्यांनी धोतर-कुर्ता, शेरवानी आणि पगडी अशा रुबाबदार वेशभूषेत हजेरी लावली होती. या माध्यमातून कॅम्पसमध्ये लघु भारताचे दर्शन घडले. लोकगीते, पारंपरिक नृत्य, संगीत खुर्ची आणि ट्रेझर हंट या उपक्रमांनी कार्यक्रमात अधिकच उत्साह भरला.

उत्कृष्ट वेशभूषा आणि विविध स्पर्धांमधील विजेत्यांची निवड परीक्षकांनी केली. मान्यवरांच्या हस्ते या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन संयोजक डॉ. उत्तरा तडवी व डॉ. नूतनवर्षा देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अशोक इंगळे, डॉ. माणिक ढोरे, डॉ. गजानन वानखडे, डॉ. उमर भटी, डॉ. संतोष कायंदे, प्रा. पट्टेबहादुर, प्रा. अर्चना कुचे, डॉ. प्रतिभा पवित्रकार, प्रा. सुधीर दुबे, प्रा. रणजीत गणोदे यांच्यासह सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

> विद्यार्थ्यांमध्ये आपल्या महान भारतीय संस्कृतीबद्दल अभिमान निर्माण व्हावा आणि त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, हाच या जल्लोष महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे.
>
> **- डॉ. सुनील पांडे, प्राचार्य**

# श्री बागाजी विद्यालय, रुईखेड येथे सीड बॉल कार्यशाळा संपन्न




**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**आकोट : दि. १३ :** तालुक्यातील रुईखेड येथील श्री बागाजी विद्यालयात सामाजिक वनीकरण विभाग, अकोट यांच्या संयुक्त विद्यमाने प्रदूषण या विषयावर चित्रकला स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, प्रश्नमंजुषा आणि सीड बॉल निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत प्रभारी शिक्षक विशाल मांडवे यांनी विद्यार्थ्यांना सीड बॉल निर्मितीचे प्रात्यक्षिक करून दाखविले. वनविभागाचे ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी वनविभागाचे डी.जी. शेगोकार, ज्योती गाडे, रूपाली मोहड, शरीफभाई तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक निनाद मानकर, किरण मानकर, अनिता मानकर, मंजुषा साठे, प्रतीक्षा सदार, विठ्ठल फाळके, गजानन घुगे, अविनाश सुकोशे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रमाई जयंतीनिमित्त जन्मलेल्या कन्यारत्नांचे स्वागत



**अकोला :** भारतीय बौद्ध महासभा, जिल्हा अकोला यांच्या वतीने ७ फेब्रुवारी रोजी जिल्हा महिला रुग्णालय, अकोला येथे जन्मलेल्या कन्यारत्न व त्यांच्या मातांचे स्वागत करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही रमाई जयंतीनिमित्त उपक्रम राबविण्यात आला.या दिवशी जन्मलेल्या एकूण ३० कन्यारत्नांना कपडे, तर मातांना ड्रायफ्रुट्सचे लाडू व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी व रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते. अशी माहिती पत्रकाद्वारे देण्यात आली.

**प्रशासकीय दुर्लक्ष?** युवकाचा हात झाला फ्रॅक्चर

# दहीहंड्यात उघड्या नालीमुळे अपघात

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी



**दहीहंडा : दि. १३ :**गावात सुरू असलेल्या रस्ते व नाली बांधकामाच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजनांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे एका युवकाला गंभीर दुखापत झाल्याची घटना समोर आली आहे. कंत्राटदाराने उघड्या ठेवलेल्या नालीमुळे हा अपघात घडल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात असून, या प्रकारामुळे दहीहंडा परिसरात कंत्राटदार आणि संबंधित विभागाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शोभा वामन वाकोडे व दशरथ मोरे यांच्या दुकानासमोरील भागात सध्या नालीचे काम सुरू आहे. या ठिकाणी गटारावर झाकण नसल्याने, तसेच सुरक्षिततेसाठी कोणतेही बॅरिकेड्स न लावल्याने एका युवकाचा तोल जाऊन तो नालीत कोसळल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या अपघातात युवकाच्या हाताला गंभीर दुखापत झाली असून त्याचे हाड मोडले (फ्रॅक्चर) आहे. जखमी युवकावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी कोणतेही इशारा फलक किंवा धोका दर्शवणारे लाल कापड लावण्यात आलेले नाही, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. भरवस्तीत सुरू असलेल्या या कामात सुरक्षेचे नियम पायदळी तुडवले जात असल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. या घटनेनंतर तरी प्रशासनाला जाग येईल का, असा सवाल आता विचारला जात आहे.

उघड्या नाल्यांवर त्वरित झाकण बसवावे आणि जेथे काम सुरू आहे, तेथे बॅरिकेड्स लावावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. भविष्यात असा जीवघेणा अपघात पुन्हा घडू नये, यासाठी संबंधित कंत्राटदारावर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी भावना व्यक्त होत आहे.

> ### उपचारांचा खर्च कोण देणार?
>
> काम सुरू असताना सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदार आणि यंत्रणेची असते. कोणतीही खबरदारी न घेता नाली उघडी ठेवणे हा गंभीर प्रकार असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. आता आमच्या मुलाच्या उपचाराचा खर्च कोण उचलणार? असा संतप्त सवाल पीडित कुटुंबीयांनी उपस्थित केला आहे.

# श्री गुरुदेव विद्या मंदिर बोर्डी येथे दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**आकोट : दि. १३ :**श्री गुरुदेव विद्या मंदिर, बोर्डी येथे शाळा समिती व विद्यालयाच्या वतीने इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा समितीचे अध्यक्ष संदीप महाले होते. याप्रसंगी शाळा समिती सदस्य तुळशीराम इस्तापे, लक्ष्मीनारायण जैस्वाल, बाळकृष्ण बुंदे, बोर्डी ग्रामपंचायतचे उपसरपंच राजेश भालतिलक, तंटामुक्ती अध्यक्ष अमोल आतकड, माजी सरपंच संजय ताडे, अरुण भगत, मंगेश गये, मनोज सोळंके, पत्रकार नरेंद्र कोंडे, सागर भालतिलक, राम वरणकार यांसह गावातील प्रतिष्ठित नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक ए.टी. राठोड यांनी केले. मुख्याध्यापक डी.जे. पाटील यांनी विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त अभियान व पुढील भविष्याबाबत सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्ही.आर. जयस्वाल यांनी केले, तर आभार अमोल महाले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मीना बद्रे, हरि शिवरकर, रवींद्र कुरई व शालेय कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

अजिंक्य भारत

# आपलं वाशिम

अकोला, शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com



महत्त्वाचे

## राज्यमंत्री इंद्रनील नाईक पोहरादेवीतील महोत्सवाला लावणार उपस्थिती



**वाशिम:** राज्याचे उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन तसेच मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी वाशिम जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त पोहरादेवी येथे आयोजित 'पर्यटन महोत्सवा'ला ते प्रमुख उपस्थिती लावणार आहेत. दौरा कार्यक्रमानुसार, राज्यमंत्री नाईक शनिवारी सकाळी ११:३० वाजता पुसद येथील 'नाईक बंगला' येथून मोटारीने पोहरादेवीकडे प्रयाण करतील. दुपारी १ वाजता ते पोहरादेवी येथे पोहोचून संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त आयोजित भव्य पर्यटन महोत्सवाच्या कार्यक्रमात सहभागी होतील.

## पोहरादेवीत संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात



**मानोरा:** गोर बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त पोहरादेवी येथील वसंतनगर परिसरात भक्तीमय वातावरणात फराळ वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. पोहरादेवी येथे सात दिवस चालणाऱ्या प्रभात फेरीच्या सांगता निमित्ताने हा उपक्रम राबवण्यात आला. हजारो स्थानिक भाविकांनी या प्रसादाचा लाभ घेतला. याप्रसंगी संजय पाटील, अविनाश राठोड, गुरुदत्त जाधव, गजानन सीडाम, भाऊराव जाधव, बलदेव चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गौण खनिज उत्खननावर कारवाई

**कारंजा :** तालुक्यातील टाकळी शिवारात गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या अवैध उत्खननावर महसूल विभागाने अखेर कारवाई केली. या मोहिमेत दोन ट्रॅक्टर आणि एक जेसीबी जप्त करण्यात आली आहे. कारवाईची चाहूल लागताच दोन ट्रॅक्टरचालक पळून जाण्यात यशस्वी झाले.

# पोहरादेवीत आज भक्ती आणि संस्कृतीचा त्रिवेणी संगम

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत 'सेवारत्न' सोहळा

। संजय अलदर ।





**मानोरा, दि. १३ :** गोर बंजारा समाजाची काशी असलेल्या श्रीक्षेत्र पोहरादेवीच्या पावन भूमीत १४ फेब्रुवारी रोजी संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त भक्ती, शक्ती आणि संस्कृतीचा त्रिवेणी संगम पाहायला मिळणार आहे. या भव्य पर्यटन महोत्सवाच्या निमित्ताने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि बंजारा समाजातील अतूट नाते पुन्हा एकदा अधोरेखित होणार असून, हा सोहळा समाजासाठी आनंदाची मोठी पर्वणी ठरणार आहे.

महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे बंजारा समाजाची लाडकी आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीची गायिका मंगली. तिच्या सुमधुर आवाजातील बंजारा गीतांनी महोत्सवाची पहाट अधिकच भक्तीमय होणार आहे. मंगलीच्या सादरीकरणामुळे बंजारा संस्कृतीचा सुगंध देशभरात दरवळणार असून, तरुणाईमध्ये या कार्यक्रमाबाबत मोठी उत्सुकता आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पोहरादेवी आणि बंजारा समाजाशी असलेले नाते केवळ राजकीय नसून ते अत्यंत जिव्हाळ्याचे आणि 'ऋणानुबंधाचे' आहे. पोहरादेवीच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान आणि बंजारा बोलीभाषेप्रति दाखवलेला आदर यामुळे समाजात त्यांच्याबद्दल कृतज्ञतेची भावना आहे. विशेष म्हणजे, मुख्यमंत्री पत्नी अमृता फडणवीस यांनी गायलेले बंजारा गीत आजही तांड्या-तांड्यांवर अभिमानाने ऐकले जाते. त्यांच्या या गीताने बंजारा कला आणि भाषेला एक नवी ओळख मिळवून दिली, ज्याचा उल्लेख आजही प्रत्येक बंजारा बांधव अभिमानाने करतो. दुपारी १ वाजता मुख्यमंत्री फडणवीस जगदंबा माता आणि संत सेवालाल महाराज यांच्या चरणी नतमस्तक होतील. त्यानंतर त्यांच्या हस्ते समाजातील ७ थोर व्यक्तींना 'सेवारत्न' पुरस्काराने गौरविण्यात येईल. याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ना. संजय राठोड, श्रीमती सुनेत्रा पवार आणि राज्यातील दिग्गज मंत्र्यांची उपस्थिती राहणार आहे. सायंकाळी ६ वाजता प्रसिद्ध गायक संजू राठोड यांच्या गीतांची मैफल सजेल. त्यानंतर रात्री लेझर शो, फायर शो आणि आकाशात झेपावणाऱ्या शेकडो ड्रोन्सच्या माध्यमातून पोहरादेवीचा इतिहास जिवंत केला जाईल. सकाळी १० ते रात्री १० या वेळेत चालणारा हा सोहळा बंजारा अस्मितेचा नवा अध्याय लिहिणारा ठरेल. बंजारा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री या व्यासपीठावरून कोणती मोठी घोषणा करतात, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे संत सेवालाल महोत्सवाला लावणार उपस्थिती



**वाशिम:** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी वाशिम जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त पोहरादेवी येथे आयोजित 'पर्यटन महोत्सवा'ला ते प्रमुख उपस्थिती लावणार आहेत. प्रशासनाकडून त्यांच्या या दौऱ्याची संपूर्ण तयारी करण्यात आली असून सुरक्षेचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दौरा कार्यक्रमानुसार, उपमुख्यमंत्री शनिवारी दुपारी १ वाजता नांदेड विमानतळ येथे दाखल होतील. त्यानंतर ते हेलिकॉप्टरने पोहरादेवीकडे प्रयाण करतील. दुपारी १ वाजून ४५ मिनिटांनी ते पोहरादेवी येथील संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सवाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहतील. या सोहळ्यानंतर दुपारी ३ वाजून १५ मिनिटांनी ते मोटारीने वाईगौळ हेलिपॅडकडे रवाना होतील आणि दुपारी ३ वाजून ३० मिनिटांनी पोहरादेवी येथून हेलिकॉप्टरने पुन्हा नांदेड विमानतळाकडे प्रयाण करतील. संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त पोहरादेवीत राज्यभरातून लाखो भाविक दाखल होत असून, उपमुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्याकडे बंजारा समाजाचे लक्ष लागले आहे. या दौऱ्यादरम्यान ते काही महत्त्वपूर्ण घोषणा करण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## महिला मंडळाकडून स्वच्छता अभियान; सामाजिक बांधिलकीचे दर्शन



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. १३ :** बंजारा काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त भुली (ता. मानोरा) येथील ग्रामस्वच्छता महिला मंडळाच्या वतीने विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. धार्मिक उत्सवाचे औचित्य साधून सामाजिक जबाबदारीचे भान जपत महिलांनी संपूर्ण परिसर चकाचक केला.

या उपक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे धर्मगुरू तथा आमदार बाबुसिंग महाराज यांच्या पत्नी पंचीबाई महाराज यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवून महिलांचा उत्साह वाढवला. 'धार्मिक स्थळांची स्वच्छता राखणे ही केवळ जबाबदारी नसून ती श्रद्धा आणि संस्कारांचे प्रतीक आहे,' अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

ग्रामस्वच्छता महिला मंडळाच्या अध्यक्षा छायाताई अरुण डाहाके यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ८० महिलांनी या अभियानात सहभाग घेतला. यामध्ये प्रामुख्याने नगारा भवन, गावातील प्रमुख चौक, संत सेवालाल महाराज मंदिर परिसर आणि पालखी मार्गाची संपूर्ण स्वच्छता करण्यात आली. जयंतीनिमित्त येणाऱ्या भाविकांना स्वच्छ आणि प्रसन्न वातावरण मिळावे, या उद्देशाने महिलांनी हे श्रमदान केले. निस्वार्थ भावनेतून राबविलेल्या या उपक्रमाचे पोहरादेवी परिसरासह सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. स्वच्छतेचा हा जागर इतर सामाजिक संस्थांसाठीही प्रेरणादायी ठरला आहे.

## पाणंद रस्त्यांचा प्रश्न प्रलंबित; यंदाही शेतकऱ्यांच्या नशिबी 'चिखलवाट'

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कोंडोली, दि. १३ :** श्रीक्षेत्र कोंडोली परिसरातील पाणंद रस्त्यांच्या कामांबाबत प्रशासकीय स्तरावर केवळ चर्चाच सुरू असल्याने रस्त्यांची अवस्था 'जैसे थे' आहे. जानेवारी महिना संपून फेब्रुवारीचा पंधरवडा उलटला तरी अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे आगामी चार महिन्यांनंतर येणाऱ्या पावसाळ्यातही या भागातील शेतकरी आणि शेतमजुरांना भीषण हाल सोसावे लागणार असल्याचे आता निश्चित झाले आहे.

रस्त्यांची दुरवस्था आणि वहिवाटीचा प्रश्न

कोंडोली ते अभईखेडा, कोंडोली ते मानोरा आणि कोंडोली ते जवळा या मुख्य पाणंद रस्त्यांवर परिसरातील शेतीची मोठी भिस्त आहे. कोंडोलीसह अभईखेडा, मानोरा, जवळा, आमगव्हाण आणि धामणी या गावांतील शेतकऱ्यांची शेती याच पट्ट्यात येते. शेतीकामासाठी शेतकरी आणि मजुरांना याच मार्गावरून नित्यनेमाने ये-जा करावी लागते. मात्र, पावसाळ्यात या पाणंद रस्त्यांची अवस्था अतिशय दयनीय होते. चिखलामुळे पायदळ चालणेही कठीण होत असल्याने शेतीमाल बाजारात नेणे किंवा मशागतीसाठी अवजारे नेणे अशक्य होऊन बसते.

यावर्षी पाणंद रस्त्यांचे काम मार्गी लागेल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र, फेब्रुवारीचा पंधरवडा उलटूनही कोणतीही यंत्रणा कामावर दिसलेली नाही. पावसाळा सुरू व्हायला अवघे काही महिने शिल्लक असताना अद्याप काम सुरू न झाल्याने, हे रस्ते पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणे तांत्रिकदृष्ट्या कठीण दिसत आहे. परिणामी, आगामी पावसाळ्यातही चिखलाच्या साम्राज्यातूनच शेतात जावे लागणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने मार्ग काढावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

## १८ पानटपरी चालकांवर कोटपा कायद्यांतर्गत कारवाई

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. १३ :** जिल्ह्यात तंबाखूमुक्त वातावरणाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा रुग्णालय आणि वाशिम पोलीस प्रशासनाने संयुक्त मोहीम हाती घेतली आहे. शुक्रवारी, १३ फेब्रुवारी रोजी शहराच्या विविध भागांत राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत धडक कारवाई करण्यात आली. यामध्ये 'कोटपा' कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या १८ पानटपरी चालकांकडून ३ हजार ६०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

शाळा परिसर आणि मुख्य चौकांत तपासणी

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी आणि शहर पोलीस निरीक्षक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवण्यात आली. पथकाने शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, राणी लक्ष्मीबाई कन्या शाळा परिसर, पाटणी चौक आणि रिसोड नाका या गजबजलेल्या भागात अचानक तपासणी केली.

'सिगारेट व अन्य तंबाखू उत्पादने प्रतिबंधक कायदा-२००३' (कोटपा) मधील कलम ६ (अ) आणि ६ (ब) नुसार, शैक्षणिक संस्थेच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणे आणि अल्पवयीन मुलांना तंबाखू विकणे हा गंभीर गुन्हा आहे. या नियमांची पायमल्ली करणाऱ्या १८ टपरीधारकांवर पथकाने प्रत्यक्ष दंड ठोठावला. या कारवाईमुळे अवैध विक्री करणाऱ्या विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

या मोहिमेत राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे जिल्हा सल्लागार डॉ. आदित्य पांडारकर, मानसशास्त्रज्ञ राम सरकटे, सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण धाडवे, मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे जिल्हा समन्वयक मंगेश गायकवाड यांच्यासह वाशिम शहर पोलीस कर्मचारी आणि होमगार्डच्या जवानांनी सक्रिय सहभाग घेतला.

'तंबाखूचे व्यसन तरुणाईला पोखरत आहे. शाळा-महाविद्यालयीन परिसरात अशा पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल. दुकानदारांनी कायद्याचे पालन करावे.

## कारखेडा येथे मोफत आरोग्य शिबिर; ८३ नागरिकांची तपासणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. १३ :** जगदगुरु संत सेवालाल महाराज जयंती आणि आमदार सई डहाके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कारखेडा येथे भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ८३ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी १२ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत केली जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

भाजप युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष श्याम डोळस यांच्या वतीने आयोजित या शिबिराचे उद्घाटन गावचे पुजारी पंडित राठोड यांच्या हस्ते झाले. ग्रामीण भागातील रुग्णांना तज्ज्ञ वैद्यकीय सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे शिबिर घेण्यात आले. यात मोतीबिंदू शस्त्रक्रिया पूर्व तपासणीसह रक्तदाब (बीपी) आणि मधुमेहाच्या (शुगर) चाचण्या मोफत करण्यात आल्या.

यावेळी भाजप तालुकाध्यक्ष अरविंद इंगोले, राजू देशमुख, मनोज खडसे, देविदास महाराज राठोड, चोखला राठोड, भानुदास जाधव, ग्रामपंचायत सदस्य बाळू जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रियंका गोगटे यांच्या मार्गदर्शनाखाली हरी काळे, नितेश लवटे व आकाश सावंत यांनी रुग्णांची तपासणी केली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी सौरभ राठोड, गोपाल जाधव, हरीश जाधव यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

विधी सेवा महाशिबिर | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व प्रशासनाचा पुढाकार

# एकाच छताखाली कायदेशीर सल्ल्यासह शासकीय योजनांचा लाभ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

न्याय सब के लिए

ACCESS TO JUSTICE FOR ALL

**वाशिम, दि. १३ :** न्यायव्यवस्थेचा लाभ केवळ न्यायालयाच्या पायऱ्या चढणाऱ्यांनाच नाही, तर समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, या उदात्त हेतूने वाशिम येथे शनिवारी, १४ फेब्रुवारी रोजी 'विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांच्या महामेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय आणि राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने होणारा हा उपक्रम प्रशासकीय आणि न्यायालयीन प्रक्रियेतील दरी कमी करणारा ठरणार आहे.

अकोला रोडवरील वाटाणे लॉन मंगल कार्यालय येथे सकाळी १० वाजल्यापासून या महामेळाव्याला प्रारंभ होईल. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे एकाच छताखाली कायदेशीर सल्ला आणि शासकीय योजनांचा लाभ मिळण्याची दुर्मिळ संधी वाशिमकरांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

एकाच छताखाली प्रशासकीय दालने केवळ घोषणाबाजी न करता, प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देण्यासाठी जिल्हा प्रशासनातील सर्व महत्त्वाच्या विभागांचे स्वतंत्र स्टॉल्स या ठिकाणी लावण्यात येणार आहेत. यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, जिल्हा सामान्य रुग्णालय, समाजकल्याण, महिला व बालविकास, उपप्रादेशिक परिवहन, कृषी विभाग, ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था, जिल्हा कामगार कार्यालय आणि जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय अशा विविध विभागांचा समावेश आहे. प्रत्येक स्टॉलवर संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित राहून नागरिकांना योजनांची माहिती देतील व आवश्यक त्या अर्जांची पूर्तता करून घेतील.

**'न्यायदान प्रक्रिया ही केवळ खटल्यांपुरती मर्यादित नसून, नागरिकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे आणि शासकीय योजनांचा लाभ पारदर्शकपणे मिळवून देणे हा विधी सेवा प्राधिकरणाचा मुख्य उद्देश आहे. वाशिम जिल्ह्यातील नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या तक्रारींचे निवारण करून घ्यावे,' असे आवाहन अनिल सुब्रमण्यम (प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम) यांनी केले आहे.**

बऱ्याचदा कायदेशीर गुंतागुंत आणि माहितीच्या अभावामुळे सामान्य नागरिक आपल्या हक्कांपासून वंचित राहतात. ही अडचण दूर करण्यासाठी जिल्हा वकील संघाच्या सहकार्याने ज्येष्ठ वकील आणि विधी तज्ज्ञ या मेळाव्यात मोफत कायदेशीर मार्गदर्शन करणार आहेत. कौटुंबिक वाद, जमिनीचे खटले, कामगारांचे हक्क आणि फौजदारी प्रक्रियेतील प्राथमिक माहिती येथे विनामूल्य उपलब्ध होईल.

या महामेळाव्यात महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग बांधव आणि शेतकरी यांच्यासाठी राज्य व केंद्र सरकारमार्फत राबविण्यात येणाऱ्या विशेष योजनांवर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. विशेषतः दिव्यांगांसाठीची साधने, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या योजना आणि शेतकऱ्यांसाठीचे विमा व सवलतीचे लाभ मिळवून देण्यासाठी येथे 'ऑन द स्पॉट' नोंदणीची व्यवस्था करण्यात आली आहे.

## वाशिमच्या मंजुषा ठाकरे यांना राज्यस्तरीय 'आद्या पुरस्कार' प्रदान

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. १३ :** महाराष्ट्र शासन अंगीकृत महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून, अमरावती विभागातून वाशिम जिल्ह्यातील कारंजा लोकसंचालित साधन केंद्राच्या उपाध्यक्षा मंजुषा राजेंद्र ठाकरे यांना राज्यस्तरीय 'आद्या पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईत आयोजित 'महाविकास २०२६: महाराष्ट्र डायरेक्ट सेलिंग समिट' या विशेष सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला.

मंजुषा ठाकरे यांनी कारंजा तालुक्यातील वाई ग्रामपंचायत स्तरावर 'स्वामी समर्थ महिला बचत गटा'ची स्थापना करून ग्रामीण महिलांना संघटित केले. या गटामार्फत त्यांनी 'स्वरा स्वादिष्ट पापड' हा गृहउद्योग सुरू केला, जो आज कारंजा शहर आणि परिसरात गुणवत्तेच्या जोरावर अत्यंत लोकप्रिय झाला आहे. त्यांच्या या पुढाकारामुळे अनेक महिलांना हक्काचा रोजगार उपलब्ध झाला असून, हा ब्रँड घराघरांत पोहोचला आहे.

कारंजा लोकसंचालित साधन केंद्राच्या माजी सचिव आणि विद्यमान उपाध्यक्षा म्हणून मंजुषा ठाकरे यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. महिला सक्षमीकरण आणि स्वावलंबनाच्या दिशेने त्यांनी केलेले हे कार्य प्रेरणादायी ठरले असून, अमरावती विभागातून त्यांची झालेली ही निवड माविम वाशिमसाठी अभिमानास्पद मानली जात आहे.

अजिंक्य भारत

आपलं अकोला / वाशिम

अकोला, शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com



**महत्त्वाचे**

## लाखपुरीत कीर्तनातून सामाजिक प्रबोधन



**मुर्तिजापूर :** तालुक्यातील तीर्थक्षेत्र लक्षेश्वर संस्थान, लाखपुरी येथे महाशिवरात्री उत्सवानिमित्त व्यसनमुक्ती सम्राट ह.भ.प. मधुकरजी खोडे महाराज यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम पार पडला. या माध्यमातून त्यांनी व्यसनाधीनता आणि मोबाईलच्या अतिवापरामुळे मानवी नात्यांत निर्माण होत असलेल्या अंतरावर परखड भाष्य केले.कीर्तनादरम्यान खोडे महाराज म्हणाले की, ''आई-वडील स्वतः कष्ट करून मुलांना सर्व सोयी-सुविधा पुरवतात, मात्र आजची पिढी त्यांच्या त्यागाला विसरत चालली आहे. आई-वडिलांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे.'' संतांचे विचार केवळ ऐकण्यासाठी नसून ते आचरणात आणण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कीर्तन हे विचारांचे मंथन असून सात्विक विचारांमुळे समाज नक्कीच सुधारेल, असेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमास लक्षेश्वर संस्थानचे अध्यक्ष राजू दहापुते, ग्रामीण पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष विलास नसले, विविध वृत्तपत्रांचे प्रतिनिधी, संस्थानचे सेवाधारी, हरिपाठ मंडळाचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सातपुड्याच्या पायथ्याशी विद्यार्थ्यांचे शिक्षण आधारहीन

## साहेब, आम्हाला आधार कार्ड द्या!; राहणापूर-कासोदच्या चिमुकल्यांची आर्त हाक

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. १३:** एकीकडे देश डिजिटल इंडियाच्या गप्पा मारत असताना, अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या राहणापूर आणि कासोद या आदिवासीबहुल गावांतील विद्यार्थ्यांचे भविष्य मात्र आधारअभावी अंधारात आहे. ''साहेब, आम्हाला आधार कार्ड द्या!'' अशी आर्त हाक पहिली ते सातवीतील चिमुकल्यांनी दिली असून, या गंभीर प्रश्नामुळे प्रशासकीय अनास्थेवर संताप व्यक्त होत आहे.

येथील शेकडो विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून केवळ कागदपत्रांअभावी दूर फेकले जात आहेत. आधार कार्ड नसल्यामुळे विद्यार्थ्यांची नावे ऑनलाइन पोर्टलवर नोंदवणे, शासकीय शिष्यवृत्ती आणि मोफत गणवेश, शालेय पोषण आहार यांसारख्या लाभांपासून हे विद्यार्थी वंचित राहत आहेत. विशेष म्हणजे, या विद्यार्थ्यांकडे जन्माचा कोणताही ठोस



पुरावा उपलब्ध नसल्याने त्यांची आधार नोंदणीच होऊ शकत नाही, अशी भीषण तांत्रिक अडचण उभी राहिली आहे.

स्थानिक शिक्षकांनी वारंवार पाठपुरावा करूनही कागदपत्रांचा गुंता सुटलेला नाही. परिणामी, शैक्षणिक नुकसान होत असल्याची व्यथा विद्यार्थ्यांनी बोलून दाखविली. आता जिल्हा प्रशासनाने या संवेदनशील प्रश्नाकडे लक्ष देऊन विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**कागदपत्रांच्या कचाट्यात भविष्य!**

राहणापूर-कासोदमधील विद्यार्थ्यांकडे जन्माचा दाखला नसल्याने आधार नोंदणी रखडली आहे. दुर्गम भागातील या वंचित घटकासाठी प्रशासनाने कायदेशीर चौकटीत राहून सुलभ पर्याय किंवा विशेष 'कॅम्प' उपलब्ध करून दिला, तरच या चिमुकल्यांच्या शिक्षणाला खऱ्या अर्थाने 'आधार' मिळेल. प्रशासनाच्या तातडीच्या कार्यवाहीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

> अतिदुर्गम गावांतील विद्यार्थ्यांकडे ठोस कागदपत्रे नसल्याने आधार नोंदणी रखडली आहे. यामुळे गरिबांची मुले शासकीय लाभांपासून वंचित राहत आहेत. प्रशासनाने या प्रश्नाची दखल घेऊन विशेष मार्गदर्शन व ठोस पर्याय उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबेल.
>
> – जोस्ना अशोकराव बकाले, शिक्षिका, राहणापूर.

## वाडेगावात घराला आग; साहित्य जळून खाक!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**बाळापूर : दि. १३:** बाळापूर तालुक्यातील वाडेगाव येथे एका घराला आग लागून घरातील संसारोपयोगी साहित्य, धान्य आणि महत्त्वाची कागदपत्रे जळून खाक झाल्याची घटना १३ फेब्रुवारी रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली.मिळालेल्या माहितीनुसार, वाडेगाव येथील जुन्या ग्रामपंचायत इमारतीजवळ असलेल्या एका भाड्याच्या खोलीत सिंधू रमेश आकोटकर या मजूर महिला वास्तव्यास आहेत. घटनेच्या वेळी संबंधित महिला आपल्या नातेवाईकांकडे गेल्या असल्याने घरी कोणीही नव्हते. घरातील विद्युत तारांच्या शॉर्टसर्किटमुळे ही आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज वर्तविला जात आहे.घराला आग लागल्याचे पाहून शेजाऱ्यांनी तातडीने आकोटकर यांना माहिती दिली आणि आग विझविण्याचा प्रयत्न सुरू केला. दरम्यान, महिला घरी परतल्यानंतर घरातून मोठ्या प्रमाणात धूर निघत असल्याचे दिसले. नागरिकांनी धावून येत घराचा दरवाजा उघडून पाहिले असता, घरातील जवळपास सर्वच साहित्य आगीत भस्मसात झाले असल्याचे निदर्शनास आले.

परिसरातील नागरिकांनी अथक परिश्रम घेऊन आग विझविली, मात्र तोपर्यंत घरातील वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या आगीत संसारोपयोगी साहित्यासह नगदी रकमेचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. सुदैवाने, आगीत गॅस सिलिंडरचा स्फोट झाला नाही, अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती, अशी भीती उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

## जि.प. विद्यालय माना येथे दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मुर्तिजापूर : दि. १३:** जिल्हा परिषद विद्यालय, माना येथे शैक्षणिक सत्र २०२५-२६ मधील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत उपसरपंच गजानन भाऊ गायकवाड होते. प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे माजी प्राचार्य काळमेघ, माना पोलीस स्टेशनचे ठाणेदार गणेश नावकर व पोलीस पाटील संजय देशमुख उपस्थित होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला.



समारंभाच्या औचित्याने माजी शिक्षकांना विशेष निमंत्रण देण्यात आले होते. अनेक माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून गुरुजनांशी संवाद साधत जुन्या आठवणींना उजाळा दिला. मान्यवरांचा शाल-श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित वक्त्यांनी विद्यार्थ्यांना आगामी परीक्षांसाठी शुभेच्छा देत शिस्त, परिश्रम व संस्कार यांचे महत्त्व अधोरेखित केले. जीवनात ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न करण्याचा संदेशही देण्यात आला.

मुख्याध्यापक गजानन गिरी यांनी प्रास्ताविकातून 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमात विद्यालयाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल शिक्षक, विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांचे अभिनंदन केले. शाळेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकजुटीने योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमानंतर पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पुरुषोत्तम कदम यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोहारी खु. शाळेची सिंदखेडराजा व लोणार येथे शैक्षणिक सहल संपन्न



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. १३:** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि पाठ्यपुस्तकातील ज्ञानासोबतच प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळावी, या उद्देशाने जिल्हा परिषद शाळा लोहारी खु.च्या वतीने नुकतीच हिवरा आश्रम, लोणार व सिंदखेडराजा परिसरात शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती. या सहलीत शाळेतील विद्यार्थी व शिक्षक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक व नैसर्गिक वारसा प्रत्यक्ष पाहून माहिती घेतली. हिवरा आश्रम येथे विवेकानंद स्मारकास भेट देऊन आश्रमातर्फे चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली. येथील स्मारक परिसर, तलाव आणि निसर्गरम्य बाग पाहून मुलांनी मनसोक्त आनंद लुटला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी जगप्रसिद्ध लोणार सरोवर परिसराला भेट दिली. उल्कापातामुळे निर्माण झालेल्या या सरोवराची वैशिष्ट्ये, जैवविविधता आणि पर्यावरणीय महत्त्व यावर मुख्याध्यापक नितीन धोरण यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी परिसरातील नैसर्गिक सौंदर्य अनुभवत विविध निरीक्षणे नोंदवली. सिंदखेडराजा येथे विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जन्मस्थानाला भेट देऊन मराठा इतिहासाची माहिती जाणून घेतली. येथील राजवाडा, राजे लखुजी जाधव यांची समाधी, रामेश्वर मंदिर आणि जिजाऊसृष्टी या स्थळांचे ऐतिहासिक महत्त्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. सहलीचा हा अनुभव विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरला असून, भविष्यातही अशा शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस मुख्याध्यापकांनी व्यक्त केला. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश वानखडे, उपाध्यक्ष सुमेधा डोबाळे, सुनिता म्हैसने, मुख्याध्यापक नितीन धोरण, सोनाली उज्जैनकर, सोनाली निचळ, रुपाली ढवळे आणि ज्ञानेश्वर गावंडे यांनी सहकार्य केले.

## सावरगावच्या ग्रामसेवकाच्या निलंबनावर प्रश्नचिन्ह

### मनमानी कारभाराच्या चर्चांना उधाण



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातूर : दि. १३:** पातूर पंचायत समिती अंतर्गत सावरगाव येथे कार्यरत असलेले ग्रामसेवक समाधान साळोकार यांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी निलंबित केल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. साळोकार हे सावरगाव येथील महिला सरपंचांना विश्वासात न घेता मनमानी कारभार करत असल्याचा, तसेच नागरिकांशी असभ्य वर्तन करून कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आल्याचे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, गाळलेल्या विहिरींच्या सर्वेक्षणात आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप महादेव पायगन यांनी केला होता. या तक्रारीनंतर गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार समितीमार्फत चौकशी करण्यात आली होती.

> सावरगाव येथील ग्रामसेवक समाधान साळोकार यांच्या निलंबनाबाबत जिल्हा परिषदेकडून पत्र (डाक) प्राप्त झाले आहे. मात्र, संबंधित आस्थापना विभागाचे लिपिक सुट्टीवर असल्यामुळे, आदेश पत्रातील सविस्तर माहिती उद्यापर्यंत देण्यात येईल.
>
> **-सतीश नायसे,** गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पातूर.

मात्र, प्राथमिक चौकशी समितीचा अहवाल संशयास्पद असल्याचा दावा तक्रारदारांनी केला होता. या पार्श्वभूमीवर, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी उच्चस्तरीय समिती गठित करून चौकशीचे आदेश दिले होते. साळोकार यांच्याकडे आगीखेड ग्रामपंचायतीचा प्रभार असतानाही काही तक्रारी प्राप्त झाल्याची चर्चा आहे. या सर्व गंभीर बाबींची दखल घेत प्रशासनाने निलंबनाची कारवाई केल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, पातूरच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे या कारवाईबाबत विचारणा केली असता, त्यांच्याकडून अद्याप स्पष्ट माहिती दिली जात नसल्याने परिसरात विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

## श्री संत गाडगेबाबा चौकातील मांस विक्रीची दुकाने हटविण्यासाठी निवेदन

### आंदोलनाचा तीव्र इशारा; प्रशासनाच्या भूमिकेवर संताप




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मुर्तिजापूर : दि. १३:** संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी असलेल्या मुर्तिजापूर शहराचे प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या अकोला नाका चौकाचे नगरपालिकेने श्री संत गाडगेबाबा चौक असे नामकरण करून त्याचे सुशोभीकरण करण्याचा ठराव काही वर्षांपूर्वी घेतला आहे. मात्र, याच चौकात सध्या मोठ्या प्रमाणात मांस विक्रीची दुकाने थाटली गेल्याने या चौकाच्या पावित्र्याचा प्रश्न निर्माण झाला असून, नागरिक उपहासाने याला मटण चौक म्हणू लागले आहेत.

या परिसरात मांस विक्रीच्या दुकानांमुळे भटक्या कुत्र्यांचा हैदोस वाढला असून, त्याचा त्रास शालेय विद्यार्थी आणि महिलांना सहन करावा लागत आहे. या संदर्भात मागील वर्षापासून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. यंदा श्री संत गाडगेबाबा यांची १५० वी जयंती असून, या निमित्ताने तरी नगरपालिकेने या चौकातील मांस विक्रीची दुकाने हटवून चौकाच्या नावाची पवित्रता राखावी, अशी मागणी केली जात आहे.

या संदर्भात शुक्रवारी (१३ फेब्रुवारी) नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांसह नगराध्यक्ष हर्षल साबळे यांना निवेदन सादर करण्यात आले. चर्चेदरम्यान मुख्याधिकाऱ्यांनी घेतलेली गुळगुळीत भूमिका खपवून घेतली जाणार नाही, असे स्पष्ट मत संस्थेचे अध्यक्ष राहुल तिडके यांनी व्यक्त केले. तसेच, मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देत, गाडगेबाबा विचारप्रेमी मागे हटणार नाहीत, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी संत गाडगेबाबा स्मारक समितीचे कार्याध्यक्ष अरविंद तायडे, सचिव अनिल डहेलकर, माजी मुख्याध्यापक वानखडे , रितेश शेंदरकर यांच्यासह धोबी समाज बांधव व संत गाडगेबाबा विचारप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आज मार्गदर्शन सेमिनार** | लाभ घेण्याचे प्राचार्या डॉ. संगीता साने यांचे आवाहन

## डॉक्टर व परिचारिकांसाठी भारत आणि परदेशात रोजगार संधी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला : दि. १३:** आरोग्य क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या तरुण-तरुणींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. भारत आणि विदेशात डॉक्टर आणि नर्सेससाठी रोजगाराच्या संधी या विषयावर उद्या, शनिवार दि. १४ फेब्रुवारी रोजी दुपारी दोन वाजता अलायन्स कॉन्फरन्स सेंटर चर्च, अशोक वाटिकेजवळ याठिकाणी पुणे येथील बालरोगतज्ज्ञ डॉ. ललित पाटील यांच्या एका विशेष मोफत सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे. या सेमिनारसाठी प्रवेश विनामूल्य आहे, मात्र नाव नोंदणी आवश्यक आहे. या क्षेत्रातील वाढती मागणी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संधी पाहता, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या सेमिनारचा लाभ घ्यावा, असे आवाहन दयासागर सामाजिक व आरोग्य व बहुउद्देशीय संस्थेच्या प्राचार्या डॉ. संगीता साने यांनी केले आहे.या सेमिनारची वैशिष्ट्ये सांगताना डॉ. संगीता साने म्हणाल्या, की यामध्ये देशांतर्गत संधी अर्थात भारतातील नामांकित कॉर्पोरेट हॉस्पिटल्स आणि सरकारी क्षेत्रातील करिअरचे मार्ग यावर मार्गदर्शन करण्यात येईल तसेच



विदेशात करिअर करण्यासाठी यूके, कॅनडा, जर्मनी आणि आखाती देशांमध्ये नर्सेस आणि एमबीबीएस, बीएएमएस, बीपीटी डॉक्टरांसाठी असलेल्या विशेष संधी यावर सखोल मार्गदर्शन करण्यात येईल. त्याचसोबत यासाठी आवश्यक असलेली पात्रता आणि प्रक्रिया जसे परदेशात जाण्यासाठी आवश्यक असलेल्या परीक्षा आणि नोंदणी प्रक्रिया यांची सविस्तर माहिती देण्यात येईल. एवढेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळणारे मानधन आणि इतर सुविधांचा आढावा यावेळी घेण्यात येईल.

### जागतिक स्तरावर प्रगती करण्याची एक मोठी संधी!



> आरोग्य सेवा हे केवळ सेवा करण्याचे साधन नसून, जागतिक स्तरावर प्रगती करण्याची एक मोठी संधी आहे. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास आमचे विद्यार्थी जगभरात आपले नाव उज्ज्वल करू शकतात. म्हणूनच आम्ही या मोफत मार्गदर्शनाचे आयोजन केले आहे.
>
> **-प्राचार्या डॉ. संगीता साने**

विज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण घेत असलेले विद्याथी, नर्सिंगचा कोर्स करीत असलेले विद्याथी आणि नर्सिंग क्षेत्रात कार्यरत व्यक्ती, आपल्या पाल्याला रोजगारच्या उत्तम संधी मिळविण्याच्या शोधात असलेले पालक या मोफत सेमिनारचा लाभ घेवू शकतात, अशीही माहिती आयोजक डॉ. संगीता साने (मो. ९९२१९७९५११) आणि अनुप डेव्हीडसन (मो. ९३२५४ ४६४१४) यांनी दिली आहे.

## बार्शिटाकळीत मंदिरातील देवसाहित्याची चोरी

### नागरिकांच्या सतर्कतेमुळे चोरटा गजाआड

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बार्शिटाकळी : दि. १३:** येथील काळा मारोती चौक परिसरातील एका खासगी मंदिरातून पूजेचे साहित्य चोरून पळून जाणाऱ्या चोरट्याला नागरिकांनी धाडसाने पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. ही घटना आज, १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ९:३० वाजेच्या सुमारास घडली.

फिर्यादी नरेंद्र दत्तात्रय पोटेकर (वय ७६, रा. काळा मारोती चौक) हे सेवानिवृत्त असून त्यांच्या घरातच गोपाळ कृष्ण मंदिर आहे. या मंदिरात महादेवाची पिंड व पूजेचे साहित्य आहे. आज सकाळी एक अनोळखी इसम मंदिरातील साहित्य पिशवीत भरून पळून जात असताना स्थानिक रहिवासी गोपाळ रामदास जाधव यांच्या निदर्शनास आला.



संशयित इसम पळत असल्याचे पाहून गोपाळ जाधव यांनी तातडीने पाठलाग करून त्याला काळा मारोती चौकात पकडले. पिशवीची झडती घेतली असता, त्यात मंदिरातील जुना नंदादीप, तांब्याचे लोटे, पूजेचे ताट, पितळी घंटा, समई आणि निरांजने असे सुमारे ६,०५० रुपये किमतीचे एकूण १४ प्रकारचे साहित्य मिळून आले.

पकडलेल्या चोरट्याने आपले नाव राजू सीताराम पेनुकर (वय ५०, रा. गणेश पार्क, परळी, जि. बीड) असे सांगितले. नरेंद्र पोटेकर यांनी नागरिकांच्या मदतीने चोरट्याला बार्शिटाकळी पोलीस स्टेशनमध्ये हजर केले. याप्रकरणी पोलीस निरीक्षक प्रवीण धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी आरोपीविरुद्ध बीएनएस च्या कलम ३०५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. नागरिकांच्या सतर्कतेमुळे चोरीचा माल हस्तगत करण्यात यश आल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

## महत्त्वाचे

### जयभवानी मंडळाची शिवजयंती कार्यकारिणी गठीत

**खामगाव :** स्थानिक चांदमारी भागातील जय भवानी मंडळाची बैठक ज्येष्ठ पदाधिकारी महेंद्रसिंह ठाकुर यांच्या अध्यक्षतेखाली व आखाडा प्रमुख प्रितम माळवंदे, सुधाकर माने, पवन माळवंदे, श्याम माळवंदे, निलेश तासतोडे, किशोर लोखंडे, दत्ता सरोदे, गणेश गुजर, राजेश ठाकुर, रवि माळवंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच संपन्न झाली. यावेळी सर्वानुमते शिवजयंती उत्सव समितीची कार्यकारिणी गठीत करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष लकी गवळी, उपाध्यक्ष महादेव राक्षे, सचिव किष्णा कोरडे, कोषाध्यक्ष शंकर कडवकर, सहकोषाध्यक्ष वैभव यादे तर सदस्य अमोल खाडे, प्रशांत पुके, करण त्रिभुवन, चेतन मस्के, शुभम माळवंदे यांचा समावेश आहे. बैठकीला संदीप मस्तुद, श्रावण सातपुते, राम माळवंदे, भावेश शिंदे, रोहित जाधव, अलोक घुमरे, तुषार गुजर, रोहण गुजर, प्रेम खरात, साहिल गुजर, संकेत गुजर, समिर गुजर, गोंडु माळवंदे, शुभम गजानन गुजर, तासतोडे, सागर कांबळे, गणेश माळवंदे, राहुल माळवदे, अजय माळवंदे, सुनिल माळवंदे, पंकज पुरी, विनोद बोराखडे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### दोन दुचाकींची धडक;इसम जखमी

**खामगाव :** संग्रामपुर तालुक्यातील वरवट खंडेराव येथील रहिवासी दिपक वासुदेव शेंडे (५०) हे ११ फेब्रुवारी २६ रोजी दुपारी ५ वा.च्या सुमारास दुचाकी क्र. एमएच-२८-एडी १२२२ ने जात असतांना दुचाकी क्र. एमएच-५६-डी-१५३५ चा चालक सोपान रामचंद्र वानखडे रा. माटरगाव बु. याने दिपक शेंडे यांच्या दुचाकीला धडक दिली. यामध्ये दिपक शेंडे जखमी झाले. याप्रकरणी मंदा दिपक शेंडे यांनी जलंब पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये सोपान वानखडे याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

### युवकाची आत्महत्या



**साखरखेर्डा :** येथील एका युवकाने देवळाली येथील परिसरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी उघडकीस आली आहे. प्रताप विष्णू कोरडे वय ३४ असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव असून तो संभाजीनगरात वाळूज येथे एका पेट्रोलपंपावर कामाला होता. काल सकाळ पासून तो बेपत्ता होता दरम्यान देवळाली परिसरात एका चिंचेच्या झाडाला त्याचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत दिसून आला. आज दि १३ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेदहा वाजता साखरखेर्डा येथे त्याचेवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे आई वडील, तीन मुले, पती भाऊ बहीण असा परिवार आहे. दरम्यान संभाजीनगर येथे वाळूज पोलीस ठाण्यात मर्ग दाखल करण्यात आला असून आत्महत्येचे कारण मात्र कळू शकले नाही.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | - २०२५ - २०९६ |
| गहू | - २२५० - २८५० |
| तुर | - ५००० - ८३०० |
| हरभरा | - ५३०० - ५४५० |
| सोयाबीन | - ४१००- ६३७५ |
| उडीद | - ४००० - ६३५० |
| मुग | - ५५०० - ५५०० |
| मका | - १६०० - १६०० |

# जिल्हा परिषद विभागीय क्रीडा व सांस्कृतिक महाकुंभाचे उद्घाटन

## खेळाडूंच्या पथसंचलनातून सामाजिक संदेशांचा प्रभावी अविष्कार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.१३ :** स्थानीय जिल्हा क्रीडा संकुल येथे आजपासून सुरू झालेल्या तीन दिवसीय जिल्हा परिषद विभागीय क्रीडा व सांस्कृतिक महाकुंभाचा प्रारंभ उत्साहात झाला. पहिल्या दिवशी उद्घाटन समारंभात सहभागी खेळाडूंच्या पथकांनी मान्यवरांना मानवंदना देताना आकर्षक देखावे सादर केले.

सामाजिक आशय, लोकसंस्कृती आणि ऐतिहासिक वारसा यांचा संगम असलेल्या या पथसंचलनाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधले. अकोला, बुलढाणा, वाशिम, अमरावती आणि यवतमाळ या जिल्हा परिषदांमधील सुमारे १,१५० खेळाडूंनी पथसंचलनात सहभाग नोंदविला. अनुरूप वेशभूषा, रंगभूषा, संगीत आणि संवाद यांच्या माध्यमातून विविध सामाजिक विषयांवर सादरीकरण करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते उद्घाटन समारंभ पार पडला.

**लोककलांचा जागर :** अकोला जिल्हा परिषदेच्या चमूने कीर्तन, पोवाडा, भारुड, लावणी, कोळी नृत्य, वारली नृत्य, वाघ्या-मुरळी आदी महाराष्ट्रातील वैविध्यपूर्ण लोककलांचे सादरीकरण करत लोकसंस्कृतीशी असलेली नाळ अधोरेखित केली.

**मराठी भाषेचे संवर्धन :** बुलढाणा जिल्हा परिषदेच्या पथकाने मराठी भाषेला मिळालेल्या अभिजात दर्जाबद्दल शासनाचे आभार मानत मराठी साहित्या-संस्कृतीचे जतन आणि मराठी शाळांची आवश्यकता यावर प्रभावी देखावा सादर केला.

**वारकरी परंपरेचा गौरव :** अमरावती जिल्हा परिषदेने संत गजानन महाराजांच्या शेगावीची वारी या संकल्पनेवर आधारित देखावा सादर केला. अन्नछत्र, यात्रेकरू निवास, सेवाधारी वृत्ती, स्वच्छता आणि स्वयंशिस्त यांसारख्या मूल्यांचे दर्शन घडविणाऱ्या या सादरीकरणाने मंचावरील मान्यवरांसह उपस्थितांना भावूक केले.

**ऐतिहासिक अभिमान :** वाशिम जिल्हा परिषदेच्या चमूने छत्रपती संभाजी महाराज व कवी कलश यांच्यातील संवाद, त्याग आणि बलिदान यांवर आधारित ज्वलंत ऐतिहासिक देखावा सादर करत मराठी स्वाभिमानाची आठवण करून दिली.

**मानवतेचा संदेश :** यवतमाळ जिल्हा परिषदेच्या पथकाने सामाजिक विषमतेचे विदारक वास्तव मांडत संत गाडगेबाबांच्या "भुकेल्याला अन्न द्या" या संदेशाचा हृदयस्पर्शी आविष्कार केला. या सादरीकरणाने अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. पाचही जिल्ह्यांच्या संघांनी सादर केलेल्या सामाजिक संदेशप्रधान देखाव्यांमुळे उद्घाटन समारंभातील पथसंचलन आकर्षक, आशयघन आणि संस्मरणीय ठरले. महाकुंभाच्या पुढील

# मुंबई पोलीस दलातील पतीसह सासरच्या ८ जणांवर गुन्हा

## लोणारमध्ये २५ वर्षीय विवाहितेची तक्रार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि. १३ :** मानसिक-अन्याय झाला तर न्यायासाठी पोलीसांकडे धाव घेतली जाते. मात्र, शारीरिक छळ व छेडखानीचे गंभीर आरोप पोलिसांकडूनच अन्याय झाल्यास दाद कुणाकडे मागावी, असा प्रश्न उपस्थित होतो. असाच धक्कादायक प्रकार लोणार येथे उघडकीस आला आहे.

लग्नानंतर सुखी संसाराचे स्वप्न घेऊन सासरी गेलेल्या २५ वर्षीय विवाहितेचा हुंड्यासाठी छळ करण्यात आल्याचा आरोप आहे. मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेल्या पतीसह सासरच्या मंडळींनी पाच लाख रुपयांच्या मागणीसाठी तिला मानसिक व शारीरिक त्रास दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी लोणार पोलीस ठाण्यात पतीसह सासरच्या आठ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तालुक्यात खळबळ उडाली आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी प्रीती नितीन चव्हाण (२५) हिचे लग्न लोणार येथील रहिवासी व सध्या मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेल्या नितीन इंद्रजीत चव्हाण यांच्याशी झाले. सुरुवातीला चांगली वागणूक मिळाली; मात्र काही काळानंतर हुंड्याची मागणी करत मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचा आरोप आहे.

याशिवाय, देवर निलेश इंद्रजीत चव्हाण याने संशयातून वाईट उद्देशाने हात धरून छेडखानी केल्याचा आरोपही प्रीतीने बुलढाणा येथील महिला तक्रार निवारण कक्षात केला होता. त्या कक्षाकडून प्राप्त पत्राच्या आधारे लोणार पोलिसांनी पती, सासू-सासरे, देवर व इतर नातेवाइकांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलमांनुसार गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार संजय जाधव करीत आहेत.

# कृष्णाई लांजुळकर यांच्या हरिकीर्तनाचे आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.१३ :** श्री काशी विश्वनाथ महादेव मंदिर, गौरक्षणच्या पाठीमागे घाटपुरी रोड, विश्वनाथ नगर येथे रविवारी दि.१५ फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य महाशिवरात्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांनी हा महोत्सव भक्तिमय वातावरणात साजरा होणार आहे.

महोत्सवाची सुरुवात सकाळी ब्रह्ममुहूर्तावर शिवलिंग अभिषेकाने होईल. त्यानंतर शिवलीलामृत पारायणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. माऊली महिला मंडळाच्या वतीने भावपूर्ण भजन सादर करण्यात येणार असून, परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण होणार आहे. यावर्षी महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे खामगाव नगरीमध्ये प्रथमच बाल कीर्तनकार ह.भ.प. कृष्णाई लांजुळकर (देवरी, ता. अकोट, जि. अकोला) यांचे भव्य हरिकीर्तन होय. हा कार्यक्रम सायंकाळी ठीक ५.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. त्यांच्या ओजस्वी व प्रभावी कीर्तनातून उपस्थित भाविकांना आध्यात्मिक संदेश व भक्तिरसाचा लाभ मिळणार आहे. हरिकीर्तनानंतर उपस्थितांसाठी फराळाची व्यवस्था करण्यात आली आहे. या पवित्र सोहळ्यास पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हरिकीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. श्री गुरुदेव सेवा मंडळ, बाल गणेश विश्वनाथ मंडळ तसेच महिला मंडळ यांच्या वतीने सर्वांनी उपस्थिती दर्शवून महोत्सवाची शोभा वाढवावी, असे नम्र आवाहन करण्यात आले आहे.

# व्हिडिओ कॉन्फरन्सिंग कक्षाचे उद्घाटन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.१३ :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा येथे आज दुपारी २.०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग कक्षाचे उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. आर. एन. रोकडे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलढाणा यांच्या अध्यक्षतेखाली निलेश तांबे, पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्या हस्ते कक्षाचे उद्घाटन करण्यात आले.

या नव्या सुविधेमुळे कारागृहात बंदिस्त असलेल्या बंद्यांशी तसेच तालुकास्तरीय न्यायालयात उपस्थित असलेल्या साक्षीदारांची साक्ष थेट न्यायालयात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे नोंदविणे शक्य होणार आहे. त्यामुळे न्यायप्रक्रियेला गती मिळून वेळ व खर्चाची बचत होण्यास मदत होणार आहे. सदर कार्यक्रमास किरण पाटील, जिल्हाधिकारी, बुलढाणा, विजय सावळे, अध्यक्ष, वकिल संघ, बुलढाणा, मा. सर्व न्यायाधीश, डॉ. लता बाहेकर, विधीज्ञ तसेच न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी नितीन एन. पाटील, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अ.भा. किसान सभेची कामगारांच्या मागण्यांसाठी निदर्शने

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१३ :** कामगारांच्या विविध मागण्यांसाठी राष्ट्रीय स्तरावरील प्रमुख कामगार संघटना व शेतकरी संघटना यांच्या वतीने काल १२ फेब्रुवारी २६ रोजी देशव्यापी औद्योगीक संप व ग्रामीण भारत बंदची हाक देण्यात आली होती.

या आंदोलनाला अखिल भारतीय किसान सभा बुलढाणा जिल्हा कमिटीच्या वतीने जाहीर पाठींबा दिला होता व उपविभागीय अधिकारी (महसुल) कार्यालयासमोर निदर्शन करण्यात आली. तसेच विदेशी कापुस व धान्य जाळुन कामगार व शेतकरी विरोधी कायद्यांचा निषेध करण्यात आला. तसेच महामहिम राष्ट्रपती यांना उपविभागीय अधिकारी (महसुल) यांच्या मार्फत मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी कॉ. शैलेष तायडे, कॉ. एन. वाय. देशमुख, कॉ. विप्लव कविश्वर, कॉ. रमेश अजेडीवाल, कॉ. वाय. एम. वानखडे, कॉ. एस.ए. जाधव, कॉ. दगडु मोरे, कॉ. जितेंद्रकुमार चोपडे, कॉ. महेश वाकदकर, कॉ. आदित्य इंद्रावते आदी उपस्थित होते.

# श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१३ :** तालुक्यातील पिंप्री गवळी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहास भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला आहे. सोमवार दि. ९ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या धार्मिक सोहळ्याचे यंदाचे १६ वे वर्ष असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या निमित्ताने भाविकांना हभप अनिल महाराज गोंदीकर यांच्या रसाळ वाणीतून श्रीमद् भागवत कथेचा लाभ मिळत आहे. त्यांच्या ओजस्वी निरूपणामुळे भाविक मंत्रमुग्ध होत असून दररोज मोठ्या संख्येने उपस्थित राहून कथा श्रवणाचा आनंद घेत आहेत. तसेच हभप ज्ञानेश्वर महाराज खोंड यांच्या प्रेरणेने सप्ताहात दररोज श्रीहरी कीर्तनाचे दणदणीत कार्यक्रम पार पडत आहेत. कीर्तनसेवेत हभप शाम महाराज डाकोरकर, हभप रेवननाथ महाराज चव्हाण, हभप संजय महाराज फत्तेपूरकर आणि हभप तुकाराम महाराज मेहूणकर यांचा सहभाग लाभला आहे. पंचक्रोशीतील टेंभूर्णा, आवार, गव्हाण, वरुड, कोलोरी, जवळा, पिंप्राळा, हिंगणा कारेगाव तसेच पिंप्री गवळी येथील टाळकरी मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. टाळ-मृदंगाच्या गजरात गावात भक्तिरसाची उधळण होत आहे. सोमवारी सांगता सोमवार दि. १६ फेब्रुवारी रोजी सप्ताहाची सांगता होणार असून यानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच दिवशी पताकांसह श्रीमद् भागवत ग्रंथाची गावातून भव्य दिंडी काढण्यात येणार आहे. हरिपाठ, काकडा व इतर धार्मिक कार्यक्रमांची जबाबदारी स्थानिक मंडळाने स्वीकारली असून ग्रामस्थांच्या सहकार्याने सप्ताह उत्साहात पार पडत आहे.

# वीर परिवार सहायता योजनाअंतर्गत प्रशिक्षण व मार्गदर्शन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.१३ :** जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथील प्रशिक्षण केंद्रात आज सकाळी ११.०० वाजता वीर परिवार सहायता योजना अंतर्गत 'अधिकार मित्र' यांचे प्रशिक्षण तसेच माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांसाठी मार्गदर्शन शिबीर उत्साहात पार पडले.सदर कार्यक्रम एन. एन. पाटील, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा आणि स्कवॉडर्न लीडर रुपाली सरोदे, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलढाणा यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात उपस्थितांना वीर परिवार सहायता योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली. याप्रसंगी मा. एन. एन. पाटील, स्कवॉडर्न लीडर रुपाली सरोदे, ॲड. राहुल दाभाडे आणि ॲड. संजय इंगळे यांनी उपस्थितांना विविध कायदेशीर बाबींविषयी मार्गदर्शन केले. शिबिरात माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांच्या हक्क, योजना लाभ प्रक्रिया आणि कायदेशीर सहाय्य याबाबत उपयुक्त माहिती देण्यात आली. कार्यक्रमास माजी सैनिक, त्यांच्या कुटुंबियांसह संबंधित अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरामुळे लाभार्थ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

**मागणी** | ऐतिहासिक निर्णयाने कलाल समाजात जल्लोष

# संत सावजी महाराजांच्या नावावरील जागेची अधिकृत मोजणी पूर्ण

अंजिक्य भारत / प्रतिनिधी



**शेगाव दि.१३:** श्री क्षेत्र पंढरपूर येथे आज कलाल समाजासाठी अत्यंत अभिमानाचा व ऐतिहासिक क्षण ठरला. कलाल समाजाचे आराध्य दैवत श्री संत सावजी महाराज यांच्या नावावर असलेल्या सुमारे ८ ते १० हजार चौरस फूट जागेची अधिकृत मोजणी सर्व प्रशासकीय अधिकारी व पोलिस बंदोबस्तात पार पडली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली ही प्रक्रिया आज पूर्ण होत जागा कायमस्वरूपी महाराजांच्या नावावर निश्चित करण्यात आली.

या कार्यासाठी सावजी महाराजांच्या वारसदारांनी दीर्घकाळ सातत्याने प्रयत्न केले होते. विशेषतः काकपुरे महाराज व रामभाऊ धामंदे यांनी या प्रकरणाचा सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून समाजात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सुमारे महिनाभरापूर्वी काकपुरे महाराज व रामभाऊ धामंदे यांनी अखिल भारतीय साव कलाल समाज समितीचे केंद्रीय अध्यक्ष सुनील खराटे यांची भेट घेऊन जागेच्या प्रश्नाबाबत सविस्तर माहिती दिली व सहकार्याची विनंती केली. त्यावेळी केंद्रीय सचिव सुनील राऊत तसेच प्रसिद्धी प्रमुख सुरेंद्र जयस्वाल उपस्थित होते. समाजकार्याला तत्पर असलेले केंद्रीय अध्यक्ष सुनील खराटे यांनी तात्काळ संबंधित शासकीय यंत्रणांशी संपर्क साधून प्रकरणाची माहिती घेतली. त्यांनी महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री मा. ना. चंद्रशेखर बावणकुळे यांची भेट घेऊन या कामासंदर्भात मान्यता मिळवली. मंत्री बावणकुळे यांनी स्वतः सोलापूर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच पोलिस प्रशासनाला दूरध्वनीद्वारे तातडीने व नियमानुसार मोजणी करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने दि.११-०२-२०२६ रोजी संबंधित अधिकारी प्रत्यक्ष स्थळी उपस्थित राहून मोजणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. केंद्रीय अध्यक्ष सुनील खराटे स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून संपूर्ण प्रक्रियेत पुढाकार घेतला. त्यांच्या सोबत केंद्रीय सचिव सुनील राऊत व प्रसिद्धी प्रमुख सुरेंद्र जयस्वाल उपस्थित होते. काही ठिकाणी अतिक्रमणाची शक्यता व गुंड प्रवृत्तींची माहिती असतानाही समाजहितासाठी ठामपणे उभे राहण्याचे धैर्य दाखविल्याबद्दल सुनील खराटे यांचे समाजात विशेष कौतुक होत आहे. यावेळी बोलताना सुनील खराटे म्हणाले, "ही केवळ सुरुवात आहे. संत सावजी महाराजांचे भव्य स्मारक मंदिर आणि भक्तनिवास उभारण्याचे कार्यही आम्ही लवकरच पूर्णत्वास नेऊ." संत सावजी महाराजांच्या सर्व नातेवाईकांसह केंद्रीय समितीचे पदाधिकारी उपस्थित राहिल्याने हा सोहळा अधिक ऐतिहासिक ठरला. आजचा दिवस कलाल समाजाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवला जाईल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# राजस्व मंडळ पेठ अंतर्गत मंगरुळ नवघरे येथे महाराजस्व शिबिराचे यशस्वी आयोजन

अंजिक्य भारत / प्रतिनिधी




**मंगरूळ नवघरे दि.१३ :** महसूल विभागाचे दि.१ सप्टेंबरचे शासन निर्णय व मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचे दि.११ सप्टेंबर २०२५ चे निर्देशानुसार व मा तहसीलदार श्री विजय सवडे यांचे सुचनेनुसार राजस्व मंडळ पेठ अंतर्गत मंगरुळ नवघरे येथे गजानन महाराज मंदिराजवळ छशिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आज दि.१३ फेब्रुवारी २०२६रोजी यशस्वी आयोजन करण्यात आले. तहसीलदार विजय सवडे यांचे अध्यक्षतेखाली सदर शिबीराचे नियोजन करण्यात आले.

सदर शिबीरामध्ये महसूल विभागामार्फत विविध प्रकारचे प्रमाणपत्र वाटप, सातबारा वाटप करण्यात आले तर आरोग्य विभागामार्फत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले कृषी विभागामार्फत पी एम किसान व कृषी विभागाचे विविध योजना बाबत वितरण करण्यात आले. भूमि अभिलेख विभागामार्फत सनदीची वाटप करण्यात आले. या शिबिराला विजय सवडे तहसीलदार, नायब तहसीलदार कडू, गटविकास अधिकारी गजानन पोफळे, मंडळ अधिकारी शेळके, सरपंच नलिनी जाधव. पेठ मंडळ अंतर्गत तलाठी अर्चना बाहेकर, रजनी देशमुख, राहुल जाधव, सुनील साबळे, जयश्री सोळंके, कोतवाल गजानन अंभोरे, आरोग्य विभागडॉक्टर सायली लोखंडे, राजेश खेडेकर, साजरे ग्रामसेवा सहकारी सोसायटी भास्कर धमक, सभापती सुधाकर नाना धमक, शाळा अध्यक्ष रामेश्वर धमक, नारायण अंभोरे, माजी सरपंच अफसर खान पठाण, गणेशराव अंभोरे, ग्रामपंचायत अधिकारी सचिन रिंडे, नंदकिशोर इंगळे, ग्रामपंचायत अधिकारी महिमळ ग्रामपंचायत सदस्य सदानंद दमकनंदू अंभोरे तसेच तसेच कृषी विभाग मधून अर्चना वाकोडे, बळी मॅडम ,अमोल मोरे, गावातील सेतू चालक सचिन मगर, राजू जोरवार, जिल्हा परिषद केंद्रीय मराठी प्राथमिक शाळा केंद्रप्रमुख रामदास भगत, मुख्याध्यापक अमोल अंभोरे, दिनेश पवार, मुरकुटे सर, जाधव सर, तावरे सर पोलीस पाटील श्याम धमक, प्रतिष्ठित मंडळी नितीन तांबट,श्याम वाकडे,अशोक तांबट हजर होते.

अजिंक्य भारत •
# आपलं खामगांव
खामगाव,शनिवार, दि.१४,फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com


**महत्त्वाचे**

## दुचाकी अपघातात विवाहितेचा मृत्यू

**खामगाव :** रस्त्यावर दुचाकीवरून पडून गंभीर जखमी झालेल्या ३० वर्षीय विवाहितेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पिंपळगाव राजा पोलीस ठाण्यात कलम १९४ अंतर्गत नोंद करण्यात आली आहे. मृत महिलेचे नाव सौ. सुरेखा लखन लुंगातार (३०) रा. भंडारी, खामगाव असे आहे. पोलीस सूत्रांनुसार, दि. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.१५ वाजताच्या सुमारास खामगाव ते तरवाडी रस्त्यावर दुचाकीवरून पडल्याने त्या गंभीर जखमी झाल्या होत्याा. अपघातानंतर नातेवाइकांनी त्यांना तातडीने विदर्भ हॉस्पिटल, अकोला येथे सायंकाळी ४.३० वाजता दाखल केले. मात्र उपचार सुरू असतानाच त्याच दिवशी रात्री ११.१५ वाजता त्यांचा मृत्यू झाला. रुग्णालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रारंभी अकोला खदान पोलीस ठाण्यात मर्ग नोंदविण्यात आला होता. त्याानंतर मर्ग खबर, डेथ समरी, मृत्यू अहवाल, पंचनामा आदी आवश्यक कागदपत्रांसह हे प्रकरण पुढील कारवाईसाठी पिंपळगाव राजा पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आले आहे.

## मधोमध हातगाडी लावल्याप्रकरणी गुन्हा

**खामगाव :** खामगाव शहरात रस्त्याच्या मधोमध हातगाडी उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध खाम गाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम १२५ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणात फिर्यादी म्हणून पोलीस कॉन्स्टेबल रमेश काकड यांनी तक्रार दिली आहे. आरोपी म्हणून कृष्णा राजेश महाशस्दे (२३) रा. चांदमारी, खामगाव, जि. बुलढाणा याचे नाव नमूद करण्यात आले आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १२ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता गांधी बगीचा परिसरात आरोपीने आपल्या ताब्यातील वडापावची हातगाडी ही रस्त्याच्या मधोमध उभी केली होती. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता होती तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. याबाबतची तक्रार रात्री ९ वाजता नोंदविण्यात आली. फिर्यादीच्या अहवालावरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्ह्याची नोंद पो. हे.कॉ. शफाकत कुरेशी यांनी केली आहे. पुढील तपास पो.हे.कॉ. सुनील सोळंके करीत असून, प्रकरणात ई-साक्ष नोंदविण्यात आली आहे.

## महाशिवरात्रीनिमित्त १२ शिव ज्योतिर्लिंग देखावा

**खामगाव :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त शहरात आध्यात्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालय यांच्या वतीने ''शिवालय'' शिव मंदिर, मातोश्री पार्क परिसरात १३ ते १६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान सायं. ५ ते रात्री ९ या वेळेत भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन १३ फेब्रुवारी रोजी सायं. ६ वाजता नगराध्यक्ष अपर्णाताई फुंडकर यांच्या हस्ते होणार आहे. सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे भारतातील १२ ज्योतिर्लिंगांची भव्य झांकी. यात सोमनाथ मंदिर, काशी विश्वनाथ मंदिर, केदारनाथ मंदिर, त्र्यंबकेश्वर मंदिर आदी ज्योतिर्लिंगांचा समावेश आहे. याशिवाय राजयोग ध्यानसत्रे, ''विश्व नवनिर्माण'' या संकल्पनेवरील चित्रप्रदर्शनी व शिवज्ञान जागृतीपर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. शांत व सात्विक वातावरणात नागरिकांना ध्यान-भक्तीचा अनुभव घेता येणार आहे. सेवा केंद्र संचालिका शकुंतला दीदी यांनी सर्वांनी कुटुंबासह उपस्थित राहून या आध्यात्मिक पर्वाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## राष्ट्रभाषा वाचनालयात निबंध स्पर्धा

**खामगाव:** राष्ट्रभाषा वाचनालयाच्या वतीने मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त ज्येष्ठ नागरिकांचे आनंदी जीवन या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत किमान ३०० शब्दात निबंध २३ फ ब्रुवारीपर्यंत राष्ट्रभाषा पुस्तकालय कार्यालय देवजी खिमजी मंगल कार्यालय येथे पाठवावे.

# विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात; खामगाव न. प. पहिल्या सभेत महत्वपूर्ण निर्णय

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.१२:** शहराच्या सर्वांगीण विकासाचा रोडमॅप निश्चित करणारी खामगाव नगर परिषदेची नूतन कार्यकाळातील पहिली सर्वसाधारण सभा मंगळवारी उत्साही व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. विविध विकासकामांच्या महत्त्वपूर्ण प्रस्तावांना या सभेत मंजुरी देण्यात आली असून, आगामी काळात शहरात विकासरथाची घोडदौड अधिक वेगाने सुरू राहणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा अपर्णा फुंडकर विराजमान होत्या.

प्रारंभी बांधकाम सभापती सतीष दुडे यांनी माजी उपमुख्यमंत्री स्व. अजिता पवार यांना श्रद्धांजली अर्पण करत शोकप्रस्ताव मांडला. सभागृहात उपस्थित सर्व सदस्यांनी दोन मि निटे मौन पाळून त्यांना आदरांजली वाहिली. यावेळी उपाध्यक्ष, विविध विषय समित्यांचे सभापती, नगरसेवक तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीला नगराध्यक्षा अपर्णा फुंडकर यांनी नवनिर्वाचित सदस्यांचे स्वागत करून शहराच्या प्रगतीसाठी सर्वांनी पक्षभेद बाजूला ठेवून एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले. ''नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे,'' असे त्या म्हणाल्या. सभेत शहरातील रस्त्यांची दुरुस्ती, नूतनीकरण व डांबरीकरण, पाणीपुरवठा योजनेत सुधारणा, ड्रेनेज लाईनचे मजबुतीकरण, स्वच्छता व्यवस्थेचे बळकटीकरण, सार्वजनिक उद्याने व मैदाने विकसित करणे तसेच इतर नागरी सुविधांशी संबंधित विविध प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बहुतांश विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले. काही प्रस्तावांवर सदस्यांनी सूचना व हरकती नोंदविल्या असता, त्या सकारात्मक दृष्टीने स्वीकारून प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. बांधकाम सभापती सतीषआप्पा दुडे यांनी आगामी काळात दर्जेदार व टिकाऊ विकासकामांवर विशेष भर दिला जाईल, असे स्पष्ट केले. ''कामांची गुणवत्ता अबाधित ठेवत नियोजित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्याचा आमचा प्रयत असेल,'' असे त्याांनी सांगितले. पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना राबविण्याबाबतही सभेत सकारात्मक चर्चा झाली. एकूणच, नूतन कार्यकाळातील पहिल्याच सभेत विकासाभिम ुख निर्णय घेतल्यामुळे शहरवासीयांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. सर्व पदाधिकारी व नगरसेवक एकदिलाने शहराच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे चित्र या सभेत दिसून आले. नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देत खामगावचा विकास वेगाने साध्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# प्रधानमंत्री आवास योजनेतील हप्ता विलंब

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**रायपूर दि. १३:** तीव्र आंदोलन व प्रशासन स्पष्टीकरण रायपूर, दि. १३ फेब्रुवारी २०२६: प्रधानमंत्री आवास योजनेच्या रोहित हप्त्यासाठी रायपूर शहर व ग्रामीण भागात तीव्र आंदोलने तापली असून, बुलढाणा पंचायत समितीने स्पष्टीकरण दिले आहे. लाभार्थ्यांच्या घरकाम रखडल्याने शेकडो कुटुंबे आर्थिक संकटात सापडली आहेत, ज्यामुळे प्रशासनावर दबाव वाढला आहे. रायपूर शहरातील रस्ता रोकोरायपूर शहरातील लाभार्थ्यांनी आज प्रमुख रस्त्यांवर रस्ता रोको करून वाहतूक ठप्प केली.

५ फेब्रुवारीच्या पूर्वीच्या आंदोलनाला पाठपुरावा देत त्यांनी ''उर्वरित हप्ता तात्काळ द्या, प्रशासन हतबल होईपर्यंत लढा'' अशा घोषणा दिल्या यात शमीम सौदागर, निलेश राजपूत,अबदूल अबूलेस.इतर गाम्रसथ होते.जिल्हा प्रशासनाला देऊन २४ तासांत हप्ते जमा करण्याचा अल्टिम ेटम देण्यात आला, ज्यामुळे शहरात वाहतुकीचा प्रचंड त्रास झाला व पोलिसांना कडक बंदोबस्त ठेवावा लागला.बुलढाणा रायपूर ग्रामपंचायतीचा प्रकारबुलढाणा पंचायत समितीने जारी केलेल्या पत्रानुसार, रायपूर गावातील ६४७ मंजूर घरकुलांसाठी अधिकाऱ्यांच्या बदल्यांमुळे विलंब झाला होता. १० फेब्रुवारीला नवीन अधिकाऱ्यांनी ॲक्टिव्ह करून ऑनलाइन हप्ता वर्गणूक सुरू केली असल्याचे स्पष्ट केले. मात्र, ५ फेब्रुवारीला शमीम सौदागर, निलेश राजपूत, जाबीर शबीर व इ. लाभार्थ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना अर्ज देऊन ७ दिवसांत (१२ फ ेब्रुवारीपर्यंत) हप्ता न मिळाल्यास रायपूर-बुलढाणा महामार्गावर रस्ता रोकोचा इशारा दिला होता. लाभार्थ्यांची व्यथा व पार्श्वभूमी अंतर्गत चार हप्त्यांत (किंवा ग्रामीणमध्ये तीन: पूर्व, मध्य, अंतिम) रक्कम मिळते, पण रोहित हप्ता (दुसरा/तिसरा, रखडल्याने घरकाम ७०%वर थांबले आहे. अनेक कुटुंबे भाड्याच्या २ हजार रुपयांच्या खोल्यात किंवा छावणीत राहत असून, मजुरी करूनही शिलाई-छतासाठी पैसे जुटवत नाहीत. त्यामुळे मुलांच्या शिक्षण व आरोग्यावर परिणाम होत असल्याचे लाभार्थी सांगतात.प्रशासनाची स्थिती व अपेक्षा जिल्हा प्रशासनाने अद्याप अधिकृत निवेदन दिलेले नाही, पण उच्च अधिकाऱ्यांशी चर्चेची शक्यता आहे. केंद्र-राज्य निधी उपलब्ध असला तरी आधार लिंकिंग, तांत्रिक अडचणी व बदलींमुळे विलंब होत असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. लाभार्थी आता कलेक्टर कार्यालय धरणे बसण्याचा विचार करीत असून, ग्रामपंचायत सरपंचांनी केंद्रापर्यंत प्रकरण नेण्याचे आश्वासन दिले आहे. अशा विलंबामुळे बुलढाणा-सारख्या जिल्ह्यांत तक्रारी वाढल्या असून, कायदा-सुव्यवस्था बिघडण्याची भीती आहे.

# विद्यार्थ्यांच्या नवीन मॉडेल्स आणि प्रोजेक्ट्सने केले प्रभावित



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१३:** बुलढाणा येथील हाजी सय्यद उस्मान डोंगरे नगरपरिषद उर्दू शाळा क्रमांक २, मिर्जा नगर येथे विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन अतिशय उत्साहाने आणि यशस्वीरित्या करण्यात आले. या प्रदर्शनीचे उद्घाटन वंदना टाकळकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी ओमकार जाधव, मुख्याध्यापक मो.अजीम, शेख छोटू इतर मान्यवर उपस्थित होते. इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रातील मॉडेल्स आणि प्रोजेक्ट्स तयार करून सादर केले. यामध्ये पर्यावरण संरक्षण, ऊर्जा संकल्पना, विज्ञानातील प्रयोग, रोबोटिक्स, सौरऊर्जा, पाणी शुद्धीकरण यांसारख्या विषयांवरील मॉडेल्सचे सादरीकरण खूपच आकर्षक होते. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या मॉडेल्सचे स्पष्टीकरण आणि प्रयोग दाखवून उपस्थितांना प्रभावित केले.

# छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान शिबिर उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**सिंदखेड राजा दि.१३ :** जिल्हाधिकारी किरण पाटील साहेब यांचे सूचनेनुसार व संजयजी खडसे उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा आणि अजित दिवटे तहसीलदार सिंदखेड राजा यांचे मार्गदर्शनाखाली सदर शिबिर संपन्न झाले सदर कार्यक्रमाच्या ृध्यक्षस्थानी सरपंच श्रीमती वनिता सोळंके होत्या प्रमुख उपस्थितीमध्ये श्रीमती प्रांजल पवार ना. तहसीलदार व इतर विभागाचे विभाग प्रतिनिधी उपस्थित होते.

शिबिरात वारस नोंदी, निराधार अनुदान योजनेचे पूर्णत्व प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र उत्पन्न दाखले राशन कार्ड लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले. शिबिराचे निमित्त तहसील कार्यालय सिंदखेडराजा-चे विविध विभागाचे प्रतिनिधी म्हणून श्री नागरे, रोकडे,श्रीमती. बारवाल श्रीमती पडघान श्रीमती चिपडे श्रीमती वाघ श्रीमती जायभाये, हजर हो-



ते. आरोग्य विभागाचे प्रवीण शिंदे कृषी विभागाचे रमेश झोरे सेतु संचालक वानखेडे, मयूर देशमुख, प्रमोद सोळंके, सतिश सोळंके उपस्थित होते. शिबिरासाठी सुनील टेकाळे मंडळ अधिकारी सिंदख-ेडराजा ग्राम महसूल अधिकारी जी.वाय. दराडे एम. ए. उदार,के.एल. खरात,ओ ए गव्हाणकर, राहुल देशमुख, संगीता निकस महसूल सेवक पांडुरंग सुरुशे, संतोष पवार, शरद दराडे हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश लिहीणार व डोंगरसिंग मेहेर यांनी केले.

# खामगावतील गुरुवारचा आठवडी बाजार पुढे ढकलला

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.१३ :** खामगाव शहरात दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होणार असल्याने त्या दिवशी भरविण्यात येणारा गुरुवारचा आठवडी बाजार रद्द करून पुढील दिवशी भरविण्याचे आदेश जिल्हादंडाधिकाऱ्यांनी जारी केले आहेत.

पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांनी संदर्भीय पत्राद्वारे कळविले होते की, जयंतीनिमित्त शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून मोठ्या प्रमाणावर नागरिक सहभागी होतात. त्याच दिवशी आठवडी बाजार भरत असल्याने वाहतुकीची कोंडी होण्याची तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या पार्श्वभूमीवर बाजार आणि यात्रा कायदा, १८६२ च्या कलम ५ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्हादंडाधिकाऱ्यांनी १९ फेब्रुवारीचा आठवडी बाजार रद्द करून तो पुढील दिवशी भरविण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# शेतकऱ्यांचा तहसील कार्यालय समोर विमा न मिळाल्याने आक्रोश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.१३:** लाजुड येथील शेतकऱ्यांनी खरीप हंगाम २०२४ मध्ये सोयाबीन कपाशी तूर पिकाची लागवड केल्यानंतर या पिकांचा विमा देखील त्यांनी काढला होता. तीस ते पन्नास टक्के येथील शेतकऱ्यांना विमा खात्यात जमा झाला असून ७० टक्के शेतकरी या विमा पासून वंचित आहेत.

याच शेतकऱ्यांनी ट्रिगर द्वारे तक्रार नोंदवली प्रतिनिधी प्रत्यक्ष पाहणी करून गेले त्यानंतर प्रतिनिधींना फोन केल्यानंतर नुकसान शून्य टक्के असल्याने त्यांनी शेतकरी अपात्र ठरविले तसेच त्याच गटातील अन्य शेतकरी पात्र ठरविले अशी विमा प्रतिनिधी विरुद्ध तक्रार आहे. तसेच ऑक्टोबर महिन्यात पाच-सहा दिवस शेतात पडलेला पावसाने नुकसान झाले आहे. असून एका शिवारातील एकाच गटातील शेतकऱ्याल्या विमा मिळतो आणि त्याच गटातील वंचित राहतो तक्रार करणारा शेतकरी एकच मोबाईल नंबर एकच गट नंबर एकच असे असतानाही विम्या पासून वंचित का? अशी तक्रार लाजुड येथील शेतकऱ्यांनी तहसील कार्यालय येथे केली आहे तसेच हे निवेदन जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालय आयुक्त कार्यालय पुणे आमदार आकाश फुंडकर यांना निवेदनाद्वारे तक्रार देण्यात आली . तसेच दहा ते पंधरा दिवसात पिक विमा न मिळाल्यास लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्याचे लांजुड येथील ग्रामस्थांनी निवेदन द्वारे दिले आहे.

# पोलीस इन्स्पेक्टरचा छापा; ग्रामविकास अधिकाऱ्याकडे मागितली लाच?

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेंदुर्जन दि.१३:** आज दिनांक १३ फेब्रुवारी रोजी शेंदुर्जन गावातील आठवडी बाजाराच्या दिवशी एका पोलीस इन्स्पेक्टरने थेट ग्रामपंचायत कार्यालयावर अकस्मित धाड टाकली. या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आणि कामासाठी आलेले नागरिक पुरते चक्रावून गेले. मात्र, थोड्याच वेळात या धाडीमागचे धक्कादायक आणि रंजक वास्तव समोर आले.

नेमका प्रकार काय?

ग्रामपंचायत कार्यालयात शिरलेल्या या पोलीस इन्स्पेक्टरने ग्रामविकास अधिकारी प्रकाश आढाव यांना थेट लक्ष्य केले. ''तुमचा भ्रष्टाचार खूप मोठा आहे, हा भ्रष्टाचार दाबण्यासाठी आम्हाला काही पैसे द्या,'' अशी रोखठोक मागणी या इन्स्पेक्टरने केली. या अनपेक्षित मागणीमुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामविकास भ्रष्टाचाराच्या आरोपाला न घाबरता ग्रामविकास अधिकारी प्रकाश आढाव यांनी अत्यंत संयमाने आणि धाडसाने उत्तर दिले. ते म्हणाले, ''आमचा भ्रष्टाचार दाबू नका, तुम्हाला जे काय करायचे आहे ते करा!'' अधिकाऱ्यांच्या या भूमिकेनंतर या इन्स्पेक्टरचे खरे रूप समोर आले. तो अधिकारी कोणताही सरकारी पोलीस नसून, तो पोलीस वेशातील एक बहुरूपी कलाकार होता! कलेच्या माध्यमातून समाज प्रबोधन आपल्या कलेचे सादरीकरण केल्यानंतर या कलावंताला ग्रामपंचायतीकडून वर्गणी देण्यात आली. मात्र, या घटनेने एका महत्वाच्या प्रश्नाकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. अशा कलाकारांकडे केवळ भिकारी किंवा वर्गणीदार म्हणून न पाहता, समाज प्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम म्हणून पाहिले जावे, अशी मागणी आता जोर धरत आहे. लोककलेचे अस्तित्व धोक्यात! तारेवरची कसरत करणारे आणि विविध रूपे धारण करून जनजागृती करणाऱ्या या कलावंतांना शासनाने अधिकृत मानधन द्यावे, अशी रास्त अपेक्षा या निमित्ताने व्यक्त होत आहे ''जर अशा कलाकारांना शासकीय आधार मिळाला नाही, तर ही समृद्ध लोककला हळूहळू लोप पावेल,'' अशी भीती या कलाकारांनी व्यक्त केली आहे.

**सामाजिक** | एसबीआय संग्रामपूर शाखेचा स्तुत्य उपक्रम

# जिल्हा परिषद शाळेतील ६ वीच्या विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**संग्रामपूर दि.१३:** स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा संग्राम पूरचे वतीने फंडातून जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता ६वी च्या मुलींना दि. १२ फेब्रुवारी रोजी ७५ सायकलीचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे आयोजन संग्रामपूर येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या प्रांगणात करण्यात आले होते.

दरम्यान स्टेट बँक शाखा संग्रामपूर यांच्या वतीने सर्वप्रथम जिल्हा परिषदच्या सहावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या व बाहेरगावावरून ये-जा करणाऱ्या विद्यार्थिनींचा सर्वे करण्यात आला होता व त्यामधून ७५ मुली सायकलीसाठी पात्र ठरल्या. तालुक्यातील सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार प्रशांत पाटील हे होते तर आ.डॉ.संजय कुटे यांचे बंधु बाळू भाऊ कुटे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती भाऊराव पाटील, गटविकास अधिकारी माधव पायघन, शाखेचे रिजनल मॅनेजर निरज कुमार, मॅनेजर विवेक इगावे, पोस्ट खामगाव राजेंद्र पवार गटशिक्षणाधिकारी दीपक टाले एसबीआय मॅनेजर किरण पाटेकर, मुख्याध्यापक योगेश कुकडे, ,यांची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान शाखा संग्रामपूर चे व्यवस्थापक संदेश मगरे यांच्या पुढाकारातून सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लाभार्थी ७५ विद्यार्थिनीं व त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावर उत्साह फुलून दिसत होता. विशेष म्हणजे रांगेत असलेल्या लेडी बर्ड कंपनीच्या सायकली घंटी व कुलपासह उठून दिसत होत्या सदर कार्यक्रमाचे संचालन शिक्षक संघटनेचे अध्यक्ष श्याम कौलकर यांनी केले तर आभार प्रदर्शन संग्राम पूर शाखा व्यवस्थापक संदेश मगरे यांनी केले. वंदे मातरम व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली सदर अभिनव उपक्रमामुळे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा संग्रामपूरचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# कोलते कॉलेजमध्ये रंगणार भविष्यातील इंजिनीअर्सचे तांत्रिक कुरुक्षेत्र

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि. १३ :** येथील लोकसेवा शिक्षण बहुउद्देशीय मंडळ संचलित पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगमध्ये येत्या २० फेब्रुवारी २०२६ रोजी टेक तंत्र २के या राष्ट्रीय स्तरावरील भव्य तांत्रिक महोत्सवाचे आयोजन इंजीनिअरिंग व पॉलिटेक्निक मध्ये करण्यात आले आहे. अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि कौशल्याला व्यासपीठ मिळवून देणाऱ्या या तांत्रिक कुरुक्षेत्राची जय्यत तयारी सध्या सुरू असून, संपूर्ण परिसरात या महोत्सवाचे बिगुल वाजले आहे.

Padm. Dr. V.B. Kolte College of Engineering, Malkapur • 2010 • ।। तंत्रशिक्षणम् सर्वश्रेष्ठ ।। EST.2010

एआयसीटीई अंतर्गत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व एमएसबीटीई यांच्या मुख्य संरक्षणाखाली आणि संस्थेचे अध्यक्ष डी. एन. पाटील, उपाध्यक्ष. पी. डी. कोलते व सचिव डॉ. ए. डब्ल्यू. कोलते यांच्या मार्गदर्शनात हा थरार रंगणार आहे. या महोत्सवात विद्यार्थ्यांच्या तांत्रिक बुद्धिमत्तेची कसोटी पाहणाऱ्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यात संगणक विभागाची कोडक्स ही कोडिंग स्पर्धा, मेकॅनिकल इंजिनीअरिंगची चित्तथरारक रोबो रेस व डिझाइन मास्टर, इलेक्ट्रिकल विभागाचे गुंतागुंतीचे सर्किट पझल, सिव्हिल इंजिनीअरिंगचे लाईट-वेट काँक्रीट क्यूब एक्सप्लोर आणि अप्लाइड सायन्स विभागाचे पोस्टर प्रेझेंटेशन अशा चुरशीच्या स्पर्धांची जुगलबंदी पाहायला मिळणार आहे. यातील पोस्टर प्रेझेंटेशनमध्ये कोणत्याही शाखेचा पदवीधर विद्यार्थी आपली कला सादर करू शकतो. विजेत्या स्पर्धकांसाठी लाखाहून अधिक रुपयांच्या पारितोषिकांसह उत्तेजनार्थ बक्षिसांची मोठी लूट ठेवण्यात आली आहे. प्राचार्य डॉ. अनिल खर्चे, प्रशासकीय डीन डॉ. युगेश खर्चे, आयक्यूएसी अधिकारी प्रा. रमाकांत चौधरी आणि कार्यक्रम निमंत्रक प्रा. सदाशिव लवंगे व प्रा. दीपक जोशी यांच्या नेतृत्वाखाली या महोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. आयएसटीई व आयईआय नवी दिल्ली यांच्या सहकार्याने होणाऱ्या या राष्ट्रीय महोत्सवात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कॉलेज प्रशासनातर्फे करण्यात आले.

अजिंक्य भारत • आपलं जालना

जालना, शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### महापौरांचा स्वच्छता व पाणीपुरवठ्यावर भर

**जालना :** स्वच्छता आणि पाणीपुरवठा व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी महानगरपालिकेत तातडीची बैठक आयोजित



करण्यात आली होती. या बैठकीत शहरात स्वच्छता आणि पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तत्काळ उपाययोजना राबविण्याचे निर्देश महापौर वंदना मगरे यांनी प्रशासनाला दिले. बैठकीस उपमहापौर राजेश राऊत, सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण तसेच स्वच्छता निरीक्षक व पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान स्वच्छता निरीक्षकांनी शहरातील वाढत्या गरजांच्या पार्श्वभूमीवर घंटागाडी, जेसीबी, ट्रॅक्टर व अतिरिक्त स्वच्छता कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याचे मत मांडले. यावर महापौरांनी तत्काळ चार ट्रॅक्टर, २० कामगार आणि एक जेसीबी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. तसेच शहर स्वच्छतेसाठी स्वतंत्र स्वच्छता समिती स्थापन करून अधिक प्रभावी कामकाज करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महापौर मगरे यांनी नागरिकांनाही स्वच्छतेच्या मोहिमेत सहकार्य करण्याचे आवाहन केले. अंबड येथील तसेच जे.ई.एस. कॉलेज मागील पाण्याच्या जलशुद्धीकरण केंद्राचे काम पूर्ण झाल्यानंतर जालना शहराला एक दिवस आड नियमित पाणीपुरवठा करण्यात येईल, असेही महापौरांनी सांगितले. पाणीपुरवठा विभागाला गळती रोखणे आणि वेळापत्रक काटेकोरपणे पाळण्याचे निर्देश देण्यात आले. शहरातील रस्त्यांवरील अतिक्रमणाबाबतही बैठकीत चर्चा झाली. नागरिकांनी स्वतः अतिक्रमणे काढून घ्यावीत, अन्यथा महानगरपालिकेकडून लवकरच कारवाई सुरू करण्यात येईल, अशी माहिती महापौरांनी दिली.

# मनरेगा, सिल्क समग्र आणि पोकराचा मिळणार लाभ

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. १३ :** जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीला फाटा देऊन शाश्वत उत्पन्नासाठी रेशीम उद्योगाकडे वळावे, या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या महारेशीम अभियान-२०२६ चा शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी रोजी शुभारंभ करण्यात आला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते रेशीम चित्ररथाला हिरवा झेंडा दाखवून या नोंदणी मोहिमेची सुरुवात करण्यात आली. यावर्षी जिल्ह्यात तब्बल ५ हजार एकर क्षेत्रावर नवीन तुती लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. इतर पिकांच्या तुलनेत रेशीम शेती शाश्वत आणि अधिक नफा देणारी आहे. जालना जिल्ह्यात रेशीम प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन दिले जात असल्याने शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा. असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी केले.

यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी, रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते, वरिष्ठ क्षेत्र सहाय्यक एस.आर. जगताप, के.एन. जाधव, डॉ. जी.के. गीते यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच किरण ढगे (डी.एस. युनिट), जावेद एम. शेख, सचिन भुजबळ, ग्लोबल विकास ट्रस्टचे पवन परतूरकर, कृष्णा ढेंबरे आणि प्रगतशील रेशीम उत्पादक शेतकरी पांडुरंग निंबाळकर उपस्थित होते.

जालना जिल्हा हा रेशीम कोषासाठी मोठी बाजारपेठ म्हणून उदयास येत आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्ह्यात आता सोईल टू फॅब्रिक (माती ते कापड) ही संकल्पना राबविण्यात



### जिल्ह्यात पाच हजार एकरवर तुती लागवडीचे लक्ष्य

येत आहे. म्हणजेच केवळ तुती लागवडच नाही, तर कापड निर्मितीपर्यंतचे प्रक्रिया उद्योग जिल्ह्यात सुरू होत असल्याने शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार असल्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी सांगितले.

महारेशीम अभियान-२०२६ अंतर्गत जिल्हा प्रशासनाने हा विशेष रेशीम चित्ररथ तयार केला आहे. रेशीम शेती म्हणजे नेमके काय? अनुदान कसे मिळते? आणि रेशीम कीटक संगोपन कसे करायचे? या सर्व प्रश्नांची उत्तरे आता शेतकऱ्यांना त्यांच्या गावातच मिळणार आहेत. चित्ररथावर रेशीम लागवडीपासून ते कापड निर्मितीपर्यंतची सर्व माहिती चित्रांच्या माध्यमातून मांडण्यात आली आहे. हा चित्ररथ जिल्ह्यातील रेशीम शेतीसाठी निवडण्यात आलेल्या गावांच्या समूहामध्ये फिरणार आहे.

शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी या अभियानात तीन प्रमुख योजनांची सांगड घालण्यात आली आहे. यामध्ये मनरेगा, केंद्र सरकारची सिल्क समग्र-२ आणि पोकरा-२ (हवामान अनुकूल कृषी प्रकल्प) या योजनांचा समावेश आहे. या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अनुदान आणि तांत्रिक साहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. या त्रिवेणी संगमाचा लाभ घेऊन अधिकाधिक शेतकऱ्यांनी आपली नोंदणी करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दि. ४ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ पर्यंत अभियान कालावधी असून गावोगावी फिरणारा रेशीम चित्ररथ शेतकऱ्यांना तुती लागवडीच्या तांत्रिक माहितीसह नोंदणीसाठी प्रोत्साहित करणार आहे. रेशीम विभाग, मनरेगा, पंचायत समिती आणि कृषी विभाग संयुक्तपणे ही मोहीम राबविणार आहेत.

जालना जिल्ह्यात सुरू झालेल्या महारेशीम अभियान-२०२६ ला आता नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या (पोक्रा-२) दुसऱ्या टप्प्याची भक्कम साथ मिळणार आहे. या योजनेतून रेशीम उद्योग सुरू करणाऱ्या शेतकऱ्यांना ३ लाख २५ हजार रुपयांपासून ते ३ लाख ९० हजार रुपयांपर्यंत भरघोस अनुदान जाहीर करण्यात आले असून, यामुळे जिल्ह्यातील रेशीम क्षेत्रात मोठी क्रांती होण्याची शक्यता आहे. सर्वसाधारण प्रवर्गाला प्रति एकर एकूण ३,२५,१२५ रुपये अनुदान तर अनुसूचित जाती, जमाती प्रवर्गाला प्रति एकर एकूण ३,९०,१५० रुपये अनुदान मिळणार आहे. या योजनेसाठी जागतिक बँकेचा निधी उपलब्ध असल्याने प्रक्रियेत पारदर्शकता राहील आणि शेतकऱ्यांना त्यांचे अनुदान वेळेत मिळण्यास मदत होईल.

# जाफराबाद तालुक्यात नैसर्गिक आपत्ती अनुदान वाटपात कोट्यवधींचा घोटाळा?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जाफराबाद, दि. १३ :** जाफराबाद तालुक्यात सन २०२२ ते २०२४ या कालावधीत अतिवृष्टी, दुष्काळ, नापिकी आणि इतर नैसर्गिक आपत्ती अनुदानाच्या वाटप प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी सोनगिरी येथील शेतकरी प्रविण सुभाष पिंपळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करून महसूल विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कडक प्रशासकीय व फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### चौकशीची मागणी

तक्रारीनुसार, तालुक्यातील विविध सज्जांमध्ये नैसर्गिक आपत्ती अनुदान मंजुरी व वाटप करताना नियमबाह्य पद्धती वापरण्यात आल्या आहेत. अनेक ठिकाणी बोगस लाभार्थी तयार करून, शेतजमिनीची खोटी क्षेत्रवाढ दाखवून, कोरडवाहू जमीन बागायती किंवा फळबाग म्हणून नोंदवून जादा अनुदान काढण्यात आल्याचा आरोप आहे. काही प्रकरणांत ७/१२ उताऱ्यावर मालकी नसलेल्या व्यक्तींनाही लाभार्थी दाखवण्यात आले आहे.

तसेच दुबार व बनावट आधार क्रमांक वापरून एकाच व्यक्तीच्या नावावर अनेक वेळा अनुदान घेतल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. काही लाभार्थी हे संबंधित गाव किंवा तालुक्याबाहेरील असल्याचा संशय असून, वेगवेगळ्या गावांतील व्यक्तींना चुकीच्या नोंदी करून अनुदान मंजूर करण्यात आले आहे. तहसील कार्यालयातील ई-पंचनामा आणि संगणकीय प्रणालीमध्ये फेरफार करण्यात आल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. अधिकाऱ्यांचे लॉगिन आयडी व पासवर्डचा गैरवापर करून बनावट माहिती अपलोड करण्यात आली असून, महाआयटी विकसित प्रणालीचा दुरुपयोग करून खोट्या याद्या तयार केल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. चौकशीची शक्यता लक्षात येताच कागदोपत्री व डिजिटल पुरावे नष्ट किंवा बदल करण्यात आल्याचा संशय अर्जदाराने नोंदवला आहे.

यापूर्वी जाफराबाद तहसीलदारांनी दिलेल्या पत्राद्वारे संबंधित तलाठी यांनी हाताळलेल्या गावांच्या ८-अ याद्यांची तपासणी करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे प्राथमिक स्तरावर अनियमिततेची दखल महसूल प्रशासनाने घेतल्याचे दिसून येते. मात्र, स्थानिक पातळीवरील चौकशी अपुरी ठेवून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप अर्जदाराने केला आहे. या संपूर्ण प्रकरणात तत्कालीन तहसीलदार, तलाठी, मंडळ अधिकारी, सहाय्यक

महसूल अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालयातील काही कर्मचारी तसेच संगणक ऑपरेटर यांचा संगनमताने सहभाग असल्याचा दावा करण्यात आला आहे. शासनाची फसवणूक करून कोट्यवधी रुपयांचा निधी अपहार झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. अर्जदाराने जिल्हाधिकाऱ्यांकडे जिल्हा स्तरावर स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी समिती गठीत करावी, सन २०१९-२० तसेच २०२२ ते २०२४ या कालावधीतील सर्व अनुदान प्रकरणांचे सखोल ऑडिट करावे, ई-पंचनामा व डिजिटल डेटाचे फॉरेन्सिक आयटी ऑडिट करावे, दोषी अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करावे आणि अपहार झालेली रक्कम वसूल करून संबंधितांवर भारतीय न्याय संहिता व माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हे दाखल करावेत, अशा मागण्या केल्या आहेत.




**देशातील वाढती महागाई,बेरोजगारी कामगार कायद्याचे उल्लंघन केंद्र व राज्य सरकारकडून केले जात असल्याच्या विरोधात आयटकेनेही पाठिंबा देत गुरुवारी झालेला देशव्यापी आंदोलनात सहभाग नोंदवला होता, त्यावेळी घेतलेले छायाचित्र.**

# धार्मिक स्थळांवरील विनापरवाना ध्वनिक्षेपके काढा : पोलिस अधीक्षकांचे निर्देश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. १३ :** शहरातील सर्व धार्मिक स्थळासह सार्वजनिक स्थळावरील विनापरवाना असलेले ध्वनिक्षेपके तत्काळ काढू घ्यावे. त्यानंतर रीतसर पोलिसांची परवानगी घ्यावी, असे निर्देश पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी दिले आहे.

पोलिस अधीक्षक कार्यालयात आयोजित सर्व धर्मगुरूसह प्रमुखांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपविभागीय पोलिस अधीक्षक अनंत कुलकर्णी, पोलिस निरीक्षक संदीप भारती, पोलिस निरीक्षक जनार्धन शेवाळे, पोलिस निरीक्षक बाळासाहेब पवार आदी उपस्थित होते. यावेळी धार्मिक स्थळावर विना परवाना ध्वनिक्षेपके, भोंगे लावण्यात आले आहे. त्यामुळे सर्व धार्मिक स्थळावरील हे ध्वनिक्षेपके धर्मगुरूसह प्रमुखांनी स्वतःच काढून घ्यावे. यासंदर्भातील मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश असून राज्य शासनाकडून या संदर्भात निर्देश देण्यात आले आहे. त्यानुसार सर्व धार्मिक स्थळावरील भोंगे, ध्वनीक्षेपके काढून घेण्याचे निर्देश देण्यात आले. शिवाय मुंबई पोलिस नियमावलीनुसार ध्वनीयंत्र बसवण्यासाठी परवाना दिला जाऊ शकतो. परंतु, सध्या विना परवाना असलेले भोंगे, ध्वनी यंत्र काढून घ्यावे. २० फेब्रुवारीपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करून घेण्याचे निर्देश या बैठकीत पोलिसांच्या वतीने देण्यात आले आहे. मात्र, जर हे भोंगे, ध्वनिक्षेपके न काढल्यास पोलिस प्रशासनाकडून कारवाई केली जाईल, असे या बैठकीत सांगण्यात आले आहे.

# जालन्यातील एमआयडीसीमधील कारखान्याला आग; मोठ्या प्रमाणात हानी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. १३ :** जालना शहराबाहेरील औद्योगिक वसाहतीतील फेज ३ मध्ये ठिबक सिंचन साहित्य तयार करणाऱ्या कारखान्यास गुरुवारी दुपारी साडेबारा वाजेच्या सुम ारास लागलेल्या आगीत मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. अग्निशमन दल आणि चंदनझीरा पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांना आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अथक परिश्रम करावे लागले.

साई एरिगेशन सिस्टम नामक ठिबक सिंचन साहित्य तयार करणाऱ्या कारखान्याला अचानक आग लागली. आगीचे लोट इतके प्रचंड होते की काळ्या धुराचे ढग दूरवरूनही दिसत होते. प्लास्टिक व रसायनयुक्त साहित्य असल्यामुळे आग झपाट्याने पसरली, कंपनीतील कर्मचाऱ्यांनी तात्काळ बाहेर पळ काढत अग्निशमन दलाला माहिती दिली. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या तब्बल चार गाड्या दाखल झाल्या. सुमारे ८० लिटर विशेष रसायनांचा वापर करत जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवले. चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांच्यासह पोलीस कर्मचारी तात्काळ घटनास्थळी पोहोचले अग्निशमन दलाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अथक प्रयत्न करून सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर या आगीत कंपनीतील मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक साहित्य, तयार माल आणि काही महत्त्वाचे उपकरण जळून खाक झाल्याची प्राथमिक माहिती आहे. हा कारखाना प्रशांत नानासाहेब गायकवाड यांच्या मालकीचा असल्याची माहिती अग्निशमन दलाच्या सुत्रांनी दिली. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# वाढत्या प्रदुषणाकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे अप्पर जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. १३ :** हवामानातील बदल, वाढते प्रदूषण आणि प्राणीजन्य रोगांचा वाढता धोका लक्षात घेता, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी आरोग्य विभागाचा धावता आढावा घेतला. त्यांनी जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था, प्रदूषण नियंत्रण आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत चर्चा करून अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

या बैठकीस जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजेंद्र पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख दीपक काजळकर यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ म्हणाले, औद्योगिकीकरणामुळे मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे. जालना औद्योगिक वसाहतीतील हवेच्या प्रदूषणाबाबत चिंता व्यक्त करत प्रदूषण नियंत्रण यंत्रणेने हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी नियमित देखरेख ठेवावी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांवर कारवाई करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

शहरातील भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. ही संख्या नियंत्रित करण्यासाठी प्रभावीपणे निर्बिजीकरण मोहीम राबवावी, जेणेकरून श्वानदंशाच्या घटना कमी होतील. तसेच भविष्यात कुत्र्यांची संख्या मर्यादित राहण्यास मदत होईल. प्राण्यांपासून मानवांना होणाऱ्या मेंदूज्वर या सारख्या गंभीर आजारांच्या प्रसारावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. अशा आजारांचा धोका वेळीच ओळखणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. प्राण्यांपासून होणाऱ्या आजारांचा धोका टाळण्यासाठी जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय व्यावसायिकांचे विशेष प्रशिक्षण आयोजित करुन आधुनिक उपचार पद्धती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती या प्रशिक्षणातून देण्याची सुचनाही त्यांनी यावेळी केली. शहरी भागातच नव्हे, तर ग्रामीण भागातही प्राण्यांपासून होणाऱ्या आजारांबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्याचे निर्देश त्यांनी आरोग्य विभागाला दिले.

ज्या आरोग्य केंद्रांवर कायमस्वरूपी महिला वैद्यकीय अधिकारी नाहीत, अशा ठिकाणी नियोजित दिवशी महिला डॉक्टरांची उपस्थिती सुनिश्चित करावी, जेणेकरून महिला रुग्णांची गैरसोय होणार नाही. तसेच सामान्य रुग्णांना वेळेत आणि दर्जेदार उपचार मिळतील याची खात्री संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी करावी. उपचारांमधील दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

तसेच एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम अंतर्गत जिल्ह्यातील आजारांच्या नोंदीबाबत त्यांनी समाधान व्यक्त करत यंत्रणा अधिक सक्षम करण्यास सांगितले. या बैठकीला आरोग्य विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पशुसंवर्धन विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## शैक्षणिक

### वार्षिक स्नेह संमेलनात भास्करराव अंबेकर यांचे मत

# डॉक्टर,इंजिनिअरच नव्हे तर माणूस घडविण्याचे काम करा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि.१३ : शालेय जीवनात ज्ञानाबरोबरच चांगले संस्कार विद्यार्थ्यांना देणे, डॉक्टर, इंजिनिअरच नव्हे तर माणूस घडविण्याचे काम करावे, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी केले. जालना तालुक्यातील मानेगाव येथील यशवंती इंग्लीश स्कुल या शाळेत आयोजित वार्षीक स्नेहसंमेलन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.**

यावेळी व्यासपीठावर अंकुश पाचफुले, माजी सरपंच अशोक हंडे, गजानन कळकुंबे, परशुराम मोहिते यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना अंबेकर म्हणाले की, माझे प्राथमिक शिक्षण मानेगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतच झाले.

पदवीधर झाल्यानंतरही इंग्रजी भाषेवर प्रभुत्व नसल्याने संकोच व अडचणी निर्माण झाल्या. मातृभाषा ही आवश्यक आहे. पण इंग्रजी ही अंतरराष्ट्रीय भाषा असल्याने उद्याच्या भविष्यात आपले स्थान निर्माण करण्यासाठी व आत्मविश्वास येण्यासाठी इंग्रजी भाषेचे महत्वही नाकारता येत नाही.

यशवंती ही इंग्रजी शाळा असल्या



कारणाने येथील विद्यार्थी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व निर्माण करतील. पण शिक्षण घेणाऱ्याबरोबरच शिक्षण देणाऱ्या गुरुजन व संस्थानी गुणवत्ता, व्यक्तीमत्व विकास या बाबीवर निश्चितच लक्ष दिले पाहिजे व शाळेतून गुणवंत विद्यार्थी निर्माण झाला पाहिजे. पण ही गुणवत्ता केवळ डॉक्टर, इंजिनिअर व करिअर निर्माणापुरतीच मर्यादीत न राहता याच वयामध्ये माणुसकीच्या गुणांचे व मानवतेचे संस्कार विद्यार्थ्यांवर

झाले पाहिजेत. आज समाज व्यवस्थेमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढूनही माणुसकीचा ऱ्हास झाल्याने एकत्र कुटूंब पध्दती, नात्या गोत्यांतील गोडवा, सामाजिक बांधलिकी झपाट्याने कमी होत असून पुर्ण आयुष्य हे केवळ पैश्याभोवती फिरत असल्याने नितीमूल्यांचा ऱ्हास होत आहे. अगदी कालपरवाच्या निवडणुकांमध्ये जे चित्र सर्वांनी बघितले लोकशाही ज्या मतप्रक्रियेतून बळकट होते त्या मताची किंमत पैश्याच्या माध्यमातून होत असल्याने धनदांडग्या व गुंडांच्या हातामध्ये राजकीय व्यवस्था जात आहे. त्यामुळे सामान्यांना कसा न्याय मिळणार, अशा लोकांकडून न्यायाची अपेक्षा कशी करणार ? त्यामुळे शालेय जीवनापासूनच शिक्षणाबरोबर चांगले संस्कार बालमनावर करणे गरजेचे आहे, असे झाल्यास आपली राजकीय व्यवस्था पारदर्शक व स्वच्छ होईल, असे सांगून शाळेतील विद्यार्थ्यांना शुभेच्छा देवून कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल शिक्षकवृंद व संस्था चालकांचे कौतुक केले.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६

## थोडक्यात

### शस्त्र घेवून फिरणाऱ्यांवर कारवाई

अमरावती : चाकू व कोयत्यासारखे शस्त्र अवैधरित्या बाळगून गुन्हा करण्याच्या उद्देशाने दोघेजण जयस्तंभ चौक व भाजीबाजार परिसरात फिरत असल्याची गुप्त माहिती कोतवाली व खोलापुरी गेट पोलिसांना मिळाली. आपापल्या कार्यक्षेत्रात कारवाई करीत कोतवाली पोलिसांनी आकीब परवेज कमर (२४), तर खोलापुरी गेट पोलिसांनी बादल बागवाले (२२) यांना ताब्यात घेत त्यांच्यावर गुन्हे दाखल केलेत. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहे.

### फेरी विक्रेत्याला गुंडांकडून धमकी

अमरावती : मी या एरियाचा डॉन आहे, दादा आहे, अशी बतावणी करीत दोघांनी एका विक्रेत्यासह पादचाऱ्याचा रस्ता अडवला. त्यांना जवळील शस्त्राचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी दिली. या घटना मसानगंज व असोरिया पेट्रोल पंपासमोर घडल्या. या प्रकरणी नागपुरी गेट पोलिसांनी दोघांवर गुन्हे दाखल केलेत.

### स्टंटबाजी करणाऱ्या वाहनचालकावर कारवाई

अमरावती : दर्यापूर मार्गावरील रहदारीच्या मुख्य रस्त्यावर स्टंटबाजी करीत वाहन चालवताना दोन युवक आढळून आले. त्यामुळे अपघाताची शक्यता बळावली होती. भातकुली पोलिसांनी कारवाई करीत तनवीर खान नसरुल्ला खान (२६) व उदय विलास मानकर (२०) यांच्यावर गुन्हे दाखल केलेत. या घटनेचा पुढील तपास भातकुली पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली भातकुली पोलीस करीत आहे.

### गळफास घेऊन युवकाची आत्महत्या

अमरावती : युवकाने राहत्या घरी पंख्याला गळफास लावत आत्महत्या केली. अक्षय वासनिक (२९) असे मृतकाचे नाव असून ही घटना संजय गांधी नगर येथे उघडकीस आली. फ्रेजरपुरा पोलिसांनी मर्ग नोंदवला.

### अपघातात दोन महिला जखमी

अमरावती : गाडगे नगर व कंवर नगर येथे घडलेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोन महिला जखमी झाल्यात. जखमी महिलांच्या तक्रारीवरून गाडगे नगर व राजापेठ पोलिसांनी अपघाताला कारण ठरलेल्या वाहन चालकांवर गुन्हे नोंदवले असून पुढील तपास सुरू आहे.

### रहदारीला अडथळा करणाऱ्यावर कारवाई

अमरावती : सार्वजनिक, रहदारीच्या व मुख्य रस्त्यावर चालकांनी आपल्या ताब्यातील वाहन उभे केले. त्यामुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला होता. अशा एकूण आठ वाहन चालकांवर नागपुरी गेट, वलगाव, राजापेठ पोलिसांनी गुन्हे नोंदवलेत. या कारवाई लालखडी चौक, टांगा पाडाव चौक, कामुंजा फाटा, नवाथे चौकात करण्यात आल्यात.

### जुगार अड्डयावर पोलिसांच्या धाडी

अमरावती : शहरात ठिकठिकाणी सुरू असलेल्या पाच जुगारांवर विविध पोलीस ठाण्यांतर्गत कारवाई करण्यात आली. त्यात एकूण आठ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आलेत. त्यापैकी एक फरार एक फरार आहे. त्यांच्या ताब्यातून एकूण १६ हजार २३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाई शुक्रवार बाजारालगतचे मैदान, लुंबिनी नगर, महात्मा फुले नगर व कमेला ग्राऊंड परिसरात करण्यात आल्यात. प्राप्त माहितीनुसार, फ्रेजरपुरा पोलिसांनी शुक्रवारी बाजारालगतच्या मैदानामध्ये सुरू असलेल्या दोन जुगारांवर कारवाई केल्या.

# भाजप म्हणजे विषारी साप, ना मैत्री बरी, ना शत्रूत्व!

## बच्चू कडू यांची सणसणीत टीका

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती,दि.१३ :** भाजप म्हणजे विषारी सापासारखा पक्ष आहे. भाजपसोबत न मैत्री बरी, न शत्रूत्व. आम्ही तर शत्रूत्व स्वीकारले आहे. ते कधीही नाग पाठवू शकतात, अशा शब्दांत प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी भाजपवर टीका केली आहे. गेल्या २८ जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांचे अकाली निधन झाले.

या धक्कादायक घटनेमुळे राजकीय वर्तुळात अनेक प्रश्न उपस्थित केले जात असतानाच बच्चू कडू यांनी भाजपवर टीका केली आहे. बच्चू कडू म्हणाले, लोक भाजपकडे नेहमी संशयाने पाहतात. भाजपने खांद्यावर हात जरी टाकले, तरी लोक म्हणतात, हा मेला. बच्चू कडू म्हणाले, पूर्वी सिव्हिल सर्जनला असलेले औषध खरेदीचे अधिकार आता मंत्रालयाने स्वत:कडे घेतल्याने भ्रष्टाचाराला वाव मिळत आहे. कमिशनसाठी औषधे महाग केली जात आहेत. ना खाऊंगा ना खाने दूंगा म्हणणारेच आज टेंडरच्या माध्यमातून सर्वाधिक भ्रष्टाचार करत असल्याचे सांगत, त्यांनी रोजगार हमी योजनेचे पैसे आणि दिव्यांगांच्या रखडलेल्या पगारावरून सरकारला धारेवर धरले. ज्या दिव्यांगांना दोन पाय नाहीत, त्यांचे पगार वेळेवर न देणाऱ्यांच्या



कानफटात मारण्याची वेळ आता आली आहे, असेही ते म्हणाले. बच्चू कडू म्हणाले, पंधराशे रुपये देऊन मते मिळवण्याचा प्रयत्न होत असला तरी, दुसरीकडे स्मार्ट मीटरच्या माध्यमातून सरकार जनतेचे पैसे लुटत आहे.

एकीकडून द्यायचे आणि दुसरीकडून काढून घ्यायचे ही सरकारची नीती आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली नाही, तर महाराष्ट्रात रेल्वे चालू देणार नाही, असा इशारा देत त्यांनी आगामी काळात गनिमी काव्याने आंदोलन करण्याचे संकेत दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करू, असे आश्वासन दिल्याने त्यांना आता मागे फिरता येणार नाही.

> शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन पूर्ण न केल्यास एक जुलैपासून राज्यातील एकही रेल्वे धावू देणार नाही, असा इशारा बच्चू कडू यांनी यापुर्वीच दिला आहे. सरकारने आम्हाला गृहीत धरू नये.मागणी मान्य न झाल्यास सरकारला सळो की पळो करून सोडू. शेतकऱ्यांनी, दिव्यांग बांधवांनी जिवावर बेतणारी आंदोलने केली आहेत. या वेळीही आम्ही शेवटपर्यंत लढा देऊ. कार्यकर्ते कमी असले, तरी राज्यभरातील सर्व रेल्वे कशा रोखायच्या याचा अभ्यास केला आहे, असे बच्चू कडू यांनी म्हटले होते.

# क्षयरोग जनजागृतीच्या नावाखाली ७५ हजारांचा मंडप घोटाळा

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.१३ :** महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील कारभार पुन्हा एकदा संशयाच्या भोवऱ्यात सापडला असून, क्षयरोग जनजागृतीसाठी मिळालेल्या शासकीय निधीचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. केवळ एका दिवसाचा कार्यक्रम आणि १५ बाय १५ आकाराचा मंडप उभारून थेट ७० ते ७५ हजार रुपयांचे देयक कंत्राटदाराच्या खात्यात जमा करण्यात आल्याची तक्रार ४ फेब्रुवारी २०२६ रोजी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्याकडे करण्यात आली आहे. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य या संवेदनशील विभागात निधीचा कसा बेमालूम वापर होतो, याचेच हे जिवंत उदाहरण असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत अमरावती महानगरासाठी १०० दिवसांचा विशेष उपक्रम राबविण्यासाठी तब्बल ९ लाख ७१ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून महापालिकेच्या दवाखान्यांमध्ये व्यापक जनजागृती, तपासण्या आणि मार्गदर्शन अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात हा संपूर्ण कार्यक्रम एका व्यक्तीला कंत्राट देऊन केवळ एकाच दिवसापुरता मर्यादित ठेवण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, त्या एकमेव दिवशीही फक्त १५ बाय १५ चा मंडप उभारण्यात आला. शहरातील इतर भागात किंवा महापालिकेच्या दवाखान्यांमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाविषयी झालेली तक्रार अद्याप माझ्याकडे आलेली नाही. तक्रारीतील नेमका मजकूर तपासल्यानंतरच यावर प्रतिक्रिया देता येईल.

# अतिक्रमण प्रकरणी सरपंच व पतीवर कारवाईचे निर्देश

## वाघडोह ग्रामपंचायतीतील प्रकार

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अचलपूर,दि.१३ :** ग्रामपंचायत वाघडोह येथील शासकीय जमीन व गावठाण क्षेत्रातील अतिक्रमण प्रकरणी पंचायत समिती अचलपूर यांनी गंभीर दखल घेतली असून, संबंधित प्रकरणाची सविस्तर चौकशी करून सरपंच सौ. भाग्यश्री संतोष लंगोटे व त्यांचे पती श्री. संतोष श्यामराव लंगोटे यांच्याविरुद्ध महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमांतर्गत कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. सुनील मारोती बेलसरे व इतर १२ उपोषणकर्त्यांनी दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने पंचायत समिती अचलपूर कार्यालयाने चौकशी प्रक्रिया सुरू केली होती. उपोषणकर्त्यांनी ग्रामपंचायत वाघडोह अंतर्गत शासकीय जमीन व गावठाण क्षेत्रातील अतिक्रमण, रस्ते मोकळे करणे, मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे तसेच संबंधित अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. चौकशीदरम्यान असे निदर्शनास आले की, सरपंच सौ. भाग्यश्री संतोष लंगोटे या दिनांक १२ सप्टेंबर २०२३ पासून विद्यमान सरपंच असून, त्यांच्या पती श्री. संतोष लंगोटे यांच्या नावावर असलेल्या मालमत्ता क्रमांक १५७ बाबत अतिक्रमणासंदर्भात गंभीर तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. संबंधित प्रकरण न्यायप्रविष्ट असले तरी ग्रामपंचायत प्रशासनाने नियमानुसार आवश्यक ती कारवाई न केल्याचा ठपका चौकशी अहवालात ठेवण्यात आला अधिकारी व आहे. ग्रामपंचायत विस्तार अधिकाऱ्यांनी दिलेल्या लेखी जबाबांनुसार, अतिक्रमण काढण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या; मात्र उपोषणकर्त्यांनी उपोषण मागे घेतले अतिक्रमणाबाबत ठोस कार्यवाही नसल्याचे व न झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच, मालमत्तेचे पुरावे, नोंदी व कर आकारणीसंदर्भातील कागदपत्रे सादर करण्यात अपयश आल्याचेही अहवालात स्पष्ट झाले आहे. या सर्व बाबींचा विचार करता, पंचायत समिती अचलपूरचे गटविकास अधिकारी यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (मुंबई अधिनियम क्रमांक 3) मधील कलम ३९ (१) व १४ (१) (ज-३) अन्वये संबंधितांविरुद्ध कारवाईचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे तातडीने सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणामुळे वाघडोह ग्रामपंचायत हद्दीतील अतिक्रमणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पुढील कारवाईकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. अखेर उपोषणकर्त्यांचे शासना कडून समाधान झाल्याने उपोषण मागे घेतले आहे.

# भाईगिरीतून युवकाची निर्घृण हत्या

## तीन आरोपींना अटक | नांदगाव पेठ हद्दीतील घटना

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.१३ :** आम्ही महादेव खोरीचे भाऊ आहोत असे ओरडत तीन तरुणांनी अंजनगाव सुर्जी येथील गौरव सुधाकर घोटेकर (३४) याला चाकूने वार केले. त्यानंतर ते घटनास्थळावरून पळून गेले. तथापि, नांदगाव पेठ डीबी पथकाच्या पथकाने काही मिनिटांतच त्यांना अटक केली.

या घटनेत गौरवचा भाऊ सौरभ घोटेकर गंभीर जखमी झाला. पोलिसांनी बुधवारी रात्री उशिरा तिन्ही आरोपींना अटक केली, गुरुवारी त्यांना न्यायालयात हजर केले आणि १५ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

हे लक्षात घ्यावे की, बुधवार, 11 फेब्रुवारी रोजी रात्री, नांदगाव पेठ एमआयडीसी येथील रेमंड कंपनीत काम पूर्ण केल्यानंतर, अंजनगाव सुर्जी येथील गौरव आणि सौरभ घोटेकर हे दोन भाऊ



एका ढाब्यावर जेवण करून एका मेडिकल स्टोअरमधून औषध खरेदी करत होते. ते दुचाकीवरून नांदगाव पेठ येथील नमन विहार येथे घरी जात असताना, कार कट झाल्याच्या वादातून आदेश रघुनाथ तेलमोर (२५), रोहित संजय तायडे (२३) आणि दीप उर्फ यशोदीप विनायकराव वेलकर (२५) या दोन तरुणांनी त्यांच्यावर हल्ला केला, जे महादेव खोरी येथील रहिवासी आहेत.हल्ल्यादरम्यान, आरोपींनी ओरडले, तुम्ही आम्हाला ओळखत नाही का? आम्ही महादेव खोरीचे भाऊ आहोत! आदेश तेलमोरने चाकू बाहेर काढला आणि एकापाठोपाठ सात वार केले.

हल्ल्यात गौरव गंभीर जखमी झाला. त्याचा मोठा भाऊ सौरभ घोटेकर त्याला वाचवण्यासाठी गेला तेव्हा त्याच्यावरही हल्ला झाला आणि तो गंभीर जखमी झाला. त्यानंतर आरोपी पळून गेला. फरार आरोपींच्या शोधात नांदगाव पेठ पोलिसांनी वाकी धरण रस्त्यावर नाकाबंदी केली आणि काही वेळातच तिघांनाही अटक केली.गुरुवार, १२ फेब्रुवारी रोजी त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले आणि १५ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. नांदगाव पेठ पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

गौरव घोटेकरच्या हत्येनंतर, नांदगाव पेठ स्टेशन हाऊस ऑफिसर दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सहाय्यक निरीक्षक रितेश राऊत, पीएसआय वाकडे, कारंडे, हेड कॉन्स्टेबल राजाभाऊ राऊत, नीलेश गावनर, कॉन्स्टेबल राजिक खान, नीलेश सावकर, अमित ढोले, वैभव तिखिले, राजा सय्यद, विकास साठे, संदीप गावंडे, चालक उमेश भुजाडे आणि वैभव धुरंधर यांचा समावेश होता. आरोपींना तात्काळ अटक करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# स्वामित्व योजनेतील पी.आर.कार्ड त्रुटीवर बैठक

## 50 टक्के नागरिक वंचित असल्याचा आरोप | नमुना 8-अ वर दस्त नोंदणी परवानगीची मागणी

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि.१३ :** स्वामित्व योजनेअंतर्गत ड्रोन सर्व्हे करून तयार करण्यात आलेल्या पीआर कार्ड(मालमत्ता पत्रक) प्रक्रियेमुळे अमरावती तालुका व जिल्ह्यात निर्माण झालेल्या गंभीर समस्यांच्या पार्श्वभूमीवर आज निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे महत्त्वपूर्ण



बैठक पार पडली. महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सादर करण्यात आलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने ही बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीचे अध्यक्षस्थान निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी भूषविले. बैठकीदरम्यान सहनिबंधक कार्यालय तसेच जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी स्वामित्व योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या ड्रोन सर्व्हे व पीआर कार्ड निर्मिती प्रक्रियेबाबत माहिती दिली.

# काँग्रेस नगरातील दोन सावकारांवर छापे

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.१३ :** अवैध शहरातील सावकारीच्या तक्रारींची गंभीर दखल घेत सहकार विभागाने मंगळवारी वडाळी आणि काँग्रेस नगर परिसरात दोन ठिकाणी छापे टाकले. या धडक कारवाईत अवैध सावकारीशी संबंधित संशयास्पद कागदपत्रे, कोरे धनादेश आणि स्थावर मालमत्तेचीखरेदीखते जप्त करण्यात आली असून, सावकारी तक्रारींवरून हे पाऊल उचलण्यात आले आहे. पाशात अडकलेल्यांच्या सहायक निबंधक, सहकारी संस्था, दर्यापूर यांच्या कार्यालयाला प्राप्त झालेल्यातक्रारींच्या आधारे जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी या कारवाईचे आदेश दिले होते. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गगलानी नगर (वडाळी) आणि काँग्रेसनगर येथे १० फेब्रुवारी २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली. सहकार विभागाने या कारवाईसाठी दोन स्वतंत्र पथके नियुक्त केली होती. वडाळी परिसरात सहायक निबंधक किशोर बलींगे यांच्या नेतृत्वाखालील या पथकाने गगलानी नगरमधील शक्तीसिंह विरेंद्र दीक्षीत यांच्याकडे सकाळी ११.५५ ते दुपारी २.३५ या वेळेत झडती घेतली. या ठिकाणी५ संशयास्पद दस्तऐवज, २ कोरे धनादेश आणि मालमत्तेचे खरेदीखते हस्तगत करण्यात आले.काँग्रेस नगर परिसरात सहायक निबंधक किशोर इंगळे (चांदूर रेल्वे) यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सुमंत अरविंद पाटील यांच्या निवास्थानी छापा टाकला. येथे सर्वाधिक १४ संशयास्पद दस्तऐवज आणि २ कोरे धनादेश मिळून आल्याची माहिती आहे.

## मदत | प्रतिबंधात्मक उपाययोजनांची गरज

# भारतातील सर्वात लांबीच्या ‘स्काय वॉक’ला आधाराची गरज!

अजिंक्य भारत | भारत वरठे

**मेळघाट, दि.१३ : :** भारतातील सर्वात लांबीचा काचेचा पूल (स्काय वॉक) हा विदर्भातील चिखलदरा या थंड हवेच्या ठिकाणी उभारला जात आहे. या पुलाचे काम पूर्णत्वास आले आहे. या काचेच्या पुलावरून चालताना पर्यटकांना थरारक अनुभव येणार आहे. चिखलदरा येथील हरिकेन ते गोराघाट पॉइंटला जोडणाऱ्या स्कायवॉक प्रकल्पाला २०१८ मध्ये राज्य सरकारने परवानगी दिली होती. सुमारे ४०७ मीटर लांबीचा हा काचेचा पूल आहे. पण, आता या पुलाला आधार द्यावा लागणार आहे.

‘स्काय वॉक’चा ८० ते १०० मीटरचा मध्यभाग हा मजबूत आणि पारदर्शक काचेचा असेल. पण, या स्कायवॉकची लांबी जास्त असल्याने मध्यभागी आधार द्यावा लागणार आहे. यासाठी वनविभागाची परवानगी घेण्यात आल्याचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सांगितले.



> आमझरी मधाचे गाव म्हणून विकसित करण्यात येत आहे. येथे शबरी महामंडळाने रिसॉर्टसाठी एकत्रितरित्या कार्य केल्यास जादा पर्यटकांची सुविधा निर्माण होण्यास मदत होईल, अशी सूचनाही आशीष येरेकर यांनी केली.स्काय वॉकची उंची २८० मीटर (अंदाचे ५९४ फूट) आहे. या स्काय वॉकचे फ्लोअर १२ मिलीमीटर जाडीच्या त्रिस्तरीय काचेचे असणार आहे. एकाचवेळी ५०० पर्यटकांचा भार सांभाळण्याची तसेच प्रतितास १९० किलोमीटर गतीचा वारा झेलण्याची क्षमता या काचेची राहणार आहे. हरिकेन आणि गोराघाट यादरम्यान सर्वसाधारण वाऱ्याचा वेग ताशी १६० किलोमीटर असतो. या प्रकल्पावर सुमारे ४० कोटी रुपये खर्च होत आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात पर्यटन आणि पायाभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी ही माहिती देण्यात आली.

या ‘स्काय वॉक’ला कायमस्वरूपी आधार द्यावा लागणार असल्यामुळे या भागातून माकड किंवा इतर प्राणी चढून जाऊ नये, म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. यासोबतच चिखलदरा येथे २७ किलोमीटरचा गोलमार्ग तयार करण्यात येणार आहे. वन क्षेत्रातून जाणाऱ्या मार्गासाठी वनविभागाची परवानगी घ्यावी. तसेच ग्लो गार्डनसाठी शक्यता तपासून पहाव्यात. चिखलदरा येथे पर्यटन वाढीसाठी नवीन प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. याठिकाणी ट्रेकींगचे पर्याय दिल्यास पावसाळ्यानंतर मार्चपर्यंत पर्यटक येतील.यासाठी वन विभागाने ट्रेकचे मार्ग निश्चित करावेत. पर्यटनामुळे चिखलदरा मध्ये क्रांती घडू शकते. त्यामुळे येथे पर्यटकांना सुविधा द्याव्यात. पीएम मित्रा पार्कमधील महापारेषणने उपकेंद्राचे काम सुरू करावे. यासाठी आवश्यक असणारे सहकार्य करण्यात येईल. यासोबतच मेळघाटातील २२ गावांच्या विजेच्या प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. राष्ट्रीय वन्यजीव बोर्डाची परवानगी मिळातच इतर कामे करावीत.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मितीत विदर्भातून अमरावती अव्वल!

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.१३ :** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम हा महाराष्ट्र राज्य सरकारचा एक महत्त्वाचा उपक्रम आहे, जो बेरोजगार युवकांना स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी अनुदान आणि कर्ज दिले जाते.

या योजनेचा मुख्य उद्देश असा की, युवकांना छोट्या आणि मध्यम उद्योग क्षेत्रात स्वत: चे व्यवसाय सुरू करण्यासाठी सक्षम बनवणे. हा कार्यक्रम अधिक गतीने राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे आणि त्यात सहभागी होण्यासाठी युवकांना काही महत्त्वाची माहिती आणि मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत, प्रत्येक उद्योजकाला १० लाख रुपयांपासून ५० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज आणि अनुदान दिले जाते. हे कर्ज आणि अनुदान युवकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले संसाधने, उपकरणे, कच्चा माल, आणि इतर गोष्टी खरेदी करण्यासाठी मिळते. यात खुल्या प्रवर्गातील युवकांसाठी २५ टक्क्यांपर्यंत अनुदान, तर राखीव प्रवर्गातील युवकांसाठी २५ टक्के ते ३५ टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाते.अमरावती जिल्हा विदर्भातून अव्वल

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत अमरावती जिल्ह्याने मोठी झेप घेतली असून, कर्ज मंजुरीमध्ये अमरावती जिल्हा विदर्भात प्रथम तर राज्यात तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. नियोजन भवन येथे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा आढावा घेण्यात आला. उद्दिष्टपूर्तीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी निर्देश दिले आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी जिल्ह्याला १६०० कर्ज प्रकरणांचे लक्ष्य देण्यात आले आहे. आतापर्यंत जिल्हा प्रशासनाने ३ हजार ७०४ प्रस्ताव बँकांकडे पाठवले असून, त्यापैकी ८०२ प्रकरणांना मंजुरी मिळाली आहे. जिल्ह्याला राज्यात प्रथम क्रमांकावर नेण्यासाठी २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.सरकारी योजनांच्या कर्ज मंजुरीबाबत खाजगी बँकांकडून दाखवण्यात येणाऱ्या अनास्थेबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. आयसी आयसीआय, ॲक्सिस, एचडीएफसी आणि येस बँक या बँकांच्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर ताशेरे ओढत, जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना भर सभेतून निघून जाण्याचे आदेश दिले.जिल्ह्यातील नवउद्योजक युवक-युवतींच्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस अमरावती येथे ‘स्वरोजगार महासंमेलन’ आयोजित करण्यात येणार आहे.पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन होईल. यात स्वयंरोजगारातून उत्पादित केलेल्या मालाच्या विक्रीसाठी विशेष स्टॉल्स उभारले जातील. यात नाविन्यपूर्ण उत्पादन करणाऱ्या उद्योगांना प्राधान्य दिले जाईल. बेरोजगार युवक-युवतींनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### दुचाकीच्या धडकेत युवकाचा मृत्यू

चांदूर बाजार : दोन दुचाकींची समोरा समोर धडक झाली. त्यात एका २२ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. विक्रम तेजुराम शेळके (२०, रा. मोथा) असे मृतकाचे नाव आहे. घटनेच्या वेळी तो दुचाकीने (एमएच २७-बीएस ८१४८) ने बहिरम मार्गाने जात होता. त्या वेळी समोरून आलेल्या दुचाकीने (एमएच २७-सीक्यू ६९९८) त्याला धडक दिली. त्यात त्याला गंभीर दुखापत होवून मृत्यू झाला. शिरजगाव कसबा पोलिसांनी मृतकाचे वडील तेजुराम हिरूजी शेळके (४६) यांच्या तक्रारीवरून अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध अपघाताचा गुन्हा नोंदवला. ही घटना बहिरम ते परतवाडा मार्गावर घडली.

### अंगणातून दुचाकी चोरून नेली

अचलपूर : परतवाडा शहारातील सिव्हिल लाईन येथे घराच्या कंपाऊंड बाहेर उभी केलेली दुचाकी (एमएच २७-सीएफ ४७७३) अज्ञाताने चोरून नेली. याबाबत आशिष संतोष नरेढी (३१) यांच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी अज्ञात दुचाकी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### शहानूर धरणाच्या कॅनलमध्ये आढळला मृतदेह

पथ्रोट : अनोळखी व्यक्तीचा मृतदेह जळलेल्या अवस्थेत जहानपूर शेत शिवारातील वाघडोह ते खोडगाव मार्गावरील शहानुर धरणाच्या कॅनलमध्ये आढळला. त्याची इतरत्र हत्या करीत पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने कॅनलमध्ये आणून जाळल्याचा अंदाज पथ्रोट पोलिसांनी व्यक्त केला. या प्रकरणी अज्ञातावर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### खोट्या कागदपत्रांच्या आधारे शेतीवर कब्जा

अचलपूर : वडिलोपार्जित शेती आई व मुलीच्या नावावर असताना एका परिचिताने त्यावर कब्जा केला. त्यासाठी मायलेकीची संमती असल्याची खोटी कागदपत्रे तयार केली. त्या आधारे शेतीच्या नापिकीचे आलेले १४ हजार ४५० रुपये परिचिताने त्याच्या पोस्टाच्या खात्यात जमा करून घेतली. या फसवणूक प्रकरणी महिलेने अचलपूर पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी फसवणूक करणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### नळाच्या कारणावरून पती-पत्नीस मारहाण

मोर्शी : पतीची गाडी घराजवळ स्लिप झाली. शेजाऱ्याने नळासाठी रस्ता फोडल्याने पती पडल्याचे महिलेने शेजाऱ्याला म्हटले. त्याचा राग आल्याने शेजाऱ्याने काठीने महिलेला मारहाण केली, तर तिच्या पतीला जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना धानोरा येथे घडली. महिलेच्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### महिलेला विटेने मारून जखमी केले

खोलापूर : येथे क्षुल्लक कारणा वरून चौघांनी महिलेसोबत वाद घालत विटेने तिचे डोके फोडले. जखमी महिलेच्या तक्रारीवरून खोलापूर पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हे दाखल केलेत.

### घाटलाडकी येथे घरफोडी

चांदूर बाजार : कुणी नसल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने रोख रकमेसह एकूण ५ लाख ३८ हजारांचा ऐवज चोरला तो पळून जाण्याच्या तयारीत असतानाच शेतकरी घरी परत आला. मात्र चोरटा त्याला चुकवून पळून जाण्यात यशस्वी झाला. ही घटना घाटलाडकी येथे घडली. मिथेलसिंह जगदेवसिंह पवार (४४) यांच्या तक्रारीवरून ब्राह्मणवाडा थडी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# अंडी पुरवठा घोटाळयात तिघांना कारणे दाखवा नोटीस

## कपाटातील फाईल गहाळ प्रकरण | आदिवासी संघटना आक्रमक

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**धारणी, दि.१३ फेब्रुवारी :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात घडलेल्या ९० लाखांच्या अंडी पुरवठा घोटाळयाने पुन्हा एकदा मेळघाट प्रशासन हलवून सोडले आहे. अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेने उपायुक्तांना निवेदन देत तत्काळ कारवाईची मागणी केल्याने प्रकरणाला नवी कलाटणी मिळाली आहे. अंडी पुरवठ्याचे अतिशय संशयास्पद देयक तयार झाल्यानंतर संबंधित फाईल कार्यालयातून खिडकी तोडून आणि कपाट फोडून गायब करण्यात आली होती. कार्यालयात अनेक कपाट असताना, नेमके अंडी पुरवठा देयकाची फाईल असलेल्या कपाटालाच लक्ष्य केले गेल्याने अंतर्गत संगनमताचा तीव्र संशय उपस्थित होत आहे.

प्रकरणानंतर प्रशासनाने पोलिसांत तक्रार दिली होती; मात्र दीर्घ कालावधी उलटूनही कोणताही आरोपी सापडला नाही. त्यामुळे प्रकरण जाणीवपूर्वक थंडबस्त्यात टाकले गेले, असा आरोप आदिवासी संघटनांनी केला आहे. दरम्यान, माध्यमांमध्ये बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर प्रकल्प अधिकारी कार्यालयात खळबळ उडाली आणि उच्चस्तरीय चौकशी समिती गठित करण्यात




आली. या समितीने संपूर्ण घडामोडींची तपासणी करून अप्पर आदिवासी आयुक्तांकडे सविस्तर अहवाल सादर केला आहे, ज्यात कार्यालयातील काही अधिकारी व कर्मचारी यांची जबाबदारी स्पष्टपणे अधोरेखित करण्यात आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे. त्यांना कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरू आहे. अंडी पुरवठ्याची बिले मंजूर होऊन देयके निघाली: परंतु त्याच कालावधीत केलेल्या केळी पुरवठ्याचे देयक मात्र आजही प्रलंबित असल्याने देयक प्रक्रिया निवडक पद्धतीने करण्यात आल्याचा संशय अधिक गडद झाला आहे. एका बाजूला प्रत्यक्ष केळीचा पुरवठा

करणाऱ्या पुरवठाधारकाचे देयक थकवले गेले, तर दुसऱ्या बाजूला अंड्याचे काल्पनिक देयक प्रक्रिया करून निधी गहाळ करण्यात आल्याचा आरोप आदिवासी विकास परिषदेने केला आहे. या प्रकरणात आता स्थानिक आदिवासी संघटना अत्यंत

> प्रकल्प अधिकारी कार्यालयातून चौकशी अहवाल प्राप्त झाले असून त्यानुसार प्रथम दर्शनी संबंधित दाखवा नोटीस जारी करण्यात तीन अधिकाऱ्यांना कारणे आले असून पुढील कार्यवाही सुरू आहे.
>
> **श्रीकांत धोटे उपायुक्त,**
> **आदिवासी अप्पर आयुक्त कार्यालय अमरावती.**

आक्रमक बनल्या असून, दोषींवर तातडीने कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, आदिवासी भागासाठी असलेला विकासाचा निधी गहाळ करणारे अधिकारी कोणत्याही परिस्थितीत सुटता कामा नयेत. प्रकल्प कार्यालयात घडलेली फाईल चोरी ही साधी चोरी नसून महाघोटाळा लपवण्याचा सुनियोजित प्रयत्न आहे. आता यामध्ये विरोधीपक्षनेत्यांनी यामध्ये उडी घेतली असून आदिवासी मंत्र्यांकडे चौकशीची व कार्यवाहीची मागणी केली आहे. त्यामुळे चौकशी अहवालावर तत्काळ निर्णय घेऊन दोषींची नावे जाहीर करणे, निलंबन व गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करणे आवश्यक आहे, अशी मागणी जोर धरत आहे.

## रोहना येथे सांस्कृतिक क्रीडा महोत्सव उत्साहात



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**रोहना, दि.१३ :** जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा, रोहना येथे नुकताच नांदगाव बिटस्तरीय शालेय क्रीडा महोत्सवाचे आयोजित करण्यात आलेला होते. या क्रीडा स्पर्धा मधे नांदगाव, मांजरी म्हसला आणि शिवणी केंद्रातील केंद्रस्तरीय विजयी चमू सहभागी झाल्या होत्या.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. पंकज फिसके, अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती यांनी उपस्थिती होते तरमहोत्सवाचे उद्घाटन प्रसाद संकपाळ गटशिक्षनाधिकारी, पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून निलेश ठाकरे साहेब, सहाय्यक गटविकास अधिकारी, अनिल कोल्हे, अविनाश आढाव, केंद्रप्रमुख, यांनी उपस्थिती दर्शवली. उद्घाटणीय सोहळयाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचिन अवघड यांनी केले तर प्रास्ताविक अनिल कोल्हे यांनी तर आभार प्रदर्शन सुरज मंडे यांनी पार पाडले. दोन दिवस विविध खेळ स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे भरगच्च आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी खेळाडूवृत्तीने सर्व स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून भरपूर आनंद लुटला. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गावचे सरपंच काकडे तर प्रमुख अतिथी म्हणून, अनिल कोल्हे, अविनाश आढाव, मधुसूदन काळमेघ, जफर अली आणि शालव्यवस्थापन पदाधिकारी उपस्थित होते. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रध्दा सार्वे यांनी केलं तर आभार प्रदर्शन राजेंद्र बांडाबूचे यांनी केले.या महोत्सवातील जनरल चॅम्पियनशिप जिल्हा परिषद शाळा, शिवनी रसूलापूर यांनी पटकावून आपले खेळातील वर्चस्व सिद्ध केले.

## धानोरा शिक्रा येथे सांस्कृतिक कार्यक्रम



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धानोरा, दि.१३ :** नुकतेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धानोरा शिक्रा येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होत. त्यामध्ये लहान चिमुकल्यांनी विविध वैयक्तिक व सामूहिक नृत्य सादर करीत गावकऱ्यांची मने जिंकली. याप्रसंगी सुबोध योगीराज टेंभरे यांने भारतीय प्रजासत्ताक या विषयी आपले विचार व्यक्त केले.

या शाळेमध्ये युवा प्रशिक्षणार्थी म्हणून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सुरज जुनघरे यांना शाळेच्या वतीने स्मृतिचिन्ह, फोटोफ्रेम व भेटवस्तू देवून सन्मानित करण्यात आले. शाळेची विकासकामे नळ जोडणी, रंगरंगोटी, स्टाईल बसविणे, ह्यांडपंप दुरुस्ती, तीनपत्र्याचे कुंपण आणि शालेय मैदान सपाटीकरण करिता ग्रामपंचायतने भरीव योगदान दिल्याबद्दल गावाचे उपसरपंच मारोती रामटेके यांचा शाळेच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. या रंगतदार कार्यक्रमध्ये मुख्याध्यापक दीपक धांडे व सुरज मंडे आणि सुरज जुनघरे यांनी चालू सत्रामध्ये शाळेमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणून शाळेचा कायापालट केल्याबद्दल चंद्रभान जुनघरे यांनी शाळेचे मुख्याध्यापक दीपक धांडे यांचा तर वंदना जुनघरे यांनी सुरज मंडे यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार केला. त्याचप्रमाणे रामपाल बद्रे आणि सुशीला डोंगरे यांनी सुद्धा शिक्षकांचा व सुरज जुनघरे यांचा कौटोंबिक सन्मान केला. ज्योत्स्ना डोंगरे यांनी शाळेला सावित्रीबाई यांची फोटोफ्रेम सरपंच लता मालगावे यांचे हस्ते प्रदान केली तर सुरज जुनघरे यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेची मोठी फोटोफ्रेम शाळेला भेट दिली. माजी शाळाव्यवस्थापन समिती अध्यक्ष रवी ठाकरे यांनी त्यांची मुलगी कोमल हिच्या वाढदिवस निमित्त सर्व विद्यार्थ्यांना उपयुक्त शालेय किट वैशाली ठाकरे यांचे हस्ते शाळेला भेट दिली. ह्या भरगच्च कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता रविभाऊ ठाकरे, किशोर गरड, योगिराज टेंभरे, वसंतराव टेंभरे, अश्विनीताई मेश्राम, शकिला बानो, तामगाडगे ताई तसेच सर्व गावकरी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## खालखोनी येथे श्रीराम कथा सप्ताह

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**खोलापुर, दि. १३ :** येथुन जवळच असलेल्या श्री महादेव मंदिर खालखोनी अंतापुर येथे महाशिवरात्रीच्या महान पर्वावर श्री.ह.भ.प. रामायणाचार्य मंगेश महाराज ढवळी (शास्त्री) हिंगणीकर यांच्या कुशल नेतृत्वाखाली श्रीराम कथा ज्ञान यज्ञ सप्ताह संगीत व दुष्यासह आयोजित केला आहे.

पर्व विशेष भागवत धर्मी / नृसिंह जयंती रामनवमी / वामन जयंती कृष्णाष्टमी/उत्तमो उत्तम शिवरात्र// महाशिवरात्री महोत्सवाचे औचित्य साधून खालखोनी अंतापुर येथे दि ९ फेब्रुवारी ते दि १६ फेब्रुवारी पर्यंत श्री.ह.भ.प. श्रीरामकथा प्रवक्ते मंगेश महाराज शास्त्री आळंदीकर यांच्या नेतृत्वाखाली श्रीराम कथा ज्ञान यज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१३ फेब्रुवारीला दुपारी व १४ फेब्रुवारीला सकाळी श्री महादेवाची शिवलिंग व नंदिकेश्वरची होमादी विधीयुक्त पुजन करुन प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. श्रीराम कथेचे मुख्य यजमान श्री संतोष वामनराव गाळे व सौ.रंजणाताई संतोष गाळे हरताळा यांच्या कडुन नविन शिवलिंग दान करण्यात आले.

दैनंदिन कार्यक्रम म्हणुन सकाळी




काकडा आरती, हनुमान चालीसा, सकाळ व दुपारला रामकथा, सायंकाळी हरिपाठ व रात्री कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. दि.९ फेब्रुवारीला ह.भ विणोदाचार्य रमेश महाराज दुधे रा.डिग्रस दि.१० फेब्रुवारीला ह.भ.प. शिवचरित्रकार विशाल महाराज वाकोडे रा. आपातापा जी अकोला, दि.११ फेब्रुवारीला ह.भ.प. सोपानकाका काळपांडे आळंदीकर, दि.१२ फेब्रुवारीला विनोदाचार्य ह.भ.प. श्रीनिवास महाराज अडगोकर रा. रासेगाव दि.१३ फेब्रुवारीला ह. भ.प. अच्युत महाराज बोरोडे रा वडाळी, दि.१४ फेब्रुवारीला ह.भ.प. मंगेश महाराज शास्त्री ढवळी हिंगणीकर,दि. १५ फेब्रुवारीला महाशिवरात्रीच्या शुभ पर्वावर पहाटे ५ वाजता यजमान संतोषराव वामनराव गाळे यांच्या हस्ते शिवलिंगावर रुद्राभिषेक करण्यात येईल. त्यानंतर दुपारी ५ वा. खालखोनी अंतापुर या गावामधुन भव्य दिव्य पालखी सोहळयाची मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत पंचक्रोशीतील हजारो महिला व पुरुष मंडळी सहभागी होणार आहेत. शनिवार दि. १६ फेब्रुवारीला सकाळी १०ते १२ वा . भागवताचार्य श्री.ह.भ.प. रविंद्र महाराज पाटील खालखोनीकर यांचे गोपाल काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर सप्ताह अंतर्गत चहाफराळ व अन्नदान करणाऱ्या दान दात्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. संच मंडळी म्हणुन विणेकरी ह.भ.प.गौरव महाराज गाळे खालखोनी, ह.भ.प. तन्मय महाराज झासकर रा खोलापुर, आर्गनवादक ह.भ.प.नरेशभाऊ गोलाईत रा भातकुली, पॅटवादक आदी उपस्थित होते.

## माघ अमावस्या निमित्त चंदन उटी उत्सव कार्यक्रम

**चांदूर रेल्वे, दि.१३ :** अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यात असलेल्या प्रसिद्ध तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे माघ मास अमावस्या निमित्त चंदन उटी उत्सव तसेच चैत्र मास अखंड जागृती भजन मांड कार्यक्रमाचा शुभारंभ आयोजित करण्यात आला आहे. श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत



बुवा संस्थान यांच्या वतीने दि. १७ फेब्रुवारी २०२६, मंगळवार रोजी दुपारी ३.३० वाजता संस्थान परिसरात भक्तिभावपूर्ण वातावरणात चंदन उटी उत्सव संपन्न होणार आहे. या प्रसंगी चंदनउटी नंतर बाहेरगावाहून येणाऱ्या भाविक भक्तांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन संस्थानच्या अन्नदान समितीमार्फत करण्यात आले आहे.

याच दिवशी पहाटे ५.०० वाजता संस्थानतर्फे चैत्र मास निमित्त आयोजित अखंड जागृती भजन मांड कार्यक्रमाचा शुभारंभ लहान मंदिरात ढाल बसवून होणार असून,मुख्य मंदिरात कृष्णाजी महाराजांचे गण सुमरनाने विश्वस्त मंडळ व भाविक भक्तांच्या उपस्थितीत भजनाचा गजर सुरू होईल.या मांडीत सहभागी अवधूत भजन मंडळाची संस्थान तर्फे दैनंदिन भोजन,चहा व नास्ता इ.व्यवस्था करण्यात आली आहे आणि सहभागी मंडळांना महाराजांची गाथा,संस्थानची टोपी व सन्मान पत्र देवून सन्मानित करण्यात येणार आहे.

सन्मान | अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे आयोजन

# आज पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा

■ राज्य, विभागीय आणि जिल्हास्तरावरील पुरस्कारांचे होणार वितरण ■ प्रकाश पोहरे, विलास बडे यांच्यासह ५ पत्रकारांचा होणार सन्मान

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती,दि.१३ :** मराठी पत्रकार परिषदेशी संलग्नित असलेल्या अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने भव्य पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. १४ फेब्रुवारी २०२६ शनिवार रोजी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व.सोमेश्वर पुसदकर ऑडिटोरियम येथे सायंकाळी ४.३० वाजता हा सोहळा पार पडणार आहे. राज्य, विभागीय तसेच जिल्हास्तरावरील विविध पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण या सोहळयात मान्यवरांच्या हस्ते केले जाणार आहे.

अमरावती जिल्ह्यातील पत्रकारांची सर्वात मोठी संघटना असलेल्या अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी पत्रकारिता क्षेत्रात सेवा देणाऱ्या पत्रकारांचा विविध पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. यावर्षी देखील संघटनेच्या वतीने हे पुरस्कार दिले जाणार आहेत. अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार असून या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून







अमरावती लोकसभा खासदार बळवंत वानखडे, राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्यासह अतिथी म्हणून जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त राकेश ओला, सकाळचे समुह संपादक राहुल गडपाले यांची देखील उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमातून स्व.दादासाहेब काळमेघ यांच्या नावाने दिला जाणारा राज्यस्तरीय पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार ३० वर्षांची प्रदीर्घ पत्रकारिता सेवा तसेच राजकीय, पर्यावरण आणि शेतकऱ्यांच्या विषयावर लिखाण करण्यासाठी राज्यभर ख्याती असलेले दै.देशोन्नतीचे संपादक असलेले प्रकाश पोहरे यांना दिला जाणार आहे. ४१ हजार रूपये रोख, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असणार आहे. तसेच स्व.जुगलकिशोरजी अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार यावर्षी ३० वर्षांची पत्रकारिता सेवा आणि बातमीकडे पाहण्याचा सखोल दृष्टीकोण, अभ्यासू आणि अचूक विश्लेषण, प्रसंगावधान असलेले आयबीएन १८ चे वृत्त निवेदक विलास बडे यांना दिला जाणार आहे.

३१ हजार रूपये रोख, सन्मानचिन्हं, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तसेच विभागीय पत्रकारिता पुरस्कार यवतमाळ जिल्ह्यात नमो महाराष्ट्र या दैनिकाचे संपादक असलेले आणि ३० वर्षांचा पत्रकारिता क्षेत्राचा अनुभव असलेले वसंतराव घुईखेडकर यांना दिला जाणार आहे. दै.सकाळचे समुह संपादक राहुल गडपाले पुरस्कृत हा पुरस्कार 21 हजार रूपये रोख, सन्मानचिन्हं, शाल आणि श्रीफळ अशा स्वरूपाचा आहे. अमरावती जिल्हा आणि ग्रामीण क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना देखील जिल्हास्तरीय पुरस्कार संघटनेच्या वतीने दिले जातात. यामध्ये जिल्हास्तरीय (शहर) पत्रकारिता पुरस्कार दै. प्रतिदिन अखबारचे वृत्त संपादक प्रवीण आहुजा यांना त्यांच्या ३० वर्षांच्या प्रदीर्घ पत्रकारितेच्या सेवेसाठी दिला जाणार आहे. दै. विदर्भ मतदार पुरस्कृत या पुरस्काराचे स्वरूप ११ हजार रूपये रोख सन्मानचिन्हं, शाल आणि श्रीफळ असे असणार आहे. तसेच जिल्हास्तरीय (ग्रामीण) पत्रकारिता पुरस्कार दै.आपली मातृभूमीचे वरूड तालुका प्रतिनिधी असलेले चंद्रकांत भड यांना वरूड तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न, शोषित समाजाचे प्रश्न या विषयावरील सातत्यपूर्ण लिखाणसाठी दिला जाणार असून पी.आर.पोटे एज्युकेशनल गृप ऑफ अमरावती यांच्याकडून पुरस्कृत असलेला हा पुरस्कार देखील ११ हजार रूपये रोख सन्मानचिन्हं, शाल आणि श्रीफळ अशा स्वरूपाचा असणार आहे. या पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळयाला अमरावती जिल्ह्यातील शहर तसेच ग्रामीण क्षेत्रात कार्य करणारे समस्त पत्रकार बांधव, राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे मान्यवर, नागरिक बंधू आणि भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अमरावती जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## स्कूल ऑफ स्कॉलर्स धामणगाव रेल्वे येथे सामाजिक उपक्रम



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**धामणगांव रेल्वे, दि.१३ :**

सहानुभूती, करुणा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा हृदयस्पर्शी आदर्श साकारत स्कूल ऑफ स्कॉलर्स, धामणगांव रेल्वे येथील विद्यार्थी व कर्मचारी यांनी १४ जानेवारी २०२६ रोजी माननीय पं. श्री शंकरप्रसादजी अग्निहोत्री यांच्या जयंतीनिमित्त जॉय ऑफ गिव्हिंग उपक्रम उत्साहात साजरा केला. या उपक्रमांतर्गत शाळेतील सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी आपल्या घरातून थोड्या-थोड्या प्रमाणात तांदूळ आणून शाळेत संकलित केले. संकलित तांदूळ नंतर मातोश्री वृद्धाश्रम, पुलगाव येथे पाठविण्यात आला. विद्यार्थी परिषदेचे सदस्य व शिक्षिका मनीषा मलवार, प्रविण टोंगे, निकिता ढोले व गौरी वानखेडे यांच्यासह वृद्धाश्रमात गेले व तेथील ज्येष्ठ नागरिकांना तांदळाच्या पोत्या सन्मानपूर्वक भेट दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधला, त्यांचे आशीर्वाद घेतले तसेच समाजात ज्येष्ठ नागरिकांचे महत्त्व व त्यांच्याप्रती असलेल्या कर्तव्याची जाणीव करून घेतली.

हा उपक्रम उप-प्राचार्य श्री तुषार रेवटकर व प्रशासन अधिकारी श्री प्रितेश जानवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.शाळेच्या प्राचार्या श्रीमती प्रचीती धर्माधिकारी यांनी विद्यार्थि व पालकांच्या उदारतेचे कौतुक करताना सांगितले,गरजूंसोबत आपले अन्न वाटून विद्यार्थ्यांनी जीवनातील सर्वात मोठा धडा—मानवता—शिकला आहे.

## घटना - घडामोडी

### आमडी येथे रमाबाई आंबेडकर यांची जयंती उत्साहात



**घाटंजी :** तालुक्यातील आमडी येथे शनिवारी (ता. ७) त्यागमाता रमाबाई भीमराव आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. बाबासाहेबांच्या जडणघडणीत रमाईंचा असलेला वाटा आणि त्यांचा त्याग यावर प्रकाश टाकून मान्यवरांनी त्यांना अभिवादन केले. त्याग, संयम आणि निस्सीम प्रेमाची मूर्ती असलेल्या रमाबाई आंबेडकर यांचा जन्मदिवस आमडी येथे उत्साहात साजरा झाला. बाबासाहेबांच्या अत्यंत कठीण काळात आणि गरिबीतही खंबीरपणे घर सांभाळत त्यांनी बाबासाहेबांना मोलाची साथ दिली. त्यांच्या या त्यागामुळेच बाबासाहेब भारतीय संविधानाचे शिल्पकार बनू शकले, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. उपस्थितांनी रमाईंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून 'त्यागमूर्ती'ला वंदन केले. या कार्यक्रमाला आतिश मंडपे, कार्तिक मानकर, विनोद लढे, दिनकर शेंडे, चरणदास मंडपे, वसंता मानकर, अनिल मंडपे, राहुल लढे, मिलिंद मानकर, स्वाती लढे, कोकिळा मानकर, अस्मिता भगत, सविता मंडपे, वंदना मानकर, कुसुम मानकर, बेबी मंडपे, ज्योष्णा लढे, रज्जू मंडपे, लता धोंगडे, शालिनी मंडपे, रसिका लढे, निर्मला लढे यांच्यासह गावातील अनेक बौद्ध उपासक आणि उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### मोहदा येथील मूकबधिर विद्यालयाची राज्यस्तरावर भरारी

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्हा परिषद आणि दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत मोहदा येथील बाबुसिंग चव्हाण मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. समीक्षा आत्राम, संतोष अंजीकर आणि शिवानी राऊत यांनी पदके पटकावून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध केली. यवतमाळ येथे २०२५-२६ या वर्षासाठी जिल्हास्तरीय दिव्यांग मुला-मुलींच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मनोहर नाईक शिक्षण संस्था संचालित बाबुसिंग चव्हाण मूकबधिर निवासी विद्यालय, मोहदा येथील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. सोळा ते एकवीस वयोगटात समीक्षा वामन आत्राम हिने २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक, तर गोळाफेक प्रकारात कांस्यपदक मिळवले. मुलांच्या गटात संतोष अंजीकर याने २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. तसेच सांस्कृतिक विभागात शिवानी राऊत हिने कांस्यपदक मिळवून शाळेचे नाव उंचावले. या यशाच्या जोरावर या विद्यार्थ्यांची आगामी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ग्रामीण भागातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेल्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



### यवतमाळात अवैध दारू विक्रीमुळे बार चालकांचा संताप

**यवतमाळ :** शहरात अवैध दारू विक्री वाढल्यामुळे त्रस्त झालेल्या यवतमाळ शहर वाईन बार असोसिएशनने गुरुवारी आर्णी रोडवरील हॉटेल साहिबा येथे बैठक घेतली. जोपर्यंत अवैध धंदे बंद होत नाहीत, तोपर्यंत आगामी मार्च महिन्याचे परवाना शुल्क न भरण्याचा इशारा त्यांनी प्रशासनाला दिला आहे. शहरासह जिल्ह्यात अवैध दारू विक्रीने टोक गाठले असून, याचा थेट फटका शासनमान्य व्यवसायाला बसत आहे. या गंभीर विषयावर चर्चा करण्यासाठी वाईन बार असोसिएशनने तातडीची बैठक बोलावली होती. शहरात हातगाड्या, अंडी विक्रीची दुकाने, धाबे आणि खाणावळींमध्ये सर्रास अवैध दारू विक्री सुरू आहे. बेकायदेशीर विक्रेत्यांना कोणताही कर भरावा लागत नाही, मात्र अधिकृत बार चालकांना लाखो रुपये शुल्क भरावे लागते. यापूर्वी १४ जुलै २०२५ रोजी प्रशासनाला निवेदन देऊनही कारवाई झाली नाही. वारंवार तक्रारी करूनही प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप असोसिएशनने केला आहे. नियमानुसार दारू पिण्याची परवानगी केवळ परमिट रूमला असतानाही बाहेर नियम मोडले जात आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध विक्री तातडीने बंद करावी, अन्यथा मार्च २०२६ चे वार्षिक परवाना शुल्क भरणार नाही, असा एकमुखी निर्णय असोसिएशनने घेतला आहे. तसे निवेदन अधीक्षकांना देण्यात आले आहे.

### यवतमाळ रेल्वे आरक्षण दलालांच्या विळख्यात

**यवतमाळ :** यवतमाळ रेल्वे स्टेशनवरील तिकीट आरक्षण काउंटर दलालांच्या ताब्यात गेल्याने सर्वसामान्यांना तिकिटे मिळत नसल्याचा प्रकार उघड झाला आहे. या विरोधात शिवसेना नगरसेवक पिंटू बांगर यांनी स्टेशनवर जाऊन संताप व्यक्त केला आणि खासदार संजय देशमुख यांच्याकडे तक्रार करत कारवाईची मागणी केली. रेल्वे कर्मचारी आणि दलाल यांच्या संगनमतामुळे प्रवाशांची लूट सुरू असल्याचा आरोप होत आहे. पिंटू बांगर यांनी स्टेशनला भेट दिली असता, काउंटरवर तिकीट मिळत नसताना दलाल मात्र फोनवरून आरक्षण करून देत असल्याचे निदर्शनास आले. एका तिकिटामागे ५०० ते ६०० रुपये अतिरिक्त रक्कम घेतली जात आहे. या गंभीर प्रकाराची माहिती बांगर यांनी माजी खासदार भावना गवळी आणि खासदार संजय देशमुख यांना दिली. देशमुख यांनी प्रकरणाची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. रेल्वे प्रशासनाने दलाल आणि सहभागी कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत आणि प्रवाशांना सुलभ सेवा द्यावी, अशी मागणी पिंटू बांगर यांनी केली आहे.

# महावितरणला पाच लाखांचा 'शॉक'

## थकबाकीपोटी नगरपरिषदेकडून कार्यालय सील, दोन विभागांतील संघर्ष चव्हाट्यावर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. 13 : उमरखेडमध्ये गुरुवारी दोन प्रमुख शासकीय विभागांतील संघर्ष शिगेला पोहोचल्याचे चित्र पाहायला मिळाले. महावितरण कार्यालयाकडे नगरपरिषदेच्या मालमत्ता कराची तब्बल साडेपाच लाख रुपयांची थकबाकी असल्याने, पालिकेच्या पथकाने दुपारी थेट महावितरणचे कार्यालयच सील (अटकावणी) केले. या कारवाईनंतर काही वेळातच शहराची बत्ती गुल झाल्याने एकच खळबळ उडाली. दोन विभागांच्या या वादात सामान्य नागरिकांना मात्र अंधाराचा सामना करावा लागला असून, प्रशासकीय वसुलीच्या या कारवाईची शहरात जोरदार चर्चा सुरू आहे.**



> **'नगरपरिषदेने थकीत करापोटी आमचे संपूर्ण कार्यालय सील केले आहे. कार्यालयात प्रवेश नसल्याने कर्मचारी काम करू शकत नाहीत. यामुळे तांत्रिक बिघाड झाल्यास तो दुरूस्त करणे किंवा शहरातील वीजपुरवठा सुरळीत करणे, यामध्ये मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत.'**
>
> **- प्रशांत आंबटकर,**
> **उपकार्यकारी अभियंता, महावितरण, उमरखेड**

उमरखेड नगरपरिषदेने कर वसुलीसाठी आक्रमक भूमिका घेतली असून, त्याचा पहिला फटका महावितरणला बसला आहे. येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या उपविभागीय कार्यालयाकडे (मालमत्ता क्रमांक 199, वॉर्ड क्र. 18) नगरपरिषदेचा मोठ्या प्रमाणावर कर थकीत होता. यामध्ये मागील थकबाकी 3 लाख 32 हजार 432 रुपये, चालू वर्षाची कर रक्कम 1 लाख 17 हजार 048 रुपये आणि दंडाची रक्कम 70 हजार 728 रुपये अशी एकूण 5 लाख 43 हजार 558 रुपयांची रक्कम महावितरणकडे प्रलंबित होती. नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 150 अन्वये मे 2025 मध्येच महावितरणला मागणी देयक बजावले होते. त्यानंतर, पुन्हा 4 फेब्रुवारी रोजी स्मरणपत्र देऊनही महावितरणने कराचा भरणा केला नाही. अखेर, वारंवार सूचना देऊनही दखल घेतली जात नसल्याने, मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांच्या आदेशानुसार गुरूवारी दुपारी 1:30 वाजता पालिकेच्या पथकाने धडक कारवाई केली. प्रशासनाने कायद्यातील तरतुदीनुसार महावितरणच्या कार्यालयावर 'अटकावणी'ची प्रक्रिया पार पाडली व कार्यालय सील केले. मात्र, आपत्कालीन सेवा बाधित होऊ नये म्हणून केवळ एक खोली उघडी ठेवण्यात आली. या कारवाईनंतर काही वेळातच शहरातील वीजपुरवठा खंडित झाला. वीज गेल्याने आणि कार्यालय सील असल्याने दुरुस्तीच्या कामात व्यत्यय आला, ज्यामुळे दोन विभागांतील हा संघर्ष आता थेट नागरिकांच्या दारात पोहोचला आहे. ही कारवाई मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली कर अधीक्षक सुनील वसमतकर, पाणीपुरवठा अभियंता संदेश मोरे, सहाय्यक कर अधीक्षक सत्यजित रावळे, कपिल नल्लेवार, कृष्णा कदम, अजय राठोड, कृष्णा लामटिळे आणि श्याम वासमवार यांच्या पथकाने पार पाडली.

## सावरगाव येथे एनएसएस शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; ग्रामविकासाचे धडे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. १३ :** यवतमाळ येथील सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकातर्फे सावरगाव येथे ९ ते १५ फेब्रुवारीदरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शाश्वत विकासासाठी पाणी व्यवस्थापन या विषयावर आधारित या शिबिरात ग्रामस्वच्छता आणि जलसंधारणाचे उपक्रम राबवून युवकांमध्ये सामाजिक जाणीव रुजवली जात आहे.

सावरगाव येथील जिल्हा परिषद शाळेत सुरू असलेल्या या शिबिराचे उद्घाटन महेश चव्हाण यांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रमाला प्राचार्य रिमा पाटे, कार्यक्रम अधिकारी विक्रांत जाधव, सहकार्यक्रम अधिकारी कल्पना राजनडेकर, ग्रामविकास अधिकारी रुपेश अंधारे, तलाठी प्रियांका हांडे आणि सामाजिक कार्यकर्ते गणेश आंबेकर उपस्थित होते. तसेच ग्रामपंचायत कर्मचारी आशिष भुजाडे, सरपंच इंदिरा डोणोडे, उपसरपंच शंकर बुचाडे, वैद्यकीय अधिकारी सुशिल पवार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय शिरसाट, सदस्य जागीरसिंग काजी आणि मुख्याध्यापक विलास किनकेकर यांची उपस्थिती लाभली. शिबिराचा मुख्य विषय 'शाश्वत विकासासाठी युवा : पाणी व्यवस्थापन आणि पडिक जमीन विकास' हा आहे. स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छता, श्रमदान, पाणी अडवा-पाणी जिरवा जनजागृती, आरोग्य मार्गदर्शन आणि वृक्षारोपण असे उपक्रम राबवले. ग्रामस्थांनीही याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत ग्रामविकासात पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

## जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत आर्णीच्या मूकबधिर विद्यालयाची बाजी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. १३ :** यवतमाळ जिल्हा परिषद आणि जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाच्यावतीने आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत आर्णीच्या स्व. वसंतराव नाईक मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळविले. धावणे आणि पोहण्याच्या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी पारितोषिके पटकावली आहेत.

यवतमाळ येथे दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील ३५ दिव्यांग शाळांमधील ३०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. यात आर्णीच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात आपला ठसा उमटवला. ८ ते १२ वयोगटात १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत सेजल मनोहर चाफले हिने तृतीय क्रमांक पटकाविला. तसेच युवराज रमेश मुधोळकर यानेही १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत तृतीय क्रमांक मिळविला. १३ ते १६ वयोगटात कल्याणी कैलास पवार हिने पोहण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक




पटकावून शाळेचे नाव उंचावले. क्रीडा स्पर्धेसोबतच सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कोळीगीताला उपस्थितांनी दाद दिली. या यशाबद्दल जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी मंगला मून, संस्था सचिव अनिल आडे, मार्गदर्शक किशोर आडे, मुख्याध्यापक प्रेमदास जाधव, विशेष शिक्षक सचिन यंबरवार, विनोद थूल, जाकीर बेग मिर्झा, भीमराव भवरे आणि रमेश मुर्खे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## पांढरकवडा येथे शेषराव डोंगरे यांचा सन्मान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. १३ :** येथील संत गजानन महाराज संस्थानमध्ये उमरी पठारच्या दोला महाराज वृद्धाश्रमाचे संस्थापक शेषराव डोंगरे यांचा सन्मान करण्यात आला. गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पूर्णचंद्र गाडगे, दिलीप गंगशेट्टीवार आणि नितीन माथने यांच्या हस्ते ३५ वर्षांच्या निस्वार्थ वृद्धसेवेसाठी त्यांना गौरवण्यात आले.

कार्यक्रमात शाल, श्रीफळ आणि मानपत्र देऊन डोंगरे यांचा सत्कार झाला. यावेळी दीपक भूता यांनी ५ हजार, तर दिलीप गंगशेट्टीवार यांनी २ हजार रुपयांची मदत दिली. उमरी पठारसारख्या खेड्यात डोंगरे आणि त्यांचे पुत्र जयप्रकाश १६० निराधार वृद्धांचा सांभाळ करत आहेत. ५५ वृद्ध अंथरुणाला खिळलेले असूनही शासनाकडून केवळ २५ जणांचे अनुदान मिळते. उर्वरित १३५ जणांचा खर्च लोकसहभागातून केला जातो. सत्काराला उत्तर देताना डोंगरे यांनी आई-वडिलांची सेवा करा, त्यांना वृद्धाश्रमात पाठवू नका, असे भावनिक आवाहन केले.

## बाभुळगाव जि. प. शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

### चिमुकल्यांच्या कलाविष्काराने प्रेक्षक झाले मंत्रमुग्ध!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बाभुळगाव, दि. १३ :** स्थानिक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी शाळेचे तीन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाले. या रंगारंग सोहळ्याचे उद्घाटन गटविकास अधिकारी उज्वला ढोले यांच्या हस्ते झाले, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालाजी संस्थेचे अध्यक्ष डॉ. रिकबचंद तातेड हे होते. चिमुकल्यांच्या अदाकारीने आणि कलागुणांनी उपस्थित प्रेक्षक भारावून गेले.




या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष श्रीकांत कापसे, माजी सभापती प्रकाशचंद छाजेड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सतीश मानलवार, नगर पंचायत उपाध्यक्ष श्याम जगताप, मुख्याधिकारी डॉ. पल्लवी सोटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचा प्रारंभ मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाला. शाळेचे ज्येष्ठ शिक्षक प्रशांत भुराने यांनी आपल्या प्रास्ताविकातून शाळेच्या प्रगतीचा आलेख मांडला. १८६२ मध्ये स्थापित झालेली ही ऐतिहासिक शाळा आजही खाजगी शाळांना टक्कर देत असून, नर्सरी ते आठवीपर्यंतचे शिक्षण येथे दर्जेदार पद्धतीने दिले जाते. शिष्यवृत्ती आणि महादीप परीक्षेत विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर यश मिळवून शाळेचा पट दरवर्षी वाढवल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या शैक्षणिक दर्जाचे कौतुक केले. स्नेहसंमेलनाचे मुख्य आकर्षण ठरले ते विद्यार्थ्यांनी सादर केलेले सांस्कृतिक कार्यक्रम. चिमुकल्यांनी समूह नृत्य, एकल नृत्य, गायन आणि नाट्यप्रयोगातून आपल्या सुप्त गुणांचे आणि सर्जनशीलतेचे दर्शन घडवले. विविध सामाजिक विषयांवरील नाटिका आणि प्रश्नमंजुषा कार्यक्रमाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली बोरकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंकुश सोयाम, उपाध्यक्ष लता सौसाकडे, सदस्य शशिकांत थोटे, तसेच शिक्षक संतोष लिचडे, राजेश गोसावी, शाम लोखंडे, ममता बिंनोड, प्रगती चिंचे, संध्या लांडे, सुनीता जयसिंगपुरे आणि सर्व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## फुलसावंगीमध्ये 'जिओ'ची सेवा कोलमडली

### दोन दिवसांपासून नेटवर्क ठप्प, ग्राहक 'नॉट रिचेबल'!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. १३ :** आजच्या डिजिटल युगात इंटरनेट हा श्वास बनला असताना, फुलसावंगी परिसरात मात्र रिलायन्स जिओची सेवा गेल्या ४८ तासांपासून पूर्णपणे कोलमडली आहे. नेटवर्क नसल्याने हजारो ग्राहकांचा संपर्क तुटला असून, महागडे स्मार्टफोन केवळ 'शोभेची वस्तू' बनले आहेत. यामुळे ऑनलाईन व्यवहार ठप्प झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



फुलसावंगी परिसरातील जिओ ग्राहकांसाठी गेले दोन दिवस अत्यंत मनस्तापाचे ठरले आहेत. 'डिजिटल इंडिया'चे स्वप्न दाखवणाऱ्या जिओचे टॉवरच रेंज नसल्याने 'सिग्नल' दाखवत नाहीत. परिणामी, केवळ फोन कॉल्सच नाही, तर हायस्पीड इंटरनेटवर अवलंबून असलेली सर्व कामे ठप्प झाली आहेत. संपर्क क्रांतीचा दावा करणाऱ्या या कंपनीची सेवा खंडित झाल्याने गुगल पे, फोन पे यांसारख्या युपीआय सेवा पूर्णपणे बंद पडल्या आहेत. यामुळे छोट्या व्यापाऱ्यांपासून ते सामान्य ग्राहकांपर्यंत सर्वांचेच आर्थिक व्यवहार रखडले आहेत. रोखीची सवय मोडलेल्या नागरिकांना आता पैशांच्या देवाणघेवाणीसाठी अडचणी येत आहेत. तसेच, घरगुती आणि व्यावसायिक कामांसाठी वापरली जाणारी सेवाही विस्कळीत झाल्याने 'वर्क फ्रॉम होम' करणारे कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. ग्राहकांनी हजारो रुपये खर्च करून घेतलेले महागडे ५-जी हँडसेट सध्या केवळ म्युझिक प्लेयर म्हणून वापरावे लागत असल्याची तिखट प्रतिक्रिया उमटत आहे. "आम्ही वेळेवर रिचार्ज करतो, मग सेवेच्या बाबतीत ही टाळाटाळ का?" असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. विशेष म्हणजे, ४८ तास उलटूनही कंपनीकडून तांत्रिक बिघाडाबाबत कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. दुर्गम भागातील नेटवर्कची समस्या नेहमीची असली तरी मुख्य बाजारपेठेत दोन दिवस सेवा बंद राहणे हा चिंतेचा विषय आहे. यावर प्रतिक्रिया देताना त्रस्त ग्राहक नरेंद्र शिंदे म्हणाले की, "आजच्या काळात वीज आणि पाण्याइतकीच इंटरनेटची गरज आहे. जिओने आपली सेवा सुरळीत न केल्यास ग्राहकांना अन्य कंपनीचा पर्याय शोधावा लागेल." त्यामुळे कंपनीने ही 'निर्जीव' झालेली सेवा त्वरित 'सजीव' करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## शिवजयंतीनिमित्त व्याख्यान, रॅलीसह विविध स्पर्धा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. १३ :** घाटंजी येथील शिवतीर्थ खापरी नाका येथे शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने १८ आणि १९ फेब्रुवारी रोजी व्याख्यान, रॅली आणि विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त होणाऱ्या या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण आणि मनोरंजनाचे कार्यक्रम पार पडणार आहेत.

घाटंजीमध्ये दोन दिवसीय शिवजयंती उत्सवाची जय्यत तयारी झाली आहे. १८ फेब्रुवारीला संदीप धुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली आणि जितेंद्र मोघे यांच्या हस्ते उत्सवाचे उद्घाटन होईल. यावेळी अभिषेक ठाकरे, शैलेश इंगोले, संजय गोडे, बाळू खांडरे, आकाश राठोड, कल्पना काकडे, संदीप बिबेकार उपस्थित राहतील. सायंकाळी लोकगीतांवर आधारित राज्यस्तरीय समूह नृत्य स्पर्धा होईल. १९ फेब्रुवारीला सकाळी भव्य रॅली, वेशभूषा स्पर्धा आणि लाठीकाठी, तलवारबाजीची प्रात्यक्षिके होतील. सायंकाळी ५ वाजता सामान्य ज्ञान स्पर्धा आणि ६ वाजता ज्ञानेश बडगुजर यांचे व्याख्यान होईल. या सत्राला विजय साळवे, केशव ठाकरे, राजू घोडके, प्रमोद धांदे, रणजीत बोबडे, विजया धस उपस्थित राहतील. रात्री ७ वाजता हंसराज अहीर यांच्या अध्यक्षतेखाली आणि राजू तोडसाम यांच्या हस्ते आयएएस आदिबा अशफाक अहेमद यांना 'वीर राजे संभाजी पुरस्कार' देऊन गौरवण्यात येईल. यावेळी परेश कारिया, सोनल ठाकरे, आशिष लोणकर उपस्थित राहतील. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार झाल्यानंतर रात्री ८ वाजता महेश सोनेकर व संजय बिहाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत भारत गणेशपुरे आणि प्रवीण तिखे यांच्या विनोदी कार्यक्रमाने उत्सवाची सांगता होईल.

अजिंक्य भारत
आपलं यवतमाळ
शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com


# यवतमाळ पोलिस भरतीचा 'रणसंग्राम' सुरू

## १६१ जागांसाठी १३,७८० हून अधिक उमेदवारांची मैदानात झुंज

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१३ : यवतमाळ जिल्हा पोलिस दलात पोलिस शिपाई आणि पोलिस बँड पथकातील रिक्त पदांसाठी सुरू असलेल्या भरती प्रक्रियेला उमेदवारांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. या भरती प्रक्रियेच्या सद्य:स्थितीबाबत जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी आज, शुक्रवारी (दि. १३) पिंपळगाव (पळसवाडी) कॅम्प परिसरातील मैदानावर पत्रकारांशी संवाद साधून सविस्तर माहिती दिली.**





पोलिस भरती २०२४-२५ अंतर्गत १५० पोलिस शिपाई आणि ११ बँड्समन अशा एकूण १६१ जागांसाठी ही भरती प्रक्रिया राबविली जात आहे. या जागांसाठी जिल्ह्यासह इतर भागांतून तब्बल १३,७८० पेक्षा अधिक उमेदवारांनी अर्ज केले असून, दररोज हजारो उमेदवार शारीरिक चाचणीसाठी मैदानावर घाम गाळत आहेत. ११फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे ५:३० वाजता पोलिस कवायत मैदानावर या भरती प्रक्रियेचा प्रत्यक्ष प्रारंभ झाला. पहिल्याच दिवशी ७५० उमेदवारांनी शारीरिक चाचणी दिली असून २१ फेब्रुवारीपर्यंत सुमारे १,२०० उमेदवारांची चाचणी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. १५ फेब्रुवारी (रविवार) आणि १९ फेब्रुवारी (शिवजयंती) रोजी भरती प्रक्रिया बंद राहणार आहे. उमेदवारांच्या शारीरिक चाचणीसाठी प्रशासनाने मैदानावर चोख व्यवस्था केली आहे. १६०० मीटर आणि १०० मीटर धावण्यासाठी अद्ययावत ट्रॅक, गोळाफेक मैदान तसेच उंची आणि छाती मोजणीसाठी स्वतंत्र कक्ष उभारले आहेत. विशेष म्हणजे, कागदपत्र पडताळणीसाठी स्वतंत्र टेंटची सोय करण्यात आली आहे. भरती प्रक्रियेते पारदर्शकता राखण्यासाठी संपूर्ण मैदानावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर असून प्रत्येक उमेदवाराची बायोमेट्रिक हजेरी घेतली जात आहे. धावणाऱ्या उमेदवारांच्या अचूक वेळेसाठी त्यांच्या पायाला स्कॅनरयुक्त 'ट्रॅक पट्टी'बांधली जात आहे.

**'यवतमाळ पोलीस भरतीची ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत पारदर्शक, नि:पक्ष आणि गुणवत्ता आधारित पद्धतीने राबविली जात आहे. तांत्रिक साधनांमुळे यात मानवी हस्तक्षेपाला वाव नाही. त्यामुळे कोणत्याही उमेदवाराने भरतीसाठी कोणाही मध्यस्थाला पैसे देऊ नये किंवा कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करू नये. केवळ स्वतःच्या मेहनतीवर विश्वास ठेवावा.'**



**-कुमार चिंता,**
**जिल्हा पोलिस अधीक्षक, यवतमाळ.**

### मार्च महिन्यात होणार लेखी परीक्षा

**मैदानी चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची मार्च महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात लेखी परीक्षा घेण्याचे नियोजन आहे. भरती प्रक्रियेच्या ठिकाणी ५०० पोलिस कर्मचाऱ्यांचा कडक बंदोबस्त तैनात असून, पोलिस कवायत मैदान परिसरात सकाळी फिरण्यास येणाऱ्या नागरिकांना तूर्त बंदी घालण्यात आली आहे. गुणवत्ता यादीनुसार टप्प्याटप्प्याने अंतिम निवड प्रक्रिया पार पडणार असून, यवतमाळच्या तरुणांमध्ये पोलिस दलात सामील होण्यासाठी मोठी उत्सुकता दिसून येत आहे.**

## महत्वाचे

### दरवाजा तोडून घरात तोडफोड

**यवतमाळ :** जुन्या वादातून एका इसमाने महिलेच्या घराचा दरवाजा कुऱ्हाडीने तोडून घरातील साहित्याची नासधूस केल्याची घटना माळीपुरा भागात घडली. २९ जानेवारी रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास आरोपी मेहेर बेलसरे (३३) याने संगीता कामठे यांच्या घरात शिरून ५० हजार रुपयांचे नुकसान केले. आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकीही दिली. याप्रकरणी यवतमाळ शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

### कारच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर

**बाभुळगाव:** गणोरी फाटा येथे भरधाव अर्टिका कारने दुचाकीला समोरून धडक दिल्याने एक तरुण गंभीर जखमी झाला. १७ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता ही घटना घडली. आरोपी कार चालक तेजस कोडापे याने निष्काळजीपणे वाहन चालवून चेतन डडमल यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात चेतनच्या छातीला आणि मणक्याला गंभीर दुखापत झाली आहे. बाभुळगाव पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

### प्रवासादरम्यान दागिने लंपास

**वणी:** बसस्थानक परिसरातून प्रवास करताना एका वृद्ध महिलेचे ८ लाख ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोकड अज्ञात चोरट्याने लांबवली. फिर्यादी शोभा डॉगे (६५) या २० जानेवारी रोजी जनता कॉलेज चंद्रपूर बसस्थानक परिसरात असताना ही चोरी झाली. त्यांच्याकडे ८२ ग्रॅम सोन्याचे दागिने होते. याप्रकरणी ३० जानेवारी रोजी वणी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अवैध रेती वाहतूक पकडली

**झरी जामणी:** विनापरवाना रेतीचे उत्खनन करून वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर मुकुटबन पोलिसांनी कारवाई केली. मौजा दरा येथे ही कारवाई करण्यात आली. आरोपी सुशम मिलमिले आणि चंद्रकांत आगलावे हे एक ब्रास रेतीची चोरी करून वाहतूक करत असताना मिळून आले. पोलिसांनी ६ हजार रुपयांची रेती आणि ३ लाख रुपयांचा ट्रॅक्टर असा एकूण ३ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# ईशान मिनरल्स कंपनीविरोधात ग्रामस्थांचे उपोषण

## धुळीमुळे पिकांचे नुकसान, बेकायदेशीर उत्खणनाविरोधात ग्रामस्थांचा आक्रोश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**झरी जामणी, दि. १३ :** अडेगाव परिसरातील ईशान मिनरल्स कंपनीमुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून, बेकायदेशीर उत्खणनामुळे निसर्गाचा ऱ्हास होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी मंगळवारी (दि.१०) उपोषणाला सुरुवात केली आहे. गुरुवारी उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी काँग्रेसचे प्रदेश सचिव संजय खाडे यांनी सहकाऱ्यांसह उपोषण मंडपाला भेट देत आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला.

ईशान मिनरल्स कंपनी गेल्या काही वर्षांपासून अडेगाव परिसरात कार्यरत आहे. कंपनीतून निघणाऱ्या धुहीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होत आहे. काही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जात असली तरी नवनाथ महादेव क्षीरसागर यांना गेल्या ११ ते १२ वर्षांपासून कोणतीही भरपाई मिळालेली नाही. त्यामुळे दरवर्षी ६० हजार रुपये नुकसान भरपाई तसेच आधीच्या नुकसानीसाठी ३ लाख ३० हजार रुपये देण्याची मागणी करण्यात आली आहे. ग्रामस्थांनी बफर झोनमधील उत्खणन त्वरित थांबवून उत्खणन केलेल्या परिसराचे पुनर्भरण करण्याची मागणी केली आहे. डी-वॉटरिंगमुळे परिसरात पाण्याची समस्या निर्माण झाल्याने ८० फुटाखालील डी-वॉटरिंग थांबवावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. कंपनीतून मोठ्या प्रमाणात धुळ निघत असल्याने रस्त्यावर नियमितपणे वॉटर टँकरद्वारे पाणी मारावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. आंदोलनाला संजय खाडे यांच्यासोबत तेजराज बोढे, मोहन पानघाटे, नितेश ठाकरे यांच्यासह काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते. संजय खाडे यांनी आंदोलनाला पाठिंबा देताना इशारा दिला की, अडेगावच्या ग्रामस्थांचा लढा हा अन्यायाविरुद्धचा आवाज आहे. ईशान मिनरल्स कंपनीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असताना प्रशासनाने यात तातडीने हस्तक्षेप करावा. ग्रामस्थांच्या मागण्या मान्य कराव्यात. काँग्रेस पक्ष या आंदोलनाच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. शेतकऱ्यांचे नुकसान थांबवले नाही तर काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून ग्रामस्थांसोबत लढा देईल.

# अखेर 'त्या' मुख्याध्यापकासह शिक्षकावर गुन्हा

## 'तेरी यलगार कहाँ है...' गाण्यावरून खळबळ, देशविरोधी कृत्य

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. १३ :** येथील नगरपरिषदेच्या उर्दू शाळेत प्रजासत्ताक दिनी विद्यार्थ्यांकडून पाकिस्तानी आणि देशविरोधी समजल्या जाणाऱ्या गाण्यावर नृत्य करवून घेतल्याप्रकरणी अखेर खळबळजनक कारवाई झाली आहे. भाजप नगरसेवक गोपाल कलाने यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी शाळेचे मुख्याध्यापक आणि एका शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल केल्याने शिक्षण क्षेत्रात आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

उमरखेड नगरपरिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या अब्दुल गफूर शाह उर्दू शाळा क्रमांक २ मध्ये २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांकडून 'ए मर्द-ए-मुजाहिद तेरी यलगार कहाँ है' या गाण्यावर नृत्य सादरीकरण करण्यात आले. तक्रारदार यांच्या मते, हे गाणे पाकिस्तानात लष्करी आणि राष्ट्रीय समारंभात वापरले जाते, जे तेथील नागरिकांना व सैनिकांना युद्धासाठी प्रवृत्त करणारे आहे. अशा आक्षेपार्ह आणि प्रतिबंधित स्वरूपाच्या गाण्यावर भारतात नृत्य सादर करणे हे गंभीर कृत्य आहे. या प्रकारामुळे समाजात धार्मिक तेढ निर्माण होऊ शकते आणि भारताच्या सार्वभौमत्वाविरोधात भावना भडकवल्या जाऊ शकतात, असा आरोप भाजप नगरसेवक गोपाल कलाने यांनी केला होता. विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर देशविरोधी विचार रुजविण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगत त्यांनी २ फेब्रुवारी रोजीच पोलिसांत तक्रार देऊन संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. पोलिसांनी या संवेदनशील प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत सखोल चौकशी केली आणि वरिष्ठांचे मार्गदर्शन मागवले. त्यानंतर १२ फेब्रुवारी रोजी उमरखेड पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १७३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. यामध्ये शाळेचे मुख्याध्यापक अन्सारउल्ला खान अब्दुल मन्नान खान (वय ५५, रा. तातारशहा वार्ड) आणि या वादग्रस्त गीताच्या नृत्याची रचना करणारे शिक्षक मोहम्मद फिरोज आशाजी (वय ५४, रा. रहीमनगर) यांचा समावेश आहे. या कारवाईमुळे शहरात चर्चेला उधाण आले असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# हरविलेली रोकड असलेली बॅग मूळ मालकाला केली परत

## पत्रकाराचा प्रामाणिकपणा; तहसील कार्यालयातील घटना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.१२ :** येथील गजबजलेल्या तहसील कार्यालय परिसरात ४० हजार रुपये रोख रक्कम असलेली बेवारस बॅग सापडल्यानंतर, ती तातडीने प्रशासनाकडे सुपूर्द करून पत्रकार हरिओमसिंह बघेल यांनी प्रामाणिकपणाचा एक नवा आदर्श घालून दिला आहे. त्यांच्या या कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

वरुड (भक्त) येथील रहिवासी तथा माजी सरपंच सुरेश पांडुरंग काळे हे आपल्या कामानिमित्त तहसील कार्यालयात आले होते. यावेळी त्यांची ४०हजार रुपये असलेली पिशवी परिसरात गहाळ झाली. दरम्यान, ही पिशवी पत्रकार हरिओमसिंह बघेल यांच्या निदर्शनास आली. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता आपली सामाजिक जबाबदारी ओळखून ती पिशवी तहसील प्रशासनाकडे जमा केली. तहसीलदार वैशाख वाहूरवाघ यांनी खातरजमा करून ती पिशवी मूळ मालक सुरेश काळे यांना परत केली. आपली मोठी रक्कम सुरक्षित परत मिळाल्याने काळे यांनी बघेल आणि प्रशासनाचे आभार मानले. यावेळी नायब तहसीलदार उदय तुंडालवार, एस. एस. अदमुलवार यांच्यासह पत्रकार प्रमोद कुदळे, राजेश माहेश्वरी, रशिद मलनास आणि दैनिक 'अजिंक्य भारत'चे विशेष प्रतिनिधी मनोज माघाडे आदी उपस्थित होते. आजच्या काळातही प्रामाणिकपणा आणि पत्रकारितेची मूल्ये जिवंत असल्याची प्रचिती या घटनेतून आली आहे.

# यवतमाळात दुमदुमणार 'तिरुपती बालाजी'कथेचा जयघोष

## १७ ते २१ फेब्रुवारीदरम्यान फुलणार भक्तीचा मळा, धार्मिक विधींनी कथेचा होणार श्रीगणेशा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी





**यवतमाळ, दि.१३ :** शहराच्या इतिहासात प्रथमच आराध्य दैवत भगवान तिरुपती बालाजी यांना समर्पित भव्य कथा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. लकडगंज येथील बालाजी लॉन परिसरातील 'बालाजी धाम' येथे दि. १७ ते २१ फेब्रुवारी २०२६ दरम्यान हा भक्तीचा मळा फुलणार असून, अहिल्यानगर येथील गौडीय वैष्णवाचार्य पंडित श्री युगलाशरणजी महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून भाविकांना या कथेची 'याचि देही, याचि डोळा' अनुभूती मिळणार आहे.

या पाच दिवसीय महोत्सवाची सुरुवात मंगळवारी, १७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता सिव्हिल लाईन्स येथील श्री गोवर्धननाथजी हवेली येथून निघणाऱ्या भव्य शोभायात्रेने होणार आहे. मंगलमय वातावरणात ही मिरवणूक कथास्थळी पोहोचल्यावर धार्मिक विधींनी कथेचा श्रीगणेशा होईल. महोत्सवाची वेळ दररोज सकाळी ९ ते ११ आणि दुपारी २ ते सायंकाळी ६ अशी निश्चित करण्यात आली आहे. कथेच्या विविध सत्रांमध्ये भगवान बालाजींच्या लीलांचे वर्णन केले जाणार आहे. पहिल्या दिवशी प्रभूंचा जन्मोत्सव, दुसऱ्या दिवशी कल्याण उत्सव (विवाह सोहळा), तिसऱ्या दिवशी दीपोत्सव, चौथ्या दिवशी भक्तचरित्र आणि खिरण उत्सव रंगणार आहे. तर पाचव्या दिवशी, २१ फेब्रुवारीला सकाळी ९ ते ११ या वेळेत रासलीलेने कथेची सांगता होईल. यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. आंध्र प्रदेशातील तिरुमला येथे जाऊन दर्शन घेणे ज्यांना शक्य नाही, अशा यवतमाळकरांसाठी ही पर्वणीच ठरणार आहे. या महायज्ञाच्या यशस्वीतेसाठी मुख्य सूत्रसंचालिका पूनम जाजू, वीणा बेलोरकर, आरती मुक्कावार, घनश्याम बागडी, ॲड. प्रमोद मुंधडा, जीवन लाभसेटवार, हरगोविंद चांडक, मनीषा बागडी, संगीता लोहिया, पूनम झुनझुनवाला आणि सुनील अग्रवाल यांच्यासह आयोजन समितीचे सदस्य परिश्रम घेत आहेत. शहरवासियांनी या धार्मिक सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मिटनापूरच्या आखाड्यात वाशीम आणि परभणीचा डंका

## राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत परराज्यातील संघांचीही झुंज

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**बाभूळगाव, दि. १३ :** तालुक्यातील मिटनापूर येथे 'जोशीला क्रीडा मंडळा'तर्फे आयोजित भव्य खुल्या कबड्डी स्पर्धेचा थरार नुकताच हजारो क्रीडाप्रेमींच्या साक्षिने संपन्न झाला. फायबर मॅटवर रंगलेल्या या अटीतटीच्या सामन्यांत पुरुष गटात वाशीमच्या प्रशिक्षण केंद्राने १ लाख ११ हजाराचे प्रथम पारितोषिक पटकावले, तर महिला गटात परभणीच्या आनंदवन गंगाखेड संघाने बाजी मारत विजेतेपदावर नाव कोरले.

मिटनापूर येथील जोशीला क्रीडा मंडळाने ८ ते १० फेब्रुवारी दरम्यान या भव्य कबड्डी महोत्सवाचे आयोजन केले होते. या स्पर्धेची व्याप्ती मोठी असून यात केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर हरियाणा, दिल्ली, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि चेन्नईसारख्या राज्यांतून आलेल्या नामांकित संघांनी सहभाग नोंदविला. रात्रीच्या वेळी दुधाळ प्रकाशातील नेत्रदीपक विद्युत रोषणाई, फायबर मॅटचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे मैदान आणि युट्यूबवरील लाईव्ह प्रक्षेपणामुळे या स्पर्धेला एका मोठ्या उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले होते. अंतिम सामन्यात प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोहोचली होती. पुरुष गटात वाशीमच्या संघाने आपल्या चपळ चढायांनी मैदान गाजवत जेतेपद पटकावले. तर उत्तर प्रदेशच्या मातोश्री बाळेगाव संघाला द्वितीय, शिर्डीच्या साई क्रीडा मंडळाला तृतीय आणि हरियाणाच्या एन.एन.एस. स्पोर्टिंग क्लबला चतुर्थ स्थानावर समाधान मानावे लागले. महिला गटात परभणीच्या आनंदवन गंगाखेड संघाने ३१ हजारांचे प्रथम पारितोषिक जिंकून इतिहास रचला. यात मध्य प्रदेशातील बैतूल खेल विभाग संघ द्वितीय, नागपूरचा मराठा लॉन्सर तृतीय आणि चेन्नईचा भावनादास संघ चतुर्थ स्थानावर राहिला. विजेत्यांना आकर्षक ट्रॉफी, रोख रक्कम आणि वैयक्तिक डिजिटल घड्याळे देऊन गौरवण्यात आले. या स्पर्धेला माजी मंत्री प्रा. वसंत पुरके आणि प्रसिद्ध उद्योजक गजानन काळे यांनी विशेष उपस्थिती लावून खेळाडूंचे मनोबल वाढवले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी इम्रान खान, शाहरुख खान, जोशीला क्रीडा मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि मिटनापूर ग्रामस्थांनी घेतलेले परिश्रम फळास आले. शिस्तबद्ध नियोजन आणि प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादामुळे ही स्पर्धा बाभूळगाव तालुक्यात लक्षणीय ठरली.

# बैठकीचा भत्ता नाकारत मुख्यमंत्री सहाय्यता निधीत रक्कम वर्ग

## नगरसेविका खुशबू मेंढे यांनी घालून दिला आदर्श

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. १३ :** उमरखेड नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ८ मधील युवा नगरसेविका खुशबू पवन मेंढे यांनी राजकारणात एक वेगळा आदर्श घालून दिला आहे. त्यांनी आपल्याला मिळणारा बैठकीचा मानधन भत्ता नाकारून तो थेट मुख्यमंत्री सहाय्यता निधीत गरजू रुग्णांसाठी वर्ग करण्याचा स्तुत्य आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

उमरखेड नगरपालिकेत सर्वात कमी वयात निवडून आलेल्या खुशबू मेंढे यांनी भारतीय जनता पार्टीच्या 'राष्ट्र प्रथम' या संस्काराशी बांधील राहत हा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ च्या कलम ६१(१) अन्वये निर्वाचित नगरसेवकांना बैठक भत्ता दिला जातो. मात्र, हा भत्ता स्वत:साठी न वापरता तो गरीब आणि गरजू रुग्णांच्या उपचारासाठी कामी यावा, अशी संवेदनशील भूमिका त्यांनी घेतली. यासंदर्भात त्यांनी मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन देऊन सदर रक्कम परस्पर मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्याची विनंती केली आहे. अशा प्रकारे स्वतःचा हक्काचा भत्ता नाकारून तो जनहितासाठी देणाऱ्या त्या राज्यातील संभवतः पहिल्याच नगरसेविका ठरल्या आहेत. राजकारणाकडे केवळ सत्तेचे साधन म्हणून न पाहता समाजकारणाचे पवित्र माध्यम म्हणून पाहणाऱ्या खुशबू मेंढे यांच्या या कृतीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. त्यांच्या या निर्णयामुळे इतर लोकप्रतिनिधींसमोर एक आदर्श वस्तुपाठ निर्माण झाला आहे.